# मॅरेज पन्नाशी

## आणि इतर कथा



पांडुरंग कुलकर्णी

# मॅरेज पन्नाशी आणि इतर कथा

लेखक

पांडुरंग कुलकर्णी

■

# मॅरेज पन्नाशी आणि इतर कथा


■ **लेखक**

श्री. पांडुरंग कुलकर्णी

■ **प्रकाशक**

सौ. नीता हिरवे
संवेदना प्रकाशन,
चिंचवड, पुणे



© **सौ. सुनिता कुलकर्णी**



■ **अक्षर जुळणी**

संवाद ट्रेडप्रिंट्स

■ **मुद्रक**

संवाद ट्रेडप्रिंट्स
५९५, शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
दूरभाष : ०२०-२४४८५६३२

■ **मुखपृष्ठ**

संजीव मुळ्ये

■ **प्रथम आवृत्ती**

६ जून २०१८

■ **मूल्य : रु. २४०/-**

# मॅरेज पन्नाशी

## हे ईपुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मॅरेज पन्नाशी

लेखक: पांडुरंग कुलकर्णी.

पत्ता: १८/७ (वेस्ट), प्रतीक नगर,

येरवडा, पुणे: ४११००६.

संपर्क:९८२३०७९९९८/९८५०३९६७३७

pandukul43@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

विनामूल्य ई वितरण :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP :

https://play.google.com/store/apps/details?id

=com.esahity. www. esahitybooks

**प्रकाशन : १० जुलै २०१८**

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# अर्पणपत्रिका

'माझे लग्न' हीसुद्धा माझ्या आयुष्यातली एक

अविस्मरणीय, सत्य व शुभ घटना आहे.

माझ्या लग्नाची  जशी घडली तशी कथा मी

या संग्रहात समाविष्ट केली आहे.

माझ्या लग्नाला नुकतीच ५१ वर्षे पूर्ण झाली आहेत,

आणि म्हणून माझे हे चौथे पुस्तक,

माझ्यासारख्या दौराग्रस्त, कलंदर कलावंताला,

सतत ५१ वर्षे सहन करणारी माझी प्रिय पत्नी

!! सौ. सुनिता हीस प्रेमपूर्वक !!

!!! अर्पण !!!

**पांडुरंग कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) मॅरेज पन्नाशी ........................................................ ९

२) देवा, तू सुद्धा? ..................................................... १५

३) ऑडिशन ............................................................... ५२

४) बट्ट्याबोळ .............................................................. ६३

५) कंजूष ................................................................... ९५

६) शौर्य ..................................................................... १०१

७) अस्वस्थ .................................................................. १११

८) फायनल नोटीस ......................................................... ११९

९) नानाचा सदरा ........................................................... १२६

१०) चाँदका तुकडा ........................................................ १३३

११) कर्तव्य ................................................................. १४७

१२) मातृत्व ................................................................. १६१

# लेखकाचे मनोगत.....

तसा मी फार मोठा प्रतिभावान वगैरे लेखक आहे असे मुळीच नाही. पण कधीतरी, कुठेतरी एखाद्या सामाजिक विषयाचे किंवा अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे जंतू माझ्या डोक्यात घुसून मला अस्वस्थ करतात आणि मी लिहू लागतो आणि त्यातूनच कथा, कविता जन्माला येतात. सर्व लेखकांच्या बाबतीत असेच होत असावे असे मला वाटते. असो. तर ज्या पद्धतीने शासकीय योजना राबवल्या जातात असे ऐकले, त्या संदर्भात असेच काहीं विचार माझ्या मनात आले आणि त्यातून 'बट्ट्याबोळ' ही कथा जन्माला आली व 'जत्रा' दिवाळी अंकात ती प्रसिद्ध झाली. आमचे कलावंत आणि निर्माते मित्र शहाजी काळे यांना ती कथा भावली आणि त्या कथेवर त्याने एक व्हिडिओ फिल्म निर्माण केली आणि शेमारू कंपनीने 'बाईचं ऐका गाडीभर पैका' या नावाने ती प्रकाशित केली. आज ती यु ट्यूबवर पहाण्यास उपलब्ध आहे. आणि म्हणून मी मुद्दाम ती या संग्रहात समाविष्ट केली आहे. तसेच आजूबाजूला दिसणाऱ्या आणि ऐकू येणाऱ्या तथाकथित पुढाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या गप्पा चालू असताना ''हे असले पुढारी स्वर्गातल्या देवांना सुद्धा भ्रष्ट करतील'' असे एक वाक्य कुणीतरी बोलला. या वाक्याने माझ्या डोक्यात असेच थैमान घातले आणि त्यातून 'देवा तू सुद्धा?' ही व्यंगकथा जन्माला आली आणि तीही 'जत्रा' दिवाळी अंकातच प्रसिद्ध झाली. ''या कथेवर एक मस्त फार्स होईल'' असे आमचा एक दिग्दर्शक मित्र म्हणाला आणि तो फार्स मी लिहायला घेतलाय. रंगदेवतेची कृपा असेल तर तोही लवकरच आपल्या भेटीस येईल. 'चांदका तुकडा' या कथेचे बीज कुठल्यातरी खेटून बाल्कनीज असलेल्या सोसायटीत

माझ्या डोक्यात घुसले होते आणि त्यातून जन्माला आलेली कथा 'मेरे सामनेवाली खिडकीमे' या नावाने 'अथश्री' अंकात प्रसिद्ध झाली होती. या कथेस, संवाद (नाशिक) या संस्थेचे डॉ. अ. वा. वर्टी विनोदी कथा पारितोषिक मिळाले होते आणि म्हणून मी पुन्हा ही कथा या संग्रहात ' चांदका तुकडा या नावाने समाविष्ट केली आहे. माझ्या या आणि इतर सर्वच कथा संपूर्णपणे काल्पनिक आहेत आणि त्यातल्या व्यक्ती, स्थलकाल, घटना यांचेशी कुणाचे कसले साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा हे सांगणे न लगे.

हा जरी काल्पनिक योगायोग असला तरी संवाद ट्रेडप्रिंट्सचे श्री. शैलेंद्र बोरकर यांची माझी भेट होणे, ही मात्र माझ्या साहित्य जीवनातील एक सुंदर घटना आहे. त्यांच्या माझ्या पहिल्या भेटीतच हे पुस्तक प्रिंट करून देण्याचे त्यांनी मान्य केले आणि हे पुस्तक सुबकरित्या प्रिंट झाले. त्यांचे मी आभार मानणार नाही पण आमचे हे मैत्रीसंबंध घनिष्ट होवोत अशी विनंती त्यांना जरूर करीन. मुखपृष्ठाची मी सांगितलेली संकल्पना श्री. संजीव मुळ्ये यांनी सुरेख साकार केली. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि धन्यवाद... आमचे परम मित्र श्री. मिलिंद बोरकर यांनी प्रुफे तपासून पुस्तक निर्दोष तर केलेच पण श्री. नितीन हिरवे सारखे गुणवान प्रकाशक माझ्या साहित्य जीवनात आणले याबद्दल मी त्यांना लाख लाख धन्यवाद देतो आणि हिरवे साहेब, आपण माझे पुस्तक आपण प्रकाशित करण्याचे मान्य केलेत, म्हणूनच या पुस्तकाचे प्रकाशन होत आहे यासाठी मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो आणि शेवटी पण अती महत्त्वाचे म्हणजे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांतजी देशमुख यांनी केवळ एका व पहिल्याच भेटीत या कथासंग्रहास प्रस्तावना देण्याचे मान्य केले हे मागील जन्मीचे काही जुने ऋणानुबंध असावेत असे मला वाटते. याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे. वरील तीनही पहिल्या भेटी हा माझ्या आयुष्यातला सुंदर योग आहे त्याबद्दल आभार त्या परमेश्वराचे.

**– पांडुरंग कुलकर्णी**

❒ ❒ ❒

# प्रस्तावना....

पांडुरंग हरी कुलकर्णी हे व्यामिश्र जीवनाचे सर्व रंग पाहिलेले असे अनुभव संपन्न व्यक्तिमत्व आहे. आकाशवाणी, दूरदर्शन व रंगभूमीवर त्यांचा पाच दशकांचा सक्रिय सहभाग आहे. त्यामुळे ते अंतर्बाह्य कलावंत- लेखक आहेत. त्यांचा ताजा '**मॅरेज पन्नाशी आणि इतर कथा**' हा कथासंग्रह वाचकांच्या भेटीस येत आहे. तो वाचताना लेखकाची अनुभव समृद्धी आणि रसरसून जीवन सर्वार्थानं जगलं असेल्याची जाण यातील एकेक कथा वाचताना वाचकांना जाणवते.

प्रस्तुत पुस्तकातील कथाविश्व आणि जीवन हे नागरी आणि ग्रामीण असे दोन्ही प्रकारचे आहे. घटना प्रधानता आणि निवेदनापेक्षा संवादांवर भर हे कुलकर्णी यांच्या कथांचे प्रधान वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ 'देवा तू सुद्धा?' 'ऑडिशन' व 'चांदका तुकडा' या कथा घ्या. त्यातल्या रसाळ गोष्टी वेल्हाळपणा आणि जणु श्रोत्यांना लेखक त्या कथा - ते किस्से/संवाद रसाळपणे प्रत्यक्ष सांगत आहे असे कथा वाचताना वाचकांना जाणवत रहाते. तशी ही कथन शैली आजच्या आधुनिक वाचकांना जुनी वाटेल, पण कथा या वाङ्मय प्रकारासाठी तिचे महत्व कायमचे असते, असणार आहे. या कथा वाचकांना रंजन आणि बोध दोन्ही समर्थपणे देतात.

आज जगात व देशात भ्रष्टाचाराचे थैमान माजले आहे व काही सराईत माणसं कोणत्याही प्रसंगी लाच खाणं सोडत नाहीत. पांडुरंग हरी कुलकर्णी यांनी 'देवा, तू सुद्धा' मध्ये अण्णासाहेब काळधंदे या लाच देऊन नरका ऐवजी मेल्यानंतर स्वर्गलोकी गेलेल्या व तिथंही शंकराला फसवून 'भ्रष्टाचार करणाऱ्या इरसाल पुढाऱ्याची अनैतिक करणी विनोदी ढंगात प्रकट होते. यावर खरेतर फर्मास पैकी वगनाट्य होऊ शकेल. 'बट्ट्याबोळ' ही अशीच ग्रामीण भागातील शासकिय योजनांचा नागरिकांना लाभ न देता भ्रष्ट पुढारी कशाप्रकारे स्वतःची तुंबडी भरतात व त्यांचं बिंग कसं उघडं पडतं, ही फिल्मी ढंगाची कथा आहे.

'कंजुष' कथेमधला कंजुष माणूस हा किती निःस्वार्थी व समाज परोपकारी होता याचं दर्शन घडवून मानवी व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळाच पैलू कुलकर्णी दाखवतात. 'मातृत्व' ही अशी रंजन घटनाप्रधान व दोन कलाटण्यांनी सजलेली कथा आहे.

हा कथा संग्रह वाचताना पांडुरंग हरी कुलकर्णी यांची गोष्टीवेल्हाळ शैली सातत्याने जाणवते आणि कथेद्वारे वाचकांचं रंजन करायचं, हा त्यांचा लेखन धर्म जाणवतो. रंगभूमी – सिनेमा व आकाशवाणीचा प्रदीर्घ अनुभव असला तरी त्यांचं लेखन जुन्या रंजकमय कथन शैलीचं अनुसरण करणारं झालं आहे. काही कथा या निव्वळ किश्शा स्वरूपाच्या पण रंजक आहेत. कुलकर्णी कथा उत्तम रंगवतात, संवाद सहज व प्रवाही असतात, कथेमध्ये ओ. हेन्री पद्धतीनं शेवटी एक अनपेक्षितपणे धक्का असतो. त्यामुळे कथा वाचनीय होतात, पण ते पात्रांच्या अंतरंगात फारसे शिरत नाहीत. मानवी मनोव्यापार, अबोध मनाचे दर्शन आणि कथेत अनुस्युत असणाऱ्या मानवी जीवनाचा व्यामिश्रता व जटीलतेचे अनेक कंगोरे कथाबीजात असताना पकडताना दिसत नाहीत. त्यांच्या लेखन प्रतिभेची ही एक प्रकारे मर्यादा आहे, पण दुसऱ्या अर्थाने ते त्यांचे सामर्थ्य आहे. या दृष्टीने शीर्षककथा 'कंजूष व नानांचा सदरा' या कथा पहाता त्या समर्थकथा ऐवजी किस्से स्वरूपात अवतरतात. अर्थात त्या रंजक व वाचनिय आहेतच, पण पुरेशा कलात्मक होत नाहीत, असे मला त्या वाचताना वाटत राहिले. अर्थात ही तक्रार नाही, तर त्याची जाणवणाऱ्या प्रगल्भ प्रतिभेकडून अपेक्षा आहे. ते उत्साही आहेत व लेखन ही त्यांची '**पॅशन**' आहे, त्यामुळे पुढील काळात कथा लेखन करताना ते अधिक सखोल जीवन दर्शन घडवतील अशी अपेक्षा आहे. पण एकूणच हा कथा संग्रह त्यातील वैविध्यतेमुळे आणि नाट्यपूर्ण कथाबीज आणि रंजक कथनामुळे वाचनीय झाला आहे.

पुणे

**लक्ष्मीकांत देशमुख**
अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी
साहित्य संमेलन २०१८

❐ ❐ ❐

१

# मॅरेज पन्नाशी

ही कथा आहे माझ्या आणि माझ्या सख्ख्या बायकोच्या लग्नाची. कांदापोहे नाहीत, साखरपुडा की एंगेजमेन्ट काय म्हणतात– ते नाही. पत्रिका नाहीत. वऱ्हाडी वाजंत्री म्हणतात, ते नाही. आहेर देणे–घेणे नाही. जेवणावळी तर मुळीच नाहीत. तरीपण अगदी मंगलाष्टकांच्या घोषात, पूर्ण वैदिक पद्धतीने आमचा शुभविवाह पार पडला. आणि लग्न लागल्यावर आमची वरात घरी न जाता गेली ती मुंबईच्या लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनला.

खरं तर पोलीस स्टेशन मला काही नवीन नव्हतं. थांबा, कृपया गैरसमज नको. म्हणजे पोलीस स्टेशनच्या वारंवार वाऱ्या करणारा मी काही सराईत गुंड किंवा गुन्हेगार नव्हतो, तर बालपणापासून लग्न होईपर्यंतचा माझा काळ मुंबईतील वेगवेगळ्या पोलीस लाईनीत गेला होता. ह्या पोलीस लाईनी पोलीस स्टेशनच्या आवारातच असल्याने, मुंबईतील पोलीस स्टेशने माझ्या चांगल्याच परिचयाची होती.. घरची परिस्थिती यथातथाच असल्याने, अगदी प्राथमिक शाळेत असल्यापासून मी छोट्या–मोठ्या, नव्हे छोट्याच, नोकऱ्या करीत असे. नोकऱ्या करीत–करीत माझा शिरकाव महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा (रेशनिंग) विभागात झाला, तोपर्यंत जीवनाशी संघर्ष करण्यात इतका व्यग्र होतो की, स्वत:चे लग्न हा विषयच कधी माझ्या डोक्यात आला नव्हता.

किंवा कुणी तो माझ्या डोक्यात घातलाही नव्हता. पण कसा कुणास ठाऊक, अचानक तो विचार माझ्या मनात आला आणि माझे लग्न झालेसुद्धा. हे कसे झाले, ते सांगतोच तुम्हाला.

दि. १५ सप्टेंबर १९६५ हा तो दिवस होता. त्या वेळी मी सी.पी. टँक रेशनिंग ऑफिसमध्ये पोस्टिंगवर होतो. फिल्डमधली कामे आटोपून नुकताच येऊन बसलो होतो. माझे कलिग्ज मोंडकर आणि पिंगुळकर यांच्याशी काही बोलत होतो. इतक्यात माझे लक्ष समोरच असलेल्या ऑफिसच्या दाराकडे गेले आणि मी बघतच राहिलो. दारातून एक मुलगा आणि दोन मुली आत येत होत्या. त्या दोन मुलींपकी एकीला बघून तत्काळ, प्रथमदर्शनीच, माझ्या हृदयात 'कुछ कुछ होने लगा'. मोंडकरचे लक्ष तिच्याकडे वेधून मी अचानक बोलून गेलो, ''मोंडकर, बेटा, अपनी भाभीको पहचान ले. यही लडकी मेरी जीवनसाथी है!'' तिचा आणि माझा कोणताही पूर्वपरिचय किंवा कसलाही आगापिछा नसताना, अगदी उत्स्फूर्तपणे ही भविष्यवाणी माझ्या मुखातून बाहेर पडली. तिचं नाव, गाव, जात, धर्म काहीही माहीत नसताना. मोंडकर माझ्याकडे बघून हसला. नंतर आम्हाला समजले की, ते तिघे म्हणजे आमच्याच कार्यालयात नव्याने पोस्टिंग झालेले उमेदवार होते. प्रथमदर्शनीच जिच्यावर माझा जीव जडला होता, त्या मुलीचे नाव होते शकुंतला पै. त्या मुलीबद्दल मी मोंडकरजवळ काढलेले उद्गार खरे होणार आहेत, असे जर त्या वेळी कुणी मला सांगितले असते; तर कदाचित मी त्याला मूर्खात काढले असते. पण मनापासून काढलेल्या माझ्या त्या उद्गारांची परमेश्वराने खरीखुरी दाद घेतली होती.

आमचा परिचय हळूहळू झाला, तो वाढला आणि सामान्य भाषेत ज्याला प्रेम म्हणतात, 'ते' आम्ही कधी करायला लागलो, ते आमचे आम्हालाच समजले नाही. आमचे हे प्रेम हळूहळू वाढीस लागले आणि एकमेकांशी लग्न करण्यास आम्ही वचनबद्ध झालो. कुणी, कुणाला, कधी आणि कसे प्रपोज केले– ते आता अजिबात आठवत नाही. खरं म्हणजे ते आठवत असते, तर गोष्ट सांगायला आणखी मजा आला असता. खैर प्रकरण आम्हाला आमच्या घरापर्यंत नेणे भागच होते आणि विचार पक्का होताच तसे आम्ही केलेही.

माझ्या घरून तसा फारसा विरोध नव्हता, पण 'यह शादी कभी नहीं हो सकती'चा सिनेमॅटिक सीन तिच्या घरी चांगलाच रंगला. तो इतका रंगला की,

तिचे ऑफिसला येणे बंद झालेच, पण एक दिवस तिचा राजीनामाच ऑफिसला येऊन थडकला. आईने तिच्या लग्नाचा घाट घातल्याचे मला इकडून-तिकडून समजले. मी खूप अस्वस्थ झालो. काय करावे, हे मला सुचेनासे झाले. तिला घरातून बाहेर पडण्याची बंदी झाल्याने आम्हाला एकमेकांना भेटताही येईना; बोलणे तर दूरचीच गोष्ट. तिच्या घरी फोन होता, पण घरात तिच्यावर कडक पहारा असल्याने त्याचा आम्हाला काहीच उपयोग नव्हता.

त्यातूनही मी एक-दोन वेळा गंमत केली होती. कोटेचा नावाचे माझे एक वरिष्ठ अधिकारी होते. माझी ही प्रेमकहाणी त्यांच्या कानांवर होती. आमच्या गाठीभेटी बंद झाल्याचेही त्यांना समजले होते. माणूस जरा कलंदर आणि दिलदार असल्याने त्यांची माझ्या या प्रकरणाला सहानुभूती होती.. ''काय कुलकर्णी, टे पोरीचा आनि टुज्या गाठ पडते का नाय?'' असे मला ते अधूनमधून विचारायचे. ते गुजराती असल्याने असेच मराठी बोलायचे. एक दिवस मी त्यांच्या केबिनमध्ये गेलो असताना ते असेच मला म्हणाले, ''काय रे, टुज्या टे पोरगी काय म्हणतो?'' मी खिन्नपणे म्हणालो, ''साहेब, आमचे काही बोलणेच होत नाही. माझे टेलिफोन कॉलसुद्धा तिला दिले जात नाहीत.'' हे त्यांनी ऐकले आणि म्हणाले, बश, बश, खाली बश. हे टर लई बेकार झ्याला. टुला टेच्याशी बोलायच्या हाय काय? बश.'' असं म्हणून टेबलावरचा फोन त्यांनी पुढे ओढला आणि मला विचारून तिच्या घरचा नंबर लावला. पलीकडून फोन उचलला असावा. ''हॅलो, आय एम रेशनिंग ऑफिसर कोटेचा स्पिकिंग. कॅन आय स्पीक टु मिस आर. एस. पै प्लीज?'' ते फोनवर बोलले. पलीकडून बहुधा 'काय काम आहे?' असे विचारले गेले असावे. ''आय आम नॉट गेटिंग सम इम्पॉर्टन्ट फाइल्स व्हिच शी वॉज हॅण्डलिंग.'' त्यांना थोडे थांबण्यास सांगण्यात आले असावे. ''हॅलो, आर. एस. पै?'' त्यांनी फोनवर विचारले. पलीकडून तिने होकार भरला असावा म्हणून म्हणाले, ''ये पोरी, मी कोटेचा बोलते. टू कशा हायेश?'' पलीकडून यावर काय उत्तर आले, हे मला समजणे शक्य नव्हते. पण लगेचच ''ओके ओके. टॉक टू युवर बॉय'' असं म्हणून फोन त्यांनी माझ्याकडे दिला आणि स्वत: उठून केबिनच्या बाहेर गेले. असे प्रकार एक-दोन वेळा घडले. आणि एक दिवस तिने

अचानक मला सांगितले की, घरच्यांनी तिचे लग्न तातडीने करायचे ठरविले असून त्यासाठी ते तिला हुबळीला घेऊन जात आहेत. पण तिला मात्र माझ्याशीच लग्न करायचे आहे.. आणि म्हणून ती तिचे घर सोडून माझ्या घरी येत आहे. त्या वेळी मी वरळीला राहत होतो. एक-दोन वेळा ती माझ्या घरी येऊन गेली असल्याने माझे घर तिला माहीत होते. माझी वाहिनी आणि थोरले बंधूही तिला ओळखत होते.

मी तातडीने घरी आलो, तर बाईसाहेब माझ्याआधीच पोहोचल्या होत्या. रडत-रडत तिने सर्व हकिगत मला सांगितली आणि 'आता मी पुन्हा माझ्या घरी जाणार नाही' असे निर्वाणीचे बोलली. आता जबाबदारी माझी होती. मी माझे थोरले बंधू आणि वहिनीशी सल्लामसलत केली. त्यांचे म्हणणे असे पडले की, तिला बिनलग्नाची आपल्या घरी ठेवून घेणे योग्य नाही. तेव्हा आजच्या रात्रीपुरती तिची कुठे तरी व्यवस्था करावी. मी खूप विचार केला आणि अचानक मला आठवले की, तिची मोठी बहीण ठाण्याला असते. मी तिला सांगतले की, आजच्या दिवस मी तुला ठाण्याला तुझ्या बहिणीकडे सोडतो, तिला सर्व प्रकाराची माहिती देतो आणि.लग्नाची सगळी तयारी करून उद्या सकाळी मी तुला न्यायला येतो अन् लग्न करून लगेच घरी आणतो. या माझ्या म्हणण्यास तिच्यासह सर्वांनीच मान्यता दिली आणि मी तिला ठाण्याला तिच्या बहिणीच्या ताब्यात देऊन परत आलो.

जयंत ओक या माझ्या मित्राचे वडील म्हणजे ओकगुरुजी हे आमचे अगदी घरोब्याचे गुरुजी- अर्थात पुरोहित. आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू. मी लहान असल्यापासून त्यांचा नि माझा घट्ट स्नेह होता. मुंबईच्या सगळ्या पोलीस स्टेशनांच्या होणाऱ्या वार्षिक सत्यनारायणाच्या पूजा त्यांच्याचकडे असत. शिवाय वाडीबंदर पोलीसलाईन येथे असलेल्या मारुतीच्या देवळाचे ते नित्य पुजारी होते. मी त्या वेळी वाडीबंदर पोलीस लाईनमधेच राहत असल्याने, त्यांच्याशी माझा खूप घनिष्ठ संबंध होता. किंबहुना, आधी ते माझे मित्र होते आणि त्यांच्यामुळेच माझी मैत्री त्यांचा मुलगा जयंता याच्याशी झाली, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. त्यामुळे मी त्यांच्या घरी रातोरात जाऊन, माझ्या प्रेमकहाणीची संपूर्ण माहिती त्यांना दिली. अण्णांनी मला धीर दिला

आणि सांगितले, ''घाबरू नकोस. कायद्याप्रमाणे वयाने तुम्ही दोघेही सज्ञान असल्याने काहीं कायदेशीर गुंता होण्याची शक्यता नाही. तेव्हा उद्या तू तिला इकडे माझ्याकडेच घेऊन ये. मी लग्नाची सगळी सिद्धता करतो आणि उद्याच्या उद्या तुमचे लग्न लावून देतो..'' अण्णांच्या ह्या बोलण्याने आश्वस्त होऊन मी घरी परतलो.

दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून मी तिला आणायला ठाण्याला गेलो. तिला तिच्या बहिणीसकट घेऊन अण्णांकडे जायचं आणि लग्नाला उभं राहायचं, या विचारात घरात पाऊल ठेवलं आणि तिच्या बहिणीने मला शॉकिंग न्यूज दिली. ''माझ्याकडे कसली जबाबदारी यायला नको म्हणून मी रात्रीच तिला गिरगाव येथे राहाणाऱ्या माझ्या मोठ्या भावाकडे सोडून आले'' असे मला सांगितले आणि माझ्या पायाखालची जमीनच सरकली. कुठून मला तिला तिच्या ठाण्याच्या बहिणीकडे सोडण्याची बुद्धी झाली, असे मला झाले. पण त्याचा विचार करीत बसण्याला आता काही अर्थ नव्हता आता काय करावे, ते मला काहीच सुचेना. तिचा नि माझा संपर्कही तुटला होता. त्याची पुन्हा जोडणी करणे फारच कठीण होते. जुळून आलेला डाव उधळला गेला होता. खिन्न मनःस्थितीत मी ऑफिसला गेलो. ऑफिसात जाताच तिच्या एका मैत्रिणीने 'तुमच्यासाठी एक निरोप आहे' असे सांकेतिक बोलून माझ्या हातात एक चिठ्ठी दिली.. त्या चिठ्ठीवरून मला समजले की, ती तिच्या आईबरोबर माटुंग्याला तिच्या मोठ्या भावाकडे गेली आहे. चिठ्ठीत खाली तिथला पत्ता आणि फोन नंबरही दिला होता. माझा जीव भांड्यात पडला. चला, म्हणजे तुटलेला संपर्क अशा रीतीने पुन्हा जोडला गेला होता. आता मात्र ताबडतोब ॲक्शन घ्यायला हवी होती. लगेच मी मोंडकर आणि पिंगुळकरची मीटिंग घेतली. या मीटिंगमध्ये आमच्या बाजूने असलेल्या तिच्या त्या मैत्रिणीला पण सामावून घेतले. खूप विचार करून आम्ही एक प्लॅन ठरवला आणि तो प्लॅन सविस्तरपणे तिच्यापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी त्या मैत्रिणीवर सोपवली.

मग प्लॅनप्रमाणे मोंडकर आणि पिंगुळकरसह मी लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनावरचे माझ्या ओळखीचे पोलीस इन्स्पेक्टर श्री. दीक्षितसाहेब यांना भेटलो आणि सगळा इत्थंभूत इतिहास त्यांच्या कानावर घातला. माझे आणि त्यांचे खूप वर्षांचे चांगले संबंध असल्याने त्यांनीही माझा प्लॅन लगेच अप्रूव्ह करून मला सहकार्य करण्याचे मान्य केले व त्या मुलीला घेऊन थेट पोलीस

स्टेशनलाच या, असे सांगितले. त्यासाठी त्यांच्या ओळखीच्या दोन टॅक्सी पण आम्हाला दिल्या. मग लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनवरून आमच्या दोन्ही टॅक्सीज माटुंग्याच्या रोखाने सुसाट सुटल्या. पुढच्या टॅक्सीत मोंडकर आणि पिंगुळकर होते, तर मागच्या टॅक्सीत मी होतो. माटुंग्याला आधीच हेरून ठेवलेल्या एका बिल्डिंगसमोर पुढची टॅक्सी थांबली. थोडे अंतर ठेवून दुसरी टॅक्सी मागे उभी राहिली. ठरल्याप्रमाणेच रस्त्याकडे तोंड करून असलेल्या गॅलरीत ती उभी असल्याचे खालूनच आम्हाला दिसले. टॅक्सीतून पिंगुळकर खाली उतरला, तेवढ्यात गॅलरीत उभ्या असलेल्या तिच्या हातून रुमाल खाली पडला आणि तो नेण्यासाठी धावतच ती खाली आली आणि आधीच उघडून ठेवलेल्या टॅक्सीच्या दारातून थेट आत शिरली. ती आत बसताच पिंगुळकरही बसला आणि टॅक्सी लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनच्या रोखाने सुसाट सुटली. मी पाच मिनिटे थांबून, तिच्यामागे कुणी खाली येतेय का याची वाट पाहिली, पण तसे काही दिसले नाही. मग मीही माझ्या टॅक्सीतून लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनच्या रोखाने निघालो.

लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनवर दीक्षितसाहेबांनी जय्यत तयारी ठेवली होती. दोन पंच आणि एक वकील हजर होते.. मी पोहोचताच आधी पंचनामा करून, तिच्या अंगावर असलेल्या सर्व दागिन्यांचा पंचनामा करून त्याची नोंद करून घेतली आणि ती सज्ञान असून, कोणत्याही दबावाखाली न येता व पूर्ण शुद्धीत, स्वखुशीने माझ्याशी लग्नाला तयार असल्याचे ॲफिडेव्हिट तिच्याकडून करून घेण्यात आले. तोपर्यंत अण्णा ओक यांनी लग्नाची सगळी तयारी केलीच होती. पोलीस स्टेशनवरील सगळे कायदेशीर सोपस्कार आटोपून दीक्षितसाहेब आणि त्यांच्या असिस्टंटसह आम्ही लग्नस्थळी म्हणजे अण्णांच्या घरी पोहोचलो. निरोप पाठवून माझ्या वहिनींनाही लग्नस्थळी आणले होते. अशा तऱ्हेने दिनांक २६ एप्रिल १९६७ रोजी सायंकाळी गोरज मुहूर्तावर, निवडक मंडळींच्या हजेरीत, पोलीस प्रोटेक्शन खाली अण्णा ओक यांच्या घरातच आमचा शुभविवाह पार पडला. लग्न अगदीच घाई-गडबडीने झाल्यामुळे जयंताच्या आईने रात्री आमटी-भाताचा बेत केला होता. पन्नास वर्षे झाली, पण त्या आमटी-भाताची आणि आमच्या परस्परांवरील प्रेमाची चव कणभरही कमी झालेली नाही.

!! शुभं भवन्तु !!

❐ ❐ ❐

२

# देवा, तू सुद्धा?

– १ –

‘आजा आ जाऽऽऽ मै हूँ प्यार तेराऽऽऽऽ’ भाऊ ढमालेच्या मोबाईलवर हा रिंगटोन वाजला. भाऊ अर्धवट झोपेतच होता. त्याच मोबाईलवर दुसरा कोणताही रिंगटोन वाजला असता, तर ‘च्यायला कोन तडफडतोय सकाळी-सकाळी?’ असं म्हणून भाऊने फोन कटच केला असता. पण हा रिंगटोन वाजल्यावर तो तसं करूच शकत नव्हता. उलट, हा रिंगटोन ऐकताच त्याच्या अंगात उत्साहाचे वारे संचारले. कारण हा खास असाईन केलेला रिंगटोन होता. हा रिंगटोन म्हणजे काम. हा रिंगटोन म्हणजे कमाई. जसा काय ‘माताका बुलावा’च. हा रिंगटोन म्हणजे भाऊचा जीव की प्राण. पण सकाळी-सकाळी? कसलीही सूचना नसताना अचानक? राज्यात सगळीकडे शांतता होती. ना संप, ना मोर्चा. ना धरणे, ना हरताळ. कुणीही नेता येणार किंवा जाणार नव्हता. कुठेही कसली ना सभा, ना समारंभ होता. अशी कुठलीही बातमी ना भाऊच्या वाचनात आली होती, ना टीव्हीवर बघण्यात आली होती. इतकेच काय, पण कुणा नेत्याचा वाढदिवसही नव्हता. त्यामुळे गेले दोन दिवस भाऊचे खाडेच पडले होते आणि आजही तसा खाडाच होता. त्यामुळे झोपेतसुद्धा भाऊ थोडा अस्वस्थच होता.

पण सकाळी-सकाळी हा रिंगटोन वाजताच भाऊ खाड्कन उठून इकडे -तिकडे आपला मोबाईल शोधू लागला.

''ए रखमेऽ, माझा मोबाईल कुठाय गं?'' त्याने चिडून विचारले. वस्तू पटकन मिळाली नाही की, तो असाच चिडायचा.

''आत्ता... अवो, तुमचा मोबाईल कुठं ठेवलाय, हे आमास्नी काय ठाव? पर वाजतूया कुठं तरी.'' रखमा थोडी नाराजीनेच बोलली. बऱ्याच दिवसांनी आपल्या मिठीत असलेला नवरा सकाळच्या गुलाबी वातावरणात आपली मिठी सोडवून खाड्कन उठून बसावा, हे बहुधा तिला आवडले नसावे.

''त्यो आवाज मला बी ऐकू येतोय रखमे. म्या काही भैरा नाय. पन त्यो कुठनं येतोय, ते ध्यानात येईना बग.'' भाऊ थोडासा वैतागाने बोलला.

''मला वाटतं, सैपाकघरातून आवाज येतोय.'' रखमाने अंदाज व्यक्त केला.

''तिकडं कशाला जाईल त्यो तडफडायला?'' भाऊ चिडून बोलला. कधी एकदा तो फोन कानाला लावतोय, असं त्याला झालं होतं.

''रातच्याला तुमीच तर येत व्हता माझ्यामागं सारखं-सारखं सैपाकघरात-झालं का नाय, झालं का नाय मला इचारायला.'' रखमा जरा लाजतच बोलली. स्वयंपाकघरातला तो रात्रीचा प्रसंग आठवून सकाळी-सकाळी तिच्या गालांवर गुलाब फुलले होते.

''बरं, बरं, येवढं काई ते कौतिकाचं नाय,'' असं म्हणत तो स्वयंपाकघराकडे धावला. पण तोपर्यंत फोन वाजायचा बंद झाला होता. भाऊने फ्रीजवर ठेवलेला आपला फोन ताब्यात घेतला आणि फास्ट डायलचा एक नंबर डायल केला. पलीकडून एक जनानी आवाज त्याच्या कानांवर पडला.

'आपण ज्या क्रमांकाशी संपर्क करीत आहात, तो सध्या व्यस्त आहे. कृपया प्रतीक्षेत राहा किंवा पुन्हा प्रयत्न करा.'

''च्यायला, आत्ता मला रिंग दिली आनी लगीच ह्यो अस्ताव्यस्त झाला!'' असं पुटपुटत त्याने पुन्हा तो नंबर डायल केला आणि पुन्हा ती बाई त्याच्या कानात गुणगुणली, 'ज्या व्यक्तीशी संपर्क साधण्याचा आपण प्रयत्न करीत आहात, ती व्यक्ती आता संपर्कक्षेत्राच्या बाहेर आहे.'

''च्या मारी, मिनिटभरात हा कर्म्या कुठं औट ऑफ रेंज कडमडला?'' अशी आपल्याशीच धुसफूस करीत पुन्हा त्याने तो नंबर रिडायल केला.

''अरे काय भाऊ, किती वेळ लावलास फोन घ्यायला?'' पलीकडून आवाज आला आणि भाऊचा आत्मा शांत झाला.

''न्हाय, फोन जरा दुसरीकडं ठिवला व्हता म्हनून....'' भाऊ गुळमुळत बोलला.

''दुसरीकडं म्हंजे नेहमीपरमाने सैपाकघरात म्हन की गड्या! लाजतुयास काय नव्या नवरीगत?'' पलीकडून मिश्किल विचारणा झाली.

''न्हाय ते आपलं....'' भाऊ लाजत पुटपुटला. ''बरं, ते सोडा. पन फोन कशापायी केला व्हता अचानक?'' भाऊ अधीरपणे बोलला.

''आण्णासायेब गेले.'' पलीकडून आवाज.

''दिल्लीला व्हय... नाय म्हणजे, ते आज जानारच व्हते!'' –भाऊ.

''आरं खुळ्या, दिल्लीला नाय.. वर गेले, वर!'' – पलीकडून बातमी.

''आं....! अन् असं येकायेकी? तब्येत तर चांगली व्हती. आजारीबिजारी पडल्याची काई बातमी न्हाई आली वाचनात भाऊ.''

''आरं कसलं आजारी आन् कसलं काय! रातीला शेवंताच्या माडीवर बैठक झाली. तिथंच पिऊन तराट झालं. घरी आलं न् झटक्यात खेळ खलास!'' पलीकडून अधिक माहिती पुरवली गेली.

''आरारा! वाईट झालं राव.'' भाऊने हळहळ व्यक्त केली.

''आरं, वाईट झालं काय म्हनतुस गड्या? आयुक्षभर करप्शन करत ऱ्हाइला. कधी कुनाला काई दिलं न्हाई, घेतच ऱ्हाइला. पैसं चारून, मतं इकत घेऊन निवडून येत व्हता आनी सौताच्याच इस्टेटी उभ्या करीत व्हता. ज्यांनी मतं देवून निवडून दिला, त्यांची बी कामं कराया पैसं मागत व्हता. आरं, करप्शनची शाळाच चालवीत व्हता म्हन की! हे आपलं आपल्या दोघातच बरं का! ते मरू दे .... पन जाता-जाता आपल्याला पैसा देवून गेलाय. भला मानूस.'' – पलीकडची कॉमेंट.

''ते कसं काय?'' – भाऊ.

''आरं गड्या, प्रेतयात्रेचा मोठा इव्हेंट करा– अशी आर्डर आलीया पक्षाच्या कार्यालयातून. उद्या दुपारपातुर आपली मानसं अण्णाच्या बंगल्यावर

पाठवून दे. आनी मानसं ट्रकातून येकदम लाटमधी नग पाठवूस, पायी चालत आनी गटागटानं यिऊ देत. उगं कुनाच्या डोळ्यावर यायला नगं. आनी हे बग, आपला रेट डबल कर, पन मानसांचा रेट निम्मा कर. दु:खाचा परसंग हाय म्हणून सांग.'' पलीकडून रीतसर सूचना आल्या.

''कळलं, कळलं दादा. लई बेस! पन किती नग पाठवू?'' भाऊने विचारलं.

''मोजून दोन हजार पाठव. पन अंतरा-अंतरावर चालाया सांग. धा हजाराचा माब वाटला पायजे. पक्षाकडं तेवढं बिल पाठवायचं हाय, काय?''

''पन डिफरन्स लई व्हैल दादा.'' भाऊने क्वेरी केली.

''आरं माज्या राज्या, पक्षाच्या कार्यालयात बी ह्यातला शेर जाणार हाये. तू काळजी करू नगंस. तू फकस्त मानसं आनी बिल पाठव, बाकीचं बगतो मी.''

''पन मी म्हंतो, अण्णासारख्या मानसासाठी पक्ष येवढा खर्च करील?'' भाऊने आणखी एक क्वेरी केली.

''करील, करील. आरं गड्या, तुला न्हाई कळायचं. राजकारण हाय ते.''

आणि पलीकडून फोन कट झाला.

– २ –

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत फोटोसकट प्रेतयात्रेची बातमी छापून आली होती.

राज्याचे सल्लामसलत मंत्री अण्णासाहेब काळधंदे यांचे दु:खद निधन

काल रात्री सल्लामसलत मंत्री अण्णासाहेब काळधंदे हे सांस्कृतिक खात्याची महत्त्वाची मीटिंग आटोपून घरी आले आणि हृदयविकाराचा झटका येऊन त्यांची जीवनज्योत मालवली. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अनेक राजकीय नेते, अभिनेते, खेळाडू तसेच आपल्या लाडक्या नेत्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी दहा हजारांच्या संख्येने जनता उपस्थित होती. उपस्थित, प्रतिष्ठित सेलिब्रिटींच्या प्रतिक्रिया म्हणजे बाईट घेण्यासाठी चॅनलचे कॅमेरे स्मशानभर फिरत होते. बोलणाऱ्याच्यामागे शेकडोंनी माणसं, टीव्हीत आपण दिसावं म्हणून रेटारेटी करत उभी होती. आपली प्रतिक्रिया देताना दादासाहेब भिरकावडे म्हणाले :

अण्णासहबांची शिकवण समाजाभिमुख होती. आपलं ते आपलं कोन बी म्हनंल, पन आपन दुसऱ्याचं ते बी आपलं असं म्हनायला शिकलं पायजे. दुसऱ्याच्या पैक्याकडं, दुसऱ्याच्या बाईकडं आपन आपलेपनानं बघितलं पायजे, अशी त्यांची उदात्त इचारसरणी होती. आपणासारखें करिती तत्काळ ही त्यांची वृत्ती होती.

आपली प्रतिक्रिया नोंदवताना केडगावकर पाटील म्हणाले– मी आनी आन्ना लहानपनीचे मित्र म्हणजे लंगोटीयारच म्हना की! मला भायेर जायचं असलं की, तो माजी लंगोटी काडून घ्यायचा आनी त्याला भायेर जायचं असलं की, मी त्याची लंगोटी काडून घ्यायचो. त्यांच्या या बोलण्यावर मागे रेटारेटी करीत उभ्या असलेल्या जमावात उगीचच खसखस पिकली. एका कोपऱ्यावर पान खात उभ्या असलेल्या शेवंताबाईकडे कॅमेरेवाले धावले :

आन्ना काल लैच रंगात आलं व्हतं. फुडच्या निवडणुकीत रिजर्व शीटच्या तिकिटावर निवडून आणून तुला संस्कुत्रिक मंत्री करीन, आसं त्यांनी कालच्या मीटिंगमधी मला आश्वासन दिलं व्हतं. मुख्यमंत्री आज इथं हजर हायेत म्हनून मी हे सांगतीया. काल माडीवरून आन्नाला टाटा करताना आज त्यांना असा टाटा करावा लागंल, असं वाटलं न्हवतं... असं म्हणून शेवंताबाईने कमरेला खोचलेला पदर काढून तो नाकाला लावला आणि नाक जोरात शिंकरले.

अण्णासाहेबांना श्रद्धांजली वाहताना मुख्यमंत्री गहिवरून म्हणाले –

अण्णासाहेब केवळ सरकारचाच नव्हे, तर पक्षाचा कणा होता. त्यांच्या जाण्याने जगातला प्रामाणिकपणाच नष्ट झाला आहे. संस्कृती आणि सभ्यता नष्ट झाली आहे, अशी आमची भावना आहे. 'आपणासारखे करिती तत्काळ' या संतवचनाचे ते पाईक होते. आपल्यासारखे सर्वांनी वागावे, ही त्यांची कळकळ होती आणि तशी त्यांची धडपडही होती. त्याच्या अचानक जाण्याने आमच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते असे अचानक गेल्याने माझ्या वैयक्तिक जीवनात फार मोठा खड्डा पडला आहे...

''आन्नाशी छत्तीसचा आकडा असताना, ह्यो मुख्यमंत्री आन्नाबद्दल येवढं ग्वाड–ग्वाड का बोलतोय?'' जमावातला एक जण हळूच दुसऱ्याच्या

कानात म्हणाला. ''आरं बाबा.. लई वरच्या पातळीवरचं राजकारण हाय ते. तुला न्हाय कळायचं. काय म्हनतुय ते गपगुमान ऐकून घे.'' दुसरा कुजबुजला.

''बरं-बरं'' असं म्हणून पहिल्यानं भाषणाकडे कान दिला.

अण्णासाहेब आकस्मितपणे का जावेत, हेच कळत नाही. ते म्हणतात ना', जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला... आणि मुख्यमंत्र्यांनी बोलता-बोलता खिशातला रुमाल काढून डोळ्यांना लावला. त्यांना इतके गहिवरून आले की, पुढे बोलताच येईना. क्षणभर त्यांनी भाषण संपवले आहे, हे कुणाच्या ध्यानातच आले नाही; पण ध्यानात येताच ही भावपूर्ण, विद्वत्तापूर्ण आणि काव्यात्मक श्रद्धांजली ऐकून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

– ३ –

कडकडाट, गडगडाट झाला. देवलोकात अचानक एक वेगळीच हवा पसरली. ना धड थंडी, ना धड उकाडा. ना धड वारा, ना धड पाऊस. 'अचानक असे सरमिसळ, कुंद आणि कळकट वातावरण देवलोकात का पसरावे?' असा विचार सर्व देव-देवता करू लागले.

शेषशायी भगवान विष्णूंची पदकमले चुरता-चुरता लक्ष्मीदेवीचे अंग थंडगार पडून अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. पर्जन्याचे तुषार अंगावर पडल्याचे जाणवले. विजांचा कडकडाट व मेघांचा गडगडाट होत होता, पण बाहेर पावसाचा टिप्पूस पण दिसत नव्हता. लक्ष्मीदेवी अस्वस्थ झाल्या. देवाची पदकमले चुरणारे त्यांचे हात क्षणभर थबकले. पायांना होणारा तो कोमल स्पर्श थबकताच भगवान विष्णू चपापून तलकीतून जागे झाले आणि सौहार्द्रपूर्ण स्वरात विचारते झाले.

''प्रिये, आपणास काही कष्ट आहेत का?''

''क्षमा करा नाथ. पण काही तरी अनाकलनीय असे होत आहे म्हणा किंवा घडत आहे म्हणा. पण अचानक एक अस्वस्थता जाणवत आहे.'' देवींनी आपली स्थिती कथन केली.

''पण आपणास निश्चित काय पीडा जाणवते, हे तर सांगाल?'' भगवंतांनी काळजीने विचारले.

''तेच तर उमजेनासे झाले आहे. नाथ, असे काही तरी होत आहे, जे सांगता येत नाही आणि सहनही होत नाही. हे काय चालले आहे, ते मला

कुणी सांगेल का?'' देवी हताश होऊन म्हणाल्या. इतक्यात वीणेच्या मंजूळ स्वरात 'नारायणऽ.... नारायण' असा नामोच्चार करीत नारदमुनींची स्वारी तिथे प्रकट झाली.

''हे बघ, त्रिखंड यात्री साक्षात नारदमुनीच आता इथे आले आहेत. तेच काय ते सांगतील.'' भगवंत म्हणाले.

''नारायण ऽऽ.. नारायणऽऽ ! भगवंत, आपण उभयता काही चिंतेत आहात का?'' नारदांनी पृच्छा केली.

''मुनिवर्य, देवलोकात प्रवेश करताच इथल्या वातावरणात आपणास काही फरक नाही का जाणवला?'' देवींनी विचारले.

हं.. नारायण.. नारायणऽऽ काय सांगावे देवी! देवलोकीच्या या निर्मल, पवित्र आणि स्वच्छ वातावरणात अचानक दूषित वाऱ्याचे इन्फेक्शन झाले आहे.'' नारदमुनी सुस्कारून म्हणाले.

''काय.. काय झाले आहे म्हणालात तुम्ही मुनिवर्य?'' काही न कळून उभयता एकदम किंचाळले.

''क्षमा करा भगवंत, पृथ्वीवरची भाषा मुखातून नकळत बाहेर पडली. मला असं म्हणायचं होतं की, देवलोकीच्या शुद्ध आणि पवित्र वातावरणास दूषित वाऱ्याचा संसर्ग झाला आहे.'' नारद म्हणाले.

''दूषित वारे? आणि देवलोकात? काय बोलता काय तुम्ही मुनिवर्य?'' भगवंत किंचित उसळून म्हणाले.

''सत्य तेच कथन करतोय भगवंत. आमच्या बोलण्यावर आपला विश्वास नाही का?'' मुनीवर्य किंचित क्षुब्ध होऊन विचारते झाले.

नारदांच्या रोषाला पात्र होणे भगवंतांना आणि देवलोकालाही परवडणारे नव्हते. स्वरात थोडी नरमाई आणीत ते म्हणाले, ''तसं नव्हे मुनिवर्य. आपल्या कथनाबद्दल आमच्या मनात तिळमात्र शंका नाही. पण हे अघटित घडले कसे, या चिंतेने व्याकूळ झाल्याने आमचा स्वर जरा उत्तेजित झाला होता. क्षमा असावी.''

''नारायण... नारायण...'' असं म्हणून नारदांनी विषयावर पडदा टाकला.

''पण मुनिवर्य, हे दूषित वारे आले कुठून आणि कसे?'' लक्ष्मीदेवींनी प्रश्न केला.

''हे दूषित वारे पृथ्वीतलावरून, भारत नामक देशातून नरकलोक मार्गे देवलोकात आले आहेत.'' नारदांनी कथन केले.

''कायऽ नरकलोक मार्गे?'' भगवतांनी नवलाने विचारले.

''नारायण ... नारायणऽ'' हा आपला सर्वार्थी परवलीचा शब्द वापरून नारदांनी मिश्किल होकार भरला.

''आश्चर्य आहे! असे दूषित वारे नरकलोकात सोडण्याऐवजी देवलोकात का सोडण्यात आले, याचा जाब चित्रगुप्ताला विचारायला हवा.'' असं म्हणून भगवंतांनी टाळी वाजवली.

''भगवंतांचा विजय असो!'' असा जयजयकार करीत एक सेवक त्वरित हजर झाला.

''उद्या उदईक आम्ही भेटायला बोलावले आहे, असा निरोप यमधर्माला पाठवा.'' अशी आज्ञा भगवंतांनी दिली.

''जशी आज्ञा भगवंत!'' असं म्हणत सेवक आल्यापावली परत गेला आणि गालातल्या गालात स्मितहास्य करीत नारदमुनींनी तोंडाचा चंबू करून पृथ्वीवर घालतात तशी शीळ हळूच घातली.

– ४ –

देवलोकात भगवान विष्णूंना भेटून यमराज यमपुरीत आले, ते संतापूनच. यमसदनात शिरताच त्यांनी चित्रगुप्ताला पाचारण केले. ''यमराजांचा विजय असो!'' असा जयघोष करीत चित्रगुप्त काखेतली वही सांभाळीत, हात जोडून समोर उभा राहिला.

''विजय? विजय नाही, पराजय.. पराजय असो, असं म्हणा चित्रगुप्त. संतापाने आमचा तिळपापड होतोय.'' नखशिखांत थरथरत यमराज म्हणाले.

''राजन, देवलोकात आपणास कोणी काही विपरीत बोलले का?'' चित्रगुप्ताने शांत सुरात विचारले.

''नुसते बोललेच नाही, तर चांगली षष्टी झाली आमची. आणि तीसुद्धा तुमच्या गलथानपणामुळे!''

''अशी आगळीक आमच्याकडून झाली तरी काय आणि आपल्या नकळत ती देवलोकापर्यंत पोहोचली तरी कशी?'' चित्रगुप्ताने भयभीत स्वरात विचारले.

''अशी आगळीक आपल्याकडून घडल्याची कागाळी दुसरे कोण करणार चित्रा? तुमचे ते कळीचे नारद आहेत ना..'' यमराज धुसफुसले. ''ते असो. काल पृथ्वीवरून आणलेल्या माणसांपैकी स्वर्गलोकात किती, नरकलोकात किती पाठवले आणि तेवढ्या माणसांची पोच आली का याची चौकशी करून अहवाल द्या.'' असे फर्मान सोडून रागाने शेला झटकत यमराज आपल्या रेड्यावर स्वार झाले.

चित्रगुप्ताने आपली वही चाळली आणि किंचित विचार करून, दूताकरवी निरोप पाठवून नरकपतीला बोलावून घेतले.

– ५ –

चित्रगुप्ताला भेटून नरकपती तणतणतच आपल्या कार्यालयात शिरले आणि थेट कारभाऱ्याच्या बैठकीकडे गेले :

''कारभारी, काल चित्रलोकातून आपल्याकडे एकंदर किती नग रवाना झाले होते?'' नरकपतीने प्रश्न केला आणि कारभारी चळाचळा कापू लागले. त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना.

''मी काय विचारतोय कारभारी? काल यमलोकाकडून आपल्याकडे किती नग रवाना झाले होते?'' नरकपतीने प्रत्येक शब्दावर जोर देत पुन्हा विचारले.

''स.. स.. सांग.. तो .. म.. म.. महोदय...'' बोलताना कारभाऱ्याची बोबडी वळत होती आणि कटिवस्त्र ओले झाले होते. कारभाऱ्याची ही स्थिती बघून नरकपतीचा पारा अधिकच चढला.

''काल किती लोक नरकात आले होते?'' प्रत्येक शब्दावर जोर देत नरकपतीने विचारले.

''अ.. अ.. क़.... रा... महोदय...'' कारभारी चाचरत म्हणाला.

''ठीक आहे. ताबडतोब यादीसह नग हजर करा.'' नरकपतीने फर्मान सोडले. आता मात्र कारभारी थरथरा कापू लागला. त्याच्या सर्वांगाला घाम फुटला. डोळ्यांसमोर अंधारी आली. कसे तरी हेलपाटत त्याने यादी आणि माणसे नरकपतीसमोर हजर केली. नरकपतीने यादीवर नजर फिरवून माणसे मोजली.

‘‘अरे, हे तर दहाच आहेत. अकरावा हजर कराऽऽ’’ तो दरडावला.

आता मात्र कारभारी नरकपतीच्या पायांवरच कोसळला.

‘‘दया .. दया.. दया करा महोदय, दया करा.. मी चुकलो, माझ्यावर दया करा.. दया करा....’’ असं म्हणून तो ढसढसा रडू लागला.

कारभाऱ्याला अचानक काय झाले, ते नरकपतीला उमगेना. आश्चर्य वाटून त्याने विचारले, ‘‘पण झाले तरी काय? आणि अकरावा कुठाय?’’

‘‘तो देवलोकाच्या दिशेने गेला. म्हणजे, मीच त्याला जाऊ दिला.’’ कारभारी रडत म्हणाला.

‘‘कायऽऽ? नरकात आलेल्या माणसाला तुम्ही देवलोकी पाठवलात? आता मी चित्रगुप्ताला काय जबाब देऊ? कारभारी, तुम्ही हा लांडा कारभार का केलात?’’ नरकपतीने दात ओठ खात विचारले.

‘‘क्षमा करा महोदय.. पण त्याने मला दोन सुवर्ण मुद्रा दिल्या आणि मी मोहात पडलो. आपल्यासाठी पण पाच मोहोरा त्याने दिल्या आहेत.’’ कारभारी चाचरत म्हणाला.

‘‘काऽय? म्हणजे तुम्ही लाच घेतलीत? पण या सुवर्णमुद्रा त्याच्याकडे आल्याच कशा आणि कुठून?’’ आता मात्र नरकपतीचा पारा शिगेला पोहोचला होता.

‘‘मी त्याला विचारलं महोदय. तर तो म्हणाला- जे यमदूत त्याला न्यायला आले होते त्यांना एकेक मोहोर देऊन, त्यांच्या संगनमताने काही मोहोरा त्याने वर आणल्या होत्या.’’

कारभाऱ्याच्या या बोलण्याने नरकपती थक्क झाला. ‘‘काय नाव तरी काय त्या महाभागाचे?’’ एक डोळा बारीक करीत कौतुकमिश्रित स्वरात नरकपतीने विचारले.

‘‘महोदय, त्याचे नाव अण्णासाहेब काळधंदे.’’

– ६ –

चित्रगुप्त पाप-पुण्याच्या वह्या तपासत बसला होता. ‘‘आपणास भेटायला नरकपती आले आहेत.’’ द्वारपालाने वर्दी दिली.

''हं, पाठव त्याला,'' असं म्हणून त्यांनी आपल्या वह्या आवरायला घेतल्या.

''वंदन करतो महाराज-'' म्हणून नरकपती हात जोडीत हजर झाला.

''बोल, काय काम काढलं?'' वह्या ठेवता-ठेवता चित्रगुप्ताने विचारले.

''काही नाही. काल आपण एक हिशोब मागितला होता, तो द्यायला आलोय.'' हिशोबाची आपली वही समोर ठेवीत नरकपती म्हणाला.

''अस्सं! बघू ...'' असं म्हणत चित्रगुप्ताने वहीवरून नजर फिरवली आणि त्वेषाने म्हणाले, ''काय? नरकलोकी पाठवलेला माणूस तुम्ही देवलोकी पाठवलात? तेही लाच घऊन? याचा अहवाल मला देवेद्रांना द्यायलाच हवा. ते देतील ती शिक्षा भोगायची आता तयारी ठेवा..'' चित्रगुप्त क्रोधाविष्ट होऊन म्हणाले.

''अवश्य महाराज. अगदी असंच करा आपण. तथापि, यमदूतांनी त्याला वर आणल्यावर प्रथम आपल्यासमोर उभा केला होता, हे विसरू नका म्हणजे झाले.'' नरकपती छद्मी स्वरात बोलला.

हे ऐकून चित्रगुप्त हडबडला. ''बरं, बरं... पण याची आता कुठे वाच्यता करू नका. विषय इथेच संपवा, म्हणजे झालं.'' असं म्हणून चित्रगुप्ताने नरकपतीला निरोप दिला. ''बरं, नाव काय म्हणालास त्याचं?'' जाता-जाता त्याने नरकपतीला विचारले.

''आं.. अण्णासाहेब काळधंदे.'' नरकपतीने सांगितले.

''हं..'' चित्रगुप्ताने मनातल्या मनात पुटपुटल्यासारखा पुनरुच्चार केला-

''अण्णासाहेब काळधंदे.''

– ७ –

''बरोबर! अण्णासाहेब काळधंदे हेच माझे नाव आहे.'' कैलासावर शंकर-निवासाच्या द्वारपालाला अण्णासाहेब सांगत होते. नरकपतीच्या कारभाऱ्याला पटवून तिथून बाहेर पडताच अण्णांनी झट्कन मनातल्या मनात एक मास्टर प्लॅन तयार केला आणि त्यानुसार सर्वांत प्रथम भोळ्या शंकराला खिशात घालायचे ठरवून ते कैलासावर आले होते.

''अण्णासाहेब काळधंदे? पण हे असले नाव देवलोकात आणि कैलासावर मी कधी ऐकले नाही.'' द्वारपाल हुज्जत घालीत होता.

''नसेलच ऐकले, कारण देवलोकात आलेला या नावाचा मी पहिलाच मानव आहे!''

''पण एक मानव या देवभूमीत आलाच कसा? हे शक्य नाही.'' द्वारपाल ठामपणे म्हणाला.

''का शक्य नाही? मानवाला काहीही अशक्य नाही. 'नर करे करणी तो नर का नारायण हो जाय' हे वचन तुला ठाऊक नाही वाटतं?'' अण्णा गर्वाने म्हणाले.

''ते काहीही असलं, तरी ही भोलेनाथांच्या ध्यानाची वेळ आहे. आत्ता तुम्ही त्यांना भेटू शकत नाही.'' द्वारपालाने ठणकावले.

अण्णांनी खिशातून एक सुवर्णमुद्रा काढली आणि उगीचच, छाप-काटा खेळल्यासारखी ती सुवर्णमुद्रा अंगठा व मधल्या बोटाच्या टिचकीने वर-खाली उडवू लागले. ती वर-खाली होणारी चकाकती सुवर्णमुद्रा पाहून द्वारपालाचे आशाळभूतपणे चमकणारे डोळे अण्णांच्या नजरेतून सुटले नाहीत.

''बघ, मला जर आत सोडलंस, तर ही सुवर्णमुद्रा तुझी!'' संधी साधून अण्णांनी खडा टाकला आणि पुन्हा टिचकीने सुवर्णमुद्रा वर उडवली. पण वर गेलेली ती सुवर्णमुद्रा परत त्यांच्या हातात आलीच नाही, कारण द्वारपालाने ती वरच्या वर झेलली होती. ती सुवर्णमुद्रा लकाकत्या डोळ्यांनी न्याहाळीत, अण्णांकडे न पाहताच तो म्हणाला, ''आपण आत जाऊ शकता.''

– ८ –

शंकरनिवास म्हणजे एक गुहाच होती. बर्फाच्छादित खडकांनी वेढलेली ती गुहा भस्माने भरली होती. गुहेत स्मशानशांतता होती.

''बम बम भोलेऽऽ जय शिवशंकर, जय कैलासपतीऽऽ'' असा जयघोष करीत अण्णा साष्टांग दंडवत घालत शिवाच्या पायांवर कोसळलेच.

ध्यानस्थ असलेल्या शंकराने आपल्या पायावर काय कोसळले आहे, हे बघण्यासाठी आपले नेत्र किंचित विलग केले. समोर एक मर्त्य मानव पाहताच क्रोधाविष्ट होऊन ते कडाडले :

''दूर हो ... दूर हो क्षुद्र मानवाऽऽ, दूर हो. माझ्या तपोभूमीत येऊन माझी ध्यानसाधना भंग करण्याचे तुझे धारिष्ट्यच कसे झाले? थांब, मी तुला

शापच देतो–''  असे म्हणून शापवाणी उच्चारण्यासाठी त्यांनी कमंडलूतून पाणी सोडले.

खरं तर आपल्याला क्षुद्र म्हटल्याबद्दल संतापाने अण्णा काही बोलणार, इतक्यात त्यांच्यातला राजकारणी जागा झाला. तूर्तास आपला राग आवरणे हेच आपल्या हिताचे आहे, हे त्यांनी ओळखले आणि क्षणार्धात स्वत:ला आवरीत केविलवाण्या स्वरात ते म्हणाले.

''नका... महादेवा.. नका. वर्षानुवर्षे तपसाधना करून मिळवलेली पुण्याई आपण या क्षुद्र पामराला शाप देण्यासाठी खर्च करू नका.''

अण्णांची ही केविलवाणी आर्त विनवणी ऐकून त्या भोळ्या, कनवाळू शंकराचा कमंडलूतून पाणी सोडणारा हात थबकला.  'अरे, हा मर्त्य मानव तर माझ्या संचित पुण्याची चिंता करीत आहे!' या विचाराने भोळ्या शंकराच्या मनात अण्णांविषयी कणव निर्माण झाली. त्यांनी स्वहस्ते आण्णांना वर उचलले आणि प्रेमळ स्वरात म्हणाले, ''वत्स, तू आलास कुठून आणि तुझे नाव काय?''

''महादेवा, मी पृथ्वीतलावावरील भारत नामक देशातून आलो असून, धनाजी लंपट काळधंदे असे माझे पूर्ण नाव आहे. पण अण्णासाहेब काळधंदे या उपनावाने मी ओळखला जातो.'' अण्णांनी आपली ओळख दिली.

''वा! अण्णासाहेब... छान नाव आहे. पण काळधंदे म्हणजे काय, ते नाही आम्हाला समजले?'' महादेवांनी उपनावाबद्दल उपशंका विचारली.

''असं बघा महादेवा, काळं म्हणजे ब्लॅक...''

''काय.. काय म्हणालास तू? पुन्हा एकदा बोल. तुझी भाषा मला समजत नाही. ब्ल.. ब्ल... काय म्हणालास?''  देवाने पुन्हा शंका विचारली.

अण्णांच्या त्वरित लक्षात आले की, या निर्मळ आणि स्फटिकाप्रमाणे पांढऱ्या स्वच्छ देवलोकात 'ब्लॅक' हा  शब्द असणे शक्य नाही. म्हणून सुधारणा करून ते सांगू लागले :

''महादेवा, काळं म्हणजे काकवर्णी अथवा कृष्णवर्णी आणि धंदे म्हणजे उद्योग, व्यवसाय.''

''पण उद्योग–व्यवसाय कृष्णवर्णी कसा असू शकतो?'' अण्णांना थांबवीत शंकराने मधेच विचारले.

‘‘म्हणजे प्रत्यक्ष कृष्णवर्णी नाही, पण कृष्णकृत्यं कशी कुणाला नकळत, चोरून अंधारात चालतात; तसे चोरून काळोखात म्हणजे लोकांच्या लक्षात न येणारे, पण भरपूर धन-संपत्ती देणारे धंदे.’’ अण्णांनी खुलासा केला.

‘‘काऽऽय... असे अंधारात चोरून धंदे करणारा मनुष्य ब्रह्मदेवाने निर्माण केलाय?’’ महादेव शंकित स्वरात विचारते झाले.

‘‘नाही देवा, असा कृष्णकर्मी माणूस निर्माण करण्याची ब्रह्मदेवाची क्षमता नाही, बुद्धिमत्ता नाही आणि चतुरताही नाही. देवाने दिलेली बुद्धी भ्रष्ट करून अशी कृष्णकृत्ये करण्याचे चातुर्य फक्त आम्हा माणसांकडेच आहे. आणि असा माणूस घडवण्यात आम्हीच पुढाकार घेत असतो, म्हणून आम्हाला पुढारी असंसुद्धा म्हणतात.’’ अण्णांनी स्पष्ट केले.

‘‘अरे व्वा! म्हणजे देवांना शह देण्यासाठी प्रतिसृष्टी निर्माण करणारे तुम्ही पुढारी म्हणजे दुसरे विश्वामित्रच आहात!’’ शंकराने कौतुक केले.

‘‘अलबत महादेवा, अलबत! तुम्ही आशीर्वाद दिलात तर आम्ही पुढारी काय करू शकतो, हे तुम्ही पाहाच. फक्त तुमचे थोडेसे साह्य हवे.’’ अण्णा हात जोडून म्हणाले. आता हा भोळा शंकर आपल्या कह्यात आला आहे आणि आपण काय म्हणू ते करेल, याची अण्णांना खात्री पटू लागली.

‘‘बोल वत्स, बोल! आणखीन एक खास काळधंदे प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्या प्रतिविश्वामित्रा, मला तुझे कौतुक वाटते. मी तुला काय साह्य करू, ते बोल.’’ भोळे शंकर म्हणाले.

‘‘फार काही विशेष नाही महादेवा, या बाबतीत मला देवलोकातील अधिकारी पुरुषांशी चर्चा करायची आहे. त्यासाठी मला आपले ओळखपत्र द्यावे, ही नम्र प्रार्थना आहे.’’ हे सांगताना, मतं मागताना मतदाराला जोडतात तसे हात जोडायला अण्णा विसरले नाहीत.

‘‘वत्स, तुला ओळखपत्रच हवे तर ब्रह्मा, विष्णू, गणेश यांच्यापैकी कुणाचेही घे. तेही देवलोकीचे श्रेष्ठी आहेत.’’ शंकराने सुचवले.

ही श्रेष्ठी मंडळी आपली डाळ शिजू देणार नाहीत, याची अण्णांना चांगलीच कल्पना होती. केले तर हा भोळा शंकरच आपले काम करेल, याची त्यांना खात्री होती. म्हणूनच इतरत्र कुठेही न जाता प्रथम ते इथेच आले होते.

आपल्याकडे होता नव्हता तेवढा मिठ्ठासपणा आणि नम्रता स्वरात आणत, त्यांनी आपले म्हणणे नेटाने पुढे रेटले :

''शिव शिव शिव.... काय हे महादेवा.... आपण किती भोळे आहात! अहो, आपण देवांचेही देव महादेव आहात. सर्व शक्तिमान, सर्वबद्धिमान, सर्वात्मका सर्वेश्वरा आहात. 'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी' अशी आपली स्थिती झाली आहे. जे आपण कराल, ते कोणीच करू शकणार नाही. आपण स्वत:ला ओळखलेच नाही. आणि म्हणूनच मला आपल्याकडूनच ओळखपत्र पाहिजे आहे...'' आणि हे सगळे बोलत असताना अण्णा गालातल्या...गालात लबाड हसत होते. तो आता आपल्याला पटला आहे, हे त्यांना जाणवत होते. किती भोळा आहे हा शंकर.... अगदी आपल्या जनतेसारखा. जनतेची अशी खोटी स्तुती करून निवडणुका जिंकण्याचा त्यांना दांडगा अनुभव होता.

ज्येष्ठांसमोर बोलताना ते म्हणत :

'तुम्हा मंडळींना समोर बघून मला माझ्या आई-वडिलांची आठवण येते. ते माझ्या लहानपणीच गेले. आता त्यांच्याजागी मला तुम्हीच आहात. श्रावणबाळाने जशी आपल्या आई-वडिलांची सेवा केली, तशी मी तुमची करीन. मी तुम्हाला तीर्थयात्रा घडवीन. माता-पित्यांना कावडीतून यात्रा घडविण्याचा जमाना गेला, पण मी तुम्हाला काशीयात्रेसाठी ट्रेन आणि बसची फुकट व्यवस्था करीन. तुमच्यासाठी स्वस्तात वृद्धाश्रम बांधीन. आणि यासाठी तुमची मते देऊन तुम्ही मलाच निवडून द्या, असा तुमच्याकडे माझा हट्ट आहे. आणि माझा हा बालहट्ट तुम्ही पुरवाल, अशी माझी खात्री आहे.'

भाषण झाल्यावर टाळ्यांचा झालेला कडकडाट ऐकून आपली तीर्थयात्रेची गोळी बरोबर लागल्याचे त्यांच्या ध्यानी येई आणि हसत ते पुढच्या सभेला जात. समोरचा तरुण प्रेक्षक बघून ते म्हणत :

'आजचा तरुण सुशिक्षित आणि स्वावलंबी कण्यासाठी मी माझी हयात वेचीन. तरुणांना नोकऱ्या देणे, धंदे-व्यवसाय सुरू करण्यास संपूर्ण साह्य करणे, या देशाची बेकारी व गरिबी हटवणे, हे माझ्या जीवनाचे ध्येय आहे. तुम्ही मला माझ्या मुलांसारखे आहात...' वगैरे बोलून ते तरुणांची मते खिशात घालत.

जाती–धर्माची तेढ वाढवून तर त्यांनी आपल्याच नव्हे, तर पुढच्या पिढ्यांचीही नेतेपणाची कायम सोय करून ठेवली होती. जनता कधीही एक होणार नाही, याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतली होती. कारण जनता जर एक झाली, तर आपण संपलोच, हे त्यांना पक्के माहीत होते. तीच पॉलिसी वापरून, प्रत्येक देवाला एकेकटा गाठून आपले इप्सित साध्य करून घेण्याचा त्यांचा प्लॅन होता आणि शंकराला पटवून त्यांनी पहिली बाजी मारली होती. शंकराचे ओळखपत्र आता त्यांच्यापासून हातभर अंतरावर होते.

''देताय ना ओळखपत्र महादेवा?'' देवापुढे आपले दोन्ही हात पसरून ते म्हणाले. आणि हे म्हणत असताना त्यांचा चेहरा इतका केविलवाणा झाला की, पार्वतीदेवींना त्यांची दया आली.

''भोलेनाथ, आपल्या या भक्ताचा आता अधिक अंत पाहू नका. त्यांना हवे ते ओळखपत्र प्रदान करा पाहू ....'' त्यांनी देवाकडे पाहून म्हटले. महादेवांनी एक स्मितहास्य केले आणि उजवा हात उताणा पुढे धरून, नेत्र मिटून मनातल्या मनात काही मंत्र म्हटला आणि क्षणार्धात त्यांच्या हातावर कैलासाची मोहोर उठविलेले एक ओळखपत्र आले. ते ओळखपत्र अण्णांच्या हातावर ठेवले. अण्णांनी ते ओळखपत्र वाचण्याचा प्रयत्न केला, पण ते देवभाषेत असल्याने वाचू शकले नाहीत. पण त्यावर ठसठशीत उठलेली कैलासाची मोहोर पाहून ते खूश झाले. अण्णांना ते ओळखपत्र पाहून इतका आनंद झाला की, ते मोठ्ठ्याने ओरडले ''जय शिवशंकरऽऽ, जय भोले शंकरऽऽ!

– ९ –

''जय भोले शंकरऽऽ'' अशी गर्जना करून यतिवेशात अण्णा वायुदेवाच्या वात–महालासमोर उभे ठाकले. आता त्यांच्याकडे महादेवाचे ओळखपत्र असल्याने ते देवलोकात कुठेही मुक्त संचार करू शकत होते. भोलेनाथांच्या नावाची गर्जना ऐकून वायुदेव बाहेर आले. समोर भगवी वस्त्रे परिधान केलेल्या यतीला पाहून त्यांनी पृच्छा केली, ''आपण कुठून आलात यतिराज?''

''मी कैलासाहून आलोय वत्स!'' असे म्हणून अण्णांनी आपले ओळखपत्र समोर केले. वायुदेवाने ते ओळखपत्र हातात घेऊन त्यावरची कैलासपतीची ठसठशीत मोहोर पाहून, ते यतीला परत करीत आदराने म्हणाले, ''यावं यतिराज, यावं. आपलं स्वागत आहे.''

वायुदेवांनी पुढ्यात ठेवलेल्या फलाहाराचा यथेच्छ समाचार घेतल्यावर एक दीर्घ ढेकर देऊन अण्णा म्हणाले :

''हे वायुदेवा, तुझा पाहुणचार घेऊन मी तृप्त झालो. तू अतिथीप्रेमी आहेस. सर्वव्यापी आहेस. चिरंजीव आहेस. सर्व जगताचा श्वास आहेस. प्राण आहेस. पंचमहाभूतांपैकी एक आहेस. पण मला सांगायला खेद वाटतो की-पृथ्वी, आप, तेज आणि आकाश या इतर चार महाभूतांइतके महत्त्व तुला नाही.''

''नाही यतिराज, तसे मुळीच नाही. पण आपणास असे का बरे वाटत आहे?'' वायुदेव नम्रपणे म्हणाले.

''असे मीच म्हणत नाही वत्स, तर भगवान शंकरसुद्धा तुझ्याबद्दल असेच म्हणतात. म्हणून तर त्यांनी मला तुझ्याकडे पाठवले आहे!''

''काय, साक्षात कैलासपती माझ्याबद्दल असे बोलतात? पण असे त्यांना का बरे वाटत असावे यतिराज?'' वायुदेव आश्चर्याने म्हणाले.

हा प्राणी आता आपल्या जाळ्यात अडकतोय, हे चाणाक्षबुद्धी अण्णांनी बरोबर हेरले आणि त्यांनी जाळे घट्ट करायला सुरुवात केली :

''वत्स, तू अव्याहत वाहत असतोस. प्राणिमात्रांना प्राणवायूचा पुरवठा सतत करीत असतोस. कधी शीत वाहतोस, कधी उष्ण वाहतोस. प्राणिमात्राच्या सुखाचीच चिंता सतत करीत असतोस.'' मनातल्या मनात कावेबाजपणे हसत अण्णा म्हणाले.

''सत्य आहे यतिराज! पण ते तर माझे नियमित कर्तव्यच आहे.''

''इथेच... इथेच चुकतो आहेस तू वत्स. असे नियमित कर्तव्यपालन करीत राहिल्याने आपले महत्त्व वाढत तर नाहीच, उलट कमी-कमी होत असते.'' त्याला अर्धवट तोडीत अण्णा म्हणाले.

''मी नाही समजलो यतिराज?'' वायू आश्चर्याने उद्‌गारला!

''मला सांग वत्स, हनुमंताने जन्मताच जेव्हा सूर्यावर झेप घेतली होती; तेव्हा त्याला शिक्षा करण्यासाठी म्हणून तू स्वत:ला आवरून घेतले होतेस, बंद करून घेतले होतेस - हे आठवतं तुला?'' अण्णा एक डोळा किंचित बारीक करून म्हणाले.

‘‘आठवतंय, मला ते चांगलंच आठवतंय यतिराज!’’ वायू उत्तरला.

‘‘मग तुला हेही आठवत असेल की– त्या वेळी सर्व देव–देवता, प्राणिमात्र इ. तुझ्या दाराशी येऊन तुझ्या विनवण्या – मनधरणी करीत होते?’’ अण्णा डोळा आणखी बारीक करीत म्हणाले.

‘‘हो, तेही आठवतंय मला यतिराज. पण त्याचं काय?’’

‘‘याचाच अर्थ असा वत्स की – आपण आपले कर्तव्य केले नाही, तरच इतरांना आपली आठवण येते आणि ते आपल्या पायाशी येतात. अन्यथा, आपले अस्तित्वच त्यांना जाणवत नाही.’’ अण्णा फार मोठे तत्त्वज्ञान सांगितल्याच्या थाटात म्हणाले.

‘‘हंऽऽ’’ असं स्वत:शीच हुंकारून वायुदेव विचारात पडला.

‘आता सळई चांगलीच तापली आहे. हीच घाव घालायची वेळ आहे’ असे मनाशी म्हणत अण्णा पुढे म्हणाले :

‘‘आणि म्हणून म्हणतो वत्स, अधून–मधून असं स्वत:ला बंद करून घ्यायचं आणि पुन्हा सुरू होण्यासाठी डिमांड करायची!’’ अण्णांनी समजावले.

‘‘काऽऽय... काय करायची म्हणालात यतिराज?’’ काही न समजून वायुदेव म्हणाले.

मधेच आपण माणसाची भाषा बोलल्याचे अण्णांच्या ध्यानात आले आणि गडबडून ते म्हणाले, ‘‘म्हणजे त्या बदल्यात आपण धनसंपत्ती मागायची. आणि हा सगळा व्यवहार कुणाच्याही नकळत अंधारात करायचा.’’ अण्णांनी शेवटचा हातोडा मारला.

‘‘अरे व्वा! अशी तर आपल्याकडे अमाप संपत्ती जमा होईल! पण अशी ते देतील?’’ वायूने शंका व्यक्त केली.

‘‘त्यांना ती द्यावीच लागेल, अन्यथा आपल्या प्राणास मुकावे लागेल!’’ अण्णा म्हणाले.

‘‘अरे व्वा! अशी तर आपल्याकडे अमाप संपत्ती जमा होईल. पण ती चोरीची संपत्ती जवळ किंवा कोषागारात ठेवली, तर इतरांच्या ते लक्षात येईल व त्याचा जाब आपल्याला द्यावा लागेल; त्याचे काय?’’ वायूने दुसरी शंका व्यक्त केली.

''त्याची चिंता नको. माझ्या माहितीत पृथ्वीवर स्विस नावाचा एक असा देश आहे की, तेथील कोषागारात कितीही संपत्ती ठेवली, तरी ते कसलीही चौकशी करीत नाहीत.'' अण्णा खात्रीपूर्वक म्हणाले.

हे ऐकले आणि वायुदेव खूश झाले. अण्णांबद्दल त्याला नितांत आदर वाटू लागला. अण्णांची अफाट बुद्धिमत्ता, प्रत्येक शंका निवारण करण्याचे त्यांचे चातुर्य आणि आपल्याला हवी तशी परिस्थिती निर्माण करण्याचे कौशल्य पाहून तो थक्क झाला.

''ठीक आहे यतिराज, आपण सांगितले त्याप्रमाणेच सर्व होईल. पण पुढची, संपत्ती गोळा करून ती आपण म्हणता त्या कोषागारात जमा करण्याची जबाबदारी आपली.'' वायुदेव आश्वासक सुरात म्हणाले.

''आणखी एक वत्स- हे काम पूर्णत्वास जाण्यासाठी आपल्याला प्रकाश अर्थात सूर्यदेव आणि जल अर्थात पर्जन्यदेव यांचेही साह्य लागेल. अर्थात, त्यासाठी संपत्तीचा योग्य तो वाटा त्यांनाही मिळेलच, तेव्हा ते पण तूच... जमेल ना की मीच...?''

अण्णांनी जाणूनबुजून, हेतुपूर्वक आपले वाक्य अर्धे सोडले होते. कारण ते आता वायुदेवच पुरे करील, असा त्यांचा आत्मविश्वास होता आणि झालेही तसेच.

आपले कौशल्य दाखविण्याची ही आलेली संधी वायुदेवाला गमवायची नव्हती. मी पण तुमच्याइतकाच हुशार आणि चाणाक्ष आहे, हे तो यतीला दाखवून देणार होता.

''नको-नको, आपण कशाला.... मी करीन ते. त्याबद्दल आपण अगदी निश्चिंत असावे.'' असे आश्वासन वायुदेवाने दिले आणि मनातल्या मनात खदखदा हसत अण्णांनी तिथून काढता पाय घेतला.

**- १० -**

अण्णांनी तिथून काढता पाय घेताच कधी एकदा आपण सूर्यदेव आणि पर्जन्यदेव यांच्याशी बोलतो, असे वायुदेवाला झाले. त्यांना भेटण्यासाठी निघायची तयारी करीत असतानाच त्याला अण्णांचे शब्द आठवले आणि लक्षात आले - अरे, आपण तिकडे जायची गरज नाही; उलट तेच आपल्याकडे

येतील. हा विचार मनात येताच त्याने सूर्यलोकातून आणि पर्जन्यलोकातून आपले अस्तित्व काढून घेतले.

सूर्यलोक आणि पर्जन्यलोकातील जनता वायुविना हवालदिल झाली. त्रस्त होऊन त्यांनी आपापले अधिपती सूर्यदेव आणि पर्जन्यदेव यांच्याकडे थव्याथव्याने धाव घेतली. ''भगवन्, वातावरणातून वायू अचानक नाहीसा झाल्याने आमची अवस्था मरणप्राय झाली आहे. काहीही करा, पण वायूला पाचारण करा'' अशी कळकळीची विनवणी केली. जनतेचे ते गाऱ्हाणे ऐकून पर्जन्य व सूर्यदेव आपापल्या मार्गाने वायुलोकाकडे रवाना झाले आणि एकाच वेळी वातमहालात पोहोचले.

''स्वागत...स्वागत असो आपणा उभयतांचे!'' वायुदेवाने हसतमुखाने त्यांचे स्वागत केले. त्यांनाच इथे यायला भाग पाडण्याची आपली युक्ती सफल झाल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर विलसत होता. ''बोला, काय सेवा करू मी आपली?'' त्याने नम्रपणे विचारले.

''वायुदेवा, आम्हा दोघांच्याही सत्ताक्षेत्रातून अचानक लुप्त होऊन, तू का बरे आमच्या जनतेचा छळ मांडला आहेस, हे विचारण्यासाठी आम्ही आलो आहोत.'' पर्जन्यराज म्हणाले.

''क्षमस्व! पण हे सर्व मी आपल्या भल्यासाठीच केले आहे.'' वायुदेव विश्वासपूर्वक बोलले.

''भल्यासाठी? यात आमचे काय भले आहे? जनता कष्टी होऊन आमचे कधी भले होईल का वायुदेवा?'' सूर्यदेव जरा कोपाविष्ट होऊन म्हणाले.

''शांत.. शांत व्हा.. सूर्यदेवा, शांत व्हा. असे त्वरित तप्तावस्थेत जाऊ नका. ते जनतेलाच नाही, तर आपल्यालाही घातक आहे.'' वायुदेवाने थंडपणे त्याची समजूत घातली.

''ठीक आहे, झालो मी शांत. आता यात आपले काय आणि कसे भले आहे, सांग बघू...'' सूर्यदेवाने विचारले आणि त्याला पुष्टी म्हणून ''हंऽ'' असे पर्जन्यराज हुंकारले.

''हे बघा महोदय...'' अशी सुरुवात करून वायुदेवाने त्या दोघांशी बराच वेळ खलबत केले.

''पण मी असं विचारतो की, आपल्या गरजा भागविण्याइतके धन कुबेराच्या कोषातून आपल्याला मिळतेच आहे; मग अतिरिक्त धन कशाला?'' पर्जन्यराज मधेच विचारता झाला.

''त्याचं काय आहे मित्रांनो, आपल्याला जर अधिक धन मिळाले; तर आपले राहणीमान अधिक उंचावेल. आपले राहणीमान उंचावल्याने आपल्याला अधिक मान मिळेल. अधिक मान मिळाल्याने आपली सत्ता अधिक बळकट होईल. आणि अशी आपली सत्ता बळकट झाली, तर उद्या कदाचित आपल्याला विष्णुपदावरही हक्क सांगता येईल.''

वायुदेवाचे हे प्रतिपादन ऐकून मात्र दोघेही खूश झाले आणि 'ठरलं' असं म्हणून त्यांनी एकमेकांच्या हातावर हात ठेवले.

मघाशी अण्णांनी काढता पाय घेण्याचे नाटक केले होते, पण वास्तवात ते तिथेच लपून बसले होते. आपण निघून गेल्यावर हे सर्व असेच घडणार आहे, याची त्यांना बालंबाल खात्री होती. त्यामुळे झाला प्रकार लपून ऐकल्यावर आणि बघितल्यावर त्यांच्या आनंदाला उधाण आले. बेभान होऊन ''जय शंकर, जय भोलेनाथऽ'' अशी मोठ्याने गर्जना करून ''हा हा हा हा हा हा'' असे विजयी हास्य करीत ते प्लॅनच्या पुढच्या तयारीला निघाले.

– ११ –

**दिवस सुगीचे सुरू जाहले, ओला चारा, बैल माजले**
**शेतकरी मन प्रफुल्ल झाले, छनकळ छनकळ**
**ढुम पक पक ढुम, लेझीम चाले जोरात !!**

पावसाळ्यात पाऊस, उन्हाळ्यात ऊन आणि थंडीत थंडी पडायची. सगळे मोसम आणि ऋतू आपापले काम चोख पार पाडायचे. कसलीही ददात नव्हती.

हुर्डा पार्ट्या काय, उसाची गुऱ्हाळं काय, आंबेवनात आमरसाच्या पार्ट्या काय– खाण्यापिण्याची चंगळ होती. लग्नसराईत, ढोलताशांच्या गजरात भोजनाच्या पंक्तीच्या पंक्ती उठायच्या. दिवाळी–दसऱ्यासारखे सण दणक्यात साजरे व्हायचे. अगदी कवितेत वर्णन केल्याप्रमाणे आनंदी व प्रसन्न वातावरण होते. सामान्य माणूस सुखी होता. राज्यकर्त्यांवर खूश होता.

पण कुठल्या तरी अपशकुनी क्षणी राज्यकर्त्यांच्या मनात सत्ता-संपत्तीचे राजकारण शिरले आणि हळूहळू सगळेच बदलत गेले. मतांच्या बँका निर्माण करण्यासाठी जाती-धर्मांचे गट तयार केले गेले. त्यांच्यात दुहीचे आणि द्वेषाचे बीज पेरण्यात आले की, जेणेकरून ते कधीही एक होणार नाहीत; कारण जाती-धर्मांतले हे भेद हेच त्यांच्या राजकारणाचे मुख्य भांडवल होते. विकासाच्या नावावर शेतमळे नष्ट करून सिमेंटची जंगले उभारली गेली आणि याच स्वार्थी राजकारणाच्या उदरात अण्णा काळधंदे सारख्या पुढाऱ्यांनी जन्म घेतला. सत्ता आणि संपत्तीसाठी त्यांनी नीती-अनीतीचे, पाप-पुण्याचे सगळे नियम झुगारून लावले.

त्यातच आता अवकाळी पावसाचे हे नवीनच संकट उद्भवले. पाऊस हवा तेव्हा पडेनासा झाला आणि नको तेव्हा पडू लागला. उभी पिके जळून तरी जाऊ लागली किंवा वाहून तरी जाऊ लागली. शेतकरी हवालदिल झाला. आत्महत्येचे प्रमाण वाढू लागले. थंडीत उन्हाचे चटके बसू लागले, तर उन्हाळ्यात थंडीचा कडाका भासू लागला. वादळांचे तडाखे अकाली बसू लागले. पाऊस तर कधीही पडून पिकांची आणि उद्योगधंद्यांची वाट लावू लागला. बेकारी आणि महागाई प्रचंड वाढली. भूकबळी पडू लागले. देवांच्या दारी यज्ञयाग आणि नवसांची रीघ लागली. देवळा-देवळातून गाऱ्हाणी व तक्रारींचे ढीग वाढू लागले. त्यांच्यावरचे प्रेशर प्रचंड वाढले. आणि म्हणून यातून सुटका करून घेण्यासाठी, तक्रारींचे ते ढीग घेऊन, सर्व भूदेवांनी देवलोकीचा मार्ग धरला.

– १२ –

''जय शिवशंकरऽ जय भोलेनाथऽऽ'' अशी गर्जना करीत अण्णांनी वात-महालात प्रवेश केला आणि ठरल्याप्रमाणे वायुदेव, सूर्यदेव आणि पर्जन्यराज हे तिघे एकत्र जमलेले पाहून समाधान पावले. उत्तेजित स्वरात ते बोलू लागले :

''व्वा! देवताहो, छान! छान कामगिरी केलीत तुम्ही. वारा, ऊन, पाऊस यांचा अकाली व अनियमित मारा करून भारतदेशी तुम्ही जो हाहाकार उडवलाय, त्याला तोड नाही. ते सर्व नियमित व्हावे म्हणून, मानवाकडून अमाप संपत्ती देवलोकी आली आहे. पण कसेही करून तुम्हाला ती कुबेराच्या कोषागारातून सोडवून आणायला हवी.''

''पण ते सर्व तुम्हीच कराल, असे वचन तुम्ही आम्हाला दिले होते.'' तिघेही एक स्वरात म्हणाले.

''हो, म्हणालो होतो ना! मी कुठं नाकारतोय? बोलल्याप्रमाणे लोकांना देवळा-देवळांतून दान करायला लावून ती संपत्ती देवलोकापर्यंत आणण्याचे काम मी केलेच की. पण ती कुबेराकडून सोडवून घेण्याचे काम तुम्हालाच करावे लागेल.'' अण्णा म्हणाले. वास्तविक त्यांनी स्वत: यात काहीच केले नव्हते. परिस्थितीने त्रस्त झालेली माणसे मागणी व दान घेऊन आपण होऊन देवळात जातील, हे त्यांना चांगले माहीत होते आणि दानाचे ते धन भूदेवांच्या मार्फत देवलोकात आपोआप येईल, अशी त्यांची अटकळ होती आणि अगदी तसेच घडले होते. धूर्त अण्णांनी याचा अचूक फायदा घेतला होता.

''पण त्यासाठी आम्ही नाही कुबेराकडे जाऊ शकत.'' वायुदेव किंचित रोषाने अण्णांना म्हणाले.

''ठीक आहे. मग ते धन देवलोकात कसे आले, याचा खुलासा कुबेराकडे जाऊन मीच करतो. पुढच्या परिणामांची तयारी मात्र तुम्ही ठेवा.'' असं शांतपणे म्हणून अण्णा गालातल्या गालात लबाड हसले.

''नको-नको, आम्ही बघतो काय करायचे ते.'' वायुदेव घाईघाईने म्हणाले.

''बघा. पण त्यात माझा पण वाटा आहे, हे विसरू नका. नाही तर....''

आपण अर्धवट सोडलेल्या वाक्याचा परिणाम होणारच, अशी अण्णांची खात्री होती.

**- १३ -**

भूलोकातून कुबेराच्या कोषागारात आलेल्या धन-संपत्तीची मोजणी झाली आणि ते धन हिशोबापेक्षा खूपच जास्त असल्याचे कुबेराच्या लक्षात आले. याचा खुलासा विचारण्यासाठी तो सेवकाला बोलावणार, इतक्यात सेवकच आत आला आणि वंदन करून म्हणाला,

''कुबेरमहाराज, आपल्याला भेटण्यासाठी वायुदेव, सूर्यदेव आणि पर्जन्यराज आले आहेत.''

'हे तिघे अचानक एकत्र मला भेटायला का बरे आले असावेत?' असा

विचार मनात करीत कुबेराने त्यांना आत पाठण्याची अनुज्ञा सेवकाला दिली आणि ते पुन्हा हिशोबाची वही पाहू लागले.

''प्रणाम कुबेरमहाराज!'' म्हणून तिघेही समोर येऊन उभे राहिले.

''बोला. काय कारणे येणे केलेत?'' वही पाहतच ते म्हणाले.

''काय, हिशोब चाललाय वाटतं?'' वायुदेवाने सहज विचारावे तसे विचारले. कारण जी काय बोलणी करायची ते त्यानेच करावीत, असे इतर दोघांनी त्याला आधीच बजावले होते.

''हो. पण ऐवज हिशोबापेक्षा जास्तच वाटतोय.'' कुबेर अर्धवट स्वगत आणि अर्धवट उघड पुटपुटले.

''तो आमचा आहे!'' वायुदेव झटकन म्हणून लगेच गप्प झाले. कुबेर आश्चर्याने त्यांच्याकडे बघतच राहिले.

'' काय... काय म्हणालात?'' आपण ऐकले ते खरे की तो भास होता, या शंकेने त्यांनी विचारले.

''न.... न.... नाही म्हणजे ते आपलेच आहेत... असे म्हणायचे होते मला.'' वायुदेव चाचरत म्हणाले.

''आपले म्हणजे?'' काही न समजून कुबेर म्हणाले.

''म्हणजे.... म्हणजे क्षमस्व महाराज, पण....'' असं म्हणत आता सांगितल्याशिवाय गत्यंतर नाही, हे समजून वायुदेवाने अण्णासाहेब काळधंदे भेटल्यापासूनची सर्व हकिगत कथन केली.

''काय... असा माणूस देवलोकात आहे आणि त्याच्याकडे प्रत्यक्ष भगवान शंकरांचे ओळखपत्र आहे?'' भुवया उंचावून त्यांनी आश्चर्याने विचारले. ''कुठे आहे तो?'' त्यांनी पुढे विचारले.

''तो आमच्याबरोबरच आला असून बाहेर उभा आहे.'' वायुदेव म्हणाले.

कुबेरांनी सेवकाकरवी त्याल आत बोलावून घेतले. अण्णा आत येऊन, आपले नेहमीचे पुढारी छाप हास्य चेहऱ्यावर ठेवून, दोन्ही हात जोडून उभे राहिले.

कुबेराने एखादा महामानव बघावा तसे त्यांना नखशिखांत बघून घेतले

आणि म्हणाले, ''हे मनुष्या, धनसंपत्ती जमा करण्याचे तुझे बुद्धिचातुर्य बघून मी थक्क झालो आहे. पण अशी गैरमार्गाने मिळवलेली संपत्ती इथे आणून तू देवलोक भ्रष्ट केला आहेस, यासाठी मला तुझी तक्रार ब्रह्मा-विष्णूकडे करावी लागेल.''

''ह्या संपत्तीमधला त्यांचा वाटा त्यांना आधीच पोहोचविण्यात आला आहे महाराज!'' अण्णा कमरेत वाकून हात जोडीत म्हणाले.

''काय? प्रत्यक्ष ब्रह्मा-विष्णूला लाच देऊन तू वश करून घेतले आहेस? धन्य, धन्य आहेस तू मानवा- धन्य आहेस!'' असं म्हणून कुबेरमहाराजांनी उठून त्यांना साष्टांग दंडवत घातला आणि ते पाहून वायुदेव, सूर्यदेव व पर्जन्यराज अभिमानाने व कौतुकाने अण्णाकडे बघतच राहिले.

– १४ –

भगवान विष्णुदेवाचा दरबार आज गच्च भरला होता. आज दरबारात अचानक खूपच गर्दी उसळली होती. देवलोकीचे देव तर उपस्थित होतेच, पण भूलोकीच्या देवांनीसुद्धा दरबारात गर्दी केली होती. सर्व आसने तर भरली होतीच; शिवाय मिळेल तिथे जागा पकडून काही देव खाली बसले होते, तर काही मागे आणि दोन्ही बाजूला उभे होते.

विष्णुदेवांच्या चेहऱ्यावर पसरलेले चिंतेचे जाळे सर्वांना स्पष्ट होते. भूदेवांच्या तक्रारी आणि देवलोकीच्या भ्रष्टाचाराच्या कानी आलेल्या वृत्तांनी ते खूप कष्टी झाले होते. त्याच वेळी त्यांना नारदांनी सांगितलेल्या भूलोकीहून आलेल्या दूषित वाऱ्याबद्दल आलेल्या वृत्ताचेही स्मरण झाले आणि म्हणून या प्रकरणाच्या मुळात जाऊन त्याची चौकशी करण्याचे त्यांनी ठरविले होते. त्यासाठीच ते नारदाची वाट बघत होते.

''नारायणऽ... नारायण'' चा गजर करीत नारदमुनी दरबारात आले आणि त्यांचीच वाट बघत असलेले भगवान विष्णू वेळ न गमावता त्यांना विचारते झाले :

''मुनिवर्य, आपण मागे एकदा भूलोकीहून आलेल्या दूषित वाऱ्याबद्दलची वार्ता माझ्या कानी घातली होती. त्याबद्दल चौकशी करून अहवाल देण्यास

मी यमराजाला सांगितले होते. पण अद्याप तिकडून काहीच कळले नाही. आपण त्रिखंड ज्ञानी आहात, म्हणून मी आपणास पाचारण केले आहे.''

''नारायणऽ नारायणऽऽ'' म्हणत नारदमुनी स्वत:शीच हसून म्हणाले : ''भगवंत, इंद्रदेवांकडून आपणास अहवाल येणारही नाही, कारण त्या महामानवाच्या धूर्तपणामुळे इंद्रदेवासह सर्वांचेच हात या प्रकरणात मलिन झाले आहेत आणि म्हणून प्रकरण दडपून टाकण्यात आले आहे.''

नारदमुनींच्या या बोलण्याने ब्रह्मा-विष्णूसह समस्त देवसभा अचंबित झाली. आपसात कुजबुजीचा आवाज दरबारात घुमला आणि 'शांतऽशांतऽऽ' म्हणत, मेजावर शंख आपटत विष्णूने कुजबूज बंद केली. शांतता प्रस्थापित होताच ब्रह्माला उद्देशून विष्णू म्हणाले :

''ब्रह्मा, देवांनाही अंकित करणारा असाही मनुष्य आपण घडवलाय?''

''नाही भगवन्, हा सगळा प्रकार ऐकून मी स्वत:च आश्चर्यचकित झालो आहे. असा माणूस माझ्या कार्यशाळेत घडल्याचे मला तरी आठवत नाही.'' ब्रह्माने उत्तर दिले.

''पण मग हा असा माणूस घडला तरी कसा मुनिवर्य?'' विष्णूने विचारले.

''नारायणऽ नारायणऽऽ! भगवन्, आपण अभय दिलंत, तर स्वत: चित्रगुप्त ही कथा आपणास सांगतील.'' नारद म्हणाले आणि विष्णूने अभय देऊन चित्रगुप्ताला दरबारात पाचारण केले.

आपली वही उघडून हे अजब रसायन घडले कसे याची कथा चित्रगुप्त सांगू लागताच निरव शांतता निर्माण झाली आणि सर्व दरबार कानांत प्राण आणून ऐकू लागला.

''हा माणूस जन्मतःच खोडकर, उचापती नि धाडसी. जन्माला येताना आडवा येऊन याने त्राहिभगवान करून सोडले. सुईणीच्या गळ्यातली चकाकती सोन्यची चेन दृष्टीस पडली, तेव्हा कुठे त्यांनी जन्म घेतला. बालपणी शेजारी -पाजारी त्याला कौतुकाने हसायला सांगत, तेव्हा काही खाऊ दिल्याशिवाय ते हसतच नसत. लहान असताना आई घरकाम करी, तेव्हा ते रडून गोंधळ घालीत असत आणि काही खाऊ दिल्यावरच तिला काम करू देत असत. थोडे मोठे झाल्यावर ते पाठच्या भावंडांना सांभाळीत, पण त्यासाठी आईकडून

खाऊ उपटायला चुकत नसत. आणखी मोठे झाल्यावर जेव्हा ते मुलांत खेळायला लागले; तेव्हा दोन मुलांमध्ये भांडणे झाली, तर ती सोडवत आणि त्या बदल्यात दोघांकडूनही पेन्सिल, रबर, वही अशा वस्तू उपटत. आणखी मोठे झाल्यावर ते शेतीव्यवसायातील दोन भावांचे किंवा बांधाला बांध लागून असलेल्या दोन शेतकऱ्यांचे तंटे सोडवायचे आणि त्या बदल्यात दोघांकडूनही थोडी-थोडी जमीन लाटायचे. अशी फुकटची जमीन लाटून-लाटूनच ते जमीनदार झाले आणि गावचे पुढारीही झाले. ग्रामपंचायत कार्यालयात अनेक लफडी-कुलंगडी करून त्यांनी आपला जनसंपर्क वाढवला आणि सरपंच झाले. सरपंच झाल्यावर आपल्या सत्तेचा वापर करून त्यांनी अनेक अडल्या-नडल्या शेतकऱ्यांच्या जमिनी व घरे फुकटात किंवा कवडीमोलाने लाटून गावचे, तालुक्याचे आणि जिल्ह्याचे सम्राटपद प्राप्त करून घेतले. अर्थात, हे सर्व करीत असताना त्यांनी अनेक गावगुंडांना अंकित करून घेतले होते. नंतर ते राजकारणात आले. नव्हे, त्यांना यावेच लागले. कारण राजकारणात अशाच धडाडीच्या माणसांची गरज होती. जिल्ह्याच्या एका मंत्र्यांनी त्यांना हाताशी धरले आणि तोच हात धरून निवडणूक लढवून ते मंत्री झाले. त्यांच्या धडाडीचा आणि चातुर्याचा सर्व राजकारण्यांना लाभ व्हावा, यासाठी कुठेही अस्तित्वात नसलेले सल्लागार मंत्रिपद खास त्यांच्यासाठी निर्माण करण्यात आले. त्यांचा सल्ला किती मोहक, मोलाचा आणि आकर्षक असतो, हे आपण देवलोकात अनुभवले आहेच.''

चित्रगुप्ताने वाचन संपवून वही मिटली. दरबारात क्षणभर सुन्न शांतता भरून राहिली. अवाक् होऊन सर्व जण नुसते बघतच राहीले. आणि अचानक टाळ्या वाजवून भगवान विष्णूंनी त्या निरव शांततेचा भंग केला आणि हळू-हळू वाढत जाऊन दरबार टाळ्यांच्या कडकडाटाने भरून गेला.

''वा! छान! इतक्या हुशार, बुद्धिमान मनुष्यप्राण्याला भेटायलाच हवे. आता कुठे आहे तो?'' विष्णूंनी विचारले.

''इथे माझ्याबरोबरच आणला आहे मी त्याला. दरबाराच्या प्रतीक्षा-गृहात बसवले आहे.'' चित्रगुप्ताने उत्तर दिले.

''त्याला आमच्यासमोर त्वरित हजर करा.'' भगवान विष्णूंनी आज्ञा दिली.

– १५ –

सर्व दरबाराचे लक्ष प्रवेशद्वाराकडे लागले होते. भूलोकावरचे हे अजब रसायन आहे तरी काय, हे पाहण्याची सर्वांनाच उत्सुकता लागली होती. भगवान विष्णू आता त्याला कसा फैलावर घेतात आणि काय शिक्षा करतात, याकडेही सर्वांचे डोळे लागले होते.

चेहऱ्यावर नेहमीचे छाप हास्य ठेवून, कमरेत वाकून व दोन्ही हात जोडून अण्णांनी दरबारात प्रवेश केला आणि महाविष्णूसह पूर्ण देवसभा त्यांच्याकडे आश्चर्याने पाहू लागली.

''प्रणाम भगवंत!'' असे म्हणून तशाच हात जोडलेल्या स्थितीत अण्णा त्यांच्यासमोर उभे राहिले. खरं तर आपल्यासमोर एक हुकमी आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व येईल, अशी सर्वांची अपेक्षा होती; पण अशी बावळट व लाचार दिसणारी अगदी सामान्य व्यक्ती समोर पाहून त्यांची घोर निराशा झाली.

''चित्रगुप्त, आत्ता आपण ज्या चरित्राचं वाचन केलंत, तो हा मानव?'' अण्णांकडे तुच्छतापूर्वक कटाक्ष टाकीत विष्णू म्हणाले.

''होय भगवंत, हाच तो मानव. आपण त्याच्या या ध्यानावर जाऊ नका. 'वेश असावा बावळा, परंतु अंतरी नाना कळा' या उक्तीत पुरेपूर बसणारा हा मानव आहे.'' चित्रगुप्ताने तरफदारी केली.

''हं. नाव काय तुझं?'' विष्णूंनी विचारले.

''अण्णासाहेब काळधंदे भगवन्'' अण्णा स्वरात पूर्ण आत्मविश्वास आणत म्हणाले.

'हं, म्हणजे दिसतो तसा बावळट नाही' स्वरातली दृढता हेरून विष्णूंनी मनात विचार केला.

''भूलोकात स्वतःच्या कृष्णकृत्यांनी तू फार उच्छाद मांडला आहेस, अशा स्वरूपाच्या तुझ्याविरुद्धच्या तक्रारींचे गठ्ठेच्या गठ्ठे माझ्याकडे आले आहेत.'' भूदेवांनी आणलेल्या गठ्ठ्यांकडे निर्देश करून विष्णू म्हणाले.

''भगवंत, विश्वाचा एवढा मोठा पसारा सांभाळायचा, म्हणजे अशा काही तक्रारी येणारच. आपण सर्वांना सर्व देऊन सर्वांचेच समाधान करू शकत

नाही. त्यामुळे काही अतृप्त लोक अशा तक्रारी करणारच. तिकडे आपण थोडे दुर्लक्ष करायला शिकले पाहिजे, म्हणजे मनावर फार ताण येणार नाही.'' देवांनी न मागताही असा सल्ला देऊन अण्णा आपल्या सल्लामंत्रिपदाला जागले. आणि कसे कुणास ठाऊक, विष्णूंनाही हा सल्ला भावला. इतकी युगे हे आपल्याला का सुचले नाही? उगीचच 'यदा यदा हि धर्मस्य' करीत आपण अवतार घेत राहिलो, असे त्यांना वाटले.

''पण आम्ही देव आहोत. लोकांची आमच्यावर श्रद्धा आहे, भक्ती आहे. त्यामुळे त्यांचा विचार आम्हाला करायलाच हवा.'' असे म्हणून विष्णूंनी वाद पुढे रेटला.

''क्षमा करा भगवंत. पण लोकांची तुमच्यावर श्रद्धा आहे, भक्ती आहे हा तुमचा निव्वळ भ्रम आहे!'' अण्णांच्या या विधानाने मात्र देवसभा हडबडली. त्यांच्या पोटात प्रचंड शूळ उठला.

''काय म्हणतोस काय, तू मानवा! तुझ्या या विधानाने तू भक्तांचाच नाही, तर आम्हा देवांचाही अवमान केला आहेस.'' क्रोधित होऊन विष्णू म्हणाले.

''शांत व्हा! शांत व्हा भगवन्, शांत व्हा! आपला अवमान करण्याचा माझा हेतू नव्हता; फक्त वस्तुस्थिती आपल्या नजरेस आणायची होती.'' अण्णा देवांना चुचकारीत म्हणाले.

एका य:कश्चित मानवासमोर आपण इतके क्रोधाविष्ट व्हायला नको होते, ही गोष्ट विष्णूंच्या ध्यानात आली ''आणि, काय-काय वस्तुस्थिती आहे, सांग बघू....'' स्वत:ला सावरीत त्यांनी विचारले.

''क्षमा करा भगवंत, पण वस्तुस्थिती अशी आहे की- तुमचे भक्तजन स्वार्थी आणि आपमतलबी आहेत. थांबा, असे रागाने माझ्याकडे बघू नका. मी तुम्हाला हे सप्रमाण पटवून देतो. पहिली गोष्ट म्हणजे, तुमचे भक्त जेव्हा काही संकटात किंवा अडचणीत असतील, तेव्हाच त्यांना तुमची आठवण येते. दुसरी गोष्ट म्हणजे, अगदी अल्प मोबदल्यात ते तुमचे साह्य मागतात. लक्षावधी मोलाची कामे ते केवळ हार आणि नारळाच्या मोबदल्यात करून घेतात. अर्थात, त्यांच्याकडून तुमची काही अपेक्षा नसेलही. तरीही, म्हातारी मेली तरी चालेल, पण काळ सोकावता कामा नये- ही गोष्ट आपण ध्यानी घ्यायला

हवी. आता तुमच्या नावावर हजारो-लाखो मंदिरे चालतात. करोडो-अब्जावधींचे व्यवहार तिथे होत असतात. पण तुम्हाला काय मिळतं? एक फूल आणि नारळ- बस्स!'' आणि असे किती तरी वेळ अण्णा बोलत होते. देवसभा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती.

अण्णांचे बोलणे संपताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सर्व देव आणि स्वत: विष्णू भगवान अण्णांकडे कौतुकभरल्या नजरेने बघत होते. नेहमीप्रमाणे अण्णांनी सभा जिंकली होती.

''पण हे मानवा, इथे देवलोकी इतकी संपन्नता असताना अतिरिक्त धन हवेच कशाला?'' भगवंतांनी पुढचा प्रश्न विचारला.

आता अण्णांचा आत्मविश्वास बळावला होता. उत्तेजित होऊन ते म्हणाले, ''भगवन्, पैसा कुणाला नको असतो? पैसा असला की, आपण अधिकाधिक सुखे विकत घेऊ शकतो. अधिकाधिक सुंदर आणि संपन्न जीवन जगू शकतो. आपल्या कुटुंबाची हौसमौज पूर्ण करू शकतो.... ''

आणि अचानक विष्णूला परवाच लक्ष्मीदेवींशी झालेला वार्तालाप आठवला. त्या म्हणत होत्या :

''नाथ, किती युगं झाली- आपण आपले वाहन घेऊन. आपला गरुड आता जुना झाला आहे, म्हातारा झाला आहे. आपण दुसरे एखादे वाहन घेऊ या ना गडे. निदान दुसरा गरुड तरी घेऊ.'' नवे शालू, पैठण्या आणि दागिन्यांसाठीसुद्धा बरीच युगे त्यांचा तगादा सुरू आहे. बघू-बघू म्हणून किती युगे त्यांना असे टोलवत राहणार ....

''आपण काय विचार करीत आहात भगवंत?'' विष्णू विचारात पडल्याचे पाहून अण्णांनी विचारले.

''नवा गरुड ...'' अनावधानाने विष्णू चट्कन बोलून गेले आणि आपली चूक लक्षात येताच त्वरेने स्वत:ला सावरीत म्हणाले, ''नाही. म्हणजे, तू सांगितलेल्या या नव्या गोष्टी आहेत छान, पण त्या साधायच्या कशा? कारण आपल्याकडे आलेल्या सर्वच धनाची कोषागारात नोंद होत असते.''

खरं तर मनात आलेले मूळ विचार देवाने चपळाईने बदलल्याचे चाणाक्ष अण्णांच्या बुद्धीतून सुटले नव्हते आणि त्यामुळे सावज आपल्या जाळ्यात

अडकत असल्याची त्यांची खात्रीच झाली. त्यामुळे अधिक आत्मविश्वासाने ते म्हणाले :

''आहेत... भगवान, त्याचेही बरेच मार्ग आपल्याकडे आहेत. त्यापैकी काही आपण त्वरित अमलात आणू शकतो.

''पहिली गोष्ट म्हणजे– मंदिरात येणारी दानदक्षिणा पावती फाडून किंवा पेट्या–हुंड्यांतून न येता रोखीने कशी येईल, याची व्यवस्था करायची. म्हणजे, आपोआपच आपल्याकडे असे अब्जावधीचे बेहिशोबी धन जमा होईल.

''दुसरी गोष्ट म्हणजे– काही देवांचे आपण मार्केटिंग करायचे ....''

''म्हणजे काय करायचे?'' लक्षपूर्वक ऐकत असलेल्या विष्णूंनी मधेच अण्णांचे बोलणे तोडले.

आपली चूक अण्णांच्या लक्षात आली आणि ती सावरून घेत लगेच ते म्हणाले, ''म्हणजे असे की, आपण काही देवांचे महत्त्व वाढवायचे, जेणेकरून त्यांच्याकडे दानदक्षिणेचा ओघ वाढता राहील.''

''त्यासाठी काय करायला हवे?'' विष्णूंनी विचारले.

''त्यासाठी, काही देवांकडे आलेल्या तक्रारींची आणि नवसांची काही प्रमाणात आपण पूर्तता करायची. खरं तर त्यांची पूर्तता आपोआप होणारच असते, पण आपण फुकटच श्रेयाचे धनी व्हायचे. असे केल्याने अमुक देव नवसाला पावतो, अशी जाहिरात आपणहोऊन लोकच करतील आणि त्या देवाकडे भक्तगणांचा आणि पर्यायाने दानदक्षिणेचा ओघ आपोआपच वाढता राहील.

''आणि तिसरी गोष्ट म्हणजे– हवा, उन, पाऊस, थंडी या गोष्टींवर संपूर्णपणे आपलेच नियंत्रण ठेवायचे. त्यामुळे शेती, उद्योगधंदे, कारखाने यांचे उत्पन्न घटेल आणि अधिकाधिक लोक देवांकडे आकर्षित होतील.''

अण्णांनी आपली त्रिसूत्री योजना मांडली.

''ते सारे ठीक आहे... पण या सर्वांचा ठपका लोक देवावरच ठेवतील, त्याचे काय?'' विष्णूंनी सावध प्रश्न विचारला.

''छे छे छे!ऽऽ त्यांना झटकीत अण्णा म्हणाले. ''ते बालंट आपण आपल्यावर ओढवून घ्यायचेच नाही. तो दोष आपण वाढती लोकसंख्या, खून, दरोडे, बलात्कार या वाढत्या पापाला देऊन मोकळं व्हायचं!'' अण्णांनी मार्ग सुचवला.

''आता एक शेवटची शंका. पण या सगळ्या गोष्टी करणार कोण?'' विष्णूंनी कळीचा प्रश्न केला.

पण अण्णासुद्धा पहुँची हुई चीज होते. त्यांची योजना एकदम फुलप्रूफ होती. याही प्रश्नाचा त्यांनी आधीच विचार केला होता. ''त्याची आपल्याला अजिबात चिंता नको भगवन्. हे सर्व करण्यासाठी आपले बरेच मध्यस्थ आहेत भूलोकावर. त्यांना आम्ही मानव एजंट किंवा दलाल असे संबोधतो. धनप्राप्तीसाठी काय वाट्टेल ते करायची त्यांची तयारी असते. आणि मुख्य म्हणजे, अशा कृष्णवर्णी धंद्यात ते अधिक प्रामाणिक असतात. आणखी काही शंका भगवन्?'' अण्णांनी विचारले.

''वा! अण्णा, वा! शाब्बास आहे तुमची!!''

विष्णूंनी अण्णांबद्दल हे शाबासकीचे उद्गार काढले, म्हणून तर अण्णांची छाती गर्वाने फुललीच; पण त्याहीपेक्षा देवाने त्यांना 'हे मानवा' असे न संबोधता त्यांच्या 'अण्णा' या नावाने संबोधले म्हणून त्यांची छाती आणखी रुंदावली.

''या अण्णा, या. इकडे या-'' म्हणून स्वत: उभे राहून विष्णूंनी अण्णांना जवळ बोलावले आणि आपल्या शेजारच्या आसनाकडे निर्देश करीत म्हणाले, ''आपण बसावे इथे.''

अण्णांनी आसन ग्रहण करताच विष्णुदेव म्हणाले, ''अण्णा, आजपासून हे आसन तुमचे. आजपासून तुम्ही आमचे सल्लागारमंत्री.'' विष्णूंनी असे म्हणताच टाळ्यांचा इतका प्रचंड कडकडाट झाला की, त्या आवाजात ढगांचा झालेला गडगडाट कुणी ऐकलाच नाही.

– १६ –

''फ्लॉवर कसा दिला?'' रास्तेमास्तरांनी भाजीवालीला विचारले. आज त्यांचा जावई येणार होता. त्याला वरण-भाताबरोबर फ्लॉवरची तळलेली कुरकुरीत भजी फार आवडतात, म्हणून आज खास फ्लॉवर आणण्यासाठी त्यांच्या बायकोने एक भली मोठी पिशवी हातात देऊन त्यांना मंडईत पाठवले होते. खरं तर आज बऱ्याच महिन्यांनी ते मंडईत आले होते. परीक्षा, फेरपरीक्षा, पेपरतपासणी, रिझल्ट- ही शाळेतली आणि निवडणूक याद्या, जनगणना,

पोलिओ डोस, कुटुंबनियोजन इ. शाळेनेच दिलेली शाळेबाहेरची कामे करण्यातून त्यांना घरची कामे करण्यास सवडच मिळत नसे. पण आज जावई यायचे म्हणून त्यांनी खास सुट्टी काढली होती आणि ती मिळावी म्हणून उद्या हेडमास्तरांची घरची लाईट आणि फोनची बिले भरण्याचे कबूल केले होते. ''फ्लॉवर कसा दिला?'' व्यग्र असलेल्या भाजीवालीला त्यांनी पुन्हा विचारले.

''स्वस्त लावलाय, घ्या. किती देऊ?'' भाजीवालीने विचारले.

''पण कसा दिला, ते सांगा की आधी.'' मास्तरांनी भाव विचारला.

''फकस्त दोनशे रुपये. बोला, किती देऊ?'' भाजीवाली.

''आं? दोनशे रुपये? आणि स्वस्त?'' मास्तर आश्चर्याने म्हणाले.

''दुसरीकडे अडीचशेचा भाव चाललाय सायेब!'' भाजीवाली म्हणाली. मास्तरांचा विश्वासच बसेना. त्यांनी खिशातून मोबाईल काढून घरी फोन लावला. ''हॅलोऽ'' पलीकडून शारदाबाईंचा आवाज आला.

''अगं, फ्लॉवरचा भाव दोनशे रुपये सांगतेय ही भाजीवाली!'' मास्तर बोलले.

''अहो, स्वस्तच आहे थोडा. घ्या.'' शारदाबाई म्हणाल्या.

''काय? दोनशे रुपये स्वस्त?'' मास्तरांनी आश्चर्य व्यक्त केले.

''होय. अहो, बरेच दिवसांत तुम्ही गेला नाहीत मंडईत, म्हणून तुम्हाला माहीत नाही. हल्ली भाजीवाले, वाणी, मेडिकलवाले- सगळ्यांचेच भाव वाढलेत. आणा तुम्ही फ्लॉवर. पण नीट बघून घ्या- एवढं बोलून पलीकडचा आवाज बंद झाला.

''मग? देऊ का नको?'' फोन झाल्यावर भाजीवालीने विचारले.

''अर्धा किलो द्या-'' म्हणून मास्तरांनी शंभराची नोट पुढे केली.

''सायेब, दोनशे रुपये पाव किलोचा भाव हाय. अर्धा किलोचे चारशे रुपये व्हत्यात!'' भाजीवाली म्हणाली आणि मास्तरांना समोरचे एकाएकी काहीच दिसेनासे झाले.....

धान्य, कडधान्य, डाळी, तेल, भाज्या, अगदी मीठ-मिर्चीसुद्धा- सगळ्यांचेच भाव कडाडून गगनाला भिडले होते. त्यात मुलांचे महागलेले शिक्षण,

मुलींची लग्ने... बापरे! हौसमौज सोडाच; पण जगायचं कसं, हाच प्रश्न सामान्य माणसापुढे 'आ' वासून उभा होता. रेशनचा घेतलेला तांदूळसुद्धा गुंडांच्या तावडीतून सुटून घरी येईल, याची शाश्वती नव्हती. असे जनतेचे हाल-हाल चालले होते. अवकाळी पाऊस पडत होता. गारपीट होत होती. पिकं जळून जात होती, वाहून जात होती किंवा सडून तरी जात होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या होत्या. महागाई वाढतच होती आणि महागाईबरोबर सगळ्या देवांची स्विस बँकेतली खातीही फुगत चालली होती.

काळ कोपला, काळ कोपला.. एकच बोंब झाली. देव काय झोपलाय का? देवाचे डोळे फुटलेत का? देव आंधळा झालाय का? अशी देवाच्या नावाने लोक बोटे मोडू लागले. काही लोक न्यायनवस मागण्यासाठी देवळांकडे धावले. पण तिथेही दक्षिणांचे रेट वाढलेले. देवा, तूसुद्धा... देवा, तूसुद्धा...?

'बुडवाऽ बुडवा... देवाला पाण्यात बुडवा, शंकराला पाण्यात बुडवाऽऽ, कुणी तरी आवई ठोकली. झालं! पाण्याने भरलेले हंडेच्या हंडे घेऊन लोकांच्या झुंडीच्या झुंडी शंकराच्या देवळाकडे धावल्या. धो-धो करून पाण्याचे धबधबे पिंडीवर कोसळू लागले. देवळाचा संपूर्ण गाभारा पाण्याने भरला. देव संपूर्ण पाण्यात होता. ''गाभाऱ्याचे दार गच्च बंद करून घ्या, राहू द्या देवाला पाण्यात उभा!'' कुणी तरी म्हणाले आणि त्या गाभाऱ्याचे दार गच्च बंद झाले.

– १७ –

''नारायणऽ नारायणऽ'' हा कळीचा मंत्र जपत नारदांची स्वारी कैलासावरील शंकरनिवासात दाखल झाली. संपूर्ण शंकरनिवास जलमय झाला होता. पार्वतीदेवींसह भोलेनाथ पाण्यात गुदमरले होते. त्यांना श्वासही घेता येत नव्हता. नारदांना पाहताच ते म्हणाले ''मुनिवर, हा काय प्रकार आहे? आम्हाला असे पाण्यात का बरे कोंडण्यात आले आहे?''

''नारायणऽ नारायण'' काय सांगू देवा... असं म्हणत नारदांनी त्यांना सर्व काही सांगितले. नारदांच्या तोंडून हे सगळे ऐकले मात्र- शंकरांच्या मस्तकातून साक्षात अग्निदेव भडकले. संतापाने महादेवांनी थयथयाट सुरू केला. पुढे काय करायचे, हे नारदांना सांगण्याची गरज नव्हती.

**कड कड कड... कड कड कड... कडकडत शूल ये**
**डम डम डम... डम डम डम... डमडमत डमरू ये**
**क्रोधित झाले सांब सदाशिव कैलासी तांडव !!**

ढगांचा प्रचंड गडगडाट झाला. विजांचा प्रचंड कडकडाट झाला. जमिनीतून आगीचे डोंब उसळू लागले. सागराचे पाणी प्रचंड फेसाळू लागले. झाडे उन्मळून पडू लागली. इंद्रादी देवांचे मस्तकीचे मुकुट डळमळू लागले. ब्रह्मा-विष्णूंच्या आसनांना तडे गेले. काय झाले, काय झाले? अचानक असे का होऊ लागले? वारा, पाऊस, ढग सगळेच स्थिर आहे; मग हे ज्वालामुखी का भडकत आहेत? हे भूकंप का थडथडत आहेत? भगवान विष्णूंची पण मती गुंग झाली. अचानक असे काय झाले, हे विचारण्यासाठी विष्णू लक्ष्मीदेवीकडे गेले, तर लक्ष्मीदेवी त्यांना चंडीच्या रूपात दिसल्या. त्यांच्या नेत्रांतून खदिरांगार वाहत होते. भयंकर, भयंकर काही तरी झालेले दिसतेय... पण काय?

''नारायणऽ नारायणऽऽ'' करीत नारदमुनींची स्वारी प्रविष्ट झाली.

''देवर्षे नारदमुने, अचानक हे...'' भगवान त्यांना काही तरी विचारणार होते, पण नारदांनी उजव्या हाताच्या पंजाने त्यांना थांबवले आणि म्हणाले, ''क्षमस्व भगवन्, आज मी काहीही बोलणार नाही. माझे तोंड बांधण्यात आले आहे. मी आपल्याला फक्त भगवान शंकरांचा निरोप द्यायला आलो आहे. महादेवांनी अघोर तांडव सुरू केले असून, त्यांनी आपल्याला सर्व देवांसह कैलासावर पाचारण केले आहे.'' एवढं बोलून 'नारायण, नारायण' करीत नारदमुनी अंतर्धान पावले.

महादेवांनी तांडव सुरू केले... हर हर.. हे भयानक आहे. काही तरी प्रचंड उत्पात झालेला दिसतोय. सर्व देवांना जमवून त्यांच्यासह भगवान विष्णू कैलासावर प्रविष्ट झाले. शंकराचा तो रुद्रावतार पाहून भयभीत होऊन, दोन्ही हात जोडून लीन होत म्हणाले,

''हे महारुद्रा, असे कोणते संकट आपल्यावर आले आहे, म्हणून आपण कोपाविष्ट झाला आहात?''

एवढे ऐकले मात्र- आषाढात वीज कडाडावी तसे शब्दा-शब्दांतून आग ओकीत शंकर कडाडले,

''संकट माझ्यावर नाही विष्णो, संकट माझ्या भूलोकीच्या भक्तांवर कोसळले आहे आणि त्याला कारण तू आहेस विष्णो, तू आहेस! पूर्वी दानव मानवांचा छळ करायचे, म्हणून आपल्याला शरण यायचे. पण आता तूच या मानवाचा छळ आरंभला आहेस. त्यांचे वारा-पाणी तोडले आहेस. त्यांचे भूकबळी पाडतो आहेस. भ्रष्टाचारी चांडाळचौकडीने भूलोकी उच्छाद मांडला आहेच; त्या दुष्टांचे पारिपत्य करण्याऐवजी त्यांनाच सामील होऊन तूही भ्रष्टाचार माजवला आहेस? देवा, तूसुद्धा?''

शंकराचे हे वाक्ताडन ऐकून विष्णूंना थोडा रागच आला.

''कबूल महादेवा, कबूल! पण आम्ही जे काही केले, ते देवलोकाच्या भल्यासाठीच आणि आपल्याच संमतीने केले आहे.'' विष्णूंनी वार उलटवला.

''माझ्या, माझ्या संमतीने? मी, मी संमती दिली तुमच्या या पापकृत्याला?'' आरोप ऐकून शंकरांच्या अंगाची लाही-लाही झाली होती.

''हो, तुम्हीच संमती दिली होती.'' विष्णू आता 'आपण'वरून 'तुम्ही' वर आले होते.

हे भांडण विकोपाला जाऊन विश्वाचे अस्तित्व धोक्यात येऊ नये, म्हणून नारद मध्यस्थी करायला गेले.

''शांती-शांती! प्रभो, शांती. मानवामानवात मतभेद झाले तर ते असे भांडतात. पण देवा, तुम्हीसुद्धा?'' समजावण्याच्या निमित्ताने नारदमुनींनी चिमटा काढला.

''थांबा नारदमुनी, अतिशय गलिच्छ आरोप माझ्यावर करण्यात आला आहे, त्याचे खंडन व्हायलाच हवे. विष्णुदेवा, या कृत्याला माझी संमती होती, हे तू सिद्ध करू शकतोस?'' शंकरांनी विष्णूला आव्हान दिले.

''अवश्य महादेवा, अवश्य!'' असे म्हणून विष्णूंनी शेल्यात हात घालून एक पत्र काढले आणि शंकरापुढे ते फडफडवीत म्हणाले, ''हे- हे तुम्ही त्या मानवाला दिलेले ओळखपत्र. याच तुमच्या ओळखपत्राच्या बळावर तो मानव आमच्यापर्यंत पोहोचला. म्हणजे, ही तुमची संमतीच नव्हे काय?''

विष्णूंनी शंकराला खडा सवाल केला.

''पाहू बरे ते पत्र-'' असे म्हणून विष्णूच्या हातातून ते पत्र घेऊन शंकराने त्यावर आपली नजर फिरवली आणि तो खदखदा हसू लागला. पुराव्यादाखल विष्णूने दिलेले ते पत्र पाहून शंकर हसतो का आहे, याचा बोध कुणालाच होईना. आपले हसू आवरीत शंकर म्हणाले :

''हे विष्णो, धन्य-धन्य असो तुमची आणि तुमच्या देवांची! अरे, तुमच्यापैकी कुणी एकाने तरी हे ओळखपत्र नीट पाहिले का?''त्यांनी विचारले.

''होय महादेवा, आम्ही अगदी नीट बघितले. त्यावर कैलासाची ठसठशीत मोहोर उठवलेली आहे!'' विष्णू म्हणाले.

''विष्णो, तुम्ही सगळे मला भोळा शंकर म्हणता, पण भोळे तुम्ही आहात. त्या ओळखपत्रावर कैलासाची मोहोर असली, तर खाली काय लिहिले आहे, ते वाचायला नको?''

''काय, काय लिहिले आहे खाली, बघू-'' असं म्हणून विष्णूने पत्र परत घेऊन मजकूर मोठ्याने वाचला. ''या माणसापासून सावध राहावे!''

विष्णूकडून पत्र परत घेऊन म्हणाले, ''अरे, मानव जी चूक करतो, तीच चूक तुम्ही केलीत. मानवसुद्धा हेच करतो. पुढे केलेल्या कुठल्याही कागदावर आंधळेपणाने सही करतो. स्वत: विचार न करता दुसऱ्याच्या सांगण्यावरून मतपत्रिकेवर शिक्का मारतो आणि कुणालाही निवडून देतो. निवडून आलेला उमेदवार अशा 'सांगकाम्या' मतदारांचं पाणी जोखतो आणि त्याचा स्वार्थासाठी उपयोग करून घेतो. बेडकांना जसा त्यांच्या लायकीप्रमाणे राजा मिळतो, तसाच लोकांना नेता मिळतो. दोष नेत्याचा नाही, तर त्याच्यावर अंधविश्वास ठेवणाऱ्या लोकांचा आहे. या सामान्य माणसांच्या बाबतीत मी ही गोष्ट समजू शकतो; पण जगताच्या पालनकर्त्या, विश्वचालका... देवा, तूसुद्धा?''

❒ ❒ ❒

३

# ऑडिशन

‘‘कहीं न कहीं कभी न कभी कोई ना कोई तो आयेगा – अपना मुझे बनाएगा – दिल में मुझे...’’

विकास घोळून–घोळून त्याच ओळी पुनः पुन्हा आळवत होता आणि तो पण सॉलिड मूडमध्ये. माधुरी त्याची बायको शो –केसमध्ये ठेवलेल्या त्याच्या ट्रॉफीज नीट लावता–लावता कुतूहलाने आपल्या नवऱ्याचा मूड एन्जॉय होती. ‘‘काय सुप्रसिद्ध सिने–डायरेक्टर, आज मदनमोहन अगदी घोळतायत जिभेवर? कुणी मदनिका येणार आहे वाटतं ‘दिलमे बसनेवाली?’’ मधेच त्याच्याकडे एक नजर टाकत ती म्हणाली.

‘‘छे–छे ! तसं काही नाही गं. सहजच! आज बऱ्याच दिवसांनी शूटिंगमधून सुट्टी मिळाली आहे ना? जस्ट एन्जॉइंग द हॉलिडे. आजचा दिवस घरात मस्त घालवायचा. तुम और मै– बस! नो पाव्हणे, नो गेस्ट. इव्हन नो फोनकॉल्स. मोबाईलसुद्धा स्विच ऑफ करून ठेवलाय मी!’’ इतक्यात त्याला काही तरी आठवले, ‘‘ए माधुरीऽ’’ तोच डोअरबेल खणखणायला एकच गाठ पडली. ‘‘बस – बस, आता मनात जास्ती मांडे खाऊ नका. दार उघडा आणि बघा कोण आलंय ते.’’ माधुरीने मिश्कीलपणे फर्मावले.

‘‘आता कोण आलाय कडमडायला?’’ असं पुटपुटत आणि चडफडत विकासने दार उघडले, तोच अकस्मात–

‘‘माझा शोन्या राजा तो...’’ असं लडिवाळपणे म्हणत, गुढघ्यापर्यंत नऊवारी नेसलेलं एक गावरान सौंदर्य मै आयी आयीऽऽ आयी आयी राज्जाऽऽ’’ असं गात डायरेक्ट त्याच्या गळ्यात पडली आणि नकळत त्यानेही ‘‘अज्जा’’ असा प्रतिसाद दिला; पण पटकन भानावर येऊन तो म्हणाला, ‘‘ए माझे आईऽ अगं, कोण आहेस तू?’’ असं म्हणून गळ्यातले ते हात काढण्याची जोरदार धडपड तो करू लागला.

‘‘विकास, तू खरंच ओळखत नाहीस हिला?’’ माधुरीने संशयाने त्याच्याकडे बघत विचारले.

‘‘नाही गं, आज प्रथम मी तिला पाहतोय.’’ विकास निरागसपणे म्हणाला.

‘‘हो क्का?’’ असं म्हणून माधुरीने पुन्हा एक छद्मी नजर त्याच्यावर टाकली. आता मात्र विकास चांगलाच भेदरला. संसारात येऊ पाहत असलेलं हे वादळ बघून घाबरून आणि कळवळून तो म्हणाला, ‘‘माधुरी, तुझ्या मम्मी-पप्पांची, आंटी-अंकलची सगळ्यांची शपथ घेऊन सांगतो... खरंच मी हिला ओळखत नाही.’’

‘‘माझ्या माहेरच्यांच्या खोट्या शपथा घेऊ नका उगीच!’’ माधुरी कडक शब्दांत म्हणाली.

‘‘बरूबर हाय. कशापायी उगा खोट्या शपथा घ्याव्या माणसानं? राज्जा, सांगून टाक डायरेक्ट- मी तुझी लव्हर अंजू हाय म्हनून!’’ पाव्हणी बिनधास्त म्हणाली.

‘‘क.. क.. क.. काऽऽय!’’ तिचे हे बिनधास्त बोलणे ऐकून विकासची बोबडीच वळली.

‘‘आरं, शारुख खानसारखी अशी ‘क’ची बाराखडी काय लावलीस? सांगून टाक डायरेक्ट, मी तुझी लव्हर हाय म्हणून! माणसानं कसं इस्टेट खरं बोलून टाकावं!’’ मंजूने मोलाचा सल्ला दिला.

‘‘अगं, भलतंच काय बोलतेस? तुझी माझी ओळख तरी आहे का?’’ असं म्हणून केविलवाणेपणाने त्याने माधुरीकडे बघितले.

''म्हंजे, राज्जा, तू मला इसरलास? दुष्यन्त शकुंतलेला इसरला, तसा इसरलास? तू मला आंगठी दिली न्हवती, पण पारावरच्या पिंपळाखाली एकशे साडेसत्तावन्न येळा तू मला 'आय लव्ह यू' असं म्हणाला व्हतास, ते इसरलास?'' असं म्हणून भोकाड पसरून ती गाऊ लागली ''मोहे भूल गये सावरियाऽऽऽ''

''ए बाई, सावर सावर स्वत:ला. माधुरी, खरंच, अगदी आईशप्पथ सांगतो! मी नाही गं ओळखत हिला–'' गहिरेपणे त्याच्याकडे बघत असलेल्या माधुरीकडे बघत तो कळवळून म्हणाला.

''आता आणखी आईची खोटी शप्पथ नको घेऊस.'' माधुरी कडवटपणे म्हणाली.

''अक्षी राईट बोललीस तू. आईची खोटी शप्पथ घेऊच नये मानसाने.'' पाहुणीने माधुरीची री ओढली. पण अचानक लक्षात येऊन तिने विकासला विचारले, ''राज्जा, ही कोण बाई आपल्या दोघात तिसरी कबाब में हड्डी?''

''ए बाई, मी तुमच्या दोघात नाही, तू आमच्या दोघात आलीस– कबाब में हड्डी!'' माधुरी तिच्यावर फुस्कारली. ''आणि कान खोलून ऐक– मी कुणी तुझ्यासारखी ऐरीगैरी बाई नाही, तर देवाब्राह्मणासमक्ष त्याच्याशी लग्न केलेली त्याच्या लग्नाची सख्खी बायको आहे! अष्टपुत्रा सौभाग्यवती भव।'' माधुरी म्हणाली. वर्तमानपत्र मागायला आलेल्या शेजारच्या देशपांडेकाकांनी ते शब्द ऐकले आणि एकदम चवताळून ते म्हणाले,

''अष्टपुत्रा सौभाग्यवती भव? कोण, कोण म्हणालं असं? अरे, लावलंय काय तुम्ही लोकांनी? आधीच देशाची लोकसंख्या भरमसाट वाढवून ठेवली आहे, रस्ते वाहनांनी ओसंडून चाललेत. फुटपाथवरून चालायला मिळत नाही. तरुणांना नोकऱ्या नाहीत. लोक पिझ्झा–बर्गर खाऊन जगत आहेत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. भर रस्त्यात तरुणींच्यावर बलात्कार होत आहेत. आणि तरी अजून, अजून अष्टपुत्रा सौभाग्यवती भव?'' अशी एकमेकांशी अर्थाअर्थी काहीही संबंध नसलेली वाक्ये ते भडाभडा ओकले. त्यांची ही नेहमीचीच सवय होती.

''काका, देशपांडेकाका– तुम्ही आधी शांत व्हा पाहू. नाही म्हणजे, तुमचं आडनाव देशपांडे असल्याने देशाची काळजी तुम्हालाच घ्यावी लागते, हे आम्हाला मान्य आहे; पण तुम्ही समजता तसे काही नाही. तुम्ही जे ऐकले ते बरोबर आहे, पण त्याचा संदर्भ वेगळा होता.'' विकास अजीजीने म्हणाला.

''हे बघा, यापुढे ह्या देशात 'अष्टपुत्रा' हा शब्द कुठल्याही संदर्भात नकोय. आजकाल लोकांना मुली नको आहेत 'अष्टकन्या' असं का नाही म्हणत? अरे, ज्या देशात ....

आता देशपांडेकाकांची पंजाब मेल काही थांबणार नाही, हे ओळखून ''काकाऽऽ'' असं विकास जोरात ओरडला आणि रेडिओचे बटण दाबावे तसे देशपांडे एकदम गप्प झाले. ते शांत झालेले पाहून विकास म्हणाला, ''काका, तुम्ही जे ऐकले, त्याचा संदर्भ वेगळा होता.''

''असं? मग संदर्भासह स्पष्टीकरण करा–'' काकांमधला मास्तर जागा झाला.

''मी करू का सपाटीकरण?'' अंजीने मधेच तोंड खुपसले. अचानक झालेल्या त्या आकाशवाणीकडे निरखून बघत देशपांडे म्हणाले, ''ही कोण?''

''ही नाही, हा....''

''म्हणजे ही बाई नाही?'' अर्धवट तोंडात देशपांडेंनी डोळे विस्फारत त्याला विचारले.

''तसं नाही हो, बाईच आहे. ती पण तुम्ही म्हणता तो संदर्भ हा, असं मला म्हणायचं होतं.'' विकास गडबडून म्हणाला. पण तो हे बोलत असताना अंजीने त्याच्या जवळ येऊन कधी त्याच्या कोपरात आपला कोपर घातला, हे त्याला कळलेच नाही.

''दूर हो... दूर.. हो आधी! त्याच्या हातातून हात काढऽ'' असं देशपांडे अचानक ओरडले, तेव्हा ही गोष्ट विकासच्या लक्षात आली आणि झट्कन त्याने आपला हात सोडवून घेतला.

''ज्येष्ठांसमोर कसं वागावं, याचा साधा पाचपोच नाही!'' देशपांडे पुटपुटले.

''अहो काका, त्यांची ती कोण– हे एकदा विचारा की तिला–''माधुरी मधेच म्हणाली.

''तेन्ना कशाला उगीच तरास? म्याच सांगते, मी कोन हाय ते. काका, मी त्याची लव्हर हाय. अंजली माझं नाव. पन हा इकू लाडानं मला अंजी म्हंतो. व्हय की नाय रे माज्या इक्कुराज्जा?'' मान लाडिकपणे वेळावत माधुरी म्हणाली.

''अरे बाप रे! हिने तर कव्हर ड्राइव्हला चौकारच ठोकला! म्हणजे मिस्टर दशपुत्रे, प्रकरण गंभीर आहे.'' तिच्यावरची नजर न हटवता देशपांडे चिकित्सक स्वरात म्हणाले.

''काका, तुमची शपथ घेऊन सांगतो- मला हिच्याबद्दल काहीही माहिती नाही.'' विकास रडकुंडीला येऊन बोलला...

''बघा-बघा काका, माझ्या माहेरच्यांच्या खोट्या शपथा घेऊन झाल्या, आता तुमची शपथ. पण स्वतःची किंवा आपल्या घरच्यांची शपथ काही ते घेत नाहीत.. म्हणजे प्रकरणात नक्कीच पाणी मुरतंय!'' माधुरी कडाडली. तिकडे मुद्दामच थोडे दुर्लक्ष करीत देशपांडेंनी तिच्यावर तशीच स्थिर नजर ठेवून विचारले, ''काय विकासराव... नाही म्हणजे, कुठं जुळलं हे संघष्टन?''

''संघष्टन नाही हो काका...''

''मेतकूट, गूळपीठ असं काही असेल; पण हे जुळलं कुठं आणि कसं?'' उजव्या हाताची मूठ डाव्या हाताच्या तळव्यावर ठोकत देशपांडे सिच्युएशनची मजा घेत म्हणाले. ''म्हणजे, कुण्या गावचं पाखरू म्हणायचं हे, असं मला विचारायचं आहे.'' त्यांनी पुस्ती जोडली.

''अहो काका, खरंच सांगतो- हिचं नाव, गाव, पत्ता, काही काही माहीत नाही मला.'' विकास कळवळून म्हणाला.

''अच्छा! म्हणजे देवाने स्वर्गातून ही अप्सराच धाडली म्हणा की तुमच्यासाठी!'' देशपांडेंनी छद्मीपणे चिमटा काढला.

''अप्सरा? अहो, हिच्यापेक्षा आमच्याकडे घरकाम करणाऱ्या मावशी पॉश दिसतात.'' माधुरी मधेच बोलली. माधुरीचे हे बोलणे ऐकता-ऐकता आत येणारी शांतामावशी तोऱ्यात म्हणाली, ''मग? हायेच मी पॉश! आता त्यासाठी तुमाला नकळत मी तुमचा मेकअप बाक्स वापरते, ही गोष्ट येगळी. पर मागून तुमाला ते कळतंच की!''

''बराब्बर हाय. अवो, मांजर डोळं झाकून दूध प्यायलं, तरी बघणाराचे डोळे उघडेच असत्यात!'' अंजीने मधीच शेरा मारला.

''येकदम करेक्ट बोललीस बग....'' आणि अचानक तिच्या लक्षात आले की, कुणी तरी आपल्यालाच मांजर म्हणालं. पण कोण, हे काही पटकन तिला कळेना. म्हणून तावातावाने ती बोलली, ''कोण... कोण मला मांजर म्हणाली? बाईसाहेब, तुमी फकस्त मला तिचं नाव सांगा, लगीच तिची वळकटी बांधते बघा–'' असं म्हणून तिने घरभर आपली नजर फिरवली, तेव्हा तिच्या दृष्टीला गुढघ्यापर्यंत नऊवारी नेसलेली अंजी पडली आणि चपापून ती माधुरीला म्हणाली,

''म्हंजे, बाईसाहेब– खरंच तुमी दुसरी बाई कामाला ठेवताय का काय? अवो, दुसरी बाई बघा–असं परवा मी मस्करीने बोलले होते आणि तुमी खरंच... दुसरी बाई.. सायेब, तुमी तरी सांगा की काई बैसायबास्नी–'' असं गयावया करीत ती विकासकडे धावली.

''अगं, त्यांना काय सांगतेस मावशी, त्यांनीच तर आणलीय त्या बाईला!'' अंजीकडे एक जळका कटाक्ष टाकीत माधुरी म्हणाली.

''काय, म्हंजे सायेब, तुमी दुसरी बाई ठेवताय? मी असताना?'' मावशी सहज बोलून गेली आणि आपल्याकडे सगळ्यांच्या विचित्र नजरा रोखलेल्या बघून आपली चूक तिच्या लक्षात आली आणि सावरून घेत ती म्हणाली, ''नाय, म्हणजे, मी हाय की घरकाम कराया. तुमी कशापायी दुसरी बाई ठिवताय? त्यापरीस ही बाई पाठवा ह्या देशपांडेंकडे. परवाच ते म्हनाले व्हते मला, येक बाई ठेवायची हाय म्हणून!'' डोळे देशपांडेंकडे वळवीत ती म्हणाली.

''अहो मावशीबाई, मला कामाला ठेवायला बाई पाहिजे; तुम्ही म्हणता तशी 'ठेवायला' नाही. तशी ठेवायला तुझ्या या मालकानेच आणलीय तिला. काय मिस्टर सहस्रबुद्धे?'' असा प्रश्न करून सहेतुकपणे त्यांनी विकासकडे पाहिले.

''आता मात्र हद्द झाली! ए बाईऽऽ तू कोण, कुठली, इथले का आलीस– हे कळू दे एकदाचे मला आणि या सर्वांना!'' विकास पोटतिडिकीने म्हणाला.

''आता नाटक लै झालं राज्जाऽऽ असं म्हणत अंजी विकासच्या अंगचटीला आली.''

''पाहिलंत? पाहिलंत काका.. ओळखपाळख नसताना कशी निर्लज्जपणे त्याच्या अंगाशी झोंबतेय ती?'' तिच्याकडे बघून नाक उडवत माधुरी म्हणाली.

''ए बाई, बिनवळखीच्या मान्साबरूबर असं खेळ कराया म्या काई रस्त्यावर पडल्याली न्हाय. निसती वळखच न्हाय, तर लव हाय आमचं दोघांचं! व्हय की न्हाय रे राज्जा?'' असं लाडे-लाडे बोलत ती विकासच्या आणखीनच जवळ गेली.

''अरे व्वा! तेच विचारतोय मी. जमलं कुठं तुमचं हे 'लव'?'' देशपांडेंनी पुन्हा चावी भरली. त्यांना मज्जा वाटत होती.

आता मात्र विकासवर डोकं फुटायची वेळ आली. अहो, ''काही तरीच काय बोलता तुम्ही काका?'' तो चिडून म्हणाला. ''अहो, आयुष्यात पहिल्यांदा बघतोय मी तिला. आणि तुम्ही......

पण त्याला मधेच तोडत अंजी म्हणाली, ''आरं, आता कशाला लपवाछपवी करतुयास राज्जा? मागच्या येळेस न्हाय का तू आमच्या खामगावला शूटिंगला आला व्हता, तवाच जमलं की आपलं हे लव! जरा आठवून बघ की माझ्या दुष्यन्ता!'' या तिच्या बोलण्यावर मात्र... माधुरी झटकन रिॲक्ट झाली आणि म्हणाली, ''बरोबर आहे. एक-दीड महिन्यापूर्वी, विकास खामगावाला शूटिंगला गेला होता खरा. म्हणजे, ही खोटं बोलत नाही.''

''मग- न्हाईच मी खोटं बोलत. तू मुंबईला ये, मग आपण आपला संसार थाटू, असं ह्यानंच मला सांगितलं होतं.''

''बाईऽ बाईऽ बाई! आता मात्र शर्थ झाली विकास तुझ्यापुढं!'' असं म्हणत माधुरीने विकासपुढे कोपरापासून हात जोडले.

''माधुरी, प्लीज माझं ऐकून घे. अगं, बोलणं तर सोडच, या बाईला बघितलंसुद्धा नाही मी यापूर्वी.'' विकास कळवळून म्हणाला.

''अच्छा! म्हणजे शूटिंगला गेल्यावर ह्या असल्या शिकारी करता होय तुम्ही डायरेक्टर महाशय? तुमचा हा शिकारी गुण ठाऊक नव्हता आम्हास. ही एकच शिकार आहे, की अजून काही आहेत घायाळ हरिणी?'' देशपांडेंना आता चेवच चढला होता.

‘‘काय बोलता तुम्ही हे काका, मी असा दिसतो का तुम्हाला?’’ विकासने अजीजीने विचारले.

‘‘अहो विकासराव, ‘दिसतं तसं नसतं म्हणून तर जग फसतं’ अशी म्हणच आहे मुळी! आणि त्यात तुम्ही सिनेमावाले. ह्या-ह्या अशा पऱ्यांच्या राज्यात वावरणारे.’’ असं म्हणत माधुरीकडे दृष्टी वळवत ते म्हणाले, ‘‘सिनेमावल्याची बायको होणं म्हणजे सुळावरची पोळी म्हणतात, ते खरंय ग बाई!’’

‘‘अहो काका, सूळ काय.. आग काय.. पोळी काय- अहो, पेटलेल्या आगीत तेल ओतताय तुम्ही काका!’’ विकास वैतागून बोलला

यावर तितक्याच जोरात काका बोलले, ‘‘ही आग मी नाही, तुम्हीच लावली आहे मिस्टर दशपुत्रे.’’ आणि ते हे बोलत असतानाच नेमके शेजारचे अय्यर स्वामी तिथे प्रवेशते झाले. आणि त्यांचे बोलणे अर्धवट ऐकून आपली लुंगी सावरत एकदम आपल्या टिपिकल मद्रासी टोनमधे किंचाळले, ‘‘अय्योऽऽ काय सांगतं काय पांडे? हे आगऽऽ मिस्टर दशपुत्रे लावलं? व्यंकटरामणाऽऽ’’ असं म्हणत त्यांनी वर पाहून हात जोडले आणि विकासकडे बघत घाईत बोलले ‘‘छुप जाव विक्कीसाब किदर भी, जल्दीसे छुप जाव.. पोलीस अभ्भी ईदर आयेगी.’’ यावर खवळून विकास म्हणाला, ‘‘कसली आग.. कसले पोलीस.. काय बरळताय तुम्ही स्वामी?’’

‘‘अरे, मै बरळत नही विक्कीसाब,’’ असं म्हणत देशपांडेंकडे वळत तो म्हणाला, ‘‘पांडेसाब, बाजूके बंगलेमे आग लगा करके ये आग कोन लगाया इसका यन्कायरी करने पोलीस आयी है।’’ ‘‘च्ऽच्ऽ स्वामी, अरे, वडाचं पान पिंपळाला लावतोयस तू!’’ देशपांडे बोलले आणि ते ऐकून मावशींनी मधेच तोंड घातले, ‘‘अहो, या स्वामीला वडही कळायचा नाही आणि पिंपळही कळायचा नाही. अहो, दारातली वरात घरात आणायची सवयच आहे त्याला.’’ मावशीच्या या बोलण्यावर प्रश्नार्थक चेहरा करून स्वामी म्हणाला, ‘‘बोले तो?’’

‘‘काय कप्पाळ बोले!’’ असे स्वतःशी पुटपुटत देशपांडे समजावणीच्या सुरात स्वामीला म्हणाले, ‘‘अरे स्वामी, ती आग वेगळी.. ही आग वेगळी.

ती आग फायरब्रिगेडने विझवता येईल, पण ही आग फायरब्रिगेडही भस्म करील!'' देशपांडेच्या ह्या बोलण्यावर स्वामीने आश्चर्याने विचारले, ''अय्यो व्यंकटरमणाऽऽ इकडं पन आग लागलं असतं काय?'' आणि हे विचारत असतानाच त्याचे लक्ष अंजीकडे गेले आणि किंचाळून त्याने विचारले, ''अय्यो व्यंकटरमणाऽऽ हा कोण?''

''अरे स्वामी 'ही' नाही रे 'शी'! हीच इथे लागलेली आग आहे.'' अंजीकडे कटाक्ष टाकीत देशपांडे म्हणाले.

''समज गया.. अब मै समज गया. मतलब इदरका आग बौत भारी है.. ब्युटिफुल.. दशपुत्रे, ये तुमारा साली है क्या?'' स्वामीने विचारले.

''स्वामी, अहो, साली नाही.. सवत आहे ती माझी, सवत! त्याने ठेवलेली बाई आहे ही!'' माधुरी चिडून ओरडली.

''एऽ बाई, तोंड सांभाळून बोल. मी काही त्याची ठेवलेली बाई नाही, तर लग्नाची बायकू हाय!'' अंजी ठसक्यात म्हणाली.

''मीन्स दशपुत्रे, तुम्ही हिच्याशी कायदेशीर लग्न केलंय? अहो, कॉग्निझिबल ऑफेन्स आहे हा. द्विभार्या प्रतिबंधक कायदा माहीत नाही वाटतं तुम्हाला? सात वर्षं खडी फोडायला जाल.'' देशपांडेंनी आपले कायद्याचे ज्ञान पाजळले.

''ते काही नाही काका, तुमच्या ओळखीचे ते पवार वकील आहेत ना, त्यांना ताबडतोब बोलावून घ्या. मी पण पप्पांना फोन करते. आत्ताच्या आत्ता मला ह्याच्यापासून डायव्होर्स हवाय.'' असं म्हणून माधुरी मोबाईलची बटणे दाबू लागली.

''माधुरी... प्लीजऽऽ प्लीजऽऽ माझं ऐकून घे. अगं, तसं काही नाहीये. देवाशपथ सांगतो, मी हिला ओळखत पण नाहीऽ'' विकास जीवाच्या आकांताने कळवळला.

''अस्सं? तू मला ओळखत नाहीस काय? थांब, आत्ता मी तुला माझी ओळख दाखवते-'' असं म्हणून आपली बॅग उचलून अंजी तरातरा निघून गेली. ती गेली आणि सगळे जण अस्वस्थपणे चुळबुळ करीत एकमेकांकडे बघत राहिले. कुठं गेली ही बाई आणि काय करणार आहे.. कुणालाच कळेना.

''बाप रे, ही बाई गुंडांना तर आणायला गेली नाही ना?'' देशपांडे घाबरून म्हणाले. ''अय्यो, बौत डेंजर बाई दिखता. पांडेसाब, हम तो चलता'' असं म्हणून स्वामी जाऊ लागला इतक्यात त्याला- ''थांबा, मी पण येतो,-'' असं म्हणून ते दाराकडे आले, तर दारात उजव्या हातातला शिसवी रूळ डाव्या हाताच्या तळव्यावर आपटत एक लेडी इन्स्पेक्टर दारात उभी!

''इथे मिस्टर दशपुत्रे कोण? बेकायदेशीरपणे दुसरे लग्न केल्याबद्दल मी त्यांना अटक करायला आले आहे.'' ती जरबेत म्हणाली. ''ते बघा.. ते बघा मिस्टर दशपुत्रे. करा अटक त्यांना. चांगली खडी फोडायला पाठवा तुरुंगात!'' असं देशपांडे म्हणाले आणि स्वामीसह काढता पाय घेऊ लागले. इतक्यात हातातल्या रुळाने त्यांना अडवीत इन्स्पेक्टरबाई म्हणाली,

''थांबाऽऽ इथून कुणालाही बाहेर जाता येणार नाही. मिस्टर दशपुत्रेंना दुसऱ्या लग्नासाठी मदत केल्याबद्दल मी तुम्हा सर्वांनाच अटक करीत आहे.'' बाई पुन्हा जरबेने म्हणाली.

''अहो, पण त्यांच्या ह्या दुसऱ्या लग्नाबद्दल आम्हाला काहीच माहीत नाही!'' देशपांडे म्हणाले

''अय्योऽ व्यंकटरमणाऽऽ मॅडमऽऽ वि आर रिअली इनोसंट.'' स्वामी अगतिकपणे म्हणाला.

''आणि तुमची शपथ घेऊन सांगतो मॅडम, मी तिच्याशी लग्न केलेले नाही. अहो, मी तिला ओळखतसुद्धा नाही!'' विकास तळमळून म्हणाला.

''मिस्टर दशपुत्रे, तुम्ही तिला खरंच ओळखत नाही? थांबा, मी तिला घेऊन येते. पण मी येईपर्यंत इथून कुणीही हलायचे नाही. इट इज माय ऑर्डरऽ'' असा म्हणून इन्स्पेक्टरबाई बाहेर गेली. थोड्याच वेळात एक छान साडी नेसलेली, स्लिव्हलेस घातलेली आणि मॉडर्न हेअरकट केलेली एक सुंदर तरुणी आत आली अन् थेट विकासपुढे जाऊन उभी राहिली. सर्व जण आश्चर्याने तिच्याकडे टकामका बघत राहिले. विकासला ती टेचात म्हणाली, मिस्टर दशपुत्रे, मला वाटतं, ''आता तुम्ही मला नक्की ओळखाल.'' विकास निशःब्दपणे तिच्याकडे बघतच राहिला. त्याच्या चेहऱ्यापुढे टिचक्या वाजवून त्याला भानावर आणीत ती तरुणी म्हणाली, ''काय मिस्टर दशपुत्रे, आता तरी ओळखलंत ना मला?''

‘‘ऑफकोर्सऽ ऑफकोर्स!’’ भानावर येत विकास म्हणाला, ‘‘रंजना! पण तू ही अशी...’’ पण त्याला तोडत रंजना म्हणाली,

‘‘मुद्दामच वेष बदलून आले. तुम्ही खामगावला शूटिंगला आला होतात, तेव्हा ‘मला सिनेमात काम द्यालं का?’ असं मी तुम्हाला विचारलं होतं आणि तुम्ही....’’

‘‘यस यस.. आत्ता आठवलं! तू मुंबईला येऊन ऑडिशन दे; पास झालीस तर नक्की तुला काम देईन, असं मी म्हणालो होतो.’’ असं म्हणत विकासने प्रसंग आठवल्याची ग्वाही दिली.

‘‘म्हणून तर मी वेष बदलून आले आणि एक नाही तर दोन-दोन ऑडिशन दिल्या. झाले ना मी पास? मिळेल ना मला काम?’’ रंजनाने गंभीरतेने विचारले.

‘‘ऑफकोर्स! रंजना, खरंच, तुला मी अजिबात म्हणजे अजिबात ओळखले नाही. ग्रेट! तुला हंड्रेड आउट ऑफ हंड्रेड मार्क्स! आणि बरं का मंडळी, ही...

पण त्याला पुढे बोलू न देता रंजना म्हणाली, ‘‘थांबा विकास, आधी मला या सर्वांची माफी मागू द्या. सॉरी. माफ करा मंडळी. माझ्यामुळे तुम्हाला जो मनस्ताप सोसावा लागला, त्याबद्दल मी तुमची आणि विशेषकरून विकासजी आणि माधुरीताईंची क्षमा मागते.’’ असं म्हणून तिने दोन्ही हात जोडले. तिचे ते जोडलेले हात आपल्या हातात घेत माधुरी म्हणाली, ‘‘अगं नाहीं ग रंजना, उलट एक अस्सल कलावंत कसा असतो, याचं सुरेख दर्शन तू आम्हाला घडवलंस. वा! क्या बात है!’’ असं म्हणत ती रंजनाच्या अगदी जवळ गेली आणि हळूच म्हणाली, ‘‘नाही म्हणजे रंजना, माझा विकासवर विश्वास आहेच पण.. तू.. तू केलेलं ते.. ते.. नक्की नाटकच होतं ना?’’

‘‘काय हे माधुरीवाहिनी! अगं, एका कलावंत भावाला त्याच्या कलावंत बहिणीने दिलेली अभिनयाची सलामी होती ती. काय मंडळी?’’ सर्वांच्याकडे हसत बघत तिने विचारले.

‘‘याऽऽऽ सर्व’’ जण एका सुरात किंचाळले.

❐ ❐ ❐

# ४

# बट्ट्याबोळ

'बट्ट्याबोळ' हा शब्द मराठीत कुणी आणला, ते माहीत नाही; पण त्याला अर्थ प्राप्त करून दिला तो मात्र कोंडिबा उचले या माणसाने. 'आता हा कोंडिबा उचले कोण?' असं तुम्ही विचारलं आणि नाही तुम्ही विचारलंत, तरी मी ते सांगणारच. पण आधी मी त्याचं थोडं वर्णन सांगतो, म्हणजे तुम्हाला थोडी कल्पना येईल. ते बघा– ते समोर बंगलेवजा छोटंसं बैठं घर दिसतंय ना, ती आमची झरेवाडीची ग्रामपंचायत. अरे, पण हे तरी मी तुम्हाला का सांगतोय? त्याच्यावर लावलेला बोर्डच दिसतोय की– 'ग्रामपंचायत कार्यालय, झरेवाडी'. आहे आपलं जुनंच बांधकाम. आतमध्ये एक–दोन टेबलं, त्याभोवती चार–सहा खुर्च्या, भिंतीला टेकून एक–दोन लाकडी बाकडी. भिंतीवर समोरच दिसतील असे काही राष्ट्रीय पुढाऱ्यांचे फोटो आणि बाजूच्या दोन्ही भिंतींवर, 'विना सहकार नाही उद्धार', 'एकमेका करू साहाय्य अवघे धरू सुपंथ', अशी कावेच्या रंगाने लिहिलेली सुभाषिते आणि एक फुटके काचेचे, खेळाची पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रांनी भरलेले कपाट. आणि तोऽऽऽ बघा, गांधींचा फोटो दिसतोय ना, तो राजीव  नाही हो, तो पण नाही हो, बरोबर–तर महात्मा गांधींच्या फोटोला जोडून, पांढरे स्वच्छ धोत्यावर खादीचा पांढरा स्वच्छ नेहरू सदरा, त्यावर खादीचे जाकीट आणि डोक्यावर टोकदार कडक पांढरी टोपी अशा वेषात उभा आहे ना,

तो माणूस म्हणजेच कोंडिबा उचले. झरेवाडीचे सरपंच. त्यांना सगळे अण्णा म्हणतात.

आपल्या प्रत्येक कृतीतून आपले 'उचले' हे आडनाव सार्थ करण्याचा प्रयत्न अण्णांनी कधीही सोडला नाही. चला, आता जरा जवळ जाऊनच बघू, म्हणजे 'बट्ट्याबोळ' आपल्याला कळेल.

अण्णांनी गांधींच्या फोटोला मनोभावे नमस्कार केला आणि बाजूलाच असलेल्या पंचायतीच्या सदस्यांची यादी असलेल्या बोर्डावर नजर टाकली.

**झरेवाडी ग्रामपंचायत सदस्य कमिटी**

१) श्री. कोंडिबा उचले – सरपंच

२) श्री. ज्ञानदेव रोडगे – उपसरपंच

३) श्री. सदाशिव तांबट – सेक्रेटरी

४) श्री. अर्जुन रेटकर – सदस्य

५) श्री. मनोहर बोके – सदस्य

६) श्रीमती लक्ष्मीबाई भुते – सदस्य

७) श्री. गणोबा चिकटे – सदस्य

बोर्डावर नजर टाकता-टाकता, उगीचच एका नावावर त्यांची नजर क्षणभर स्थिरावली आणि गालातल्या गालात ते किंचित खुदकले. पुन्हा एकदा गांधींच्या फोटोला वंदन करून त्यांनी आपल्या खिशातून पांढराशुभ्र रुमाल काढला आणि तो हलकेच आपल्या चेहऱ्यावरून फिरवत, ते येऊन आपल्या खुर्चीत स्थिर झाले. समोरच एका स्टुलावर ठेवलेला नवा कोरा टीव्ही त्यांना दिसला आणि त्या टीव्हीकडे रोखून बघत त्यांनी हाक मारली, ''पांडाऽ अरे ये पांडाऽऽ''

''जी आण्णासाहेबऽ'' असं म्हणत लेंगा, वर बुशकोट, डोक्यावर मळलेली आडवी टोपी-अशा वेषात आलेल्या पांडाने बरोबर आणलेले पाण्याचे तांब्या-फुलपात्र टेबलावर अण्णांच्या पुढ्यात ठेवले आणि म्हणाला, ''काय म्हंता आण्णा?''

''आरं, कुठं व्हतास? कवाधरनं आलोय की मी!'' पाण्याचा तांब्या घेत अण्णा म्हणाले.

''आवो अण्णा, पाणी आनलं तुम्हासाठी.'' पांडा जरा मस्का मारत म्हणाला.

''हं, हे काम झ्याक केलंस, बरं का पांडा-'' असं म्हणत अण्णा फुलपात्रातलं पाणी घटाघटा प्यायले आणि पुन्हा टक लावून समोरच्या टीव्हीकडे बघू लागले.

''पांडा, हा टीव्ही कसा काय हाय?'' टीव्हीवरची नजर न काढता अण्णांनी विचारले.

''झ्याक हाय की. परतेक पंचायतीला टीव्ही देऊन, सरकारनं लई झ्याक काम केलंय बघा अण्णा!'' पांडा उत्साहाने म्हणाला.

''आसं व्हय. मग पांडा, आता तुमी बी येक झ्याक काम करा. हा टीव्ही इथनं उचला आणि आमच्या घरी नेऊन ठिवा.'' अण्णा हे बोलत असतानाच धोतर, कोट, टोपी या वेषातले लाटणेमास्तर हातात छत्री घेऊन तिथे प्रविष्ट झाले. ''काय अण्णासाहेब, पांडाला काय उचलून घरी ठेवायला सांगताय?'' आत येताना अण्णांचे वाक्य ऐकून त्यांनी विचारले.

''या-या लाटणे मास्तर, या. काही नाही हो, या पांडाला सांगत होतो की, हा टीव्ही येवढा इथून उचल आणि आमच्या घरी नेऊन ठेव.'' अण्णा म्हणाले.

''काय? हा- हा पंचायतीचा टीव्ही तुम्ही घरी नेऊन ठेवायला सांगताय? अण्णा, अहो, सरकारने सार्वजनिक टीव्ही म्हणून हा पंचायतीला दिलाय. तो घरी नेऊन ठेवणे नियमात बसत नाही.'' मास्तर समजावणीच्या सुरात म्हणाले.

''लाटणे, फुकाट-फुकाट मास्तर झाला बगा तुमी. अवं, समद्या पोरास्नी शिकीवताय तुमी आनी तुमास्नीच कळंना व्हय?'' अण्णा शांतपणाने म्हणाले.

''आता ह्यात माझं काय चुकलं अण्णा?'' लाटणे अजीजीने म्हणाले.

''अवो, काय चुकलं म्हनून काय इचारता मास्तर? साफ मिस्टेकच झाली म्हना की!'' अण्णा पुढे म्हणाले, ''मला सांगा मास्तर, सरकारनं ह्यो टीव्ही लोकांसाठी- म्हंजे जनतेसाठी दिला हाय का नाय?''

''तेच तर म्हणतोय मी.'' हायसं वाटून मास्तर म्हणाले.

''तुमी बरूबरच म्हंताय वो. पन मला सांगा मास्तर, समदी जनता तुमच्यावानी शानी हाय का? काय पांडा?'' असं म्हणून त्यांनी सहेतुकपणे पांडाकडे बघितले.

''छा छ्या! अवो, येक मास्तर सोडले तर गावातले समदे घोडेछापच की:'' पांडाने हेतू ओळखून री ओढली.

''अंगाश्शी! बगा मास्तर, जे पांडाला कळतंय ते तुमास्नी कळंना. आता ह्या घोडेछाप लोकांनी टीव्हीवर दगुड मारला, काई तोडफोड झाली, टीव्ही बिघाडला; तर नुकसान कुनाचं व्हैल? जनतेचंच का न्हाई?'' अण्णांनी खडा सवाल टाकला.

''हंऽऽऽ ते पण खरं आहे म्हणा.'' सुस्कारत मास्तर म्हणाले.

''मग? बापू म्हनायचे....''

''कोन बापू?'' पांडाने मधीच विचारले.

''आमचे वडील. समदे त्यांना बापू म्हनायचे. ठावं हाय की मास्तरास्नी. काय मास्तर?'' मास्तरकडे सापेक्ष बघत अण्णा म्हणाले.

''हो-हो, ठाऊक आहे तर. फार थोर आणि विचारवंत माणूस होता!'' हात जोडत वर बघत मास्तर म्हणाले.

''अगाश्शी! तर बापू म्हनायचे- जनतेच्या संपत्तीची काळजी घेनं, हे आपलं पयलं इम्पार्टंट कर्तव्य हाय. आता मला सांगा, ह्यो सरकारी टीव्ही म्हंजे जनतेची प्रापर्टी हाय का न्हाई? काय पांडा?'' पुन्हा सहेतुकपणे पांडाकडे बघत ते म्हणाले.

''व्हयच की! आता सरकार जन्तेचं म्हनल्यावर सरकारी टीवी बी जन्तेचाच की!'' पांडाने री ओढली.

''अंगाश्शी! बगा मास्तर. जे पांडाला कळतंय, ते तुमास्नी कळना. आता मला सांगा, ह्या जनतेच्या प्रापर्टीची हिथं नासधूस होन्यापरीस, ही सुरक्षित रहान्यासाठी आमच्या घरात नेऊन ठेवन्यात काई चूक हाय का?'' मास्तरांना पटवीत अण्णा म्हणाले.

''नाही, तशी काही त्यात चूक नाही... पण नियमाप्रमाणे...''

''नियम! हे तुमचे नियमच समदा घोटाळा करत्यात बगा. आनी मला सांगा, ह्या लोकशाहीत नियमापर्मानं कंच्या गोष्टी व्हत्यात का? काय पांडा?'' –पुन्हा पांडाकडे सहेतुक नजर.

''छ्या! छ्या! अवो, नेमानं काम कराय गेलो की, नेम भलतीकडंच लागतोय बगा!'' पांडाने कामगिरी चोख बजावली.

''अंगाश्शी! बगा, जे पांडाला कळतंय ते तुमास्नी कळंना. आता मला सांगा, तुमच्या भाच्याला नादारी पायजे म्हनून तुमी उत्पन्नाचा दाखला न्यायला आलाय. बरूबर?'' उजवा डोळा बारीक करून गुरुजीकडे पाहत अण्णांनी विचारले.

''हो, बरोबर आहे.'' मास्तर म्हणाले.

''आता मला सांगा नियमापर्मानं, मी जर तुमाला उत्पन्नाचा खरा दाखला दिला, तर चालंल का?'' उजवा डोळा अधिकच बारीक करत अण्णा म्हणाले.

''नाही, नाही. बरोबर आहे तुमचं म्हणणं. पांडा, तो टीव्ही ताबडतोब अण्णांच्या घरी जाऊ दे.'' मास्तर घाईघाईने बोलले.

''त्यापरीस असं का करीत न्हाई मास्तर, आता तुमी साळंकडंच जानार न्हवं? मग जाता-जाता तुमीच म्हादाच्या टेंपोतून सोडा की टीव्ही आमच्या घरी आनी मग या की उत्पन्नाचा दाखल घ्यायला!'' अण्णांनी सुचवलं.

''नाही म्हणजे, ते मी करतो... पण महादेवाचा टेंपो सांगायचा म्हणजे...'' मास्तरांनी वाक्य अर्धवट सोडले.

''शाब्बास मास्तर! अवो, येवढी साधी गोष्ट तुमास्नी कळंना व्हय? काय पांडा?'' –पुन्हा सहेतुक नजर पांडाकडे.

''अवो, सोप्पं हाय गुर्जी...''

''बगा, जे पांडाला कळतंय ते....''

‘‘कळतंय, कळतंय. ते मला पण कळतंय.’’ असं म्हणत खिशातले पाकीट चाचपत मास्तर टेंपो सांगायला पळत सुटले आणि ते पळणारे ध्यान बघून अण्णा खदखदा हसायला लागले, तर पांडा स्थिर नजरेने बघतच राहिला.

‘‘काय पांडा, असं काय बगत राहिलायस, त्या मास्तराचं भूत दिसल्यावानी?’’ अण्णा हासत म्हणाले.

‘‘व्हय, भूतच दिसतंय मला. पन मास्तरचं न्हाय, सायेबाचं!’’ नजर तशीच स्थिर ठेवीत पांडा म्हणाला

‘‘म्हंजी?’’ अण्णांनी आश्चर्याने विचारले.

‘‘म्हंजी आसं की, येक प्राब्लेम झालाय...’’ पांडा गूढपणाने म्हणाला.

‘‘आता कसला प्राब्लेम? टीव्ही टेंपोतून गेला घरी!’’ हे बोलताना अण्णांची मिशी हसल्यासारखी वाटली.

‘‘त्योच तर प्राब्लेम झालाय. आता समजा, पंचायतीचं इनिस्पेक्शन करायला सायेब आला आनी त्यानं टीव्ही कुठं हाय म्हनून इचारलं, तर? ’’ चेहऱ्यावर टेन्शन येऊन पांडा म्हणाला.

हे ऐकलं मात्र –अण्णा खळखळून हसायला लागले आणि मुश्किलीने हसू आवरीत म्हणाले, ‘‘पांडा, आरं, शेना समजत होतो की तुला मी. येवढं बी तुला कळंना व्हय? मला सांग, सायेब इनिस्पेक्शनला आला तर त्याची उठ–बस, खाणं–पिणं कुठं होनार?’’ खाणं–पिणं ह्या शब्दावर जोर देत अण्णांनी विचारले.

‘‘कुठं म्हंजी? तुमच्याच घरी की!’’ पांडा झटकन उत्तरला.

‘‘अंगाश्शी! आरं खुळ्या, तंगडी चघळताना बघीलच की तो, टीव्ही जाग्यावरच हाय ते!’’

‘‘आनि, पंचायतीचा टीव्ही घरी कसा आला, आसं इचारलं तर?’’ –पांडाची पुढची शंका.

‘‘तर म्हनायचं, पंचायतीतून टीव्ही चोरीला गेला व्हता. लाटणेमास्तरानं तो शोधून इथं आणून ठेवलाय. उघड्यावर टीव्ही चोरीला जातोय म्हनून, बंद कपाटाची आर्डर दिली हाय. ते तयार झालं की, टीव्ही नेऊ परत पंचायतीत. काय?’’

अण्णांच्या ह्या बिनतोड जबाबानं पांडा भलताच भारावला आणि कमरेत वाकून व दोन्ही हात कोपरापासून जोडून म्हणाला, ''अण्णा, अंग वलं न करता, पान्यात  कसं पवावं, हे मानसानं तुमच्याकडूनच शिकावं बघा!''

''आवं, पान्यात कसलं पवताय अण्णा, आता दुधात पवा दुधात!'' असं म्हणत, धोतर सावरत उपसरपंच ज्ञानदेव रोडगे यांनी एंट्री केली.

''या-या, माउली या. आनि ते दुधाचं काय म्हंताय, ते बसन्याआधी म्हना.'' अण्णा म्हणाले.

''ठीक हाय. अण्णा, सरकारनी बायांच्या दुधाची येक नवी योजना आणलीय.'' असं म्हणून रोडगेनी उभ्या-उभ्याच कागदाची एक गुंडाळी टेबलावर अण्णांच्या समोर टाकली आणि आपल्या खुर्चीवर बसले.

''च्या मारी! म्हशी, शेळ्या, गाया समदी सोडून आता बायांची दूध योजना?'' पांडा चक्रावून म्हणाला.

''पांडा, दोन मोठी मानसं बोलत असताना मधी बोलू नये. आणि इषय कळत नसला, तर अजिबात बोलूच नये. जा, कोंगाट्याकडून पेशल च्या घेऊन ये.'' रोडगे जोरात म्हणाला.

''पन बायांची दूध योजनाऽऽऽ''

''बास! आता लई बी आकलेचे तारे तोडू नका. च्या घेवून या.'' रोडगेने दमात सांगितले आणि  'बायांची दूध योजना' असे तोंडातल्या तोंडात पुटपुटत आणि काही तरी हातवारे करत पांडा तिथून निघून गेला.

''रोडगे, ते पांडाचं राहू द्या. पन खरं तर मला बी कळलं न्हाय, ती बायांची दूध योजना.'' जरा पडत्या आवाजात अण्णा म्हणाले.

''अण्णा, येवढे हुश्शार तुम्ही आनि....  अवो, योजना गाई-म्हशींच्याच दुधाची हाय! पन ती गावातल्या बायांनी राबवायची हाय.'' रोडगे जरा फुशारून बोलला.

''रोडगे, माझी हुशारी सोडा. पन बायकांसाठी दूध योजना असं सरळ म्हनायचं सोडून 'बायांची दूध योजना' असं राँग बोलनाऱ्या तुमाला आमी शाना समजावं का?''  अण्णांनी परतफेड केली.

''न्हाय म्हंजे, बोलन्यात वाईच जरा घसरलोच आमी.'' माफीच्या सुरात रोडगे म्हणाले.

''हं, तुमी असे बोलन्यात घसरता आनि मग तुमाला सावरायसाठी आमाला हात जोडावं लागत्यात, नको त्या मानसाम्होरं!'' अण्णांनी आपला वरचष्मा दाखवला. रोडगे उठून अण्णांच्या मागे लावलेला पंचायतीचा बोर्ड निरखून पाहू लाग्ला.

इतक्यात हुश्श-हुश्श करीत लाटणे मास्तर आले आणि घाम पुसत म्हणाले, ''अण्णा, सोडला एकदाचा टीव्ही तुमच्या घरी.''

''या या मास्तर. बसा. झ्याक काम केलं तुमी. मला सांगा, आज दिवसभर काय करताय तुमी?'' अण्णांनी धोरणीपणाने विचारले.

''काय म्हणजे? अहो, शाळा आहे ना!'' मास्तर म्हणाले.

''साळंला द्या आज सुट्टी.'' अण्णा म्हणाले.

''का? भाऊसाहेबांचे काही बरे-वाईट ...?'' मास्तरांनी कुशंका विचारली.

''न्हाई हो, त्याला काय होतंय? चांगला ठणठणीत आहे तो.'' अण्णा म्हणाले.

''मग वहिनीसाहेबांची डिलिव्हरी झाली का?'' मास्तरांनी सुशंका विचारली.

''न्हाई हो! कुठला इषय कुठं नेताय तुमी? मी आपलं सहज इचारलं.'' अण्णा थोडे वैतागून बोलले.

''नाही, नाही. शाळा आहे ना. शिवाय पोरांची एक्झामिनेशन चालू आहेत.'' मास्तर म्हणाले

''आता पोरास्नी कसली मिशिन लावताय?'' अण्णांनी नवलाने विचारले.

''मिशिन नाही हो अण्णा, एक्झामिनेशन. म्हणजे चाचणी परीक्षा चालू आहे मुलांची.'' मास्तरांनी खुलासा केला..

''म्हणजे तुमाला आज येळ नाही म्हणायचा?'' अंदाज घेत अण्णा म्हणाले.

''का? काही इशेष आहे का?'' मास्तरांनी विचारले.

''काही नाही, येक नवी योजना आली हाय. तिचं वाचन करायचं व्हतं.'' अण्णा अगदी सहज म्हणाले.

''अरे वा! नवी योजना का? मग थांबलंच पाहिजे!'' मास्तर उल्हासाने म्हणाले.

''बघा रोडगे. नवी योजना म्हणलं की, मास्तर म्हनत्यात साळा गेली उडत!'' असं म्हणून त्यांनी समोर बघितलं, तर रोडगे जाग्यावर नाही. म्हणून मागे वळून बघितले, तर हा गडी पंचायतीचा बोर्ड निरखून बघतोय.

''वो रोडगे, येवढा बारकाईनं पंचायतीचा बोर्ड बघताय– कवा बघितला न्हवता का काय?'' अण्णांनी हसंत इचारलं. अण्णांचं हे एक बरं होतं. प्रसंग कुठलाही आणि कसलाही असो– मन शांत आणि चेहरा हसरा. ''वो रोडगे, तुमास्नी इचारतोय मीऽ'' व्हाल्यूम थोडा वाढवून अण्णांनी पुन्हा विचारले.

''न्हाई, ही मेंबरांची नावं बघून जरा इचार करीत व्हतो.'' रोडगे बोर्डावरची नजर न काढताच बोलला. 'मेंबरांची' हा शब्द रोडगेने असा उच्चारला की, आण्णा सोडून दुसरा कुणी असता तर त्याने 'मेंढरांची' असंच ऐकलं असतं. आणि ते खरं पण होतं. अण्णांनी आपल्या आजूबाजूला सगळी 'होयबा' मेंढरंच गोळा करून ठेवली होती.

''आता त्यात कसला इचार? बोर्ड नवा हाय की काय?'' अण्णा टेबलावरचा उडणारा कागद सावरीत म्हणाले.

''न्हाई, बोर्ड जुनाच हाय. पन अचानक येक पाइंट नव्यानं माझ्या ध्यानात आलाय.'' अजूनही रोडगेने बोर्डावरची नजर काढली नव्हती.

''आसं? कंचा पाइंट म्हनायचा ह्यो?'' अण्णाच्या मिशीतलं हसू कायम होतं.

''अण्णा, ह्या लक्ष्मीबाई भुतेला मरून सा महिनं झालं, तरी अजून तिचं नाव बोर्डावर हाय!'' जरा बिचकतच रोडगे म्हणाला.

''असू द्या हो. जिती व्हती तवा बी नावालाच व्हती. आता मेली असली म्हनून काय फरक पडतोय? हे बघा, आता आपन योजनेचं वाचन करून टाकू, म्हंजे आपल्याला कामाला लागायला बरं'' म्हणत त्यांनी फोन उचलला. इतक्यात ''अण्णाऽ अण्णाऽऽ'' असं ओरडत पांडा आला.

''काय रं पांडा, असा का वाघ मागं लागल्यावानी पळत आलायस?'' अण्णांनी विचारले.

''वाघ न्हाई अण्णा, पर आक्सीडेंट झालाय- झेंडेवाडीच्या चौकात.''

''तिकडं व्हय!? मरू दे ते. आपल्या हद्दीत न्हाय, आपन कशापायी धावायचं? काय रोडगे?''

''व्हय की. अवो, हे म्हंजे 'रस्त्यावरची वरात आन् माझ्या घरात' असंच झालं की!'' रोडगेने अण्णांची री ओढली.

''आवो आण्णा, तमाशाच्या टेम्पोला आक्सीडन्ट झालाय. बायामानसं हैत.'' पांडा नेटाने म्हणाला.

'बायामानसं' हा शब्द ऐकला मात्र- मास्तर, रोडगे आणि अण्णा ताड्‌कन उठून उभे राहिले.

''आरं पांडा, तू येडा का खुळा? त्यांना बरूबर आनायचं नाही व्हय?'' रोडगे पांडला झापत म्हणाला.

''अरे पांडा, तुला स्त्रीदाक्षिण्य वगैरे काही आहे की नाही?'' मास्तरही पांडावर डाफरले.

''पांडा, लेका, तुला मी शाना समजत व्हतो की. तू बी ह्यांच्यासारखाच? बायकास्नी उघड्यावर टाकून आलास?'' अण्णांनी चिडून जाब विचारला.

''अण्णा, अवो, आसं कसं करीन मी? तुमचं मन मी काय वळखत न्हाई व्हय? घेवूनच आलोय की बरोबर!'' असं पांडा बोलतोय इतक्यात दोन पोरींच्या खांद्यावर हात ठेवून, लंगडत एका बाईने तिथं प्रवेश केला. सगळ्या

बाजूंनी भरलेली तमाशातली ती भरगच्च बाई बघून अण्णांच्या दोन्ही डोळ्यांनी 'आ' वासला. बाकीच्या दोघांचे तर पुतळेच झाले. क्षणात भानावर येऊन अण्णा त्या दोन पोरींना म्हणाले, ''व्हा तुमी बाजूला. मी माझा भक्कम आधार देतो बाईंना-'' असं म्हणून स्वत:होऊनच त्यांनी त्या पोरींना बाजूला केलं आणि बाईच्या कमरेभोवती आपला उजवा हात घालून आणि तिचा सगळा भार आपल्या अंगावर घेऊन तिला आपल्या खुर्चीत आणून बसवले.

''नमस्कार, नमस्कार!'' असं म्हणत, लाळघोटेपणा करीत मास्तर धोतर सावरीत पुढे झाले. इतक्यात अण्णा जरा सांकेतिक खाकरले आणि मास्तरांना म्हणाले, ''वो मास्तर, व्हा मागं. आमी हायना हिथं पावन्यांचं स्वागत करायला?'' हे ऐकून मास्तर खजील होऊन मागच्या पावली मागे सरकले. ''रामराम बाई, रामराम. मी आण्णासाहेब उचले. या गावाचा सरपंच.'' अण्णांनी पुढारीटाईप हात जोडत आपली ओळख करून दिली. इतक्यात ''आई गऽऽऽ आंऽ'' करून बाई विव्हळल्या. ''या आमच्या चंद्रकलाबाई.'' दोनपैकी एका पोरीने बाईंची ओळख करून दिली.

''कुठं लागलं म्हनायचं चंद्रकलाबाई?'' अण्णांनी एकटक बाईकडे बघत, लाळ झिरपत विचारले.

''अवो, तुमी वर काय बघता? खाली माझ्या पायाला लागलंय!'' बाई विव्हळत म्हणाल्या.

अण्णा खाली बसले. बाईंचा पाय आपल्या मांडीवर घेऊन, साडी त्यांच्या गुढघ्यापर्यंत वर करीत म्हणाले, ''बघू बरं कुठं लागलंय ते-''

''हे डाक्टर हायेत का?'' बाईंनी विचारले.

''न्हाई. अवो, हे ह्या गावचे सरपंच हैत- अण्णासाहेब उचले.'' पांडा मधेच म्हणाला.

''अवो, दिसायचा न्हाई; मुका मार लागलाय.'' साडी परत खाली करीत बाई म्हणाल्या.

''आरं आरं, त्यो तर लई डेंजर! फार दुखतंय का?'' अण्णांनी परत त्यांच्या पोटऱ्या कुरवाळीत विचारले.

‘‘व्हय हो. आता चार-सा दिस तरी कुठं जायला जमायचं न्हाई, असं वाटतंय...’’ बाई कण्हत म्हणाल्या.

‘‘कशाला जायचं? आता तुमचा पाय बरा झाल्याबिगर आमी तुमाला सोडनारच न्हाई!’’ अण्णा आग्रहाने म्हणाले.

‘‘अवो पन, आसं परक्या गावात राहायचं म्हंजे...’’

‘‘बस का बाई?’’ तिला पुढे बोलू न देत अण्णा म्हणाले, ‘‘अवो, आता तुमी आमच्या गावात आलात म्हंजे आमच्या झालात- म्हंजे आमच्या पाव्हण्या झालात! बापू म्हनायचे...

‘‘बापू म्हंजे ह्यांचे वडील.’’ पांडाने मधीच तोंड घालून माहिती पुरवली.

‘‘हां, तर बापू म्हनायचे- पावना म्हंजे देवासमान! आता तुमी काही संकोच न करता, लागंल तितके दिवस आमच्या गावात राहायचं.’’ अण्णा धोरणीपणानं म्हणाले.

‘‘पन अण्णा, त्या राहानार कुठं?’’ रोडगेने विचारले.

‘‘कुठं म्हंजे? आण्णांच्या फार्महाऊसवर!’’ पांडा मधीच बोलला.

‘‘अंगाश्शी! बघा-बघा रोडगे, जे तुमाला कळलं न्हाई, ते पांडाला कळलं.’’

‘‘व्हय-व्हय. बापू- म्हंजे आमचे वडील म्हनायचे, परस्त्रीकडे आपलेपनानं बघावं. आनि हे बी म्हनायचे की- जो करतो बाईची सेवा, त्यालाच देव देतो मेवा!’’

‘‘आक्शी बरूब्बर बोलला अण्णा तुमी! आता हेच बघा की, दूध योजना आली तवाच तुमी बी आला.’’

रोडगेने मेळ घातला.

‘‘हो. हा अगदी शुभशकुनच म्हणायचा.’’ मास्तरांनी ताल धरला.

‘‘तवा पांडा, मंडळीस्नी यवस्थित फार्महाऊसवर सोड.’’

‘‘काळजी नको अण्णा. चला मंडळी-’’ असं म्हणून पांडा सगळ्यांना घेऊन बाहेर पडला.

नवी सरकारी योजना म्हटल्यावर गुळाभोवती मुंगळे जमतात तशी मंडळी भराभरा जमा झाली. सेक्रेटरी तांबट याने कोरमची हजेरी घेतली, ''त्यव्हाऽऽऽ'' ही सेक्रेटरी शैलीत भाषण करण्याची सदा तांबटची खास लकब होती. ''त्यव्हाऽऽऽ आज झाडून फुल्ल कोरम हजर हाय. डाक्टर कडमडे आनि बँक मेनेजर मोरे बी खास पाव्हणे म्हनून हजर हायेत, त्यव्हाऽऽऽ''

''पन ती लक्ष्मीबाई भुते कुठं हाय?'' चिकटे म्हणाला.

''अवं, ती तर कवाच मे...''

''पांडा, कमिटीच्या मीटिंगमधी शिपायानं लुडबुड करू नये.'' पांडाचं वाक्य अर्धवट तोडत अण्णांनी त्याला झापले. ''मेळ्याला-मेळ्याला गेल्यात.. आज कलंगेवाडीला त्यांच्या महिला बचत गटाचा मेळा हाय नव्हं, तिकडंच गेल्यात त्या.'' अण्णा सावरून घेत म्हणाले आणि एक रागीट नजर त्यांनी पांडाकडे टाकली.

वातावरणातला ताण हेरून सदा तांबटने आपले भाषण पुढे सुरू केले. ''त्यव्हाऽऽऽ जरी लक्शीबाई भुते गैरहजर असल्या, तरी कोरम झाल्याला हाय. त्यव्हा, आपल्याला मीटिंग सुरू करायला हरकत न्हाय. आजची आपली मीटिंग नवीन सरकारी बायांच्या दूध योजनेबद्दल हाय.''

''नवीन सरकारी बायांचं दूध? ही काय भानगड म्हनायची?'' अर्जुन रेटकराने आपली शंका रेटली.

आणि मीटिंगमध्ये एकच हशा पिकला.

''अहो, महिलांनी चालवायची सरकारी दूध योजना, असं म्हना-'' बँक मॅनेजर बोलले.

''नाही, ती कुणाच्या का दुधाची योजना असेना; पण त्यासाठी मला बोलावण्याचे कारण काय?'' डाक्टर कडमडेंनी प्रश्न उपस्थित केला.

''का? मानसं दूध प्यायला लागली तर तुमचे पेशंट कमी होतील, अशी भीती तुमाला वाटती की काय?''

रोडगेने हळूच चिमटा काढला.

‘‘अवो, माणसानं दूध पिण्याशी त्यांचा संबंधच काय? ते तर गुरांचे डॉक्टर आहेत!’’ बँक मॅनेजर बोलले आणि मीटिंगमध्ये पुन्हा खसखस पिकली.

‘‘आहे डाक्टर, ह्या योजनेशी तुमचा संबंध आहे. वेळ आल्यावर कळलंच की. मास्तर, तुमी योजना वाचायला सुरू करा.’’ अण्णा म्हणाले आणि घसा खाकरून लाटणे गुरुजी योजना वाचू लागले आणि सगळे लक्षपूर्वक ऐकू लागले.

‘‘ग्रामीण भागात महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी मिळावी म्हणून शासनाने ‘महिला सहकारी दूध उत्पादक संस्था’ निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. ‘एक गाव-एक महिला सहकारी दूध उत्पादक संस्था’ असे या निर्णयाचे स्वरूप आहे.....’’ गुरुजी वाचत होते. सर्व जण तल्लीन होऊन ऐकत होते. कधी कौतुक, कधी समाधान त्यांच्या चेहऱ्यावर उमटत होते, तर कधी ते खुशीने माना डोलावत होते..... ‘‘तर अशी ही महिलांची, महिलांनी, महिलांसाठी राबविण्याची दूध उत्पादक योजना आहे.’’

गुरुजींनी वाचन संपवले. क्षणभर सगळी मीटिंग स्तब्ध होती. अण्णांनी सगळ्या कोरमवरून एक नजर फिरवली आणि मुद्दामच टाळी वाजवली. त्याबरोबर सगळ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

‘‘झकास! झकास योजना हाय. महिलांची, महिलांनी, महिलांसाठी! येकदम झकास योजना. मंडळी, आपल्याला जर देशाची प्रगती करायची आसंल, तर ही योजना आपण आपल्या गावात राबवलीच पायजे. म्हंजे योजने परमाने गायी इकत घेन्यासाठी, बँक मेनेजर मोरेसाहेब फकस्त महिलांनाच कर्ज देनार. काय मोरेसाहेब, बरूबर हाय ना?’’ आण्णांनी खुंटी बळकट करण्यासाठी विचारले. आणि ‘‘बरोबर आहे अण्णासाहेब’’ असे म्हणून मोरेंनी कन्फर्म केले.

‘‘म्हंजे बघा- गाई खरेदी करणे, त्यांना चारापानी देणे, त्यांचा शेणगोठा करणे, धार काढणे, जमाविक्री दुधाचा हिशेब ठेवणे- ही समदी कामं बायांनीच करायची. काय गुर्जी, बरूबर हाय ना?’’ आपल्याला योजना पूर्णपणे समजल्याचे दाखवीत अण्णांनी विचरले.

‘‘हो. म्हणजे परिपत्रकाप्रमाणे हे अगदी बरोबर आहे.’’ गुरुजी सावध उत्तरले.

‘‘पण अण्णासाहेब, या सगळ्या गायांत आणि बायांत माझं काय काम?’’ डॉक्टर मधेच कुरकुरले.

‘‘अवो, असं काय करता डाक्टर? ह्या-ह्या गाया उद्या आजारी पडल्या, तर त्यांना औषधपानी करायला, लागलं-सवरलं तर मलमपट्टी करायला, गुरांचा लेडी डाक्टर हाय का आपल्या गावात? हे काम तुमी करायचं, म्हनून तुमाला बोलीवलं. काय रोडगे?’’ आपण किती दूरचा विचार करतो, हे दाखवीत अण्णा म्हणाले.

‘‘आक्शी बरुबर हाय की. शिवाय गायांत आनि बायांत येक पेंद्या पायजेच!’’ रोडगेने उगाच डॉक्टरची कळ काढली.

‘‘आणि मग कृष्ण तुम्ही का?’’ डॉक्टरने चेंडू टाकला.

‘‘आपल्या गावात क्रिस्न येकच हाय. काय आण्णासाहेब?’’ रोडगेने सिक्सर ठोकली आणि मीटिंगमधी पुन्हा खसखस पिकली.

‘‘तर मंडळी, ह्या दूध योजनेची समदी कामं बायाच करनार हायेत; मग ह्यात आम्हा बाप्यांचं काम काय?’’ अण्णांनी सार्वजनिक प्रश्न विचारला. पण सगळे चिडीचूप. कुणीच काही बोलेना. हे पाहून अण्णा म्हणाले, ‘‘काय पांडा?’’

‘‘मी गावातल्या बायांची मीटिंग बोलावणे!’’ झटकन पांडा म्हणाला!

‘‘अंगाश्शी! बघा, जे तुमाला कुनाला बी कळलं नाय ते पांडाला कळलं. शाब्बास पांडा! मग आता लागाच की आता त्या कामाला-’’ असं म्हणून अण्णांनी मीटिंग संपवली.

‘‘बंधूंनो आणि भगिनींनो...’’ अण्णांनी बोलायला सुरुवात केली आणि श्रोत्यांमधून हास्याची एक जबरदस्त लाट आली. ‘‘आण्णा, आवो, समोर समदी बापेमंडळी बसलीत. बाई येक बी न्हाई!’’ बाजूलाच बसलेल्या रोडगेने हळूच अण्णांच्या कानात सांगितले. ‘‘बसा गप. माझं डोळं फुटल्यालं न्हाईत. दिसतंय मला-’’ असं रोडगेला झापून अण्णांनी भाषण परत सुरू केलं.

''बंधूनो आणि भगिनींनो... मला ठाव हाय की, तुमी समदी पुरुषमंडळी हायसा. पन ही सभा 'महिला दूध उत्पादन संस्था' स्थापन करन्याची असल्यामुळे, फकस्त महिलांनाच ह्या सभेसाठी बोलीवलं व्हतं आनि ह्याची कल्पना पन तुमास्नी दिली व्हती. पन तुमच्या घरच्या महिला बिझी असल्याकारणानं, त्यांचे परतीनिधिक म्हणून तुमी आलायासा, म्हणून मी तुमाला भगिनींनो असं म्हनालो. (टाळ्या)

''बाईच्या बदल्यात बाप्या सभेला आला म्हनून काही बिघडत न्हाय. कारन ह्या बाबतीत इथून म्होरं जी कामं करायचीत, ती बाईच्या बदल्यात बाप्यांनीच करायची हायेत. (टाळ्या) आपल्या गावात महिला दूधउत्पादक संस्था थापन करणेची हाये. इथं येक रजिस्टर ठेवल्याले हाय. त्या मधी तुमी समद्यांनी आपापल्या घराच्या महिलांची नावे लिहायची आहेत आणि नावाच्या म्होरं त्यांच्याच नावाने सह्या करायच्या आहेत किंवा आंगठे उठवायचे आहेत. तसेच परतेकाला गाय खरेदी करण्यासाठी बँकेच्या कर्जाचे फार्म देण्यात येतील. त्याच्यावर पन खुणेच्या ठिकाणी सह्या किंवा आंगठे लावायचे आहेत. त्यासाठी मीटिंग संपल्यावर घरी जाण्यापूर्वी, पर्तेकाने आमचे शेक्रेट्री सदा तांबट आनि उपसरपंच रोडगे यांना भेटल्याशिवाय जाऊ नये. ज्याला गावात सुखासमाधानाने राहायचे असेल, तो सही केल्याबिगर इथून जानार न्हाई.'' बोलता-बोलता अण्णांनी गर्भित धमकीच दिली. आता सही केल्याशिवाय कुणी जाणार नाही याची त्यांना ग्यारंटी होती. ''आनि हो- समद्यासाठी येक खुशखबर हाय. ती म्हंजे, परतेक सही आनि आंगठ्यामागं परतेकाला एक कूपन देण्यात येईल. त्या कुपनवर, हाणम्याच्या देशी माल भांडारात तुमाला पायजे तेवढा माल फुकट मिळण्याची यवस्था केली हाय!'' या वाक्यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि 'आन्नासाहेबांचा विजय असो' या घोषणांत सभा संपली.

तांबट, रोडगेला सह्या आणि फार्माच्या कामाला लावून 'आणि उद्या लवकर पंचायतीत या' असे त्यांना सांगून अण्णा श्रमपरिहारासाठी फार्महाऊसवर धावले.

आज पंचायतीत सकाळी लवकरच मीटिंग सुरू झाली होती. ''तांबट, किती बायका झाल्या?'' अण्णांनी विचारले.

''एकुणसाठ झाल्या अण्णा'' कागदावर नजर टाकीत तांबट म्हणाला.

''एकुणसाठ म्हणजे टोटल साठ, का साठला एक कमी?'' अण्णांनी खुलासा मागितला.

''साठला एक कमी.'' तांबट म्हणाला.

''आसं व्हय? मंग साठ कंप्लीट करा.'' अण्णांनी सांगितले.

''ते कसे काय होईल अण्णा?'' मास्तर म्हणाले.

''ह्या लक्ष्मीबाई भुतेचं नाव द्या की टाकून!'' सभासदाच्या बोर्डाकडे बघत अण्णा सहज म्हणाले.

नवल वाटून रोडगे पटकन म्हणाले, ''अवो पन ती तर मे...''

''मेली हाय ना? असू दे की. आता ह्या ज्या एकुणसाठ जित्या हायेत, त्या काई काम करनार हैत का? निस्त्या नावालाच हैत का नाई? तशी ही साठावी- निसती नावाला! काय पांडा?''

''व्हयच की! न्है तरी कामं तर समदी आपुनच करनार हाये!'' पांडाने सपोर्ट केला.

''बघा, जे पांडाला कळतंय ते तुमास्नी कळंना मास्तर.'' मास्तराच्या ज्ञानाची कीव करीत अण्णा म्हणाले. ''पन मला येक सांगा रोडगे, ह्या लिस्टमधल्या समद्या बायांकडे गायी हैत न्हवं?'' रोडगेकडे बारीक नजरेने बघत अण्णांनी विचारले.

''अंऽ, म्हंजे साताठ सोडल्या तर हैतच की.'' रजिस्टर बघत रोडगे म्हणाले.

''हं, म्हंजे टोटल साठ बायका झाल्या''. बरूबर रोडगे?''

''बरूबर अण्णासाहेब, टोटल साठ बायका झाल्या.'' रोडगे म्हणाले.

''त्यांच्या बॉड्या बनवायला घ्या!'' अण्णांनी आदेश दिला.

''आंऽऽ'' पांडा सोडून सगळे कोरसमध्ये दचकले.

''अवो, असं आं काय वासताय समदी जणं? आता येवढी मोठी योजना राबवायची म्हनल्यावर, बायकांच्या आडमिनीस्ट्रेट बॉड्या नको का बनवायला? उत्पादन विभाग, खरेदी-विक्री विभाग, अकौंट विभाग....

''अस्संहोय .. आम्हाला वाटले की- प्रातिनिधिक स्वरूपात...'' गुरुजी म्हणाले.

''हं, कळली तुमची अक्कल. आता म्होरच्या वक्ताला पांडालाच घेतो बोर्डावर. हं, चला. सांगितल्यापरमाने येकाने नाव सुचवायचे आनि दुसऱ्याने अनुमोदन द्यायचे. सगळी कामं कशी नेमापरमाणे आनि शिस्तीत झाली पायजेत. हं बोला, चेअरमन कोण?''

''आमच्या शाळेतल्या त्या....''

''तुमच्या साळंतल्या कुनी नगं. तिथं काय पोरं हाकायची हैत का?'' अण्णांनी मास्तरचं बोलणं तोडलं.

''आमच्या बायकोचं घ्या म्हटलं असतं, पन....''

''बास- ठरलं सावित्रीबाई कोंडिबा उचले. मास्तर, तुमी नाव सुचवलं आनि तांबटानं अनुमोदन दिलं. फुडं बोला-'' रोडगेने घाईघाईत डिक्लेर केले आणि एक फुशारकीची नजर अण्णांकडे टाकली.

''बरं, व्हाईस चेअरमन कोन?'' रोडगेने पुकारा केला आनि आशेने अण्णांकडे बघितले.

''त्या पोस्टची गरज न्हाई. कटाप करा.'' अण्णा म्हणाले.

''सेक्रेटरी कोण?'' रोडगेने पुढली पोस्ट पुकारली.

''गुरुजीच्या बायकोचं नाव टाका-'' तांबट म्हणाला.

''नको, ती शिकल्याली हाय. अवघड जागी दुखणं होऊन बसंल!'' अण्णा हळूच म्हणाले.

''मग तांबटची बायको...'' कुणी तरी अर्धवट पुटपुटले.

''नको. त्यापरीस असं करा-'' सभासदाच्या बोर्डाकडे बघत अण्णा म्हणाले ''ह्या लक्ष्मीबाई भुतेचं नाव द्या टाकून.''

''अवो पन अण्णा, ती...''

''मेल्याली हाय! ठाव हाय मला रोडगे. पुन्ना पुन्ना तेच काय बोलताय? सेक्रेटरी म्हणून तिचंच नाव टाका आनि सभासद म्हणून टाका तुमच्या सगळ्यांच्या बायकांची नावं.'' आण्णांनी फायनल सांगितले. ''तर, अशी महिलांची बॉडी तयार झाली आता...''

''माहेरची साडी!'' पांडा चटकन म्हणाला.

''शाब्बास पांडा! बघा, कुणाला बी न्हाई कळलं ते...''

''पांडाला कळलं. तरी बी आमाला न्हाई कळलं!'' रोडगे म्हणाला.

''अवो रोडगे, ह्या बायकास्नी न इचारता, काई बी न सांगता-सवरता, आपन त्याची कमिटी नेमली, बॉड्या बनवल्या; पन ह्याच्या बदल्यात त्यास्नी कमीत कमी साड्या तरी द्याया पायजे का नको? काई तरी मिळवण्यासाठी काई तरी द्यावं लागतं, हा नेमच हाय रोडगे. काय पांडा?''

''तर! न्हाय तर लेनेके देने पडत्यात, असं म्हनत्यात!'' पांडा म्हणाला.

''बघा जे पांडाला कळलं ते आमाला बी कळलं.'' एका सुरात कमिटी बोलली आणि पंचायत खळखळून हसली..

''झिरप्याऽ आरं, कडबा आसा का पसरलाय गोठ्यात? दिसंना व्हय? जरा लावून घे की वाईच-'' अण्णांचा आवाज ऐकला आणि सावित्रीबाईंनी चहाचं आधण ठेवलं. अण्णा ओसरीवरून बैठकीच्या खोलीत आले आणि टोपी खुंटीला लावून लोड्याला टेकून बैठकीवर विसावले. इतक्यात पाण्याचा तांब्या आणि चहाचा कप घेऊन सावित्रीबाई आल्या. ''आज येरवाळीच घरचा रस्ता दिसला?'' त्यांनी विचारले. ''हं, सांगतो- बसा'' कधी नव्हे ते प्रेमाने अण्णा म्हणाले.

''बसाय येळ न्हाई. कामं हैती.'' असं म्हणून सावित्रीबाई आत निघाल्या.

‘‘थांबा. बसा म्हंतोय न्हवं? बसा मग.’’ अण्णा जराशा जरबेनं म्हणाले.

‘‘आत्ता? ह्यो जुलूमच म्हनायचा!’’ असं बोलत त्या बसल्या.

‘‘व्हय, आमी सदान्‌कदा तुमच्यावर जुलूम करतो. तुमच्यावर आराडतो. तुमच्यावर आमचं पिरेम न्हाई, आसं तुमाला वाटतं. पन खरं तसं न्हाई. अवो, जनतेची कामं करनाऱ्या माणसाकडे आशा गोष्टी कराया येळ कुठं असतो? बरं ते असू द्या. हे घ्या तुमाला प्रेझेंट–’’ असं म्हणून बरोबर आणलेलं पार्सल अण्णांनी सावित्रीबाईंकडे सरकवलं.

‘‘काय हाय?’’ पार्सल हातात घेऊन सावित्रीबाईंनी विचारलं.

‘‘बघा की उघडून. तुमालाच दिलंय ते.’’ अण्णा म्हणाले.

सावित्रीबाईंनी पार्सल उघडून बघितलं आणि डोळे विस्फारले. ‘‘या बया! आज ना जत्रा ना निवडणूक, ना दसरा ना दिवाळी... मधीच ही साडी कशापायी?’’ त्यांनी विचारले.

‘‘आगं, दिवाळी–दसराच हाय!’’ अण्णा हसत म्हणाले.

‘‘उगी काय तरी बोलू नगासा!’’ कृतक्‌कोपाने सावित्रीबाई म्हणाल्या.

‘‘अहो, खरंच सांगतोय. ‘योजना येती घरा तोचि दिवाळी दसरा’ असं म्हनून ठिवलंय ना कुनी तरी? तसंच समजा–’’ अण्णांनी फोड केली.

‘‘म्हंजे?’’ काही न कळून सावित्रीबाईंनी विचारले.

‘‘म्हंजे मांजराचे डोळे, वाघाचे पंजे, हत्तीचे कान आनि उंटाची मान! तुमाला न्हाई कळायचं आनि कळन्याची गरज पन न्हाई. मिळाली हाय ना साडी? गप नेसायची, नसत्या चौकशा करायच्या न्हाईत.’’ अण्णा जरा दमात बोलले. इतक्यात ‘‘अण्णा, येताय न्हवं पंचायतीत?’’ कुणी तरी बाहेरून आवाज दिला.

‘‘आलोच मी. व्हा तुमी फुडं–’’ अण्णांनी जबाब दिला.

‘‘आत्ता? ह्या वक्ताला पंचायतीत काय काम?’’ सावित्रीबाई कुरकुरल्या.

‘‘हे बघा, बायामानसांनी नसती पंचाईत करू न्हाई. जनतेसाठी काम करणाऱ्या आमच्यासारख्या फुडाऱ्यांना रात्रीचा दिवस कराया लागतोय. ज्या अंगी मोठेपन त्या यातना कठीन– आसं संतांनी म्हनूनच ठिवल्यालं हाय!’’

असं म्हणून अण्णांनी खुंटीवरची टोपी डोक्यावर ठेवली आणि वाऱ्याच्या वेगाने बाहेर पडले.

नवीन योजनेचे प्लॅनिंग करण्यासाठी आज खास आणि गुप्त मीटिंग बोलावली होती. पंचायतीचे सगळे मेंबर आणि खास पाहुणे म्हणून डॉक्टर आणि बँक मॅनेजर यांनाही निमंत्रण होते.

''हं मास्तर, सगळा हिशेब नीट लिहून घ्या. एका गाईला पंधरा हजार, तर साठ गाईंना किती?'' अण्णांनी हिशेब घातला. मास्तर बोटे मोजून मनातल्या मनात हिशोब करू लागले, 'साठ दुने एकशेवीस, त्रिक एकशे ऐंशी'

''मास्तर, अवं, बोटं कशाला घालताय? हा घ्या कलेक्टर–'' असं म्हणून अण्णांनी टेबलावरचा कॅल्क्युलेटर उचलून मास्तरकडे फेकला आणि मास्तरांनी धडपडत तो झेलला. त्यांचे ते विचित्र हातवारे बघून मंडळींत जर खसखस पिकली.

''नऊ लाख झाले.'' मास्तरांनी हिशोब करून आकडा सांगितला.

''म्हंजे– बँक आपल्याला साठ बायकांच्या नावावर नऊ लाख रुपये कर्ज देनार. बरूबर मोरेसाहेब?'' अण्णांनी बँक मॅनेजरला विचारले.

''बरोबर.'' बँक मॅनेजर म्हणाले.

''तेच्यापैकी दीड लाख खर्च करून आपण धा गाई खरेदी करायच्या, बरं का मास्तर.''

''फक्त दहाच? आणि बाकीच्या पन्नास?'' मास्तरांनी गोंधळून विचारले.

''आवो, त्या आधीच खरेदी केल्यात की आपन!'' अण्णा बोलले

''आधीच? आधी कधी?'' मास्तरांनी भोळेपणाने विचारले.

''आवो, साठ बायकांपैकी पन्नास बायकांकडे आधीपासूनच गाई हैत. काय रोडगे?''

''होय की!'' रोडगेने होकार भरला.

''त्याच पन्नास गायांची खरेदी आधीची. कळलं का मास्तर?'' अण्णा म्हणाले.

‘‘हां-हां, म्हणजे जुन्याच गाई नव्याने खरेदी केल्या, असं दाखवायचं. म्हणजे प्रत्यक्षात दहाच गाई खरेदी करायच्या, पण बिल मात्र साठ गाईंचं घ्यायचं.’’

‘‘शाब्बास मास्तर! फुडच्या वर्षी तुमाला हेडमास्तरच करतो बघा!’’ अण्णा म्हणाले.

‘‘पण अण्णा, हे खोटं काम आहे- ही शुद्ध फसवणूक आहे.’’ मास्तर कुरकुरत म्हणाले.

‘‘तुमचा उत्पन्नाचा दाखला पन खोटाच होता मास्तर...’’ अण्णांनी टोला मारला.

‘‘बरोबर, बरोबर आहे अण्णा. हे ठरले. पण अजून एक शंका आहे अण्णा. ह्या दहा गाईंच्या दुधातून साठ गाईंचं कर्ज फेडायचं कसं?’’ मास्तरांनी विचारले.

‘‘मास्तर, इथं बसून तुमी योजना वाचली. पन तुमच्या डोस्क्यात काय बी शिरलं न्हाय बघा. कसं होनार तुमच्या इद्यार्थ्यांचं? आवो, पयल्या वर्साचा हप्ता माफ केलाय, आसं लिवलंय ना योजनेत?’’ अण्णांनी विचारले.

‘‘अरे हो, ते मी विसरलोच होतो!’’ मास्तर म्हणाले.

‘‘इसरू नका. लई इंपार्टन्ट कलम हाय ते. त्याच्यावर लाल शाईने खुणा करा.’’ अण्णांनी ताकीद दिली.

‘‘पण अण्णा, मी काय म्हंतो वर्सानंतर तरी हप्ता देयाच पायजे बँकेला.’’ तांबटने पाइन्ट काढला.

‘‘द्यायचा की! दुसऱ्या वर्सापासून बँकेला हप्ता द्यायचा, पन धाच गाईंचा.’’ अण्णा म्हणाले.

‘‘आं? आनि बाकीच्या पन्नास गाई?’’ मास्तरांनी आश्चर्याने इचारले.

‘‘मेल्या म्हनून बँकेला आनि सरकारला रिपोर्ट करायचा!’’ अण्णा बिनधास्तपणे म्हणाले.

''पण अण्णा, बँक तोंडी सांगून ऐकणार आहे का? त्यासाठी नियमाप्रमाणे बँकेला कागदपत्रे द्यावी लागतील.'' मास्तरांनी अडचण सांगितली.

''देऊ की. गाईंना झालेला आजार, केलेले उपचार, डेथ सर्टफिकेट– सगळी कागदपत्रे यवस्थित देऊ. ह्या गुरांच्या डाक्तरला तेवढ्यासाठी तर घेतलाय कमिटीमधी. काय डाक्तर?''

''हम्माऽऽऽ'' करून डॉक्टरने होकार भरला.

''चला, म्हणजे बँक गाईंसाठी बायांना कर्ज देनार, पुरुषमंडळी बायांच्या नावाने योजना राबवनार आनि डाक्टर गाई मेल्याची सरटीफिकेट देनार– अशी आपली योजना तयार झाली. मास्तर, योजनेचे कागद तुमच्या हातात हायेत; पन त्यातले काही इतर फायद्याचे मुद्दे मी तुमाला सांगतो, ते नीट लिहून घ्या आनि तशी योजना राबवा.

१) योजनेत महिलांना प्रशिक्षण देन्यासाठी सरकारी अनुदानाची सोय हाय. ते मिळवणे.

२) दवाखान्यासाठी आनि लसीकरनासाठी अनुदानाची सोय हाय, ते मिळवणे.

३) गाईंसाठी पेंड, भुसा, चारा घेन्यासाठी अनुदानाची सोय हाय, ते मिळवणे.

४) दूध वाहतुकीसाठी टेम्पो, जीप घ्यायला शंभर टक्के फुकट कर्जाची सोय आहे. महिलांच्या नावाने ताबडतोब घेऊन टाका.

५) जनावरांच्या आनि टेम्पो–जीपच्या फुकट विमा पालिसीची सोय आहे.

''आता मला सांगा– रेकार्डपरमाने साठ गाईंसाठी आपण ह्या योजनेचा लाभ घेऊन, तो फकस्त दहाच गाईंसाठी वापरला तर....''

''पन्नास गाईंचा हिशेब आपल्या खिशात!'' रोडगेने अण्णांचे वाक्य पूर्ण केले.

''चुकताय तुमी रोडगे. पुन्हा तुमी बोलन्यात घसरताय. आपल्या न्हाई, जनतेच्या खिशात. आनि सध्या जनता आपनच हाय. काय पांडा?'' म्हणत अण्णांनी पांडाकडे नजर टाकली.

''व्हय की! आवो, सरकार जनतेचं हाय म्हंजे जनता आपनच की!'' असं म्हणून पांडा अण्णांच्या पुढच्या व्यवस्थेसाठी फार्महाऊसवर पळाला.

बघता-बघता वर्ष गेलं. ह्या वर्षभरात अण्णा आणि मंडळींनी बायकांच्या नावावर स्थापन केलेली पण पुरुषांनीच चालवलेली 'महिला सहकारी दूध उत्पादक' योजनाही व्यवस्थित मार्गाला लागली होती. म्हणून आज खास सेलिब्रेशन मीटिंग बोलावलेली होती.

''मंडळी, आज तुमच्यासाठी एक खूशखबर हाय. फार्महाऊसवर आज तुमच्यासाठी येक खास पार्टी आणि आयटम आरेंज केलेला हाय आनि तो आयटम म्हंजे चंद्रिकाबाई!''

अण्णांनी ही अनाउन्समेंट केल्याबरोबर ''वाः वाः वाः'' करीत सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. इतक्यात आनंदाने उड्या मारीतच रोडगेने एन्ट्री केली.

''अण्णाऽ अण्णाऽऽ अवो, दोन खूशखबरी घेऊन आलोय!'' उत्साहाने ते म्हणाले.

''अरे वा! मंडळी, आज खूशखबरींचा दिवस दिसतोय. बोला, बोला रोडगे, काय खूशखबर आणलीत?'' अण्णांनी विचारले.

''अवो, पन्नास मेलेल्या गायांचं कर्जमाफीचं पत्र आलंय बँकेकडून आनि शिवाय पन्नास मेलेल्या गायांची विम्याची रक्कम मंजूर झाल्याचं पत्र बी आलंय. आता येताना पोस्टातून घेऊनच आलो दोन्ही पत्रं.'' असं म्हणून दोन्ही पत्रं त्यांनी अण्णांच्या ताब्यात दिली.

''वाऽ वाऽ वा! पांडा, आज पेश्शल च्या सांगा सगळ्यांना.'' असं ते म्हणाले इतक्यात ...

''येऊ का आत दारातून आवाज आला?''

''ही घ्या आणखी एक खूशखबर! भोसलेसाहेबांचे पाय पंचायतीला लागले. या, या भोसलेसाहेब, या. आज तालुक्याहून कसं येन केलंत गरिबाकडे?'' अण्णा मानभावीपणाने म्हणाले.

''नाही, तुम्ही 'महिला सहकारी दूधसंस्था' गावात सुरू केल्याचं कानावर आलं. म्हटलं, बघून यावं.''

''पांडा, लेका, भोसलेसाहेब आल्यात. खास त्यांच्यासाठी मलई मारके येक पेश्शल च्या सांग.''

''सांगतो की-'' असं म्हणून पांडा निघाला. इतक्यात.....

''आनि हे बघ, जाता-जाता भिवाकडं दोन गुबगुबीत कोंबड्या बी सांग.. भोसलेसाहेब आलेत... आनि हो... ते इसरू नका-'' असं म्हणून अण्णांनी डाव्या हातावर उजव्या हाताचा कोपर टेकून झेंडा उभा केला. ''न्हाई-न्हाई, ते कसं इसारणार? अवो, कोंबडी म्हटलं की ते पायजेच!'' हसत पांडा म्हणाला.

''अण्णासाहेब, ते राहू द्या. आधी कामाचं बघू.'' भोसले म्हणाले.

''अरे हो, तुमाला ते कागदपत्रं तपासायचे हायेत, नाही का?'' म्हणून ते उगीचच इकडे-तिकडे शोधाशोध करू लागले आणि शोधता-शोधता म्हणाले, ''मला वाटतं साहेब, ती फाईल डेरीवरच आसंल.''

''नाही अण्णासाहेब, मी आधीच तिकडे जाऊन आलोय. ती फाईल इकडेच आहे, असं मला समजलं; म्हणूनच इकडे आलो.'' भोसलेंनी सांगितले.

''आसं? मंग कुठं गेली म्हणायची फाईल?'' म्हणत अण्णा टेबलाची खालची-वरची कपाटे नि ड्राव्हरची उघडझाप करू लागले.

''अवो आण्णा, ती काय तुमच्यासमोरच हिरव्या रंगाची फाईल दिसतीया!'' पांडा फाईलकडे निर्देश करून म्हणाला आणि अण्णांनी एक जळजळीत नजर त्याच्याकडे टाकली. ते रागात पांडाला म्हणाले, ''तू अजून हिथंच? जा, पटकन च्या घेऊन ये.'' पण लगीच स्वत:ला सावरून घेत, कृत्रिम हसत म्हणाले, ''बघा- ह्यालाच म्हनतात 'काखंला कळसा न् गावाला वळसा'. फाईल इथंचं हाय आनि मी गावभर शोधतोय. घ्या साहेब, ही फाईल घ्या आनि बैजवार तपासा. घ्या-समदी कागदपत्रं ह्याच्यात डिटेलवार लावल्यात.'' असं म्हणून अण्णांनी फाईल भोसेलेकडे दिली. जसा-जसा भोसले फाईल चाळू लागला तसतशी मंडळींच्या छातीत धडकी भरू लागली. पण

अण्णा शांतपणे हाताचा इशारा करून त्यांना धीर देत होते. भोसलेंनी फाईल मिटली आणि अण्णांच्या दिशेने पाऊले टाकत म्हणाले, ''अण्णासाहेब, ही कागदपत्रे खोटी आहेत.''

''काय म्हणालात?'' अण्णा किंचित दचकून म्हणाले.

''नाही, म्हटलं– ही सगळी कागदपत्रे खोटी आहेत.'' प्रत्येक शब्दावर जोर देत भोसले म्हणाले.

''खरी आहे!'' अण्णा उद्गारले.

''काऽय?'' भोसले जर चिडक्या आवाजात म्हणाले.

''म्हणलं, ही कागदपत्रे खोटी आहेत, ही गोष्ट खरी आहे. पन आमी असा इचार केला भोसलेसाहेब की– घरी बायकांना धुनी, भांडी, रांधा, वाढा, आवरा, झाडलोट... किती तरी कामं असत्यात. त्यात आनि हा डेरीचा बोजा त्यांच्या डोक्यावर कशापायी ठेवायचा? म्हनून आम्ही पुरुषमंडळींनीच बायकांच्या नावाने डेरी सुरू केली. हा आपला मामुली घरगुती किरकोळ मामला आहे साहेब. तुमी कशाला येवढं मनावर घेताय? द्या सोडून.''

हे बोलताना अण्णा अगदी बिनधास्त होते. इतर लोक आणि स्वत: भोसलेही अण्णांच्या या धारिष्ट्याचे मनोमन कौतुक करीत होते.

''अण्णा, डेरी जर खरोखरच रीतसर नियमाप्रमाणे सुरू असती, तर या बाबींकडे मी काणाडोळा केलाही असता. पण अण्णासाहेब, साठ गाईंसाठी कर्ज घेऊन प्रत्यक्षात फक्त दहा गाई खरेदी केल्यात. साठ गाईंसाठी तुम्ही योजना राबवलीत, सगळी अनुदाने आणि फायदे घेतलेत. वर पन्नास खोट्या गाई मेल्याचे दाखवून, त्यांच्या विम्याचे पैसेही लाटलेत. शासनाची आणि जनतेची फार मोठी फसवणूक केलीत अण्णासाहेब. ह्या सगळ्या गोष्टींचा तुम्हाला जाब द्यावा लागेल!'' भोसलेंनी डायरेक्ट चार्ज ठेवला.

''जाब?'' जरा रागातच अण्णा बोलले. पण लगेच स्वत:ला सावरून घेत, आपल्या खास शैलीत हसत म्हणाले, देऊ की साहेब. क़र नाही त्याला डर कशाला? जे काही जाबजबाब द्यायचे, ते सगळे देवू. पन आज नाही, उद्या–''

''उद्या?''  भोसले जर चढ्या आवाजात बोलले.

''त्याचं काय हाय भोस्लेसाहेब, बऱ्याच दिवसांनी गावात आलात. कामं तर होतीलच हो, पन जरा  आराम करा. संध्याकाळी जाऊ फार्महाऊसवर. तिथं सांज आरती व्हैल!''

''सांज आरती?''  भोसलेंनी आश्चर्याने विचारले.

''हां, म्हंजे सांच्याला करत्यात ती आरती. मग तीर्थ, आनि मग ठरल्यापरमाने महाप्रसाद हायेच की! काय पांडा?''  च्या घेऊन येत असलेल्या पांडाला बघून अण्णा म्हणाले.

''तर वो! गावात दुधाचे पाट वाहायचे असतील, तर देवाला कोंबडीचा निवेद दावायालाच पायजे!'' पांडा भोसलेकडे पाहत म्हणाला.

ऐकलं आणि अण्णा हसत म्हणाले, ''बघा बघा मंडळी, जे कुनाला पण कळलं न्हाई ते... ''

''पांडाला बरोब्बर कळलं!'' कोरसमध्ये एकसुरात सगळे बोलले.

चंद्रकलाबाईंनी समेवर येऊन लावणी संपवली. मद्यापेक्षाही चंद्रकला-बाईंच्या मधाळ आवाजाने आणि मादक हावभावांनी महफिल चांगलीच धुंद झाली होती. लावणी संपताच 'वाऽ वाऽ वाऽ!' करीत सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

''वाः चंद्रकलाबाई, वा!''  नशेने जडावलेल्या आवाजात अण्णा म्हणाले. ''आज तुमी आमच्या कानाचं आनि डोळ्यांचं पारणं फेडलंत. शाब्बास!'' असं म्हणत त्यांनी नोटांची फुलं बाईवर उधळली.

''चला गं पोरींनो-'' असं सोबत नाचणाऱ्या पोरींना म्हणून बाई आत जाऊ लागल्या.

''तुमी कुठं निघालात?'' अण्णांनी मदभऱ्या आवाजात विचारले.  त्यांची जीभ बोलताना अडखळायला लागली होती.

''अवो, तीर्थ झालं; आता प्रसादाची तयारी नको का करायला?'' बाई म्हणाल्या.

‘‘होऽ होऽ हो... करा प्रवासाची- आपलं प्रसादाची तयारी करा.’’ अण्णा म्हणाले आणि आपल्या सख्यांसह बाई आत गेल्या.

‘‘काय भोसले सरकार, कशी काय झाली आरती? आली का नाही मजा?’’ अण्णांनी विचारले.

‘‘आरती? अहो, ही तर महाआरती झाली!’’ भोसले पण मस्त रंगात आला होता. ‘‘मस्त मजा आली. पण अण्णासाहेब, उद्या ते फाइलीचं जरा..’’

‘‘ते व्हैल हो उद्या, तुमी कशाला उगी चिंता करता?’’ असं म्हणून जवळच उभ्या असलेल्या पांडाला ते म्हणाले, ‘‘पांडा, मघाशी तुमच्याकडे दिलं होतं ते, द्या इकडे-’’

‘‘देतो की!’’ असं म्हणून पांडाने नोटांचं बंडल अण्णांकडे दिलं. ‘‘अरे पांडा, हे असे ओपन द्यायचे नसते. येका पाकिटात घालून... बरं, असू दे आता,’’ असे म्हणून ते बंडल भोसलेकडे देत अण्णा म्हणाले,

‘‘भोसलेसाहेब, घ्या हे.’’

‘‘हे काय?’’ भोसलेने उगीचच विचारले.

‘‘प्रसाद हो! तीर्थ झालं, आता प्रसाद नको? दक्षिणा समजा तुमची’’ म्हणत अण्णांनी बंडल पुढे केले.

‘‘कशाला-कशाला अण्णा...’’ असं म्हणत भोसलेने हात पुढे कला.

‘‘काय हाय भोसलेसाहेब, ताकाला जाऊन भांडं लपवायचं नाही. तुमाला सांगतो भोसलेसाहेब, हे जे काही चाललंय ना- ही योजना, बँकेचं हाप्तं, वगैरे हे समदं खोटं हाय, बनावट हाय. आणि ही सगळी आयडिया ह्या रोडगेची हाये...’’ अण्णा नशेत बोलून गेले.

‘‘अवो अण्णा, तुमी सांगितलं म्हनून मी...’’ नशेमुळे रोडगेच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

‘‘मी सांगितलं म्हनून? आनि तुझी अक्कल काय शेन खायला गेली व्हती? आनि हा बँक मेनेजर. ह्याला साधा समजू नका, बरं का. येवढा शिकला-सवरलेला मानूस, कागदपत्रे न बघता कर्ज मंजूर करतो?’’

‘‘अण्णा, तुम्ही सांगितलं म्हणून मी....’’

‘‘मी ढीग सांगीन. मी म्हनीन, हिरीत जीव दे. देशील? आनि आता ह्यो शाळामास्तर लाटणे –अवो, हा बी कमी न्हाई. सरकारी योजना आली की म्हंतो, साळा गेली उडत....’’

‘‘अहो अण्णा, सरकारी योजना वाचण्यासाठी तुमी मला सुट्टी घ्यायला लावलीत!’’ मास्तर साळसूदपणे म्हणाले. आणि आपले नाव पटावर येण्यापूर्वीच सावध होऊन गुरांचा डॉक्टर म्हणाला, ‘‘अण्णांच्या सांगण्यावरूनच मी गाईंची खोटी डेथ सर्टिफिकेट दिली.’’

हे सगळं ऐकून घेऊन अण्णा म्हणाले, ‘‘अरे वाऽ वाऽ वा ! म्हणजे मलई तुमी खायची आनि खापर माझ्या डोस्क्यावर?’’ अण्णांच्या ह्या बोलण्यावर मैफलीत एकच गोंधळ आणि आरडाओरडा सुरू झाला. इतक्यात ‘‘गप्पा बसा’’ असा एक दमदार बायकी आवाज आला. कोण आहे, हे बघण्यासाठी गोंधळ थांबला. बघतात तर चंद्रकलाबाई आणि तिच्या तीन साथीदार पोलिसांच्या युनिफॉर्ममध्ये.

‘‘अरे वाऽ वाऽ वा! बाई, तुमी या वेषात? नवीन नाटक करताय वाटतं?’’ अण्णा म्हणाले.

‘‘हो, नवीन नाटक करत्येय. आणि त्याचा खेळ आज तुम्हाला मी दाखवणार आहे.’’

‘‘आं? काय सांगताय काय? बघा मंडळी, शुभारंभाचा प्रयोग आपल्या गावात!’’ –अण्णा.

‘‘अगदी बरोबर. शुभारंभाचा प्रयोगही इथेच आणि शेवटही इथेच!’’ चंद्रकलाबाई टोचून म्हणाल्या. आणि लगेच जरबेने म्हणाल्या, ‘‘अण्णासाहेब, यू आर अंडर अरेस्ट!’’

‘‘अरे वा! बघा मंडळी, हे ह्यांच्या नव्या नाटकाचं नाव बरं का. अण्णासाहेब, यू आर अंडर अरेस्ट!’’ असं बोलून हसायला लागले आणि ‘वाऽ वाऽ वा’ म्हणत सगळ्यांनी पुन्हा एकाच गोंधळ केला.

‘‘शटअपऽऽ’’ असं बाई जोराने ओरडताच सगळे शांत झाले आणि घाबरून बघू लागले. ‘‘आजपर्यंत मी तुमच्याशी वागले, ते नाटक होते. पण हे नाटक नाहीये. मी आहे एसीपी तेजश्री प्रधान आणि या मुली आहेत माझ्या सहकारी. एका बाईचा खून केल्याची तक्रार आमच्याकडे आली होती आणि त्याची चौकशी करण्यासाठी मी माझे पथक घेऊन इकडे आले. आणि त्याच वेळी तुम्ही चालवलेल्या महिला दूध उत्पादक संस्थेचा बनावट कारभारही आमच्या लक्षात आला होता. म्हणूनच आम्ही बँक मॅनेजर, डॉक्टर, मास्तर, पंचायतीचे सर्व सदस्य यांच्यासह तुम्हाला अटक करीत आहोत.’’

ऐकून अण्णा खदाखदा हसायला लागले आणि म्हणाले, ‘‘बायांनो, तुमी ढीग कलमं लावाल. पन याला पुरावा काय?’’ अण्णांचे हे बोलणे ऐकून बाजूलाच उभा असलेला पांडा पुढे झाला आणि म्हणाला, ‘‘अण्णासाहेब, या महिला दूध योजनेची जी खोटी, बनावट कागदपत्रे तुम्ही तयार केलीत, त्यांची ही फाईल हाच याचा पुरावा आहे’’ असं म्हणत पांडाने आपल्या हातातली ती फाईल अण्णांना दाखवली

‘‘पांडा, लेका तू?’’ चमकून अण्णा म्हणाले. ‘‘अरे, गयावया करून नोकरी मागायला आलास, म्हनून तुला पंचायतीत कामाला ठिवून घेतला. आनि आता तूच उलटलास?’’ अण्णा चिडून म्हणाले.

‘‘नाही अण्णासाहेब, मी पंचायतीचा पांडा नाही; तर मी आहे सीबीआय ऑफिसर विजय प्रधान!’’ पांडा हे बोलत असतानाच भोसले हळूहळू तिथून काढता पाय घेऊ लागला, तेव्हा पांडा म्हणाला-

‘‘अहो भोसले, तुम्ही कुठं जाताय? हे प्रकरण दडपण्यासाठी तुम्ही लाच घेतलीत, म्हणून तुम्हाला पण मी अटक करतोय. इथे घडलेला सर्व प्रकार त्या समोरच्या कॅमेऱ्यात रेकॉर्ड झालाय.’’

‘‘आणि पंचायतीच्या सभासद लक्ष्मीबाई भुते यांच्यावर बलात्कार करून, त्यांचा खून केल्याच्या आरोपावरूनही मी तुम्हाला अटक करतेय.’’ तेजश्री म्हणाली.

आता मात्र अण्णांची सहनशक्ती संपली. एकदम चिडून संतापाने ते म्हणाले, ''अरे, कोन लक्ष्मीबाई भुते? तिचा–माझा काय सबंध? आणि मी तिचा खून केला, याला पुरावा काय?''

''मी हाय– मी हाय त्याचा जित्ता पुरावा अण्णासाहेब! त्या लक्ष्मीबाई भुतेवर बलात्कार करून तुमी  तिचा खून केलात आनि ह्या रोडगेने नेऊन तिला जमिनीत पुरली. मला समदं ठाव हाय. बाईसाहेब, तिला कुठं पुरली ती जागा मी दाखवते तुम्हाला.'' सगळे जण 'आ' वासून बघतच राहिले.

आपलीच बायको अचानक अशी चंडी होऊन तिथं आल्याचे बघून अण्णा आधी अवाक् झाले, पण प्रसंग ओळखून सावरले आणि म्हणाले, ''सावित्री, तू.. तू साक्ष देनार माझ्या इरुद्ध?''

''व्हय. मी साक्ष देनार हाय तुमच्या इरुद्ध. अवो, गोरगरिबांसाठी असलेल्या सरकारी योजना तुमी समद्यांनी आपल्या फायद्यासाठी वापरल्यात. आणि त्याच्या इरुद्ध आवाज उठवणाऱ्या त्या लक्ष्मीबाईचा खून केलात. कुठं फेडणार हे पाप? हे समदं मी कुनाला पचू देनार न्हाई. म्हनून मीच ह्या समद्याची चौकशी व्हावी, म्हनून सरकारकडे अर्ज केला व्हता.''

सावित्रीच्या या बोलण्यावर अण्णा खदखदून हसले आणि म्हणाले, ''ये सावित्रे, ह्या अण्णाला काय दुधखुळा समजलीस काय? थांब, आता डायरेक्ट होम मिनिस्टरलाच फोन लावतो–'' असं म्हणून अण्णांनी मोबाईल बाहेर काढला. इतक्यात तेजश्री  हसून म्हणाली,  ''अण्णासाहेब, त्यांना फोन करण्याची तसदी घेऊ नका. कारण होम मिनिस्टरांनीच तुमच्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी दिलेलं हे पत्र बघा–'' असं म्हणून ते पत्र तिने अण्णांच्या तोंडासमोर नाचवले आणि साद घालत म्हणाली,

''हवालदार कदम, ह्या सगळ्यांना ताब्यात घ्या आणि पोलीस स्टेशनाला घेऊन जा. मी आलेच.'' हुकूम होताच बाहेर उभे असलेले हवालदार कदम आणि त्याचा स्टाफ आत आला आणि सगळ्या आरोपींना घेऊन गेला. सागळे निघून गेल्यावर विजय, तेजश्री अन् सावित्रीबाई एवढीच माणसे तिथे उरली.

‘‘सावित्रीबाई, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तुम्ही स्वत:च्या नवऱ्याची पण पर्वा केली नाहीत. धन्य आहे तुमची!’’

‘‘ते समदं खरं हाय बाईसाहेब. पन मला सांगा– ज्या गोरगरिबांसाठी हे समदं केलं, तेच बंद झालं; तर त्यांची पोटं कशी भरायची?’’ सावित्रीबाई कळवळून म्हणाल्या.

‘‘सावित्रीबाई, आता रडायचं नाही. ही डेरी तुम्ही महिलांनी चालवायची आणि गोरगरिबांचं कल्याण करायचं. डेरीची सर्व कागदपत्रे तुमच्याकडे देण्याची व्यवस्था मी करते.’’ तेजश्री म्हणाल्या.

‘‘फार उपकार झाले बाईसाहेब–’’ असं म्हणून सावित्रीबाई गेल्या.

‘‘मिस्टर विजय, कसा काय वर्कआउट झाला माझा प्लॅन? सरकारी योजनांचा बट्ट्याबोळ करणाऱ्या अण्णांचा केला की नाही बट्ट्याबोळ?’’ तेजश्री हसत म्हणाली.

‘‘पण मादाम...’’

त्याला पुढे बोलू न देता तेजश्री म्हणाली,

‘‘मला वाटतं, आता आपली ड्युटी संपलेली आहे; तेव्हा आपण मिस्टर आणि मिसेस प्रधान या आपल्या खऱ्या नावाने आणि नात्याने वावरायला हरकत नाही. नाही तर आपल्याच संसाराचा व्हायचा बट्ट्याबोळ!’’ असं म्हणून दोघेही खळखळून हसले.

❒ ❒ ❒

५

# कंजूष

पुण्याचा शनिवारवाडा, तळ्यातला गणपती, दगडूशेठ गणपती, पर्वती, तुळशीबाग, पुणेरी पगडी, पुणेरी पाट्या, पुणेरी, पुणेरी तऱ्हेवाईकपणा, चितळ्यांची बाकरवडी, भोजन व वामकुक्षीसाठी दुपारी दुकाने बंद ठेवण्याची पुणेरी पद्धत, या गोष्टींसारखीच– किंबहुना, त्यांहूनही अधिक प्रेक्षणीय व अनुभवनीय अशी फेमस गोष्ट म्हणजे सदाशिव पेठेत राहणारे 'कंजूष बाबूराव'.

पुण्यात येऊन, 'कंजूष बाबूराव कुठे राहतात?' असे एखाद्या आंधळ्या लहान मुलाला विचारले, तर तोही तुम्हाला बाबूरावांच्या घरासमोर अचूकपणे आणून उभा करेल. इतकेच काय, पण बाबूरावांच्या आसपास राहणारे लोकसुद्धा आपला पत्ता 'कंजूष बाबूरावांच्या बाजूला किंवा जवळ किंवा समोर' असा लिहीत आणि त्यांची पत्रे त्यांना अचूकपणे मिळत. काही लोकांनी तर आपल्या परदेशस्थ नातेवाईक आणि मित्रांना आपला पत्ता 'कंजूष बाबूरावांच्या बाजूला, पुणे, महाराष्ट्र, इंडिया' एवढाच दिला होता; पण त्यांनाही पत्रे मिळण्यास कधी अडचण आली नाही. ज्या दाबके वाड्यात बाबूराव भाडेकरू म्हणून राहत होते, तो दाबके वाडा तर पुण्यात 'कंजूष बाबूराव वाडा' म्हणूनच ओळखला जायचा. एकदा दाबक्यांकडे आलेल्या एका पाहुण्याने इथे दाबके वाडा कुठे आहे, असे विचारल्यावर 'या नावाचा वाडा इथे नाही' असे त्याला सांगण्यात आले.

तेव्हा जवळच असलेला एक जुना जाणकार माणूस म्हणाला, ''अरे, आपला कंजूष बाबूराव राहतो, तोच दाबके वाडा.'' महापालिकेने तर गल्लीच्या तोंडावर चक्क 'कंजूष बाबूराव बोळ' अशी पाटीच लावली होती. एखाद्याचे अशा प्रकारचे त्याच्या जिवंतपणी स्मारक झाल्याचे हे बहुधा एकमेव उदाहरण असावे. काही प्रवासी कंपन्यानी तर प्रेक्षणीय आणि अनुभवनीय स्थळांत कंजूष बाबूरावचा समावेश केला होता.

तर, असे हे पुण्याचे फ़ेमस 'कंजूष बाबूराव' कंजूषपणात जणू चालते-बोलते लिजंड झाले होते. ज्याप्रमाणे बिरबलाच्या चतुरपणाच्या आणि आचार्य अत्रेंच्या हजरजबाबीपणाच्या अनेक कपोलकल्पित गोष्टी त्यांच्या नावावर खपवल्या गेल्या किंवा जातात, त्याप्रमाणे कंजूष बाबूरावांच्या अनेक दंतकथा प्रसृत आहेत. एक तर म्हणे, लग्नाचा आणि संसाराचा खर्च नको म्हणून बाबूरावांनी लग्नच केले नाही. तर दुसरा म्हणे- अरे, बाबूरावांची बायको मस्त चिकणी होती, पण त्यांच्या कंजूषपणाला कंटाळून ती आपल्या एका मुलासह एका रद्दीवाल्याचा हात धरून पळून गेली.

बाबूरावांनी होळी-दिवाळीची किंवा गौरी गणपतीची वर्गणी दिली नाही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी तर 'बाबूरावांकडून वर्गणी आणा आणि बक्षीस मिळवा' अशा जाहीर घोषणाही करून बघितल्या. पण ते बक्षीस कधीच कुणाला मिळाले नाही. गप्पांच्या मैफली तर बाबूरावांच्या कंजूषपणाच्या किश्श्यांशिवाय रंगतच नसत.

'अहो, तुम्हाला बाबूरावांची ती गंमत माहीत आहे का?' या वाक्याने विषयाला तोंड फुटत असे.

'कोणती, कोणती?' रसिक श्रोते उत्साहाने विचारीत.

'अहो, जग चंद्रावर गेलं, पण बाबूराव घरात अजूनही रॉकेलचा दिवा लावतात!' लावतात म्हणताना त्याने वासलेला 'आ' मिटायच्या आत दुसरा म्हणायचा,

'आणि रात्री दहा वाजले की, बाबूराव घरात अंधारबुडुक करून झोपतात. का माहीत आहे?'

'रॉकेल जास्त जळू नये म्हणून, दुसरं काय!' एक श्रोता पटकन म्हणायचा!'

'ते तर आहेच रे. पण आणखी एक त्याहूनही महत्त्वाचं कारण आहे.'

'कोणतं, कोणतं?' उत्साहात तीन-चार जण कोरसमध्ये विचारायचे.

सांगणारा जरा कुजबुजत्या आवाजात म्हणायचा 'अरे, धोतर चुरगळून खराब होऊ नये म्हणून, अंधार करून तो तसाच झोपतो!'

'धोतराशिवाय?' भान न राहून कुणी तरी एकदम ओरडला.

'शू ऽऽऽऽ हळू, हळू बोल. बोंबलतोस कशाला?' कुणी तरी त्याला झापले आणि बोलणाऱ्याचा आवाज जरा खाली आला.

खरे-खोटे बाबूरावच जाणे; पण याविषयी बाबूराव कोणाशी कधी बोलत नसत आणि लोक आपल्याबद्दल काय बोलतात याची पर्वा करीत नसत. एक मात्र नक्कीच खरे होते की- दाबके वाड्यात बाबूराव सडेफटिंग, एकटेच राहायचे. ते काय खायचे, काय प्यायचे, की काही खात-पीतच नव्हते, हे कुणालाही माहीत नव्हते. त्यांनी ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये कधी चहा प्यायल्याचे वा कधी कुणाला चहा पाजल्याचे बघण्यात किंवा ऐकिवात नव्हते. ऑफिसला ते चालतच जात-येत होते. घरून ते जेवणाचा डबा आणत असत; पण त्यात ते काय आणत, हे बघण्याची संधी त्यांनी कधीच आणि कुणालाच दिली नव्हती. त्यामुळे बाबूरावांचा डबा हे ऑफिससाठी एक गूढच होते. ऑफिसमध्ये होणाऱ्या कुठल्याही सामुदायिक कार्यक्रमासाठी त्यांनी कधीही वर्गणी दिली नाही. एवढा कंजूषपणा करून साठवलेला पैसा हा माणूस देणार तरी कुणाला, याची ऑफिसमध्ये सतत चर्चा चाले. काही जणांनी तर त्यांनी आपल्याला दत्तक घ्यावे म्हणून फिल्डिंगसुद्धा लावली होती. त्यांच्या कंजूषपणासाठी ऑफिसमध्ये लोक त्यांची नाना प्रकारे टिंगलटवाळी करत असत. पण बाबूराव कधी कुणावर रागावले नाहीत की चिडले नाहीत. सगळ्या गोष्टी ते हसण्यावारी नेत असत. ऑफिसमध्ये किंवा ऑफिसबाहेर त्यांना एक फडके वकील सोडले, तर कुणीही मित्र नव्हते. फडके वकील मात्र बऱ्याच वेळा त्यांच्याकडे येत-जात असत. पण दार लावून आत त्यांच्या

काय गप्पा चालत, हे ते आणि देवच जाणे. रिटायर्ड  झाल्यावर फंड व ग्रॅच्युइटी मिळून बरीच मोठी रक्कम त्यांना मिळाली होती. शिवाय पै-पै करून साठवलेली बरीच मोठी पुंजी बँकेत जमा होती.

आणि  शेवटी 'मानव हा मर्त्य आहे' या न्यायाने या कंजूष धनवान माणसाने एक दिवस जगाचा निरोप घेतला. आप्त, नातेवाईक, मित्र- कुणी नव्हतेच. पुढील क्रियाकर्म करण्यासाठी वाड्यातले आणि आजूबाजूचे चार लोक जमा झाले. मर्तिकाचा खर्च कुणी करायचा, याबद्दल कुजबुज सुरू झाली. कारण आयुष्यात कधी कुणाला मदत न केलेल्या माणसासाठी खर्च कोण करणार? चला, वर्गणी काढू या- कुणी तरी टूम काढली. अरे, पालिकेची ॲम्बुलन्स मागवून, बेवारशी म्हणून प्रेत ताब्यात द्या- कुणी तरी म्हणाले. यस, धिस विल बी द राईट थिंग. मीच ॲम्बुलन्सला फोन करतो, असं म्हणत बोलणारा फोन करायला निघाला. इतक्यात फडके वकील पुढे झाले. ''वर्गणी काढण्याची किंवा ॲम्बुलन्स बोलावण्याची काही गरज नाही. मी बघतो काय ते-'' असं त्यांनी म्हणताच लोकांनी नि:श्वास टाकला. चला, नाही तरी फडक्यांचं आणि बाबूरावांचं गूळपीठ होतंच; तेव्हा काय करायचं ते तेच बघतील, असा सुज्ञ विचार करून इतरेजन निर्धास्त झाले. ''अहो, हाडाचा वकील आहे हा फडके. काही तरी गोलमाल करून बाबूरावाचा पैसा ढापलाही असेल यांनी!'' कुणी तरी कुणाच्या तरी कानात हळूच कुजबुजले.

फडक्यांनी खिशातून मोबाईल काढला आणि कुणाला तरी लावला. ''हलो... हां, लगेच या'' असं म्हणून त्यांनी फोन बंद केला आणि दुसरा लावला. ''हॅलो...  हो, फडके बोलतोय. हो, गेले.. आज सकाळीच.. हो-हो, या सगळी टीम घेऊन या.. हं-हं पत्ता..  तो मी तुम्हाला एसएमएस करतो-'' असं म्हणून त्यांनी पत्ता एसएमएस केला व आणखी तीन-चार फोन केले. तेवढ्यात डॉक्टर शहा आले आणि तपासणी करून त्यांनी बाबूरावांचा मृत्यू अधिकृतपणे जाहीर केला. हे होते न होते तोच टीव्ही चॅनलची एक टीम आणि काही पत्रकार तिथे उपस्थित झाले. या सर्वांच्या साक्षीने फडके वकिलांनी बाबूरावांच्या मृत्युपत्राचे वाचन केले :

‘‘मी  एका गरीब घराण्यात जन्माला आलो.  घरात दोन वेळेच्या अन्नाची भ्रांत होती. त्यातच एका रोगाच्या साथीत माझ्या डोक्यावरचे आई-वडिलांचे छत्रही नाहीसे झाले. मी अनाथाश्रमात वाढलो आणि शिकलो. जाणता- नेणता झालो. नोकरीला लागलो आणि तेव्हाच मी मनोमन आजन्म ब्रह्मचार्याचे व्रत स्वीकारले आणि समाजाचा संसार करायचे ठरवले- पण त्याबद्दल कोणालाही काही न सांगता, कसलाही गाजावाजा न करता माझे कार्य सुरू होते. माझ्या पगारातला फार मोठा हिस्सा दरमहा ज्या अनाथाश्रमात मी शिकलो, त्या अनाथाश्रमाला जात असे.

‘‘ठाणे जिल्ह्यातल्या एका आदिवासी शाळेतील मुले-मुली असे दहा विद्यार्थी मी दत्तक घेतले होते. त्यांचाही शिक्षणाचा आणि राहण्याचा वार्षिक खर्च मी आपल्या उत्पन्नातून करीत होतो. या सर्व गोष्टींबद्दल माझ्या हयातीत कोणाला काही कळू नये, म्हणून मी कसोशीने गुप्तता पाळली होती.

‘‘मला मिळालेला फंड ग्रॅच्युएटी आणि बँकेतली रोख शिल्लक असे पंचवीस लाख रुपये मी स्वखुशीने ज्या अनाथाश्रमाने मला पाळले, पोसले आणि शिकवले- त्या माझ्या मातोश्री अनाथाश्रमाला आणि ठाणे जिल्ह्यातील स्वामी समर्थ आदिवासी शाळेला पन्नास-पन्नास टक्के असे विभागून देण्याचे ठरविले आहे.

‘‘एका साथीच्या रोगाने बालपणीच माझ्या आई-वडिलांचे छत्र हिरावून घेतले, म्हणून खरं तर मला डॉक्टर व्हायचं होतं. पण ते शक्य झाले नाही. म्हणून मरणोत्तर माझे कलेवर डॉक्टरी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडावे म्हणून मी पुण्याच्या बीजे मेडिकल  कॉलेजला माझा देह दान करीत आहे.’’

‘‘कंजूष बाबूराव म्हणून हे पुणे शहर मला ओळखते, हे मला चांगलेच ठाऊक आहे. पण मी या शहराची क्षमा मागून सांगतो की- खरं तर मला अजून खूप काही द्यायचं होतं, तेवढं मी कमवू शकलो नाही आणि म्हणून जाता-जाता पण देताना मला कंजूषपणा करावा लागत आहे, याबद्दल मला अतीव दु:ख होत आहे. म्हणून माझ्या पश्चातही माझी ओळख ‘कंजूष बाबूराव’ अशीच राहावी, ही माझी इच्छा आहे.

‘‘माझ्या या मृत्युपत्राची अंमलबजावणी करण्याचे सर्व अधिकार मी सदाशिव फडके वकिलांना देत आहे.

सही  (हरिश्चंद्र ऊर्फ बाबूराव बर्वे)’’

मृत्युपत्राचे वाचन संपले. वातावरण नि:शब्द झाले होते. ऐकू येत होते फक्त हुंदके आणि उसासे. या शांततेचा भंग केला हॉस्पिटलच्या ‘कुई कुई’ करीत आलेल्या ॲम्बुलन्सने. ॲम्बुलन्स आली आणि दान केलेला बाबूरावांचा देह घेऊन गेली. आपल्या देहाला अग्नी देण्याची संधी देण्यात पण बाबूरावांनी कंजूषपणा केला होता. वर्तमानपत्रे आणि मीडियाने मात्र बाबूरावांच्या मृत्युपत्राच्या बातम्या छापून आणि त्यावर चर्चा घडवून आणून आपले उखळ पांढरे करून घेतले.

❒ ❒ ❒

६

# शौर्य

– १ –

"आणि या वर्षीच्या विशेष राष्ट्रपती पोलीस पदकासाठी निवड झाली आहे, मुंबई पोलीस दलातील इन्स्पेक्टर श्री. चंदू अर्थात चंद्रकांत दुखंडे यांची.'' अशी उद्‌घोषणा निवेदकाने केली मात्र– संपूर्ण राष्ट्रपती भवन टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले. खुद्द राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदक स्वीकारण्यासाठी शिस्तबद्ध धीम्या गतीने राष्ट्रपतींच्या दिशेने जात असताना इन्स्पेक्टर दुखंडे यांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. या संदर्भातल्या सगळ्या घटनांचा चित्रपट त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकू लागला...

– २ –

''चंदूऽऽ चार नंबर टेबल, एक किंगफिशर माइल्ड दे.'' शेट्टीने गल्ल्यावरून ऑर्डर सोडली. फ्रीझमधल्या बर्फाळ वाफांतून एक थंडगार बिअरची बाटली काढून, दुतर्फा टेबलांच्या रांगांतून अंग चोरून वाट काढीत चंदू चार नंबर टेबलकडे कसाबसा सरकण्याचा प्रयत्न करत होता. त्याचा पाय कशाला तरी अचानक अडला आणि तोल जाऊन चंदू हातातल्या बाटलीसह धप्पदिशी जमिनीवर अगदी तोंडावर आपटला. त्याच्या मस्तकात कळ जात असतानाच ''मादर....'' अशी त्याला आठवतही नसलेल्या त्याच्या आईचा उद्धार करणारी एक सणसणीत शिवी त्याच्या कानांत शिरली.

''अरेऽ अंधा हो गया क्या.. आँखे फूट गयी क्या तेरी?'' असं म्हणत गल्ल्यावरचा शेट्टी त्याच्याकडे झेपावला आणि अशी एक भडकावली की, त्याच्या डोळ्यांसमोर ताऱ्यांचा चकचकाट झाला. ''अब ये नुकसान क्या तुम्हारा बाप भरके देगा?'' आईबरोबरच त्याच्या मेलेल्या बापाचाही उद्धार शेट्टीने केला आणि पुन्हा एकदा त्याच्या कानाखाली भडकावून शेट्टीने तारे जमीपे आणले.

सोडून द्यावं सगळं आणि जावं पुन्हा कोकणात मामाकडे- असा एक विचार चंदूच्या मनात डोकावला. खरं तर तो अविचारच होता. कारण मामाच्या घरी तरी त्याच्या नशिबात दुसरं काय वाढून ठेवलं होतं? तिथं शेट्टीच्या जागी मामी होती, इतकंच. मामाने तर तलाठ्याला खाऊ-पिऊ घालून कोकणातल्या त्याच्या घरावर आणि दोन एकरांच्या तुकड्यावर कधीच हक्क शाबीत केला होता. म्हणजेच गावात काय आणि मुंबईत काय, तो बेघरच होता. गावकऱ्यांची खोटी सहानुभूती झेलत बसण्यापेक्षा बाळू सदावर्तेबरोबर पळून जाऊन त्याने गावाला कायमचा रामराम ठोकला होता. मुंबईला आल्यावर बाळूच्याच मदतीने, त्याच्याचबरोबर राहण्या-जेवणासकट तो वेटर म्हणून त्या बारमध्ये कामाला राहिला होता. याप्रमाणे त्याच्या पोटाचा आणि छपराचा प्रश्न सुटल्यामुळे त्याने गावच्या सगळ्या आठवणी मातीत गाडून टाकल्या होत्या. नाही म्हणायला, सड्यावरल्या सुताराची कमळी कधी तरी हळूच त्याच्या स्वप्नात यायची आणि चंदू झोपेतच खदखदा हसायचा, एखाद्या लहान बाळासारखा.

– ३ –

शेट्टीचा मार आणि शिव्या खात चंदूला बारमध्ये वर्ष झालं. आपल्या अंगच्या उपजत हुषारीने आणि कष्टाळू व प्रामाणिक गुणांनी बघता-बघता चंदू शेट्टीच्या गळ्यातला ताईत झाला. आधीच्या सर्वांना ओव्हरटेक करून तो हेडवेटर झाला होता. त्याची ग्रेड आता बाळू सदावर्तेच्या वरची झाली होती. दबलेला आणि बुजरा असलेला चंदू वर्षात खूपच धीट व आक्रमक झाला होता. आपल्या विनम्र आणि गोड स्वभावाने ग्राहकांवर त्याची अशी छाप पडली होती की, त्या बारला लोक 'चंदूचा बार' म्हणून ओळखू लागले. विशेष म्हणजे, बारमध्ये काम करीत असूनही चंदू दारूच्या एका थेंबालाही स्पर्श करीत नसे आणि ग्राहकांनी दिलेली टीप नम्रतापूर्वक साभार परत करीत

असे. त्याच्या बोलण्याने अन् वागण्याने तो मालकाचा आणि ग्राहकांचा आवडता बारबॉय झाला होता.

– ४ –

चंदूच्या आयुष्यात तो दिवस वेगळाच उगवला होता. 'चिर्रर्रर्रऽऽ' असा करकचून ब्रेक लावल्याचा आवाज झाला आणि एक टॅक्सी बारच्या दारातच असलेल्या, पानाच्या ठेल्याजवळ उभ्या असलेल्या चंदूजवळच येऊन थांबली. ठेल्यावर गिऱ्हाइकासाठी सिगारेट घ्यायला थांबलेला चंदू त्या आवाजाने दचकला. टॅक्सीतून बोकडदाढी असलेला एक माणूस बाहेर आला आणि त्याच्या पाठोपाठ पांढरा स्वच्छ पायघोळ कुर्ता आणि पठाणी लेहेंगा परिधान केलेला व पान खाऊन–खाऊन तोंड लालभडक झालेला दुसरा माणूस बाहेर आला.. धाग्याच्या विणलेल्या डोक्यावरच्या गोल टोपीवरून तो अल्पसंख्याक जमातीचा असल्याचे लगेच कळून येत होते.

''खुर्शीद, तू टॅक्सी थोडी आगे ले कर रुकना और इंजिन बंद मत करना, चालूही रखना'' टोपीवाल्याने टॅक्सीवाल्याला फर्मावले. ''जी उस्मानभाई...'' असं म्हणून टॅक्सीवाला पुढे सरकला. टॅक्सीवाला थोडा पुढे जाताच टोपीवाल्याने बोकडदाढीवाल्याला जवळ बोलावले आणि अगदी त्याच्या कानाशी लागून म्हणाला, ''अहमद, देख, बराबर इस बारके उपरका रूम. दरवाजेपे 'सारंग' नामका नेमप्लेट है. हुशारीसे काम लेना. मै आऊँगा तो तीन बार दरवाजा खटखटाउँगा. समझे ?'' त्याने सूचना केल्या. ''जी उस्मानभाई'' असं म्हणून तो अहमद नावाचा माणूस बारच्या बाजूलाच असलेला जिना चढू लागला आणि टोपीवाला सरळ बारमध्ये घुसून काउंटरजवळच्याच एका टेबलाशी, बाहेरची बाजू नीट दिसेल, अशा पोझिशनमध्ये बसला. चंदू हे सर्व पाहत होता आणि ऐकतही होता.

हे सगळं पाहून आणि ऐकून चंदूच्या मनात एक वेगळीच घंटी वाजली. 'इस बारके उपरका रूम.. दरवाजेपे सारंग नामकी नेमप्लेट .. तीन बार दरवाजा खटखटाउँगा..' ही सगळी वाक्ये चंदूच्या मनात पुनः पुन्हा थैमान घालू लागली.. बारच्या वर राहणारे सारंग म्हणजे चंदूचे पेटंट आणि पर्मनंट गिऱ्हाईक. पण ते तर कुणा नातेवाइकाच्या लग्नासाठी इंदूरला गेले होते आणि आठ दिवस तरी परत येणार नव्हते, हे चंदूला खुद्द सारंग यांनीच सांगितले

होते. मग हा बोकडदाढीवाला वर गेला तो... एक भयंकर विचार चंदूच्या मनाला विजेसारखा झटका देऊन गेला आणि चंदू चपळाईने बारमध्ये शिरला. पानाच्या ठेल्यावरून आणलेली चारमीनार सिगारेट घाईघाईने तीन नंबर टेबलवरच्या गिऱ्हाइकाला दिली आणि चपळाईने चिलरबॉक्समधली एक चिल्ड बिअरची बाटली काळ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत टाकून, वाऱ्याच्या वेगाने तो बारच्या बाजूच्या जिन्याकडे धावला आणि धाडधाड जिना चढून त्याने सारंगची रूम गाठली. दरवाजाकडे नजर टाकताच त्याच्या लक्षात आले की, कुलूप उघडलेले होते. चंदूने क्षणभर विचार केला आणि दरवाजा तीन वेळा वाजवला. काही क्षण शांततेत गेले आणि दरवाजा आतून उघडला गेला. दार किलकिले करून आतला माणूस चंदूवर खेकसला–

''क्या है?'' तो पुढे काही बोलायच्या आतच चंदूने बिअरची बाटली पुढे केली आणि झट्कन म्हणाला, ''नीचेसे साबने भेजी है'' आतल्या माणसाने ''ठीक है'' असं म्हणून बाटली ताब्यात घेतली आणि पट्कन पुन्हा दार लावून घेतले.

चंदू दरवाजाकडे क्षणभर बघत राहिला आणि आपली शंका खरी असल्याची त्याची खात्री पटली. त्याने दाराला बाहेरून कडी हळूच लावून घेतली आणि जल्दीने जिना उतरून तो बारमध्ये शिरला. त्याने शेट्टीच्या कानात हळूच काही तरी सांगितले आणि हे सांगत असताना डोळे बारीक करून तो काउंटर शेजारच्या टेबलावर बसलेल्या टोपीवाल्याकडे बघत होता. शेट्टी मूकपणे 'हां हां, ना ना' करीत मन हलवीत होता आणि दोघांचे काही तरी फायनल झाले. चंदूने काउंटरवरचा फोन पुढे ओढला आणि एक नंबर डायल केला. पलीकडे बराच वेळ फोन वाजत राहिला असावा.. बऱ्याच वेळाने फोन उचलला गेला आणि बाजूला बसलेल्या शेट्टीलाही ऐकू जाणार नाही इतक्या हळू आवाजात चंदू फोनवर बोलू लागला.

– ५ –

''ट्रिंग ट्रिंग ... ट्रिंग ट्रिंगऽऽ'' पोलीस स्टेशनच्या फोनची घंटी खणखणत होती. पण फोनकडे लक्ष द्यायला कुणालाच सवड नव्हती. ''अहो सावंत, उचला की तो फोन–'' एका कोपऱ्यातून वाघमारे ओरडला. ''जाऊ द्या हो, कुणाचं तरी कुत्रं हरवलं असेल, नाही तर बायको कुणाबरोबर तरी पळून गेली असेल. बस म्हणावं बोंबलत!'' असं म्हणून सावंतने वाघमारेला पाणी लावले.

इतक्यात इन्स्पेक्टर नाडगौडांनी पोलीस स्टेशनात रुबाबात प्रवेश केला. खणखणत्या फोनकडे कुणीच लक्ष देत नाही, हे पाहून त्यांनीच फोन उचलला आणि कानाला लावला. ''हॅलो, इन्स्पेक्टर नाडगौडा स्पिकिंग. कोण? चंदू .. हां-हां! बोल चंदू, बारमध्ये? बरं-बरं.. अच्छा.. काय सांगतोस? म्हणजे प्रकरण भलतेच सिरियस दिसतेय.. बरं बरं.. व्हेरी गुड जॉब.. हं हं.. हा आलोच मी-'' असं म्हणून नाडगौडांनी फोन ठेवला आणि ओरडले,

''हवालदार वाघमारे, आपलं स्क्वाड घेऊन ताबडतोब जीपमध्ये बसाऽ'' अशी ऑर्डर सोडून त्यांनी स्टेशनडायरीत नोंद केली आणि त्वरेने जीपमध्ये बसून ड्रायव्हरला खूण करताच जीप सुसाट निघाली.

– ६ –

जीप चांदनी बारच्या दारात थांबते न थांबते तोच नाडगौडा जम्प मारून बारच्या दिशेने झेपावले. त्यांच्याबरोबरच इतर स्टाफही दणादण उड्या मारून त्यांच्यामागे धावला. बारमध्ये, काउंटरजवळच बिअर पीत बसलेल्या त्या टोपीवाल्याच्या चाणाक्ष नजरेने ही सगळी हालचाल टिपली मात्र- विजेचा झटका बसल्याप्रमाणे तो उठून उभा राहिला आणि जीव खाऊन बाहेरच्या दिशेला धावला. दारात नाडगौडाशी बोलत उभ्या असलेल्या चंदूला धक्का मारूनच तो पुढे उभ्या असलेल्या टॅक्सीकडे धावला. ''तो बघाऽ तो बघाऽ पळालाऽऽ'' अशी चंदूने ओरड केली. नाडगौडा त्याच्यामागे धावलेसुद्धा. पण तेवढ्यात टॅक्सी बाजूच्या गल्लीत दिसेनाशी झाली. वेळ न घालवता चंदू नाडगौडांच्या कानाशी लागला आणि त्यांच्यासह बारच्या बाजूलाच असलेला जिना चढू लागला. नाडगौडांनी जाता-जाता केलेला इशारा समजून त्यांचा स्टाफही मागोमाग जिना चढू लागला.

'बॉबी सारंग' असा बोर्ड असलेल्या दारासमोर चंदू थांबला. त्याने नाडगौडांच्या कानात काही तरी सांगितले.

''ओके'' असं म्हणून नाडगौडा चंदूच्या इशाऱ्याप्रमाणे, बाहेरची हालचाल आत समजणार नाही, अशा पद्धतीने एका बाजूला दबा धरून बसले आणि स्टाफला दुसऱ्या बाजूला तसेच बसवले. चंदू दारासमोर उभा राहिला आणि दारावर तीन थापा मारल्या. काही क्षण शांततेत गेले. चंदूने पुन्हा तीन थापा दारावर मारताच ते आतून उघडले गेले. आतल्या माणसाने दार किलकिले करून

बाहेर बघितले आणि चंदू दिसताच खेकसला, ''अब क्या हैं?'' यावर ''वो खाली बोतल-'' चंदू नरमाईने म्हणाला. ''मै तुम्हारी बॉटल लेके भाग जानेवाला हूँ क्या? रुक देतां हूँ-'' असं म्हणून बाटली आणण्यासाठी तो आत वळला आणि नाडगौडा चित्त्याच्या चपळाईने स्टाफसह आत घुसले आणि दाढीवाल्याच्या काही लक्षात येण्यापूर्वीच झडप घालून त्याला बगलेत जेरबंद केले.

– ७ –

चंदूच्या चाणाक्षपणामुळे एक दरोडा पडता-पडता वाचला होता. त्यातला एक आरोपी फरार झाला होता, पण अनेक प्रकरणांत वॉन्टेड असणारा अहमद ऊर्फ बाबू आयताच पोलिसांच्या हाती लागला होता. या शौर्याबद्दल खुद्द पोलीस कमिशनर कानेटकर यांनी चंदूला कार्यालयात बोलावून त्याचा सत्कार केला होता. सत्काराच्या वेळी खुद्द कानेटकरसाहेबांनी त्याला विचारले होते, ''काय चंदू, पोलिसांत भरती होणार का?'' आणि चंदूने तत्काळ होकार भरला होता. याप्रमाणे दस्तुरखुद्द पोलीस कमिशनर यांच्या व्यक्तिशः शिफारशीने चंदूला पोलिसांत भरती करून घेण्यात आले होते.

चंदू जात्याच हुशार आणि कामसू होता. पोलिसात नोकरी करता-करता, त्याने आपले अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केले होते. डिपार्टमेंटच्या परीक्षा अव्वल दर्जाने पास करून त्याने कॉन्स्टेबल ते इन्स्पेक्टर हे टप्पे पार केले होते. एक सच्चा, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी असा त्याचा डिपार्टमेंटमध्ये आणि जनमानसात लौकिक होता. अनधिकृत आणि काळे धंदे करणाऱ्यांचा तर तो काळच होता. 'इन्स्पेक्टर चंदू' म्हटले की, गुंडांचे धाबे दणाणत. इन्स्पेक्टर चंदू! कसे कुणास ठाऊक, अगदी बिअरबारबॉय ते इन्स्पेक्टर 'चंदू' हे नाव त्याला कायमचे चिकटले. खरं तर चंद्रकांत दुखंडे या त्याच्या मूळ नावाचा तो शॉर्टफॉर्म होता. साधारणपणे चंदू, बंडू, नंदू ही नावे अगदीच साधी, शेळपट वाटतात. पण चंदूने मात्र आपल्या धाडसी कृत्यांनी आपल्या नावाला एक वजन प्राप्त करून दिले होते. अगदी साधा शिपाई असल्यापासून त्याने 'चंदू' या नावाचा दरारा, दबदबा निर्माण केला होता.

– ८ –

त्या वेळी त्याचे पोस्टिंग डोंगरी पोलीस स्टेशनला होते. आपल्या सेक्शनमध्ये रात्रभर पेट्रोलिंग ड्युटी करूनसुद्धा चंदू फ्रेश होता. वायरलेस

व्हॅनमध्ये बसलेला त्याचा इतर स्टाफ मात्र कधी एकदा ड्युटी संपते आणि घरी जाऊन पडतो, याची वाट बघत होता. वायरलेस गाडी डोंगरीच्या चारनळ भागात उभी होती. समोरच्याच हॉटेलमधून चंदूने सर्वांसाठी चहा मागवला होता. पोऱ्या चहा आणतोय की नाही, हे पाहण्यासाठी चंदूने नजर सहजच हॉटेलकडे वळवली आणि बाजूच्या गल्लीत त्याला काही तरी संशयास्पद हालचाल दिसली. त्याच्या अंतर्मनाने त्याला काही वेगळ्याच सूचना दिल्या. चंदू त्या गल्लीच्या दिशेने हळूहळू सरकू लागला आणि त्या गल्लीच्या अगदी नाक्यावर असलेल्या पानाच्या ठेल्यावर उभा राहून त्याने एक कलकत्ता एकसोबीस, पक्की सुपारी, लवंग-इलायची अशी पानाची ऑर्डर दिली. पानवाला भय्या, हॉटेलवाला इराणी, तसेच वायरलेसमधला त्याचा स्टाफ- सगळेच आश्चर्याने त्याच्याकडे पाहत होते. कारण चंदू जरी नेहमी तिथे येत असला, तरी त्याला पान खाताना किंवा घेताना कुणीच आणि कधीही बघितले नव्हते.

चंदूशी याबाबत काही तरी लघळ बोलण्यासाठी पानवाल्या भय्याने तोंड उचकटले, तोच चंदूने त्याच्यावर अशी काही जळजळीत नजर टाकली की- काही न बोलता तोंड मिटून तो मुकाट्याने पान लावू लागला. इतक्यात एक पांढरीशुभ्र मारुती गाडी तिथे आली. 'तो' गाडीतून उतरला. पांढरा स्वच्छ पायघोळ कुर्ता, पठाणी लेहेंगा, डोक्यावर विणलेली सफेद गोल टोपी आणि पान खाऊन तोंड लालभडक झालेला असा तो माणूस मारुतीमधून उतरला आणि थेट गल्लीतल्या एका घरात घुसला. चंदू जरी त्याला पाठमोरा उभा होता, तरी पानाच्या ठेल्याच्या आरशात त्याला तो माणूस स्पष्ट दिसला होता. त्याला पाहून चंदूच्या डोक्यात कुठे तरी घंटी वाजली. 'कोण बरं हा माणूस? कुठे पाहिला होता?' चंदू विचार करू लागला. डोक्यावरची कॅप काढून चंदूने डोके चक्क कराकरा खाजवले. पांढरा पायघोळ कुर्ता, पठाणी लेहेंगा, डोक्यावर विणलेली पांढरी टोपी, पान खाऊन तोंड लालभडक.. कोण.. कोण .. आणि अचानक विजेचा झटका बसावा तसं चंदूला आठवलं. यस! हाच.. हाच तो उस्मानभाई.. उस्मानभाईच हा.. बारा वर्षांपूर्वी चांदनी बिअरबारमधून पळालेला. राईट! तो नेमका कुठल्या घरात घुसला होता, हे चंदूला बरोबर दिसले होते. झटक्यात पानाचा ठेला सोडून तो त्या घराकडे निघाला. ''अरे साहेब, पान..ऽऽ'' पान असे पानवाला ओरडत होता, पण चंदूचे तिकडे लक्षच नव्हते.

घराचे दार बंद असल्याने आत काय चालले आहे, हे कळायला काही मार्गच नव्हता. चंदूने घराच्या चौफेर नजर फिरविली. घराच्या डाव्या बाजूला एक-दोन फुटांची मोकळी जागा होती आणि तिथे गटार होते. त्याच बाजूला तीन-चार फूट उंचीवर गजाची छोटी एक खिडकी होती. घाणीची पर्वा न करता, चंदू गटाराच्या चिंचोळ्या जागेतून आत घुसला आणि गटाराच्या अरुंद कठड्यावर कसाबसा उभा राहून खिडकीतून आत पाहू लागला. आत आत्ता आलेला उस्मानभाई आणि इतर चार जण होते. उस्मानभाई बोलत होता आणि इतर चौघे मन लावून ऐकत होते.

''देखो, इस बार बिलकुल गलती नहीं चाहिये. बम्बई और दिल्लीके धमाके एक साथ मतलब एक साथही होने चाहिये. झहीर, अब्बास- तुम दोनो दिल्ली सँभालोगे. इसाक तुम और मुन्ना बम्बई सँभालोगे. और काम होनेके बाद चार महिने हम एकदूसरेको ना मिलेंगे, ना फोन करेंगे. ठीक है?'' असे त्याने म्हणताच ''जी उस्मानभाई'' चौघे एक साथ म्हणाले आणि चंदूला आपली शंका खरी असल्याची खात्रीच झाली. 'दिल्ली-बम्बई धमाके एक साथ' हे शब्द त्याच्या डोक्यात थैमान घालायला लागले. 'काय बरे कट असेल यांचा?...' आणि चंदूच्या डोक्यात वीज अचानक कडाडली.. बाप रे..! म्हणजे दिल्ली आणि मुंबईत पुन्हा एकदा..? आणि पुढचे बोलणे तो नीट लक्ष देऊन ऐकू लागला. उस्मानभाई बोलत होता, ''झहीर और अब्बास, तुम दोनो अपनी अपनी घडी एकदूसरेसें ठीक मिलाओ. दिल्लीमे संसद भवन और बम्बईमे विधान भवन, दिल्ली और बम्बईके रेल स्टेशन एकही साथ उडने चाहिये. अगर जरा भी गलती हुई तो...'' माय गुडनेस! म्हणजे दिल्ली आणि मुंबईवर पुन्हा एकदा.. बाप रे! चंदूच्या मनात विचारांचे वादळ उठले. हा संहार थांबवलाच पाहिजे, त्वरित ॲक्शन घेतली पाहिजे; पण काय? आणि चंदूने झटपट निर्णय घेतला.

तो आवाज न करता उडी मारून कठड्यावरून उतरला. खिशातला मोबाईल काढून वायरलेसमधल्या आपल्या स्टाफला हळू आवाजात काही सूचना दिल्या आणि कमरपट्ट्यातले लोडेड रिव्हॉल्व्हर हातात घेऊन त्या घराच्या दारात उभा राहिला. तोपर्यंत चार रायफलधारी हवालदार त्याच्यामागे येऊन उभे राहिले होते. चंदूने सर्व जोर एकवटून घराच्या दरवाज्यावर धाड्दिशी एक लाथ मारली. कडाकडा करत दरवाजा मोडून पडला. या अचानक व

अनपेक्षित हल्ल्याने आतली मंडळी क्षणभर गांगरून गेली आणि नेमका याच त्यांच्या क्षणिक बेसावधपणाचा फायदा चंदूने घेतला. चंदूने उस्मानभाईकडे निमिषार्धात झेप घेतली आणि.. आणि शिवाजीमहाराजांनी अफझलखानाला जसा बगलेत जेरबंद केला होता, तसाच उस्मानभाईला बगलेत जेरबंद केला. त्याच्या कपाळावर रिल्व्हॉल्वरची नळी टेकवून, हात खिशाकडे नेणाऱ्या चौघांना म्हणाला, ''हॅन्ड्स अप! कोई भी अगर हथियार बाहर निकालने की जरा भी कोशिश करेगा, तो यह मेरा पूरा का पूरा लोडेड रिव्हॉल्वर मै उस्मानभाईके भेजेमे खाली कर दूँगा!'' चंदूच्या या धमकीचा परिणाम म्हणून त्या चौघांनीही आपले हात वर केले होते आणि त्या चार हवालदारांनी आपल्या रायफलीच्या नळ्या त्या चौघांच्या कंठावर टेकवल्या होत्या.

अशा रीतीने दिल्ली आणि मुंबई उद्ध्वस्त करण्याचा पाकिस्तानी अतिरेक्यांचा तो कट चंदूने मुळातच उखडून टाकला होता. आणि एक नाही, दोन नाही– तर तब्बल बारा खतरनाक अतिरेकी अगदी जिवंतपणे मुंबई पोलिसांच्या ताब्यात आले होते. चंदूने स्वत:च्या जीवावर उदार होऊन केलेल्या या कारवाईमुळे लाखो दिल्ली–मुंबईकरांचे प्राण वाचले होते आणि देशाचे करोडोंचे नुकसान टळले होते.

याच शौर्यशाली कामासाठी चंदूला आज राष्ट्रपती पदक मिळणार होते. राष्ट्रपती पदक स्वीकारण्यासाठी शिस्तबद्ध धीम्या गतीने, टाळ्यांच्या कडकडाटात, राष्ट्रपतींच्या दिशेने जात असताना हा चित्रपट चंदूच्या डोळ्यांसमोर क्षणात सरकून गेला.

– ९ –

राष्ट्रपतींच्या जवळ जाताच चंदूने राष्ट्रपतींना एक कडक सॅल्यूट ठोकला. तेवढ्यातच पुढे आलेल्या तबकातून लाल रंगाच्या रिबिनीत गुंफलेले चकाकते सोनेरी पदक आपल्या हातात घेऊन, राष्ट्रपतींनी सन्मानाने व अभिमानाने ते चंदूच्या गळ्यात घातले आणि पुन्हा एकदा राष्ट्रपती भवन टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले.. कॅमेऱ्यांचे फ्लॅश उडाले. टीव्ही चॅनलवाल्यांचे मूव्ही कॅमेरे फिरले. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रे, टीव्ही चॅनल्स, रेडिओ सगळीकडे एकच नाव गाजत होते... इन्स्पेक्टर चंदू.. इन्स्पेक्टर चंदू आणि इन्स्पेक्टर चंदू.

चंदू सगळ्या देशाच्या गळ्यातला ताईत बनला. सत्काराची हजारो निमंत्रणे आणि लाखो राख्यांचा चंदूवर वर्षाव झाला. याच हजारो निमंत्रणांत एक निमंत्रण होते त्याच्या कोकणातल्या गावाचे. ते निमंत्रण बघून चंदूचे डोळे चमकले. ते निमंत्रण तो टाळू शकतच नव्हता. सर्व गावातर्फे आयजी म्हणजे इन्स्पेक्टर जनरल नाडगौडा यांच्या हस्ते त्याचा सत्कार होणार होता. इन्स्पेक्टर नाडगौडांना चंदू विसरणे शक्यच नव्हते आणि आता तर ते इन्स्पेक्टर जनरल हे उच्च पद भूषवीत होते. म्हणजेच त्याचे महावरिष्ठ होते आणि त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते चंदूचे गॉडफादर, रिटायर्ड पोलीस कमिशनर श्री. कानेटकरसाहेब.

वेशीतून वाजत-गाजत, मोठ्या मिरवणुकीने चंदूला व्यासपीठाकडे आणले गेले. चंदू डोळे भरून आपला गाव पाहून घेत होता. वेशीतले मारुतीचे देऊळ, शाळा, चावडी, पोस्ट ऑफिस, एसटी स्टॅन्ड... सगळे अगदी जसे होते तस्सेच होते. व्यासपीठावर पोहोचल्याबरोबर चंदूने नाडगौडा व कानेटकर यांना कडक पोलिसी सॅल्यूट ठोकला आणि नंतर खाली वाकून चक्क त्यांच्या पायांवर अश्रूंचा अभिषेक केला. त्या दोघांचेही डोळे भरून आले होते. दोघांनीही त्याला उचलून आपल्या छातीशी कवटाळले.

इतक्यात चंदूला गावच्या पोलीसपाटलाबरोबर येत असलेले आपले मामा-मामी दिसले. चंदूने त्यांनाही आदराने मंचावर घेऊन नमस्कार केला. नंतर व्यासपीठावर भाषणे होत होती. सारखा टाळ्यांचा कडकडाट होत होता. बाळू सदावर्ते त्याला पुष्पहार घालण्यासाठी व्यासपीठावर आला, तेव्हा चंदूने त्याला कडकडून मिठी मारली. एकीकडे हे सर्व सुरू असताना दुसरीकडे मात्र चंदूची नजर गर्दीवरून सारखी भिरभिरत होती. आणि शेवटी त्याला गर्दीत एका बाजूला उभी असलेली, सड्यावरच्या सुताराची कमळी दिसली. चंदूने नीट निरखून बघितले. तिच्या गळ्यात मंगळसूत्र नव्हते आणि ती त्याच्याचकडे बघून हसत होती- अगदी पूर्वीसारखी.

❒ ❒ ❒

७

# अस्वस्थ

घटनाच अशी घडली की, मी अस्वस्थ झालो. मला काही सुचेना. माणूस इतका खालच्या स्तराला जाऊ शकतो? एक मुलगा आपल्या जन्मदात्याला–आपल्या सख्ख्या वडिलांना–असा वागवू शकतो? विश्वास नाही बसत. ते बघितल्यापासून माझं मन सैरभैर झालंय. मी कमालीचा अस्वस्थ झालोय. मारे 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही आमची संस्कृती असल्याचा डांगोरा आम्ही पिटतो आणि त्या संस्कृतीत ही असली विकृती जन्माला येते? चुकतंय– काही तरी, कुठे तरी, कुणाचे तरी चुकतंय.

धर्माप्पा तसा साधा–सरळ, नावाप्रमाणे धर्माने वागणारा माणूस. तब्बल पन्नास वर्षे तो माझ्याच कंपनीत कामाला होता. शिकलेला फारसा नसला तरी शहाणपणात डबल ग्रॅज्युएटच नाही, तर पीएचडी होता. अनेक अडचणींच्या वेळी मी त्याचा सल्ला घेत असे. त्याच्या सल्ल्याने अनेकदा नुकसान टळले आहे. पण बदल्यात धर्माने कधी कवडीचीही अपेक्षा केली नाही. धर्मा कंपनीत सर्वांशीच मिळून–मिसळून वागायचा. कुठल्याही व कुणाच्याही कामाला त्यानं कधीही 'नाही' म्हटलं नाही. साहेबांचा तो खास माणूस होता, पण म्हणून त्याने कंपनीत कधीही रुबाब झाडला नाही. तीन–चार वर्षांपूर्वी तो रिटायर्ड झाला. कंपनी खासगी असल्याने पेन्शन नव्हती, पण फंड आणि ग्रॅच्युइटी मिळून बऱ्यापैकी रक्कम धर्माला मिळाली होती.

धर्मा कंपनीतून पायउतार झाला, पण माझ्या मनात मात्र तो सतत राहिला. धर्माने आयुष्यभर अपार कष्ट केले. आता चार पैसे हाताशी आले होते. सुदैवाने आता त्याच्यावर तशी काही जबाबदारी नव्हती. मुलगी चांगल्या घरी नांदतेय आणि मुलगा पण सद्गुणी आहे, असं तो मुलांचे कौतुक नेहमीच करीत असे. हल्ली नशिबानेच असा मुलगा मिळतो, तू नशीबवान बाप आहेस– असे मी त्याला नेहमी म्हणत असे. धर्मा कंपनीत सगळ्यांनाच हवाहवासा असल्याने त्याचा निरोप समारंभ दणक्यात झाला. फंडाच्या चेकबरोबरच शाल, श्रीफळ आणि मनगटी घड्याळ देऊन खुद्द भाटकरसाहेबांनी त्याचा सत्कार केला. धर्माने इमाने–इतबारे नोकरी तर केलीच; पण स्वत: अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलांना मात्र उत्तम शिक्षण दिले, याबद्दल साहेबांनी त्याचे फारच कौतुक केले.

धर्मा कंपनीच्या गेटमधून बाहेर पडला. बाहेर पडण्याआधी गेटमधली कंपनीची धूळ मस्तकी लावायला तो विसरला नाही. तो स्वत:ला खरोखर धन्य समजत होता. भाड्याची का होईना, पण एका चाळीत त्याची दोन खोल्यांची छोटीशी जागा होती. मुलगी सरस्वती तिच्या संसारात सुखाने नांदत होती. मुलगा हिरेन कॉम्पुटर इंजिनिअर झाला होता. एव्हरीथिंग वॉज परफेक्ट. प्रथम धर्माने एका मिठाईच्या दुकानात जाऊन चांगली घसघशीत एक किलो काजुकतली घेतली आणि घरी आला. घरात हिरेन, सरस्वती आणि जावई विद्याधर त्याचीच वाट बघत होते. ‘‘बायो कुठंय?’’ त्यांने आत येताच विचारले. बायो म्हणजे त्याची बायको.. तिला तो आणि इतर सर्व बायोच म्हणायचे, त्यामुळे तिचे खरे नाव बहुधा ती पण विसरली असावी.

‘‘काय, कसा काय झाला तुमचा शेंडाप का काय म्हनत्यात तो?’’ विचारत बायो बाहेरच्या खोलीत आली.

‘‘मस्त! भाटकरसाहेब आपल्या पोरास्नी लईच नावाजत होते बघ!’’ धर्मा पोरांकडे बघत कौतुकाने म्हणाला. ‘‘आणि टुकीने संसार करून पोरास्नी चांगलं शिकिवल्याबद्दल तुझं बी लै कौतिक केलं बघ सायबानं आणि

त्यासाठी तुला भलं मोठं बक्षीस बी दिलंय सायबानं-'' असं म्हणून धर्माने मिठाईचा पुडा व फंडाचा चेक बायोच्या हातावर ठेवला आणि शाल तिच्या खांद्यावर घालून, बॉक्स उघडून आतले नवकोरे मनगटी घड्याळ कौतुकाने तिच्या मनगटावर बांधले.

''या बया! हे काय भलतंच! आता ह्यात माझा काय पराक्रम?'' असं म्हणून बायोने पदराचा शेव हळूच तोंडाला लावला.

''अगं, असंच असतंय बायो. तू माझा संसार टुकीनं केलास. आपण अडानी असलो तरी पोरांना शिकिवलंस, हा तुझाच पराक्रम हाय न्हवं? म्हणून ह्या सत्कारावर आणि बक्षिसावर तुझाच अधिकार हाय. काय रे पोरांनो?''

''व्हय बा. बरूबर हाय तुझं.'' सरस्वतीने धर्माला दुजोरा दिला.

''हे बघा पोरांनो, येक येळ आईला इसरलात तरी चालंल, पर बाला इसरू नका. लई हाल सोसलेत त्यानं संसारासाठी. कित्तेक येळा अर्धपोटी ऱ्हावून, ओव्हर टाइम करून, तुमच्या वह्या-पुस्तकासाठी पैसा पुरवलाय त्यांनी.''

''ये बायो, माझं कौतिक ऱ्हावुदे. आधी ती मिठाई आनि चेक देवाम्होरं ठेव आनि आज काही तरी गोडधोडाचं जेवान करा.'' असं म्हणून धर्माने बायोला आत पिटाळली.

आज जेवण झाल्यावर धर्माची फॅमिली बहुतेक पहिल्यांदाच एकत्र गप्पा मारायला बसली होती. वातावरणात जरा खुशी होती. ''बोला बयोबाई, तुम्हाला काय पाहिजे?'' धर्माने खुशीत येऊन बयोला विचारले.

''मला काय बी नगं. आजपत्तुर रग्गड दिलंय तुमी मला!'' बयो उत्तरली.

''पुढचा मान जावयाचा. बोला जावईबापू, तुमची काय मागणी हाय?''

''मामा, आईप्रमाणे टुकीने आणि सुखाने संसार करणारी तुमची मुलगी तुम्ही मला दिलीत, यापेक्षा मला काय हवे? पण मला काय वाटतं, ते एक बोलू का मामा?'' विद्याधरच्या या प्रश्नाने सगळ्यांनाच थोडे टेन्शन आले. 'आता हा जावई काय मागणार बुवा?' हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात उमटला.

''अवो, बोला की बिनधास्त जावईबापू. आज तुमचा हा सासरा लखोपती हाय!'' धर्मा हसत म्हणाला.

''खरं म्हणजे, लहान तोंडी मोठा घास घेतोय मी मामा. पण मला असं वाटतंय की, जे काही तुम्हाला मिळालंय, ती तुमच्या म्हातारपणाची पुंजी आहे. ती अशी न वाटता तुम्ही तुमच्याचसाठी ठेवावी.'' जावयाचे हे शब्द ऐकले मात्र– बयोला आणि धर्माला भरून आले. सरस्वतीनेही अभिमानाने आपल्या नवऱ्याकडे बघितले.

''मी काय म्हणतो बा...'' हिरेनने विद्याधरकडे चोरटी नजर टाकत, चाचरत प्रस्तावना केली.

''नाही, हिरेनला काय म्हणायचंय ते म्हणू दे, पण आधी मी असं म्हणतो मामा की, उद्या सकाळी मला लवकर कामाला जायचंय. तेव्हा आता आम्हाला रजा मिळावी.'' विद्याधर उठत म्हणाला. सरस्वतीही उठली.

''बरं-बरं! या. सांभाळून जा.'' म्हणत निरोप देण्यासाठी धर्मा उठला. ''मामा, पुन्हा एकदा तुमचे अभिनंदन!'' म्हणून सरस्वती व विद्याने बयो आणि धर्माला नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले आणि ते गेले.

''हं, बोला हिरेनराव, तुम्ही काय म्हणत होता?'' ते दोघे गेल्यावर खाली बसत धर्माने विचारले.

''म्हणजे हे काही मी माझ्यासाठी नाही म्हणत बा...'' पण हिरेनने पुन्हा चाचरतच सुरुवात केली.

''अरे बोल की मर्दा, घडाघडा. का उगी नमनाला घडाभर तेल वाया घालवतोयास?'' धर्माने गोडीत दम भरला.

''हे बघ बा ... माझ्याकडे एक स्कीम आहे आणि आपल्याकडे आता पैसा पण आहे-'' अशी सुरुवात करून हिरेन दोन तास आपली स्कीम धर्माला सांगत होता.

त्यानंतर धर्माची आणि माझी नित्यनेमाने भेट होत असे. रिटायरमेंटचा काळ मजेत चालला होता. एकदा धर्माने त्याच्या मुलाने घेतलेल्या नव्या

फ्लॅटच्या वास्तुशांत समारंभासाठी मला बोलावले. फ्लॅट फारच प्रशस्त व हवेशीर होता आणि जुन्या चाळीच्या जवळच्याच सोसायटीत होता. ''हे एक बरे झाले धर्मा, तुझी एकाची दोन घरे जवळ-जवळच झाली. म्हणजे कसं, इकडे कंटाळा आला की, तिकडे आणि तिकडे कंटाळा आला की इकडे!'' मी सहज म्हणालो. ''छे-छे! अरे, चाळीतल्या खोल्या काढून टाकल्या. अरे, फंडाचे सगळे पैसे या फ्लॅटनेच खाल्ले. मुलाचे लग्न करायचे होते, त्यासाठी फुकून टाकली चाळीतली खोली.''

''म्हणजे, तुझ्यासाठी काहीच ठेवले नाहीस धर्मा?'' मी आश्चर्याने विचारले.

''असं कसं? मुलगा, सून आपलीच आहे की! लै जीव लावलाय बघ दोघांनी.'' धर्मा कौतुकाने म्हणाला

''छान! नशीबवान आहेस लेका-'' असं म्हणून मी त्याचा निरोप घेतला.

एकदा असाच मंडईतून भाजी नेताना भेटला. ''काय धर्मा, कसं काय चाललंय नव्या फ्लॅटमध्ये? करमतं ना? नाही म्हणजे तुला चाळीत राहायची सवय आहे ना, म्हणून विचारले.'' मी म्हणालो.

''बेस्ट! अरे, चाळीची आठवण काढायला वेळच कुठाय? सकाळ घराची झाडझूड-साफसफाई करण्यात जाती. मग हे मंडईतून भाजीपाला नेण्याचं काम. दुपारी धुतलेल्या कापडांना इस्त्री करायची. येळ कधी आणि कुठं जातोय, कळत पण नाही!'' धर्माने आपल्या कामाचे वेळापत्रक वाचले.

''अरे वा! छानच! पण मग बायोवहिनीला करमत नसेल?'' मी म्हणालो.

''ते का? आमच्या सूनबाईला लै काळजी बघ तिची. ती तर बायोला मिनिटभर बसू देत न्हाई. म्हणती, बसून राहून आजारपण येतंय, हालचाल करीत राहा. कामं करा. दिवसातून तीन-तीन वेळा भांडी घासून घेती. शिवाय कापडं धुवायला नवी आटोमॅटिक मशीन आणून दिलीय. पिळायचा तरास

नको म्हणून.'' हे सांगताना धर्माच्या चेहऱ्यावरचं सूनबाईंबद्दलचं कौतुक ओसंडून चाललं होतं.

''वा! सुखात आहात ना दोघे? आनंद वाटला ऐकून.'' असं म्हणून मी धर्माचा निरोप घेतला.

खर्ररकन ब्रेक दाबत एक गाडी माझ्या अगदी जवळ येऊन थांबली. माझ्या तर काळजाचा ठोकाच चुकला. ''एऽ दिखता नही क्या?'' असं म्हणत मी गाडीत पाहिलं, तर ड्रायव्हर सीटवर धर्मा. ''धर्मा, तू?'' असा मी म्हणतोय इतक्यात–

''आधी तू गाडीत बस, मग सांगतो.'' असं म्हणून धर्माने फ्रंटचा दरवाजा उघडला आणि मला आत घेतले. चहा घ्यायला आम्ही एका हॉटेलात घुसलो.

''काय धर्मा, आज एकदम गाडी?'' चहाचा कप तोंडाला लावत मी विचारले.''

''अरे, आमचा हिरेन... परवा मला म्हणाला– बा, आपल्याकडं दोन–दोन गाड्या आहेत. तू मंडई करायला चालत का जातोस? त्यापेक्षा तू ड्रायव्हिंग शिकून घे, म्हणजे तुला गाडीने मार्केटिंग करता येईल. आणि पठ्ठ्याने घातले मला ड्रायव्हिंगच्या शाळेत. आता मी मस्त ड्रायव्हिंग करतो. पुढच्या रविवारी येतो मी गाडी घेऊन तुझ्याकडे. आपण मस्तपैकी फिरायला जाऊ कुठे तरी. मजा करू.'' आता मात्र धर्माकडे बघताना मला त्याचा हेवा वाटला.

पुढे अनेक रविवार आले आणि गेले. पण 'ती' मजा करायला धर्मा काही कधी गाडी घेऊन आला नाही. प्रत्येक वेळी– आज मुलाची महाबळेश्वरला कॉन्फरन्स आहे, त्याच्याबरोबर जायचे आहे... आज मुलाची मुंबईला मीटिंग आहे, त्याच्याबरोबर जायचे आहे– अशी कारणे तो सांगत असे. एकदा मी त्याला म्हणालो, ''अरे, रविवारच कशाला? आपण रिटायर्ड आहोत. आपल्यासाठी प्रत्येक वार हा रविवारच. आपण इतर वारी जाऊ.'' यावर तो म्हणाला ''नाही रे, इतर वारी आमच्या सूनबाईचा क्लब, नातवाची ट्युशन

ह्या गोष्टी सांभाळाव्या लागतात. माझ्याशिवाय ते कुठे जातच नाहीत. पण एक दिवस मी आपल्यासाठी नक्की वेळ काढीन.''

आणि त्या दिवशी अचानक तो प्रसंग घडला. भाटकरसाहेबांची गोल्डन ज्युबिली मॅरेज ॲनिव्हर्सरी होती. त्यानिमित्त एका फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये पार्टी ठेवली होती. पार्टीला त्यांनी इतर पाहुण्यांबरोबर कंपनीच्या तमाम लहान-मोठ्या, आजी-माजी कर्मचाऱ्यांना आग्रहपूर्वक निमंत्रणे दिली होती. धर्माला मी विचारले होते. पण काही तरी कारण सांगून, त्याला यायला जमणार नाही, असे त्याने सांगितले होते. समारंभ फारच छान झाला. धर्माची आठवण आवर्जून निघाली. खुद्द भाटकरसाहेब. अरे, 'आज धर्मा पाहिजे होता' असे तीन-चार वेळा तरी म्हणाले. हवे त्यांना उंची ड्रिंक्स, सुग्रास जेवण, वर आइस्क्रीम असा मस्त बेत होता. खास व्हीआयपी पाहुण्यांचा कक्ष वेगळा होता. तिथे देखरेख करण्याची जबाबदारी साहेबांनी माझ्यावर सोपवली होती. त्या खास कक्षामध्ये मी अचानक आमच्या धर्माच्या हिरेनला बघितले. तशी आमची प्रत्यक्ष भेट कधीच झाली नव्हती, त्यामुळे त्याने मला ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. पण मी एक-दोन वेळा त्याला ओझरता पहिला असल्याने 'हा हिरेन' इतकेच मला माहिती होते. त्यामुळे आणि तो व्हीआयपी कक्ष असल्याने मीसुद्धा जास्त जवळीक साधण्याचा प्रयत्न केला नाही. मोठ्या लोकांच्या मोठ्या गप्पा चालल्या होत्या. भाटकरसाहेबांवर हिरेनचे फारच चांगले इम्प्रेशन असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून दिसून येत होते. गोष्टी मोबाईलच्या मॉडेलवरून चालल्या होत्या. ''यू जस्ट सी माय पीस'' असं म्हणून हिरेनने आपल्या कोटाच्या खिशात हात घातला आणि पटकन तो बाहेर काढून म्हणाला, ''ओह शीट्, माझा मोबाईल गाडीतच ड्रायव्हरकडे राहिला वाटतं. आय विल जस्ट कॉल इट अप.'' त्याने चंदानीला ''मिस्टर चंदानी, विल यू प्लीज अलाव मी टू युज युवर सेल वन्स?'' अशी फॉर्मल रिक्वेस्ट केली आणि ''शुअर, व्हाय नॉट'' असं म्हणून चंदानीने आपला फोन त्याला दिला आणि हिरेनने ड्रायव्हरला फोन केला, ''हॅलो ड्राइव्हर, हे बघ माझा मोबाईल.. अरे, मग

तू बघितला होतास तर आणून द्यायचा ना मला. युसलेस! घेऊन ये वर ताबडतोब.. असं कुठे म्हणून काय विचारतोस गाढवा, व्हीआयपी रूममधे .. आणि हे बघ– मागच्या सीटवर माझं मालबोरीचं सिगार पाकीट आहे, ते पण घेऊन ये आणि सोबत लायटर पण आण–'' कानाचा फोन काढता–काढता चंदानीकडे बघत तो म्हणाला, ''लायटर सांगितलं नसता तर नुसतंच सिगार पाकीट घेऊन आला असता थेरडा. आय टेल यू मिस्टर चंदानी, या म्हाताऱ्या लोकांना सिंपथी म्हणून कामाला ठेवतो आपण, बट दे आर सिम्पली डस्टबिन्स. शुड बी थ्रोन औट–'' चंदानीने 'या, यस यस' असं म्हणून त्याची री ओढली आणि पुन्हा म्हातारी माणसे घरात कशी त्रासदायक यावर परिचर्चा सुरू झाली.

थोड्याच वेळात हिरेनचा ड्रायव्हर सिगारचे पाकीट आणि मोबाईल घेऊन तिथे आला. भाटकरसाहेब आणि मी त्याच्याकडे पाहतच राहिलो, कारण तो धर्मा होता!

❒ ❒ ❒

८

# फायनल नोटीस

बाबूराव बडबडे कधी आणि कसे आमच्या ज्येष्ठ नागरिक संघात आले, हे आता आठवत नाही. आयुष्यभर कोर्टात वकिली केल्यामुळे असेल कदाचित, पण नावाप्रमाणे भयंकर बडबडा आणि चौकस माणूस. मला वाटते, त्यांचा हा बडबडेपणा खानदानी असावा आणि म्हणूनच त्यांचे आडनाव 'बडबडे' असे पडले असावे; नव्हे, पाडले असावे. ज्ये.ना. संघाचा फॉर्म भरताना त्याने स्वत:चे खरे आडनाव लिहिले होते. पण ते कोणते, हे आता आम्हीही विसरलो आहोत आणि स्वत: तोही विसरला आहे, बहुतेक ते 'आठवले' असे असावे. संघात आला की, हा माणूस सतत कुणाची ना कुणाची चौकशी करून आपली बडबड सुरू ठेवायचा. शांत कधी बसायचाच नाही.

एकदा बाबूराव रात्रीच्या गाडीने कोल्हापूरहून पुण्याला यायला निघाले होते. गाडी लागायला वेळ होता. वेळ रात्रीची होती, त्यामुळे बाबूरावला बोलायला प्लॅटफॉर्मवर कुणीच गिऱ्हाईक सापडेना आणि त्यात कोल्हापूरहून पुण्याला जाणारी गाडी अर्धा तास लेट लागणार असल्याची अनाउन्समेंट स्टेशन सुंदरीने केली आणि बाबूराव जामच वैतागले. बराच वेळ कोणी बोलायला मिळाले नसल्याने ते बेचैन झाले होते. त्यांचे ओठ बोलण्यासाठी फुरफुरत होते.

पण प्लॅटफॉर्मवर शुकशुकाट. कोणाशी बोलावे, कोणाशी बोलावे– असा विचार करता–करता बाबूरावांना तो दिसला.

आणि ते एका रेल्वे विंडोकडे धावले. विंडोच्या आत शांतपणे बसलेल्या माणसाला त्यांनी विचारले, ''काय, हल्ली कसे काय चाललेय तुमचे? मुलेबाळे, घरची मंडळी, खुशाल आहेत ना सगळे?'' विंडोतला माणूस क्षणभर चपापला आणि म्हणाला, ''माफ करा साहेब, पण मी ओळखलं नाही आपल्याला?'' बाबूराव म्हणाले, ''अहो, कसे ओळखणार तुम्ही मला? आज पहिल्यांदाच आपण एकमेकांना पाहत आहोत.'' यावर विंडो मॅन आश्चर्याने म्हणाला, ''अहो, मग आपली काही ओळखपाळख नसताना तुम्ही माझ्या बायको-मुलांची चौकशी का करीत आहात?''

''अहो, म्हणजे काय? बस का राव! 'येथे चौकशी करावी' असे तुम्हीच तर लिहून ठेवले आहे!'' एका बोर्डाकडे बोट दाखवत बाबूराव म्हणाले. हे ऐकून विंडोमॅनने आपल्याच कपाळाला हात लावला. इतक्यात पुण्याला जाणारी गाडी प्लॅटफॉर्म नंबर एकवर लागल्याची आकाशवाणी झाली आणि बाबूराव तिकडे धावले.

सिनिअर सिटिझन कन्सेशन असल्याने बाबूरावांनी एसी टू टायरचे तिकीट काढले होते. रुबाबात ते आपल्या रिझर्व्ह सीटवर जाऊन बसले. पण कंपार्टमेंटमध्ये ते एकटेच. त्यांना गाडीत कधीच झोप लागत नसे. त्यामुळे एकट्याने कुणाशी न बोलता रात्र कशी काढायची, या विचाराने बाबूराव हैराण झाले. आपली रिझर्व्ह जागा सोडून दुसरीकडे जावे की काय, अशा विचारात ते असतानाच एक माणूस आला आणि बाबूरावांच्या समोरच्या सीटवरच स्थानापन्न झाला. ''या साहेब ग्लॅड टू मीट यू!-'' बाबूराव उत्साहाने म्हणाले. कोणी तरी बोलायला गिऱ्हाईक मिळाले याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. पण त्या माणसाच्या चेहऱ्यावरची सुरकुतीसुद्धा हलली नाही. हुं की चूं न करता तो खिडकीबाहेर बघू लागला. बाबूराव मनात थोडे खट्टू झाले, पण त्यांनी चिकाटी सोडली नाही.

''कुठपर्यंत जाणार?'' बाबूरावांनी पुन्हा विचारले. तरी पण माणूस गप्पच. ''आपण राहणारे इथलेच की पुण्याचे?'' बाबूरावांनी त्याला बोलता करण्यासाठी आणखी एक प्रश्न पुढे सरकवला.. माणसाच्या चेहऱ्यावर नकळत

हळूहळू चीड दिसू लागली. जळता कटाक्ष बाबूरावांकडे टाकला आणि पुन्हा तो खिडकीतून बाहेर पाहू लागला. पण त्याला बोलता करायला बाबूराव जणू हट्टालाच पेटला होता. ''बरं, ते सगळं जाऊ द्या. कमीत कमी तुमचं नाव तर सांगाल?'' आता मात्र गृहस्थ आतून चांगलाच धुसफुसू लागला. पण वरवर तसे न दाखवता चेहरा कृत्रिमपणे शांत ठेवून तो म्हणाला, ''कृपया तुम्ही मला माझे नाव तेवढे विचारू नका.'' चला, गृहस्थाने बोलायला तोंड तर उघडले, असा विचार करीत बाबूरावांनी बोलणे वाढवण्यासाठी विचारले ''का? नाव का नाही विचारायचं?'' गृहस्थ चरफडला, ''कारण तुम्हाला ते सहन करता येणार नाही, तुम्ही घाबरून जाल'' गृहस्थ जरा घुश्शातच म्हणाला. ''ह्या! त्यात काय आहे सहन न होण्यासारखं? आणि घाबरून जाण्यासारखं?'' बाबूरावांनी मुद्दा उडवून लावला. ''हे बघा, मी पुन्हा तुम्हाला सांगतो- माझं नाव विचारायच्या भानगडीत पडू नका. ऐकाल तर कदाचित तुम्हाला हार्ट अ‍ॅटॅकसुद्धा येऊ शकतो.'' गृहस्थ निर्वाणीने बोलले. ''छे-छे, माझं हृदय काही इतकं लेचंपेचं नाही. सांगा तुम्ही नाव-'' बाबूराव हुशारीने म्हणाले.

''ठीक आहे. ऐका तर- माझं नाव आहे यमराज!'' गृहस्थ म्हणाले. ऐकलं आणि घाबरायच्या ऐवजी बाबूराव खो-खो हसायला लागले.. ''काय सांगता राव! यमराज हे कधी नाव असतं का कुणाचं?'' ते गृहस्थाच्या खांद्यावर चापट मारीत म्हणाले. आता त्यांची भीड थोडी चेपत चालली होती. बाबूरावांनी खांद्यावर चापट मारून दाखविलेल्या फाजील सलगीमुळे यमराज जरा चिडलेच होते. तरीसुद्धा मनावर कंट्रोल ठेवीत ते संयमित स्वरात म्हणाले, ''अहो, चेष्टा नाही करीत, मी खरोखरच यमराज आहे.''

''काय राव थापा मारताय!'' बाबूराव छद्मीपणे म्हणाले आणि ''आम्ही चित्रात बघितलेला यम तर लठ्ठ आणि काळकभिन्न, जाड-जाड मिशावाला आहे; पण तुम्ही तर तसे दिसत नाही. शिवाय मला सांगा- तुमचा रेडा असताना तुम्ही गाडीत कसे काय आलात?'' बाबूरावांनी प्रश्न केला. एका क्षुल्लक सामान्य मर्त्य माणसाने आपल्या अस्तित्वाबद्दल शंका घ्यावी, हे खरे

तर यमराजाला मुळीच आवडले नव्हते. तरीपण मनावर संयम ठेवीत ते म्हणाले ''तो समोर शेवटच्या कोपऱ्यातला निळ्या शर्टातला, त्या पिवळ्या साडीतल्या मुलीची छेड काढीत असलेला तरुण दिसतोय तुम्हाला?'' यमाच्या या बोलण्यावर बाबूराव म्हणाले, ''हो, दिसतोय की. गाडीत चढल्यापासून बघतोय मी. बिचारी एकटी बघून सारखा छळतोय तिला. त्याचं काय? '' बाबूरावांनी कुतूहलपूर्वक विचारले.

''फक्त दोनच, दोनच मिनिटांत त्याची वेळ भरणार आहे आणि मी त्याला उचलून वर नेणार आहे. बघालच तुम्ही!'' यमराज म्हणाले. ''काही तरी काय सांगता राव! इतका धडधाकट तरुण असा तडकाफडकी कसा जाईल?'' असं बाबूराव बोलतायत न बोलतायत तोच समोरच्या तरुणाने अचानक छातीत कळ आल्यासारखे तोंड वेडेवाकडे केले आणि दोनच मिनिटांत खेळ खल्लास! ती तरुणी किंचाळली आणि डब्यात एकच गोंधळ उडाला.

हे बघून मात्र बाबूराव चांगलेच हबकले. त्याही स्थितीत त्यांच्या मनात एक कल्पना डोकावली आणि झटकन उठून त्यांनी गप्‌कन यमाचे पाय धरले आणि म्हणाले ''यमराज, धन्य आहे तुमची! काय प्लॅनिंग आहे, काय मस्त टाइमिंग आहे! एक सेकंदही इकडे-तिकडे नाही.'' यमराज पण बाबूरावांनी केलेल्या ह्या स्तुतीमुळे भारावून गेले आणि हीच संधी साधून बाबूराव म्हणाले ''यमराज, तुम्हाला माझी एक विनंती आहे.'' स्वारी खूष. ''काय विनंती आहे?'' यमराजांनी विचारले. ''हे पाहा, आपण आता मित्र झालो आहोत. तेव्हा प्लीज, माझी वेळ कधी आहे, ते मला कळू शकेल?''

''सॉरी बाबूराव. तशी ॲडव्हान्स इन्टिमेशन आमच्याकडे येत नाही. त्यामुळे ते मी नाही सांगू शकत.'' यमराजाने बोलता-बोलता आपले नाव घेतलेले पाहून बाबूरावांना आश्चर्य वाटले. ते यमराजाला म्हणाले, ''यमराज, मी तर तुम्हाला माझे नाव सांगितले नाही. मग तुम्हाला ते कळले कसे? यमराज अर्धवट स्वत:शीच खुदकले आणि म्हणाले, ''बाबूराव, तुमचं नाव, गाव, कामाचे ठिकाण- सगळे मला माहीत आहे. तुमचीच नाही, तर प्रत्येक मर्त्य जीवाची ही माहिती आम्हाला ठेवावीच लागते.'' यमराजाच्या ह्या

बोलण्यावर बाबूराव खूश झाले आणि उत्साहाने म्हणाले, ''मग तर माझी वेळ कधी भरणार आहे, ते तुम्हाला नक्कीच माहीत असेल. प्लीज, सांगा ना'' असं म्हणत बाबूरावाने खिशात हात घालून काही नोटा बाहेर काढल्या, हे यमराजाच्या नजरेने टिपले आणि ते म्हणाले, ''नाही बाबूराव, तुम्ही बाहेर काढलेल्या ह्या ५०० व १००० हजाराच्या नोटा आता तुमच्या मोदी सरकारने बंद केल्या आहेत आणि जरी तसे नसते, तरी हे प्रकार आमच्याकडे चालत नाहीत. शिवाय बाबूराव, ही माहिती आमच्याकडं नसतेच.. चित्रगुप्ताकडून स्टेटमेंट आल्यावरच ती आम्हाला कळते.'' यावर बाबूराव चिकाटीने म्हणाले, ''ठीक आहे. वेळ कधी भरणार आहे ते नका सांगू, पण निदान मला थोडा काळ आधी नोटीस तर द्याल?'' यावर यमराज म्हणाले, ''ते शक्य नाही बाबूराव, तशी नोटीस देण्याची पद्धत आमच्याकडे नाही.'' मग मात्र बाबूराव अधिकच खट्टू झाले आणि साखरपेरणी करत यमराजाला मस्का लावू लागले. ''असं काय करता राव? आपण आता एवढे चांगले मित्र झालो आहोत. मित्रासाठी इतकी साधी गोष्ट करा ना प्लीज. अहो, आम्ही माणसे मित्रासाठी जीवसुद्धा देतो. आणि मी तुम्हाला जास्त काही करायला सांगताच नाही, फक्त माझी वेळ जवळ आली की, मला नोटीस द्यायची, इतकंच. अशी नोटीस मिळाली तर मला चार चांगली कामे करता येतील. दानधर्म करता येईल, थोडेसे पुण्य गाठीला बांधता येईल. घरदार, जमीनजुमला यांची नीट व्यवस्था लावता येईल. तेव्हा कृपा करून हो म्हणा यमराज, हो म्हणा. तुमच्याकडून प्रॉमिस घेतल्याशिवाय मी हे पाय आता सोडणारच नाही.'' असं म्हणून बाबूरावांनी यमराजाच्या पायांना मारलेली मिठी अधिकच घट्ट केली. शेवटी यमराजाने बाबूरावांना हवे असलेले प्रॉमिस दिले, तेव्हा त्याची सुटका झाली.

दिवसामागून दिवस, वर्षांमागून वर्षे जात होती. बाबूराव आपल्या संसारात इतके दंग झाले की, यमराजाची झालेली ही भेटही ते विसरून गेले. पुण्याची चांगली कामे, दानधर्म, जमीनजुमल्याची व्यवस्था– ही सगळी कामे 'आज करू, उद्या करू' म्हणत अजून झालीच नव्हती. यमराजाने सांगितलेला तो दिवस कधी तरी उगवणार आहे याचे त्यांना भानच राहिले नव्हते. तो

गुरुवारचा दिवस होता, म्हणण्यापेक्षा रात्र होती. बाबूरावांनी त्यांची नेहमीची टीव्ही सिरीयल बघितली. टीव्ही बंद केला आणि गुलाबी थंडीत गुलाबी स्वप्न पाहण्यासाठी बाबूराव चादरीत गुडूप झाले. इतक्यात 'खड खड खड खड' दरवाजाची कडी वाजली. 'आता कोण मरायला आलंय इतक्या रात्रीचं?' असं मनाशी म्हणत चरफडत बाबूराव उठले आणि त्यांनी दरवाजा उघडला... तर समोर साक्षात यमराज उभे!

''तुम्ही?'' यमराजाला पाहून बाबूराव आश्चर्याने ओरडले. ''हो'' मीच. चला, निघायची वेळ झाली!''

''निघायची वेळ झाली म्हणजे? अरे वा! अशी अचानक बरी निघायची वेळ होईल? माझी वेळ भरल्यावर तुम्ही मला नोटीस देणार होतात यमराज. तसं तुम्ही मला प्रॉमिस दिलं होतं. आणि आज असं अचानक...? छे छे, असा अचानक मी नाही येऊ शकणार तुमच्याबरोबर. अहो, मला अजून किती तरी कामे मार्गी लावायची आहेत. दानधर्म, पुण्यकर्म करायची आहेत, इस्टेटीची व्यवस्था करायची आहे. म्हणून तर मी तुमच्याकडून नोटिशीचं प्रॉमिस घेतलं होतं..! नो-नो. धिस इज चीटिंग. शुद्ध फसवणूक आहे ही! तुम्हा देवलोकात राहणाऱ्या लोकांना ही अशी माणुसकी शोभत नाही.'' बाबूराव भडाभडा बोलत गेले.

यमराज शांतपणे म्हणाले, ''बाबूराव, मी चीटिंग, फसवणूक वगैरे अजिबात केलेली नाही. मी माझा शब्द तंतोतंत पळाला आहे. तुम्हाला एक नाहीत, तर अनेक नोटिसा दिल्या आहेत. पण तुम्हाला त्या समजल्या नाहीत, हा काही माझा दोष नाही!'' यमराजाच्या ह्या बोलण्यावर बाबूराव चांगलेच भडकले. ''खोटं, खोटं बोलताय तुम्ही. तुमची एकही नोटीस मला मिळालेली नाही.'' बाबूराव एकदम चिडून म्हणाले. ''सांगा बघू, तुम्ही कधी नोटीस पाठवलीत ते?'' बाबूरावांनी यमराजाला आव्हान दिले.

यमराज गालातच हसले आणि बाबूरावांना म्हणाले, ''ठीक आहे. एक तर जेव्हा तुमचे केस काळ्याचे पांढरे झाले, ती तुम्हाला पहिली नोटीस होती.

पण तिला न जुमानता तुम्ही कलप लावून केस काळे केलेत आणि पुन्हा तरुण झालात. नंतर एक-एक करून मी तुमचे दात काढून घेतले, पण तेही डावलून तुम्ही कवळी बसवून घेतलीत आणि आपल्या जिभेचे चोचले पुरवू लागलात. नंतर मी तुमची श्रवणशक्ती कमी केली आणि तुम्ही बहिरे झालात. पण श्रवणयंत्र लावून तुम्ही त्यावरही मात केलीत. नंतर तुमची नजर कमी-कमी होत गेली, पण तेव्हाही चष्मा लावून त्या नोटिशीला शह दिलात. हे सगळे इशारे वेळीच ओळखले असते तर बाबूराव, ह्या अंतिम यात्रेला तुम्ही हसत-हसत सिद्ध झाला असतात आणि तुमच्या आशा-आकांक्षा अर्धवट राहून असे दु:ख करण्याची वेळ तुमच्यावर आली नसती. इस्टेटीचं म्हणाल, तर तुमचे आप्तेष्ट त्यातली एक टाचणीसुद्धा तुम्हाला बरोबर नेऊ देणार नाहीत, उलट जाताना ते तुमची नसती चड्डीसुद्धा काढून घेणार आहेत. तेव्हा आता निघा. पण निघता-निघता एक लक्षात ठेवा बाबूराव की, नियमाने चालत असल्यामुळे निसर्ग हा सर्वशक्तिमान आहे. त्यामुळे मनुष्य कितीही कर्तृत्ववान असला तरी निसर्गापुढे तो खुजाच आहे. शिवाय बाबूराव, 'प्राणिमात्रांची पुढच्या क्षणाची काहीच शाश्वती नसते तेव्हा जे काही कर्म करायचे आहे, ते वेळीच करणे गरजेचे असते. उद्याचा भरवसा नाही' असे संत-महात्मे कानी-कपाळी ओरडून सांगत असताना तुम्ही नोटिशीची वाट बघत बसलातच कसे? ते काही नाही बाबूराव, आता निघाच. ही फायनल नोटीस आहे!''

❒ ❒ ❒

९

# नानाचा सदरा

ही आहे मुंबईच्या नाना जोशीची गोष्ट! खूप-खूप वर्षांपूर्वीची- म्हणजे 'मुंबईसह झालाच पाहिजे' या आधीची गोष्ट- मुंबईत मराठी माणसं होती तेव्हाची गोष्ट. गिरगाव, गिरणगाव आणि दादर-माहिमपर्यंत मराठी माणसांचं साम्राज्य होतं, तेव्हाची गोष्ट. मुंबई महाराष्ट्राची आहे, हे सांगावं लागत नव्हतं- तेव्हाची गोष्ट. गिरगावातल्या सेन्ट्रल, मॅजेस्टिक आणि दादरच्या कोहिनूर, प्लाझामध्ये फक्त मराठीच सिनेमे लागायचे- तेव्हाची गोष्ट. गिरगावातल्या केळेवाडीत (आत्ताच्या साहित्य संघ मंदिरात) कानात अत्तराचा फाया घालून आणि सोबत मोगऱ्याची सुगंधी वेणी माळलेल्या आपल्या लग्नाच्या सख्ख्या बायकोला घेऊन दर्दी रसिक मराठी नाटक बघायला गर्दी करायचे- तेव्हाची गोष्ट. गिरगाव चौपाटीवर कुटुंबवत्सल माणसे शुद्ध हवा आणि चटपटीत भेळ खायची- तेव्हाची गोष्ट. डबल डेकरच्या बसमध्ये वरच्या डेकवर बसून हवा खात प्रवास करायला मजा वाटायची- तेव्हाची गोष्ट. कुलाबा ते दादर व्हीटी फक्त एक आण्यात दोन रुळांवरून टन टन असा खणखणत प्रवास घडवणारी ट्राम होती- तेव्हाची गोष्ट.

नाना जोशी. गिरगावात ठाकूरद्वारला झावबाच्या वाडीत बॉर्न अॅण्ड ब्रॉटअप, शिक्षण गिरगावातच झालं. एसएससी झाला आणि एम्प्लॉयमेंट एक्सचेंजचा कॉल येऊन मंत्रालयात चिकटला.

वडिलांनी ठरविलेल्या मुलीशी लग्न केले आणि वडिलांच्याच खोलीत आपला संसार थाटला. संसारवेलीवर एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन सुंदर फुले उगवली. मोठी झाली, शिकली-सवरली. मुलगी लग्न होऊन नागपूरला गेली आणि मुलगा उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेला. नाना सिनिअर क्लार्कची पायरी ओलांडून हेडक्लार्क झाले, पण इतक्या वर्षांत नानांचा दिनक्रम जसा होता तसाच राहिला. त्यात काना-मात्रेचाही फरक झाला नाही.

सकाळी पाच वाजता उठावे. प्रातःविधी आटोपून सूर्योदयापूर्वी काळ्या रामाचे दर्शन घ्यावे. घरी येऊन ताज्या दुधाचा गरम-गरम चहा भुरक्या मारत घ्यावा आणि गॅलरीत बसून ताज्या वर्तमानपत्रांचा खमंग आस्वाद घ्यावा. ''अहो, पाणी निवून चाललंय, अंघोळ करून घेता ना?'' असे किमान तीन गजर आतून झाल्यावर मग डुलत-डुलत न्हाणीघरात प्रवेश करावा आणि ''शंभोऽऽऽ'' करून असा सूर लावावा की, सगळी चाळ नानांच्या या आवाजाने धुऊन निघावी! अंघोळ आटोपून नुकत्याच केलेल्या गुळगुळीत दाढीच्या चेहऱ्यावरचे पाणी निपटून काढण्यासाठी चेहऱ्यावर ठेवलेला उजवा पालथा हात कपाळापासून हनुवटीपर्यंत आणून झटकायच्या आत समोर एक नाजूक हात पंच्यासह खुंटीसारखा हजर असायचा. हो, खुंटीसारखाच! कारण भिंतीआडून आलेला फक्त हातच दिसायचा- जणू भिंतीत ठोकलेली खुंटीच.

पंचा आला की, अंग पुसत-पुसत धीरगंभीर आवाजात नानांची आवर्तनं सुरू व्हायची. देव्हाऱ्यातले देव ताम्हणात यायचे. घंटानादात देवांचे पंचामृत स्नान, दुग्धस्नान आणि शुद्धोदक स्नान होऊन देव पुन्हा देव्हाऱ्यात आपल्या ठरलेल्या जागी जाऊन स्थानापन्न व्हायचे. इतके होते आहे तोच शेजारच्या रिकाम्या पाटावर गरम-गरम कप येऊन टपकायचा आणि तेच नानांचे पूजेमध्ये मध्यंतर असायचे. चहा भुरकून झाला की, पुन्हा पूजा सुरू व्हायची. देवांवर गंधाक्षता, फुलादुर्वांची उधळण व्हायची. तोपर्यंत एकविसावे आवर्तन पूर्ण होऊन एकादष्णी पूर्ण झालेली असायची. सोवळे सोडून नाना धुतलेले पांढरे स्वच्छ धोतर परिधान करायचे. सोनेरी बटणे लावलेला पांढरा स्वच्छ सदरा अंगात चढवायचे आणि खुंटीवर अडकवलेली काळी टोपी डोक्यावर ठेवत

असतानाच पुन्हा एकदा तो हात खुंटीसारखा पुढे यायचा. या वेळी त्या खुंटीवर एक पिशवी असायची. ती पिशवी हातात घेऊन आणि कोपऱ्यातील चकचकीत पॉलिश केलेल्या चपला पायांत सरकावून नाना भाजीवालीला भेटायला जायचे- अगदी राजरोस!

भाजी आणि भाजीवाली कितीही चांगली असली, तरी नाना ठरलेल्या वेळेतच भाजीने भरलेली पिशवी घेऊन घरी परतायचे. दारातून घरात पाऊल टाकताच खमंग कांदेपोह्याच्या वासाने त्यांच्या तोंडाला पाणी सुटायचे आणि चहा भुरकण्याचे संगीत वातावरणात घुमायला लागायचे. चहाचा कप खाली ठेवत असतानाच पुन्हा त्यांच्या पुढे तो खुंटीसारखा हात यायचा. या वेळी त्या हातात एक यादी असायची. त्या यादीवर एक नजर टाकून नाना गुरकायचे, ''गोडे तेल एवढ्यात कसे संपले?'' आवाज यायचा, ''रविवारी रमीचा डाव पडला होता दिवसभर. तेव्हा मंडळी भज्यांवरच होती दिवसभरऽऽऽ!'' हात-पाय धुऊन नाना वरमून गप्प बसायचे. यादी कोटाच्या खिशात गुपचूप ठेवायचे आणि सदरा काढून, हात-पाय धुऊन सरळ ताटासमोरच्या पाटावर बसायचे. ताटातल्या शिल्लक मिठावर पाणी सोडून झाले की, हस्तप्रक्षालन करून टम्म झालेल्या पोटावर हात फिरवीत, वाघाने डरकाळी फोडल्यासारखा असा दणकेबाज ढेकर द्यायचे की, नानांचे जेवण झाले- ही बातमी चाळभर पसरायची आणि इतर नवरे आपल्या बायकांना घाई करायला लागायचे. पुन्हा त्यांच्यासमोर तो खुंटीसारखा हात यायचा. या वेळी त्यात गोविंदविडा असायचा.

मुखरसाचा आस्वाद घेत-घेत नाना खास ऑफीसला जाण्यासाठी शिवलेली साहेबी प्यांट आणि पांढराशुभ्र डबल कफचा शर्ट चढवत कोट घालून, डोक्यावर काळी टोपी ठेवीत. इतक्यात तो खुंटीसारखा हात पुन्हा त्यांच्यासमोर येई. या वेळी त्या हातात अत्तर शिंपडलेली पांढरी शुभ्र, उशीखाली ठेवून इस्त्री केलेली रुमालाची घडी असे. ती रुमालाची घडी घेऊन नाना त्यावर शिंपडलेल्या अत्तराचा हलका सुगंध आपल्या नाकाला देत. कोटाच्या वरच्या खिशावर हलकेच थापटून, यादीची आठवण असल्याचे मूकपणेच त्या हाताकडे बघून

खुणावत आणि त्या हाताचे दोन डोळे नाना दिसेनासे होईपर्यंत त्यांचा पाठलाग करीत आणि मग दार हलकेच बंद होई.

ऑफिसात नाना मान मोडून काम करीत. साहेब त्यांच्यावर खूश असे आणि नाना स्टाफवर खूश असत. आदळआपट नाही, आरडाओरड नाही; सगळी कामे कशी शांतपणे आणि सुटसुटीतपणे चालत. सुरळीत चालत. लंच टाइमात कुणी जागेवरून हलला नाही, तर नाना लगेच त्याची चौकशी करीत. एकदा टायपिस्ट देशपांडे असाच बसून राहिला होता. नानांनी लगेच त्याला विचारले, ''काय देशपांडे, आज टिफिन घ्यायचा नाही वाटतं?'' ''आई आजारी आहे, म्हणून आज टिफिन नाही.'' असं त्याने सांगताच आजारी आईला एकटीच घरात सोडून आल्याबद्दल नानांनी त्याची चांगलीच खरडपट्टी काढली होती आणि त्याला ऑफिसमधून घरी हाकलले होते. तेव्हा देशपांडेचे डोळे कृतज्ञतेने भरून आले होते.

ऑफिसमधून परत येताना नाना सकाळी खुंटीने दिलेली यादी छगन वाण्याच्या दुकानात टाकत आणि झावबाच्या वाडीत प्रवेश करीत. वाडीत प्रवेश करताच साजूक तुपात केलेल्या शिऱ्याचा मधुर वास त्यांच्या नासिकेत शिरे आणि त्या वासाचे मूळ आपल्याच घरात आहे, अशी त्यांची खात्री असे. चपला कोपऱ्यात सरकवून नाना साहेबी प्यांट-शर्ट काढून स्वच्छ अंघोळ करण्यासाठी बाथरूममध्ये शिरत. तिथे स्वच्छ धुतलेला टॉवेल, पांढरा शुभ्र लेंगा आणि बनियन आधीच ठेवलेला असे. अंघोळ आटोपून नाना बाहेर येत, तेव्हा एका पाटासमोर शिऱ्याची बशी तयार असे. नाना चमच्याने चवीचवीने शिरा खात असताना पुन्हा त्यांच्यासमोर तो खुंटीसारखा हात येई. या वेळी त्या हातात एक पत्र असे. खात-खातच नाना पत्र वाचायला घेत.

**।। श्री गणेशाय नमः।।**

ती. स्व. नाना यांसी कृ. सा. नमस्कार

कालच आमच्या पहिल्या सेमिस्टरचा रिझल्ट लागला. ९६% मार्क्स मिळवून मी क्लासमध्ये पहिला आलो. तरीपण अभ्यास जारीच ठेवणार आहे. पदवी परीक्षेत मला तुमच्यासारखं युनिव्हर्सिटीत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण

व्हायचंय. गणेशशास्त्रींकडे माझा संस्कृतचा अभ्यास सुरू आहेच. माझी क्रिकेटमधली उत्कृष्ट कामगिरी बघून आमच्या कॉलेजने ह्या सीझनसाठी कॅप्टनपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे. आणि हो, सांगायचं राहिलंच– वक्तृत्व स्पर्धेत शिल्ड मलाच मिळालं. त्यासाठी तुम्ही पत्रातून दिलेल्या टिप्स उपयोगी पडल्या. सुट्टीत येईन तेव्हा शिल्ड दाखवायला आणीनच. आणि आईला सांगा की, मी इकडेच रमेन ही तिची भीती व्यर्थ आहे. इथल्यापेक्षा मला आपला भारत देशच फार आवडतो. आपल्याकडल्या आणि त्यातूनही आईच्या हातच्या जेवणाची चव इथल्या होस्टेलच्याच काय, पण मोठमोठ्या स्टार हॉटेलच्या कुठल्याही जेवणाला नाही. मी घरी आल्यावर रोज आंबोळ्या करून घातल्या पाहिजेत म्हणावं. मला इकडे एक छोटीशी पार्टटाइम नोकरी मिळण्याची शक्यता आहे. ती मिळाली की, मी तुम्हाला एक कॉम्प्युटर घेऊन देणार आहे. मग आपल्याला ई–मेल आणि समोरासमोर ई–चॅटिंग करता येईल. अंहं, डोंट वरी! नोकरीचा आणि त्याचा माझ्या अभ्यासावर काहीही परिणाम होणार नाही. तुमचा कॉम्प्युटरचा कोर्स आणि अभ्यास मात्र जारी ठेवा. आईला सांगा की, मी इकडे सुखात आहे, तुम्ही सुखात राहा. लवकरच भेटू.

**तुमचा आज्ञाधारक,**

**सुधाकर**

पत्र वाचून झाल्यावर नानांनी खुंटीप्रमाणे पुढे येणाऱ्या त्या हाताच्या मालकिणीकडे अभिमानाने पाहिलं. मालकिणीच्या चेहऱ्यावर त्यांना अभिमान आणि कौतुक दिसले. ते पाहून नानाही सुखावले. खाणे संपवून नाना झब्बा परिधान करून आणि डोक्यावर काळी टोपी ठेवून व चपला घालून दाराबाहेर पडून ग्यालरीतल्या कठड्याशी जाऊन उभे राहत. त्यांच्या मागे त्यांना दार लावल्याचा आवाज येई. कडी सरकवली जाई. पुन्हा दार उघडले जाऊन व बंद करून कुलूप लावल्याचा आवाज येई आणि त्या आवाजाबरोबरच तो खुंटीसारखा हात नानांच्या समोर येई. ह्या वेळी त्या हातात बंद घराच्या किल्ल्या असत.

नाना चौपाटीच्या दिशेने चालू लागत. आपल्या मागे दहा पावलांवर आपले अर्धांग चालत येत आहे, हे मागे वळून न बघताही त्यांना कळत असे. मग ती चार पावले चौपाटीच्या मऊ वाळूत रुतत आणि चालता-चालता एका ठिकाणी स्थिर होत. मावळत्या सूर्याचा तो लाल-पिवळा रंग बघून दोघांचेही भान हरपून जाई. त्या वाळूत दोघेही मधे तीन फूट अंतर ठेवून बसलेले असत. दोघेही आळीपाळीने एकमेकांकडे नुसते पाहत. दोघांनाही शब्दांवाचून एकमेकांचे अंतरंग कळत असे. ती शांतपणे, समाधानी चेहऱ्याने क्षितिजाकडे पाहत असे आणि वाळूत रुतलेल्या तिच्या हाताला एक खडखडीत पण मायाळू स्पर्श होत असे. त्या स्पर्शाने ती मोहरून जाई, पण मोह आवरून लगबगीने उभी राही. नानाही उठत आणि घराच्या दिशेने चालू लागत. अर्धांग दहा पावलांऐवजी तीन पावलांवर मागे असे आणि त्या पावलांची चाहूल नानांच्या कानांत गुंजन करीत राही.

घराच्या किल्ल्या मालकिणीकडे सोपवून नाना घराकडे पाठ करून कठड्याशी उभे राहत. कुलूप काढून दार उघडल्याचा आवाज ऐकताच नाना तडक वळून आत बाथरूममध्ये जात आणि हाता-पायांवर पाणी घेऊन निर्मल मनाने देवापुढे दिवा लावत. परवचा म्हणत आणि तेवढ्यात पांढऱ्या शुभ्र फडफडीत भातावर पिवळ्या धम्मक डाळीचे वरण, वर साजूक तुपाची धार, पिवळेजर्द रसाळ लिंबू, भाजलेला कडकडीत पापड व आंब्याच्या लोणच्याची मुरून मऊ झालेली फोड असे. शुद्ध आणि सात्त्विक पण रसाळ ताट पाटापुढे मांडले जाई. नाना पाटावर बसत. ताटाभोवती पाणी फिरवून चित्रावती घालीत. इतक्यात पुन्हा तो खुंटीसारखा हात त्यांच्यापुढे येई. ह्या वेळी त्या हातात भाताचा घास असे...

हात धुऊन नाना गॅलरीत थोडा वेळ शतपावली करीत. जेव्हा ते पुन्हा घरात जात, तेव्हा पांढरीशुभ्र चादर आणि तशाच शुभ्र अभ्र्यांनी लपेटलेल्या उशा, असा सजलेला त्यांचा मऊ बिछाना तयार असे. उशाशी बेडलॅम्प लावून नाना शिवाजी सावंतांचे 'मृत्युंजय' चाळू लागत. तेवढ्याच वेळात स्वयंपाकघरात झाकापाक केल्याचा आवाज येई. मग बाहेर येणाऱ्या पावलांचा आवाज येई. आवाज जवळ जवळ येई. मग कानांशी बांगड्यांची मधुर किणकिण होई.

नाना त्या आवाजाने धुंद होत असतानाच दिवा डोळे मिटून झोपी जाई... पुन्हा सकाळी पाच वाजता जागा होण्यासाठी.

नाना, आता सगळं बदलून गेलंय. या दहशतवाद्यांनी आमची झोपच उडवलीय. रात्र-रात्र जागेच असतो. त्यामुळे सकाळी पाच वाजता उठण्याचा प्रश्नच येत नाही. बाहेर पडताना मनात सतत अपघात आणि बाँबस्फोटांचे विचार येतात. तुमच्या वेळची मुंबई राहिली नाही. तुमच्यासारखी शहरे राहिली नाहीत आणि खेडी पण राहिली नाहीत. खेड्यांची शहरे झाल्याने शेतमळे तर आटलेच, पण माणुसकीचे मळे पण आटले. तुमच्यासारखी माणसं राहिली नाहीत. तुमच्यासारख्या खुंट्या राहिल्या नाहीत. ट्राम, मराठी सिनेमे, मराठी नाटके, शुद्ध हवेची चौपाटी तर नाहीच नाही. माणसांना फिरायला आणि मुलांना खेळायला जागा नाहीत. असल्याच, तर फिरायला आणि खेळायला कुणाकडे वेळ नाही. माणूस राब-राब राबतोय, पण यंत्रासारखा राबतोय. भरपूर कमावतोय. गाड्या उडवतोय. पण शांतपणे बसून दोन घास खाण्यासाठी, दोन मिनिटे आपल्या मुलांबरोबर बसण्यासाठी, दोन शब्द त्यांच्याशी बोलण्यासाठी त्याच्याकडे वेळच नाही. नवऱ्याला बायकोसाठी वेळ नाही, बायकोला नवऱ्यासाठी वेळ नाही आणि दोघांनाही आपल्या मुलांसाठी वेळ नाही. सुधारणा खूप झाल्यात नाना. शंभर माणसांनी करायचं काम आता एकच माणूस करतोय. पण त्या एकाला इतकं काम आहे की, त्यातून जेवायला फुरसत नाही म्हणून तो उपाशी मरतोय आणि उरलेल्यांना कामच नाही म्हणून ते उपाशी मरत आहेत. तुम्ही सुखी होतात नाना- खूप सुखी होतात. जिथे कुठे तुम्ही असाल, तिथून आम्हाला तुमचा सदरा पाठवाल का नाना? प्लीज, प्लीज नाना.... आम्हाला तुमचा सदरा हवाय... नाना, आम्हाला तुमचा सदरा हवाय!

❒ ❒ ❒

१०

# चाँदका टुकडा

आनंदनगर ही शहराबाहेरची, उपनगरातील एक टापटीप आणि शांत वस्ती. सोसायटीमधल्या समोरासमोरच्या इमारती इतक्या खेटून की, बाल्कनीतून समोरच्या घराचं संपूर्ण दृश्य दिसावं. ही म्हणजे तरुण आणि त्यातल्या त्यात नवपरिणीत जोडप्यांसाठी मोठीच अडचण!

पण राधाबाई काही तरुण नव्हत्या आणि 'जस्ट मॅरिड' तर मुळीच नव्हत्या. त्यांचं लग्न होऊन चांगली पंचेचाळीस वर्षं उलटली होती. एकुलता एक मुलगा संदेश, एकुलती एक सून नंदिनी आणि एकुलता एक नातू नीलेश- सगळेच लांब, अमेरिकेत. तीन-चार वर्षांतून कधी तरी भेटायला जायचे; पण तेवढेच. एरवी दोन बेडरूमच्या त्या फ्लॅटमध्ये राधाबाई आणि नाना, दोघांचंच राज्य आणि फक्त दोघांचंच काम ते काय असणार? त्यामुळे बराचसा रिकामा वेळ राधाबाई बाल्कनीत बसून काढत आणि नाना मॉर्निंग वॉक करून आले की, बाल्कनीच्या मागेच असलेल्या हॉलमध्ये झुल्यावर बसून वर्तमानपत्रांचा फडशा पाडत. विरुद्ध बाजूच्या बाल्कनीतून बघितलं तर नाना हॉलमध्ये बसून बातम्या वाचत आहेत आणि राधाबाई बाल्कनीच्या कठड्यावर कोपर टेकून खालची, वरची आणि समोरची न्याहाळणी व टेहळणी करीत आहेत, असंच दृश्य दिसायचं.

आज मात्र समोरच्या खिडकीतून बघून राधाबाई अगदी खुशीत येऊन गुणगुणत होत्या, अंमळ मोठमोठ्यानं... 'मेरे सामनेवाली खिडकी में...' पेपर वाचता-वाचता नानांनी दोन-तीन वेळा त्यांच्याकडे- अंमळ रागानंच- बघितलं. शेवटी न राहवून बोललेच, ''काय राधक्का... आज आनंदात खुशीत येऊन गाताय?'' नाना कधी मूडमध्ये असले की, त्यांना राधाक्का, राधाकाकू, राधावहिनी असं काही पण म्हणायचे. राधाबाईंच्या पण ते अंगवळणी पडलं होतं.

''हो, आहेच मी आज खुशीत...'' असं म्हणून आणि आवाजाची पट्टी किंचित वाढवून राधाबाई पुन्हा गुणगुणू लागल्या,'' मेरे सामनेवाली खिडकी में एक चाँदसा टुकडा रहता हैऽ''

नानांनी नकळत स्वतःच्या टकलावरून हात फिरवला आणि राधाबाईंनी बघायच्या आत झटकन काढून घेतला. मग म्हणाले, ''अरे वा! लेकिन ये खुशी आज किस खुशी में?'' टीव्हीवर बघितलेल्या हिंदी सिनेमाच्या थाटात नानांनी विचारलं.

''आहे आमची एक गंमत!'' असं म्हणून राधाबाईंनी नाक उडवलं.

''पण आम्हाला सांगा की तुमची ती गंमत!'' नानांनी नेट लावून विचारलं.

राधाबाईंनी एक छानसा मुरका मारला आणि म्हणाल्या, ''नको बाई! मला लाज वाटते.''

''अहो, लाजताय काय अशा नव्या नवरीसारख्या? सांगा तरी तुमच्या खुशीचं कारण...'' नानांनी आग्रह केला.

''नको बाई! तुम्ही रागवाल म्हणून भीती वाटते.'' राधाबाई निग्रहानं म्हणाल्या.

''अहो, आयुष्यभर तुम्हाला भिऊन वागलो मी; आता माझी कसली भीती वाटतेय तुम्हाला? सांगा.'' नाना म्हणाले. नानांच्या 'सांगा' या शब्दात इतका जोर होता की, अधिक ओढेवेढे न घेता राधाबाईंनी समोरच्या खिडकीकडे एक तिरपा कटाक्ष टाकला आणि पुन्हा एकदा एक छानसा मुरका मारून

म्हणाल्या, ''मी किनै, मी किनै प्रेमात पडलेय.'' असं म्हणून पुन्हा एकदा समोरच्या खिडकीकडे तिरपा कटाक्ष टाकून त्या गुणगुणल्या– ''एक चाँदसा टुकडा रहता है...'' हे ऐकलं मात्र आणि नानांच्या डोक्यात भयंकर स्फोट झाले. काही क्षण रागानं त्यांच्या ओठांतून शब्दच फुटेनात. शेवटी, हायवेवरून एकशेदहाच्या स्पीडनं चाललेल्या ट्रकच्या चाकात खिळा घुसून, जोरानं आवाज करत पंक्चर झालेल्या टायरसारखे ते एकदाचे फुटले आणि संबंध कॉलनीच्या कानात दडे बसावेत इतक्या मोठ्या आवाजात ओरडले, ''काय?... तू... तू प्रेमात पडलीयस? आणि या... या... वयात?''

राधाबाईंनी नानांच्या या ओरडण्याला अजिबात भीक घातली नाही. तितक्याच शांतपणे त्या म्हणाल्या, ''मग काय झालं? एवढी काही मी म्हातारी नाही. नुकतंच कुठे पासष्ट सरलंय आणि परवा मी टीव्हीवर पाहिलेल्या सिनेमात चक्क म्हटलं होतं ना, प्यार मोहब्बत को उम्र का तकाजा नहीं होता।''

''हं... उम्रका तकाजा म्हणे! राधे.. राधे... हे असलं बोलणं शोभत नाही तुला... या वयात. तू एक पत्नी आहेस, एक आई आहेस, एक आजी आहेस– हे विसरू नकोस.'' नाना धुसफुसले.

''हो, आहे ना! मी आई आहे, आजी आहे; पण माझा मुलगा आणि नातू आहेत का माझ्याजवळ? ते जाऊन बसलेत तिकडे अमेरिकेत. खरंच सांगतेय हो, हा एकटेपणा मला अगदी खायला उठतोय. सहन होत नाही.''

''का? मी नाही इथे तुझ्यासोबत?'' नाना चिडून म्हणाले. राधाबाईंना नानांच्या या चिडण्याची गंमत वाटली. त्यांना डिवचण्यासाठी त्या मुद्दामच म्हणाल्या,

''आहात ना; पण तुम्ही आता म्हातारे झालात.''

आपल्या उजव्या हाताची तर्जनी राधाबाईंच्या नाकासमोर नाचवत नाना ओरडले, ''राधे-राधे, मला जास्त राग आणू नकोस हं...''

''इश्शऽऽ! त्यात एवढं रागवायला काय झालं? म्हातारं होत नाही का कुणी?'' राधाबाई तेवढ्याच शांतपणे म्हणाल्या.

''होतात ना, लोक म्हातारे होतात; पण त्या म्हाताऱ्या लोकांच्या म्हाताऱ्या बायका प्रेमात पडून, तुझ्यासारखा दुसरा चाँद का टुकडा शोधत

नाहीत या वयात.'' आणि हे बोलत असताना नानांनी नकळत संतापानं आपला हात आपल्या टकलावरून फिरवला. ''अगं, लोक काय म्हणतील याचा जरा विचार कर–'' नानांनी पुस्ती जोडली. राधाबाईंनी कावळा हाकलतात तसा उजवा हात झटकला आणि म्हणाल्या, ''म्हणू देत लोकांना काय म्हणायचं ते,'' असं म्हणून त्या गाऊ लागल्या,

''कुछ तो लोग कहेंगे– लोगोंका काम है कहना । छोडो बेकार की बातों...''

त्या गाण्याचा गळा घोटत नाना ओरडले, ''चूऽप! लोकांना काही कहू दे नाही तर ना कहू दे; पण मला मात्र हे बिलकुल खपणार नाही,'' नानांनी राष्ट्रभाषेत तारे तोडले.

''का? मत्सर वाटतोय त्याचा?''

''सरहद्द झाली– सीमा–रमेश देव– अजिंक्य– अख्खी देव फॅमिली झाली!'' नाना संतापानं करवादले.

''चिडताय कशाला इतके? तुम्हाला बघायचा आहे का माझा चाँद का टुकडा?'' राधाबाईंनी शांतपणे विचारलं.

''काही नको– तूच बघत बस तुझा चाँद का टुकडा!'' नाना फिस्कारले. तरीपण राधाबाई नानांच्या जवळ गेल्या. जबरदस्तीनं पण लाडिकपणे त्यांना बसल्या जागेवरून उठवलं आणि खेचतच बाल्कनीत आणलं. बाल्कनीतून समोरच्या खिडकीकडे बोट दाखवून म्हणाल्या, ''बघा, तो बघा– माझा चाँद का टुकडा!''

नानांनी खिडकीतून समोर बघितलं आणि त्यांना एक हसतमुख, गोरंगोमटं व गुटगुटीत असं हात–पाय झाडत, स्वतःशीच खेळत असलेलं बाळ दिसलं. चार–सहा महिन्यांच्या त्या बाळाकडे बघत 'हा चाँद का टुकडा?' असं म्हणत नाना पुन्हा मागच्या डुलत्या खुर्चीवर जाऊन बसले आणि टकलावर हात फिरवत डुलायला लागले.

राधाबाई पण लगबगीनं आत गेल्या आणि परत येताना आणलेली दुर्बीण डोळ्यांना लावून समोरच्या खिडकीतून बघू लागल्या आणि दुर्बिणीतून

बघताना त्यांना बाळ तर स्पष्ट दिसत होतंच, पण बाळाच्या बाजूला ठेवलेल्या औषधांच्या बाटल्यांवरची आणि पावडरच्या डब्यांवरची नावंसुद्धा स्पष्ट वाचता येत होती. बाळाच्या बाजूलाच भिंतीवर एक ब्लॅकबोर्ड लटकत होता. तोसुद्धा राधाबाईंना स्पष्ट वाचता येत होता.

**सूचना :**

१) पहिलं दूध – सकाळी १०.३० वाजता.

२) बेबी फूड दोन चमचे – सकाळी ११.३० वाजता (दुधातून)

३) गरम केलेलं (कोमट) पाणी – दुपारी १२ वा. (चार चमचे)

४) दुसरं दूध – दुपारी १.३० वा.

५) गुलाबी औषध (एक चमचा)– दुपारी २ वा.

६) हिरवं औषध (एक चमचा) – दुपारी २ वा.

७) तिसरं दूध – दुपारी ४ वा.

८) बेबी फूड दोन चमचे – दुपारी ५ वा.

९) गरज पडल्यास साहेबांना किंवा बाईसाहेबांना ऑफिसमध्ये फोन करणे.

साहेब– शरद पोंक्षे – टेलिफोन.....

बाईसाहेब– स्मिता पोंक्षे – टेलिफोन....

आपल्या घरचा टेलिफोन...

सूचना : बंटीला रडवू नये.

राधाबाईंनी तो बोर्ड वाचला, त्या नवागतांची नावं त्यांना समजली आणि प्रॉब्लेम पण कळला. त्यांचं लक्ष सहजच आत हॉलमध्ये भिंतीवर लावलेल्या घड्याळाकडे गेलं. म्हणजे पावणेअकरा वाजले होते.

राधाबाईंनी लगबगीनं नानांना हाक मारली, ''अहोऽ ऐकलंत का?'' टाइम्सच्या पुरवणीत आलेला मल्लिकाचा फोटो बघण्यात नाना इतके रंगले होते की, राधाबाईंची हाक काही त्यांची तंद्री भंग करू शकली नाही.

‘‘अहो, ऐकलंत काऽ? मी काय म्हणते?’’ राधाबाईंनी पुन्हा साद घातली.

नानांना वाटलं, पुरवणीतली रंगीत फोटोतील मल्लिकाच आपल्याला लाडिक साद घालते आहे  आणि फोटोत तिनं पसरलेले बाहू जणू काय आपल्यासाठीच आहेत... असं समजून नानांनी पुरवणी छातीशी कवटाळून मल्लिकाला आलिंगन दिलं.

आता मात्र राधाबाईंची सहनशक्ती संपली आणि ‘‘नानाऽऽ’’ असं त्या जोरानं ओरडल्या. ‘‘म...म... मी कुठे तिला... मी नाही...’’ असं काही तरी पुटपुटत नकळत त्यांनी पुरवणी छातीशी अधिकच घट्ट आवळली.

‘‘अहोऽऽ तुमच्या छातीवरचे केस टोचतायेत त्या बिचारीला. फेका ती पुरवणी आणि आत जाऊन आपला कॉर्डलेस फोन तेवढा मला आणून द्याऽ’’ राधाबाईंनी फर्मावलं. एरवी नानांनी हे फर्मान जुमानलं नसतं. ‘मी काय तुझ्या...चा नोकर आहे का?’ असं काही तरी खरमरीत उत्तर राधाबाईंना दिलं असतं; पण आपलं उघडं पडलेलं मल्लिकापितळ झाकण्याची ही संधी न सोडण्याइतके धूर्त ते नक्कीच होते. त्यांनी गुपचूप जाऊन कॉर्डलेस आणला आणि राधाबाईंच्या हातात कोंबला.

दुर्बिणीतून समोरच्या घरातला ब्लॅकबोर्ड न्याहाळत राधाबाईंनी कॉर्डलेसची बटणं दाबली आणि त्या समोरून फोन उचलण्याची वाट पाहू लागल्या.

‘‘हॅलोऽऽ’’ पलीकडून आवाज आला.

‘‘नाव काय गं तुझं?’’ राधाबाईंनी विचारलं.

‘‘तुमी कोण बोलताय?’’ पलीकडून आवाज आला.

‘‘प्रश्न विचारू नकोस, नाव सांग तुझं–’’ राधाबाईंनी ठणकावलं.

‘‘माझं नाव पार्वती; पण कशाला?’’ –पलीकडून विचारणा.

‘‘एकदा सांगितलं ना, प्रश्न विचारू नकोस म्हणून? फक्त उत्तर दे. वाजले किती?’’ राधाबाईंनी अधिकारवाणीनं विचारलं.

‘‘का? तुमाकडं घड्याळ न्हाई?’’ पलीकडून प्रश्न आला.

''पुन्हा सांगते- प्रश्न विचारू नकोस, फक्त उत्तर दे. वाजले किती?'' राधाबाईंनी पुन्हा ठणकावलं.

''साडेदहा वाजलेत-'' -पलीकडचं उत्तर.

''नीट घड्याळ बघ. नक्की किती वाजलेत?'' -राधाबाई...

''अं-अंऽ' पावणेअकरा.'' पलीकडून उत्तर आलं.

''बंटीला दूध दिलंस?'' -राधाबाईंचा प्रश्न.

''बाळाचं नाव 'बंटी' हाय, ते तुमाला कसं कळलं?'' -पुन्हा पलीकडून विचारणा.

''भुतानं माझ्या कानात सांगितलं. त्याचा विचार तू करू नकोस. मला उत्तर दे- बंटीला दूध दिलंस?'' राधाबाईंनी पुन्हा प्रश्न केला.

''न्हाई अजून.'' पलीकडून उत्तर आलं.

''ताबडतोब दे. दुधाची वेळ साडेदहाची आहे. माहीत आहे ना तुला?'' राधाबाई डाफरल्या.

''व्हय. पन तुमाला कसं कळलं?'' -पलीकडचा आवाज.

''भुतानं सांगितलं म्हटलं ना एकदा? सांगितलं तेवढं कर.'' असं म्हणून राधाबाईंनी फोन बंद केला.

पलीकडून वैतागून फोन आपटला गेल्याचं बघून राधाबाई हसल्या आणि पुढचं दृश्य बघू लागल्या. समोरच्या बाईनं काही न समजल्यासारखे हात हवेत उडवले आणि जवळच ठेवलेल्या भांड्यातलं दूध बाटलीत भरू लागली. राधाबाईंनी पुन्हा कॉर्डलेसचं बटण दाबलं. समोरच्या बाईनं एकवार फोनकडे बघितलं आणि पुन्हा फोन उचलला.

''हॅलोऽऽ काय? बंटीला थंड दूध पाजणार आहेस? दूध थोडं कोमट कर. त्यात थोडी साखर घालून चमच्यानं ढवळ आणि मग बाटलीत भरून बंटीला पाज.'' राधाबाईंनी भराभर सूचना दिल्या.

''पन तुमी कोन हाय?'' पलीकडचा प्रश्न आला.

राधाबाईंनी काही न बोलता फोन कट केला आणि त्या पुढचं दृश्य बघू लागल्या.

समोरची बाई काही न समजून फोनकडे बघत असल्याचं पाहून राधाबाईंना गंमत वाटली. त्या बाईनं पुन्हा एकदा हात हवेत उडवले आणि दुधाचं भांडं घेऊन आत गेली. तेवढ्यात बंटी आपल्याकडे पाहून हसतोय, असा भास राधाबाईंना झाला.

बाई दोन मिनिटांत परत आली आणि भांड्यातलं दूध बाटलीत भरू लागली. राधाबाईंनी तत्काळ हातातल्या कॉर्डलेसचं रिडायल बटण दाबलं. ''गरम वाफा येत आहेत. दूध जरा थंड कर आणि मग बंटीला पाज. गरम दुधानं नरडं भाजेल ना बंटीचं-'' असं म्हणून राधाबाईंनी फोन कट केला.

समोरच्या बाईनं इकडे-तिकडे आणि फोनकडे बघून पुन्हा हात हवेत उडवले आणि राधाबाईंच्या सूचना तंतोतंत अमलात आणल्या. हे पाहिलं मात्र, राधाबाईंना हसू आवरेना.

हसता-हसता राधाबाईंनी आत बसलेल्या नानांना हाक मारली, ''अहो, ऐकलंत का? जरा बाहेर बाल्कनीत या बरं.''

''काय झालं?'' नाना आतून ओरडले.

''त्या मल्लिकाला सोडून आधी बाहेर या, मग सांगते.''

राधाबाईंचा हा मल्लिकाबाण मात्र बरोबर लागू पडला आणि ''काय म्हणताय?'' असं विचारत नाना बाल्कनीत आले.

''मी म्हणतेय की, स्वयंपाक तयार आहे. तुम्ही जेवून घ्या आणि मग बाल्कनीत येऊन माझ्या जागी बसा.'' असे आदेश नानांना दिले. पडत्या फळाची आज्ञा घेऊन नाना जेवायला गेले.

राधाबाईंचं लक्ष समोरच्या खिडकीकडे अचानक गेलं आणि झटक्यात त्यांनी कॉर्डलेसचं रिडायल बटण दाबलं. समोरून फोन उचलला जाताच आस्थेनं चौकशी केल्याप्रमाणे त्या बोलल्या, ''पार्वतीबाई, तुम्ही जेवलात ना?''

''व्हय की. पॉट भरून जेवले,'' पार्वती म्हणाली.

''अगं भवाने, मग बंटीच्या दुधाची बाटली कशाला तोंडाला लावलीस?'' त्या पार्वतीवर खेकसल्या.

''नाही... मी... म्हंजे मला...'' पार्वती चाचरली. पार्वतीला असं चाचरताना पाहून राधाबाईंना फारच गंमत वाटली.

''मांजरी मेली! लाज नाही वाटत बाळाचं दूध प्यायला? याद राखऽऽ पुन्हा असं केलंस तर! माझ्याशी गाठ आहे, सांगून ठेवते!'' असा सज्जड दम राधाबाईंनी पार्वतीला भरला. हे ऐकून फोन ठेवताना पार्वतीची उडालेली भंबेरी पाहून राधाबाई खदाखदा हसू लागल्या. पोटभर जेवून ढेकर देत येता-येता, त्यांना एकाएकी हसताना पाहून नानांनी विचारलं, ''काय हो, वेडबीड लागलं की काय?''

हसू आवरत राधाबाई म्हणाल्या, ''वेड मला नाही; पण तिला नक्कीच लागणार आहे.''

''तिला? तिला कुणाला?'' काही न कळून नानांनी विचारलं. राधाबाईंनी समोर बाळाजवळच्या बाईकडे अंगुलीनिर्देश केला आणि म्हणाल्या, ''तीऽऽ त्या बाळाजवळ बसलेली बाई आहे ना... तिला.'' जबरदस्तीनं नानांच्या हाताला धरून त्यांना आपल्या खुर्चीत कोंबत राधाबाईंनी फर्मान सोडलं, ''इथे बसा आणि मी जेवण करून परत येईपर्यंत त्या समोरच्या बाळावर आणि बाईवर नीट लक्ष ठेवा. आणि मुख्य लक्ष बाळावर ठेवायचं, बाईवर नाही, हे नीट ध्यानात ठेवा,'' असं म्हणून त्यांनी दुर्बीण नानांच्या हातात घुसवली आणि स्वतः भोजनार्थ अंतर्धान पावल्या.

घाईघाईनं जेवण उरकून राधाबाई पुन्हा बाल्कनीत आल्या. नानांच्या हातातली दुर्बीण खसूकन ओढून घेऊन त्यांनी आपल्या डोळ्यांना लावली आणि समोर एक दृष्टिक्षेप टाकून आग लागल्यासारख्या ओरडल्या, ''अहोऽऽ तो फोन द्या... आधी माझ्याकडे तो फोन द्या!''

काही न कळून नानांनी फोन त्यांच्या हातात दिला आणि विचारलं, ''काय झालं तरी काय असं ओरडायला?''

''काय झालं म्हणून काय विचारता? अहो, शू करून बाळाचा लंगोट ओला झालाय आणि ती भवानी ढाराढूर झोपलीये. तुम्हाला सांगितलं होतं ना लक्ष ठेवायला?''

असं म्हणत राधाबाई फोनचं रिडायल बटण दाबत होत्या. रिंग वाजत होती, पण समोरून फोन उचलला जात नव्हता. शंका येऊन त्यांनी नानांना विचारलं, ''तुम्ही एवढ्यात कुणाला फोन केला नव्हता ना?''

''होय, महाबोलेंना फोन केला होता; पण कुणी उचललाच नाही!'' नाना म्हणाले.

''जळ्ळं तुमचं लक्षण ते!'' असं पुटपुटत राधाबाईंनी पुन्हा बोर्डवर बघून पोंक्ष्यांचा नंबर डायल केला. समोरच्या बाईनं फोन उचलून कानाला लावताच त्या खेकसल्या, ''काय गं, तुला झोपा काढायला कामावर ठेवलंय का? बाळाचा लंगोट ओला झालाय, तो आधी बदल, नाही तर बंटीला सर्दी होईल ना.''

फोनच्या आवाजानं अर्धवट झोपेतून जागी झालेल्या पार्वतीनं वैतागून विचारलं, ''पन तुमी कुठून बोलताय आणि हाय तरी कोन?''

''मी तुझी सासू बोलतेय,'' राधाबाई चिडून बोलल्या.

''पन माझी सासू तर कवाच वर गेलीय!'' पार्वती बावळटपणानं बोलली.

''मग वरूनच बोलतेय, असं समज. आता बोलण्यात वेळ न दवडता बंटीचा लंगोट आधी बदल.'' असं म्हणून राधाबाईंनी फोन कट केला आणि आदेशाचं पालन होतंय की नाही, ते पाहू लागल्या. राधाबाईंचं हे नाटक बघून नाना मात्र चांगलेच बावचळले.

राधाबाईंनी चालवलेल्या या नाटकाला शरद पोक्षेंच्या घरात मात्र वेगळंच वळण लागलं होतं.

स्मिता संध्याकाळी ऑफिसमधून घरी आल्यावर पार्वतीनं तिला अगदी निक्षून सांगितलं, ''बाई, मला ही तुमची नोकरी करायला जमायचं नाय. उद्यापास्नं तुमी बाळाला सांभाळायला दुसरी बाई ठिवा.''

हे ऐकलं मात्र, स्मिता एकदम चाटच पडली. मोठ्या कष्टानं ही बाई तिनं कशीबशी मिळवली होती. आता ही जर काम सोडून गेली, तर उद्यापासून बाळाला कोण सांभाळणार? तिच्या पोटात गोळाच आला.

''अगं, पण असं झालं तरी काय?'' स्मितानं अगतिक होऊन विचारलं. हे ऐकलं मात्र, पार्वती एकदम फिस्कारली, ''वर मलाच इचारताय व्हय, झालं तरी काय म्हणून? एवढा भवरसा नव्हता माझ्यावर, तर दुसरी बाई ठिवायची व्हती कामाला.''

''अगं, पण तुझ्यावर भरवसा आहे म्हणूनच अख्खं घर तुझ्या विश्वासावर टाकून गेलो होता ना आम्ही?'' अधिकच अगतिक होऊन स्मिता म्हणाली.

''व्हय, घर गेलात सोडून माझ्यावर, पन माझ्या मागं शीआयडी लावून दिलात!'' पार्वती पुन्हा फिस्कारली.

''सीआयडी?'' स्मितानं आश्चर्यानं विचारलं.

''व्हय... शीआयडी. ह्या बोर्डावर लिवल्यापरमानं अगदी टाइमशीर फोन येतोय बगा. बंटीची दुधाची येळ झाली– त्याला दूध दे– त्याचा लंगोट वला झालंय, त्यो बदल. बंटीला औषध दे– अशा सतराशे ऑर्डरी येत्यात फोनवरनं.'' पार्वती तणतणली.

''अगं, पण आम्ही कुणालाच सांगितलं नाही, तुझ्यावर वॉच ठेवायला!'' स्मितानं स्पष्ट केलं.

''अगं बया... मंग ह्यो भुताटकीचा परकार हाय का काय म्हनावं? न्हाय बाई, मी काही असल्या भुताटकीच्या घरात काम करनार न्हायऽऽ'' असं म्हणून पार्वती तणतणत निघून गेली.

हा प्रकार ऐकला आणि स्मिता चांगलीच विचारात पडली. 'बाप रे! म्हणजे कुणाचं तरी बारीक लक्ष आहे आपल्या घरावर; पण कुणाचं?' तिनं स्वतःलाच प्रश्न विचारला. रात्री शरद घरी आल्यावर तिनं सगळी हकिगत त्याला सांगितली आणि टीव्ही सीरियलमधल्या बायकांसारखी त्याच्या छातीवर डोकं ठेवून रडायला लागली.

''अगं, पण इतकं सीरियस होण्यासारखं काय आहे त्यात? आपल्या बंटीला काही नुकसान तर पोचवलं नाही ना तिनं?'' शरद समजूतदारपणे म्हणाला.

''अजून नाही. पण शरद, त्या बाईच्या सांगण्यावरून मला तर वाटतं की, फोनवाली बंटीची अगदी बारीकसारीक हालचाल प्रत्यक्ष बघत असावी; पण कुठून? आणि कशी? शरद, खरं सांगते, मला तर फार काळजी वाटायला लागलीय आणि भीती पण वाटतेय. संधी मिळताच तिनं बंटीला काही केलं तर?'' असं म्हणून स्मिता परत टीव्हीतल्या बायकांसारखी...

''हे बघ, तसं काही होणार नाही. ही गोष्ट मी, माझा पोलीस इनस्पेक्टर मित्र अविनाश आहे ना, त्याला सांगतो. पोरं पळवणारी टोळी पकडण्याच्या कामात तो एकदम तरबेज आहे.'' असं म्हणून शरदनं तिला शांत केलं आणि पोलीस ठाण्याला जाण्यासाठी तो बाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी सकाळचं चहापाणी आणि दुपारचं स्वयंपाकपाणी उरकून राधाबाई दुर्बीण व फोन घेऊन बाल्कनीत स्थानापन्न झाल्या. समोर खिडकीतून बघतात तो कालच्या बाईऐवजी दुसराच कुणी तरी बाप्या! राधाबाईंनी समोरच्या बोर्डावर बघून नंबर डायल केला. फोन त्या बाप्यानंच उलला.

''हॅलूऽऽऽ''

''हॅलूऽऽऽ काय? अरे, बाळाला सांभाळणारी ती पार्वती कुठे तडफडली?'' राधाबाई त्याच्यावर डाफरल्या.

''ती गेली नोकरी सोडून!'' बाप्या बेफिकिरीनं म्हणाला.

''नोकरी सोडून गेली? मग बाळाला कोण सांभाळणर? त्याचं दूध, पाणी, औषध कोण बघणार?'' राधाबाईंनी त्याच्यावर सरबत्ती केली.

''मी हाय ना. तेच्यासाठीच मला नोकरीवर ठेवलाय न्हवं?'' बाप्यानं खुलासा केलं.

''जळ्ळं तुझं लक्षण ते! तू काय मेल्या बाळाला सांभाळणार? तुझ्या त्या तानाजीसारख्या जाडजूड मिश्या बघून घाबरून जाईल बाळ!'' राधाबाईंनी शेरा मारला.

‘‘पन तुमी कोन बोलताय?’’ – बाप्याचा प्रश्न.

‘‘तुझी सासू बोलतेय मी. थांब, मी आलेच तिकडे!’’ असं म्हणून राधाबाई तरातरा जिना उतरून समोरच्या घरात प्रविष्ट झाल्या आणि थेट बाळाजवळ जाऊन त्याचा ओला झालेला लंगोट सोडू लागल्या.

‘‘कोण? राधाकाकूऽऽ तुम्ही?’’ तो बाप्या आश्चर्यानं किंचाळला.

‘‘हे बघ, माझी चौकशी नंतर कर. आधी बाळाला बदलायला लंगोट दे.’’ आणि अचानक त्यांच्या लक्षात येऊन त्या बाप्याला म्हणाल्या, ‘‘पण तू मला अगदी नावानिशी कसा ओळखतोस?’’

‘‘म्हणजे काय, तुम्ही मला नाही ओळखलंत?’’ बाप्यानं उलट प्रश्न केला.

‘‘छे! तुझ्यासारख्या जाडजूड मिश्या असलेली माणसं मला अजिबात आवडत नाहीत!’’ राधाबाई नाक उडवून म्हणाल्या.

तेव्हा कुठे आपला वेषांतराचा प्रकार अविनाशच्या लक्षात आला आणि हसत-हसत त्यानं आपली मिशी ओरबाडून काढली.

‘‘अहो काकू, मी अविनाश. तुमच्या नंदूचा मित्र. ओळखलंत?’’ राधाबाईंनी आश्चर्यानं अविनाशकडे बघितलं आणि चीत्कारल्या, ‘‘अव्या, तू? आणि पोलिसातली नोकरी सोडून इथे काय करतोयस तू? आणि हे वेषांतर कशासाठी?’’

आणि मग अविनाशनं इथे राहणारा शरद पोंक्षे हा आपला मित्र आहे, तो काल पोलीस ठाण्यात येऊन भेटला, वगैरे सगळी तपशीलवार हकिगत राधाबाईंना सांगितली आणि राधाबाईंनी पण बाल्कनीत बसून केलेली करामत अविनाशला सांगितली.

‘‘अच्छा! म्हणजे ती फोन करून पार्वतीला सूचना देणारी सीआयडीबाई तुम्ही होतात तर!’’ असं अविनाशनं म्हणताच दोघं खळखळून हसले आणि ते असे हसत असतानाच बाजूच्या खोलीत लपून हे नाटक बघत असलेली स्मिता आणि शरद ही जोडी पण बाहेर येऊन त्यांच्या हसण्यात सामील झाली.

हसता-हसता स्मिता म्हणाली, ''पण काकू, तुमच्या फोनला घाबरून आमची पार्वती मात्र नोकरी सोडून पळून गेली. आता बंटीला कोण सांभाळणार?''

''अगं, काही काळजी करू नकोस. नातवंडांना खेळवण्याची माझी हौस अजून शिल्लक आहेच. पार्वती गेली तर जाऊ दे. आजपासून ही राधाआजी सांभाळेल या बंटीला.'' बोलता-बोलता राधाबाईंनी बंटीकडे नजर वळवली आणि म्हणाल्या, ''बघ-बघ, हसतोय बघ कसा लब्बाड!'' असं म्हणून त्यांनी बंटीला छातीशी धरलं.

बाळाला आजी मिळाल्याचा आनंद शरद आणि स्मिताच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता आणि तो बघून अविनाशनं राधाबाईंना एक कडक पोलिसी सॅल्यूट ठोकला.

❒ ❒ ❒

११

# कर्तव्य

टाळ्यांच्या कडकडाटात माधवरावांनी शाल व श्रीफल, सत्कार स्वीकारला आणि त्याचबरोबर अप्पासाहेब गोगटेंकडून पाच लाखांचा चेक स्वीकारताना त्यांना भरून आलं. कारण 'गोगटे अॅन्ड सन्स' कंपनीत आयुष्यभर नोकरी करून पै-पै करून त्यांनी साठविलेला फंड आणि ग्रॅच्युइटीचा तो चेक होता. 'एक सालस, प्रामाणिक आणि सचोटीचा कर्मचारी' असं त्यांचं कौतुक करून गोगटेसाहेबांनी त्यांना तो चेक सन्मानपूर्वक प्रदान केला होता. कंपनीची चाळीस वर्षे नेकीने सेवा करून माधवराव आज सेवानिवृत्त झाले होते. नोकरीतून पायउतार होऊन कंपनीच्या पायऱ्या उतरताना त्यांचे पाय जड झाले होते; पण त्याचबरोबर कंपनीचा एक पेन्शनर म्हणून कंपनीशी त्यांचं नातं अतूट राहणार होतं, हा दिलासा त्यांना सुखावत होता.

या कंपनीत येण्यापूर्वी ते गोगटे उद्योगसमूहाच्या मुंबई कार्यालयात नोकरी करीत होते. पण पाच वर्षांनी नागपूर येथे कंपनीची शाखा सुरू झाली आणि एक अनुभवी, हुशार कर्मचारी म्हणून माधवरावांची या नव्या कार्यालयात बदली झाली होती आणि गेली तब्बल पस्तीस वर्षे या कार्यालयात कार्यक्षमतेनं व सचोटीनं सेवा करून माधवराव आज मानानं सेवानिवृत्त झाले होते.

खरं तर या निरोप समारंभातच त्यांना पेन्शनचा पहिला चेक देण्याचं अप्पासाहेब गोगटेंच्या मनात होतं; पण मुंबई कार्यालयातून माधवरावांच्या सुरुवातीच्या पाच वर्षांची कागदपत्रं न आल्यामुळे त्यांची पेन्शन थोडी रखडणार होती. पण ते काम दोन-तीन महिन्यांत होईल, असं आश्वासन अप्पासाहेब गोगट्यांनी त्यांना दिलं होतं.

अप्पासाहेब गोगट्यांच्या सांगण्यावरून खास कंपनीच्या गाडीनं माधवरावांना घरी सोडलं. माधवराव घरात आले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंनी हसून त्यांचं स्वागत केलं.

हुश्श करून माधवराव कोचावर बसले. सावित्रीबाईंनी आत जाऊन तत्परतेनं पाण्याचा तांब्या भरून आणला आणि स्वतः पाणी फुलपात्रात भरून पुढे केलं. माधवरावांनी गटागटा पाणी पिऊन तृप्ततेचा ढेकर दिला.

''कसा काय झाला निरोप समारंभ?'' सावित्रीबाईंनी उत्सुकतेनं विचारलं. ''छान झाला! भाषणात गोगटेसाहेबांनी माझी खूपच स्तुती केली. श्रीफळ आणि ग्रॅच्युइटीचा चेक देऊन माझा सत्कार केला.'' असं सांगून माधवरावांनी सत्काराची शाल सावित्रीबाईंच्या खांद्यावर घालून चेक त्यांच्या हातावर ठेवला.

''इश्श्य... हे काय भलतंच!'' असं म्हणून सावित्रीबाई लाजल्या.

''अहो, भलतंच नाही. खरं तर हा सत्कार तुमचा आहे. तुमच्या वतीनं मी तो स्वीकारला, इतकंच.'' असं म्हणून माधवरावांनी सावित्रीबाईंना जवळ घेण्याच्या उद्देशानं हात पुढे केले, पण ''बाबा, आम्ही आहोत बरं का इथं!'' असा गिल्ला करत त्यांची तीन मुलं हसत पुढे आली आणि सावित्रीबाईंनी मिस्किलपणे माधवरावांकडे बघत तोंडाला पदर लावला.

माधवरावांची ही तीन गुणी मुलं- मोठा विवेक कॉम्प्युटर सायन्स घेऊन ग्रॅज्युएट झालेला, मधली विनीता नुकतीच बी. कॉम. झालेली, तर धाकटा विजय यंदा बारावीला होता.

माधवरावांना सेवानिवृत्त झाल्याची तशी मुळीच चिंता किंवा खंत नव्हती. कारण मोठा विवेक आता त्यांच्या हाताशी आला होता. त्याच्या मदतीनं ते

विजयचं पुढचं शिक्षण पूर्ण करू शकणार होते आणि विनीताचे लग्नसुद्धा ते थाटात करणार होते. शिवाय त्यांची पेन्शन आणि फंड त्यांच्यासाठी होतेच. अशा अगदी सुखमय वातावरणात निवृत्त झाल्यामुळे ते स्वतःला भाग्यवान समजत होते.

त्यांनी अगदी प्रेमानं मुलांना जवळ घेतलं आणि येताना खास त्यांच्यासाठी आणलेली अंजीरबर्फी त्यांच्या हातावर ठेवली. बर्फी खाता-खाता विवेकचं लक्ष आईच्या हातात असलेल्या चेककडे गेलं. त्यानं आईच्या हातातला तो चेक जवळजवळ हिसकावूनच घेतला आणि वाचून ''वॉवऽ! फाइव्ह लॅक्सऽऽ'' असं तो किंचाळला. त्याच्या चेहऱ्यावरचा तो आश्चर्यमिश्रित आनंद पाहून माधवराव आणि सावित्रीबाईंना कृतार्थ वाटलं.

''बाबा, यातले तीन लाख तुम्ही मला द्यायचे.'' विवेक अधिकारवाणीनं म्हणाला.

''तुला कशाला इतके पैसे?'' माधवरावांनी हसत विचारलं

''मला कॉम्प्युटरमधल्या पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला जायचंय.'' विवेक लाडिक हट्टाने म्हणाला.

''अरे, पण विनीता आता लग्नाला आलीय, विजयचं शिक्षण व्हायचंय; त्यासाठी नकोत का पैसे?'' सावित्रीबाई मधेच म्हणाल्या.

''हो आणि तुला अमेरिकेला कशाला जायला हवं? इथं खूप चांगल्या संधी आहेत. आता या फिल्डमध्ये-'' माधवराव समजावणीच्या सुरात म्हणाले.

''अहो, पण मी अमेरिकेतला कोर्स करून आलो, तर खूप पैसे कमावता येतील. मग मी तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण करीन. माझी स्वतःची कंपनी असेल. विजय त्या कंपनीत माझा पार्टनर असेल. मग विनीताचं लग्न पण आपण शाही पद्धतीने लावून देऊ. तिच्यासाठी बंगला-गाडीवाल्याचं स्थळ बघू.'' विवेक उत्साहाने सांगत होता.

''अरे, पण हे सगळं मिळण्यासाठी तू जर आम्हाला सोडून दूर जाणार असशील, तर हे काही नकोच आम्हाला!'' माधवराव म्हणाले.

‘‘हो बाई! तुम्ही सगळे आम्हाला या म्हातारपणी आता जवळ हवे आहात.’’ सावित्रीबाई भावनावश होऊन म्हणाल्या.

‘‘अगं आई, फक्त दोन वर्षं! हां-हां म्हणता दोन वर्षं निघून जातील. मग आहोतच की आपण एकत्र!’’ पुन्हा विवेक आश्वासक सुरात म्हणाला.

‘‘अरे पण, हे पैसे मला...’’

पण त्यांना मधेच तोडून विवेक म्हणाला, ‘‘कबूल आहे, पैसे तुमचेच आहेत. पण आता लगेच कशाला हवेत तुम्हाला? तात्पुरते मला द्या. मग दामदुप्पट परत करीन मी.’’

‘‘पण मला काही हे पटत नाही.’’ माधवरावांनी आपली नाराजी व्यक्त केली.

‘‘कळलं! इतरांचे आई-बाप कर्ज काढून आपल्या मुलांना शिकवतात, पण तुम्हाला मात्र स्वतःच्या पैशांचा मोह सोडवत नाही. स्वतःच्या मुलावर विश्वास नाही. इथं मुलांनी एखादी भिकारडी नोकरी करून तुमच्या संसाराला हातभार लावावा, हीच तुमची अपेक्षा. तुम्ही स्वार्थी आई-बाप आहात!’’ असं रागानं बोलून विवेक संतापानं ताड्ताड् निघून गेला.

माधवराव आणि सावित्रीबाई भानावर आले.

सावित्रीबाईंनी पदरानं आपले डोळे पुसले आणि म्हणाल्या, ‘‘मी काय म्हणते... होऊ द्या त्याच्या मनासारखं. दोन वर्षांचा तर प्रश्न आहे.’’

...आणि विवेक अमेरिकेला गेला. दोन वर्षे होऊन गेली. मधल्या काळात बरंच पाणी पुलाखालून गेलं. सुरुवातीला विवेकचे नियमितपणे फोन यायचे. हळूहळू नियमीत फोन बंद झाले आणि मग फोन येणंच बंद झालं. विवेक तिथेच एका फार मोठ्या कंपनीत अधिकारी झाला. तिथल्याच एका मुलीबरोबर लग्न करून त्यानं तिथेच आपला संसार थाटला. माधवरावांनी त्याच्या परतीची आशाच सोडली. माधवरावांची पेन्शनसुद्धा अजून सुरू झाली नव्हती, कारण मुंबई कार्यालयाची त्यांच्या पेन्शनची कागदपत्रंच गहाळ झाल्याचं त्यांना सांगण्यात आलं. जवळ असलेल्या पुंजीवर आणि इकडे-

तिकडे किडुकमिडुक काम करून माधवराव आपल्या संसाराचा गाडा कसाबसा ढकलत होते. विनीता कुठे तरी नोकरी करून वडिलांना हातभार लावायला बघत होती; पण दुर्दैवाने तिला नोकरी मिळत नव्हती. विजयचं शिक्षण अर्धवट राहिलेलं. विवेककडून काही मदत तर सोडाच, पण साधी विचारपूससुद्धा होत नव्हती.

माधवरावांचे पेन्शनसाठी ऑफिसचे खेटे संपत नव्हते. बुडत्याला काडीचा आधार म्हणून ते एका मारवाड्याच्या पेढीवर तुटपुंज्या पगारावर हिशेब लिहायचं काम करीत होते.

एक दिवस असेच भर दुपारी ते रस्त्यातून चालले असताना घेरी येऊन रस्त्यातच आडवे झाले. नशीब थोर म्हणून उजव्या बाजूनं येणाऱ्या बस ड्रायव्हरनं करकचून ब्रेक लावला आणि ते मृत्यूच्या दाढेतून वाचले. लोकांनी उचलून त्यांना फुटपाथवर आणलं. एकानं बाजूच्या हॉटेलातून पाणी आणून त्यांच्या तोंडावर शिंपडले. शुद्धीवर आले तशी गर्दी  हळूहळू पांगली. साधारणपणे त्यांच्याच वयाच्या एका गृहस्थानं त्यांना खांद्याला धरून जवळच्या हॉटेलात नेलं. गरम-गरम चहा मागवून त्यांना पाजला आणि माधवरावांना थोडी हुशारी आली. ''एकाएकी अशी घेरी कशी आली?'' त्या गृहस्थानं आस्थेनं विचारलं.

''दोन दिवसांपासून पोटात अन्नाचा कण नाही,'' असं खोल आवाजात माधवराव म्हणाले. त्या गृहस्थानं प्रथम त्यांना हॉटेलात खाऊ घातलं. पुन्हा चहा पाजला आणि माधवरावांकडे अधिक चौकशी केली, तेव्हा त्यांना माधवरावांची सर्व कर्मकहाणी समजली, त्यांची अगतिकता लक्षात आली. ते म्हणाले, ''माझ्या ओळखीचे एक महाराज आहेत. ते संतमार्गी आणि परोपकारी आहेत. तुमची इच्छा आणि विश्वास असेल, तर आपण त्यांना भेटू. ते तुमच्या समस्येवर काही इलाज सांगतील.

''पण अंगारे-धुपारे, जादूटोणा, करणी असल्या गोष्टी ते करत नाहीत. मुख्य म्हणजे ते कुणाकडून एक पैसाही घेत नाहीत. चला, तुम्ही माझ्याबरोबर!'' असं म्हणून गृहस्थ उठले.

''माफ करा, पण हॉटेलचं बिल द्यायला...'' माधवराव असं म्हणताच ''त्याची तुम्ही काळजी करू नका.'' असं म्हणून त्यांनी बिलं दिलं आणि दोघं बाहेर पडले.

माधवराव आणि ते गृहस्थ दोघेही एका जुन्या चाळीचा जिना चढत होते.

''माफ करा; पण मी तुमचं नावसुद्धा विचारलं नाही–'' जिना चढताना माधवराव म्हणाले.

''श्रीधर जोशी माझं नाव; पण ते महत्त्वाचं नाही– महत्त्वाचं आहे ते तुमच्या समस्येवर इलाज सापडणं.'' असं बोलत दोघं एका बंद दारासमोर आले. जोशींनी कडी वाजवली. एका धीरगंभीर पण प्रसन्न चेहऱ्याच्या माणसानं दार उघडलं. ''या जोशीबुवा!'' असं म्हणून हसत त्यांनी स्वागत केलं. दोघंही आत गेले.

आत मोठ्या जाड सतरंज्या टाकल्या असतील, त्यावर महाराजांचे भक्तगण बसले असतील, समोर मोठा देव्हारा असेल, देव्हाऱ्यात पुष्पमाला मांडलेली, स्वामींची तसबीर असेल; समोर दोन मोठ्या समया तेवत असतील; देव्हाऱ्यासमोर धूप–उदबत्त्यांचा धूर पसरला असेल; फळाफुलांचा, पेढ्यांचा खच पडला असेल... अशी माधवरावांची कल्पना होती. पण प्रत्यक्षात तसं काहीही नव्हतं. आत साध्या फोल्डिंगच्या दोन खुर्च्या होत्या. समोर एक सेटी होती. भिंतीवर ज्ञानेश्वर, विवेकानंद, रामदास यांचे फोटो होते. कोपऱ्यात एक छोटा टीव्ही होता.

दोघं आत जाऊन खुर्चीवर बसले. महाराज सेटीवर बसले. ''बोला जोशीबुवा, कसं येणं केलंत आज?'' महाराजांनी विचारलं.

''सांगतो. आधी तुमची ओळख करून देतो. हे माधवराव करमरकर आणि माधवराव हे नाना शिरगोपीकर. आम्ही यांना नानामहाराज असं म्हणतो.'' जोशींनी ओळख करून दिली. माधवरावांनी नम्रपणे त्यांना नमस्कार केला.

मग जोशींनी नानामहाराजांना सगळी कर्मकहाणी सांगितली. मुख्य म्हणजे त्यांची पेन्शन रखडल्यामुळे कशी दुरवस्था झाली आहे, ते सांगितलं.

नानामहाराजांनी सर्व नीट ऐकून घेतलं आणि नमस्कार करून डोळे मिटून घेतले. खोलीत गंभीर शांतता पसरली. नानामहाराज ध्यानस्थ झाले होते. सुमारे अर्ध्या तासानं त्यांनी डोळे उघडले, तेव्हा माधवरावांना त्यांच्या डोळ्यांत एक वेगळंच तेज दिसलं. क्षणभर थांबून नानामहाराज बोलायला लागले–

''मी काही काळ गुरुमाऊलीच्या चरणी लीन झालो होतो आणि या ध्यानावस्थेत एकच नाव सारखं माझ्यासमोर येत होतं आणि ते नाव म्हणजे गजानन गोगटे. हे नाव तुम्हाला परिचित आहे का?'' त्यांनी माधवरावांना विचारलं.

पण माधवरावांना काही केल्या आठवेना. नानामहाराज म्हणाले, ''बघा, स्मरणशक्तीला ताण द्या आणि आठवा. हे नाव नक्कीच तुम्हाला परिचित असले पाहिजे. नव्हे, या नावाशी तुमचा घनिष्ठ संबंध असला पाहिजे. त्याशिवाय तुमच्या संदर्भात हे नाव सारखं माझ्यासमोर येणार नाही.''

माधवरावांनी आपल्या स्मरणशक्तीला पुन्हा ताण दिला. त्यांना अप्पासाहेब गोगटे आठवले, तात्यासाहेब गोगटे आठवले, बाळासाहेब गोगटे आठवले. ही सगळी नावं गोगटेसमूहाच्या मालकांचीच होती. पण त्यात गजानन गोगटे कोण? कोण? कोण? आणि अचानक त्यांना आठवलं– यस्! हाच तो गजानन! अण्णासाहेब गोगट्यांचा मुलगा– गजानन गोगटे.

त्या वेळी ते मुंबई ऑफिसमध्ये काम करीत होते. एक दिवस 'गोगटे उद्योगसमूहा'चे मालक अण्णासाहेब गोगटे यांनी माधवला केबिनमध्ये बोलावलं. त्या वेळी अण्णासाहेबांसमोर एक तरुण, हुशार, चुणचुणीत दिसणारा असा देखणा मुलगा बसला होता. अण्णासाहेब त्यांना म्हणाले, ''श्री. करमरकर, हा गजानन–माझा मुलगा. यानं नुकतंच आपलं शिक्षण पूर्ण केलं आहे. हा जरी कंपनीचा भावी मालक असला, तरी त्यानं कंपनीच्या कामकाजाची मुळापासून माहिती करून घ्यावी, अशी इच्छा आहे; आणि म्हणून आजपासून मी त्याला तुमच्या हाताखाली देत आहे. तेव्हा त्याला आपल्या कामकाजाचं ट्रेनिंग द्यायला तुम्ही सुरुवात करा. पण लक्षात ठेवा, ट्रेनिंग देत असताना हा आपल्या मालकाचा मुलगा आहे, ही भावना मुळीच ध्यानात येऊ देऊ नका. आपल्या इतर स्टाफपैकीच तो एक आहे, असं काम करून घ्या.'' असं सांगून

अण्णासाहेबांनी त्याला माधवरावांच्या ताब्यात दिलं होतं. आज त्या गोष्टीला पस्तीसएक वर्षं झाली होती. यस्! हाच तो गजानन गोगटे!

''आठवलं महाराज, आमचे थोरले मालक अण्णासाहेब गोगटेंचा मुलगा गजानन गोगटे. आम्ही काही दिवस एकत्र काम केलं होतं. त्या वेळी आमची खूप घनिष्ठ मैत्री झाली होती. माझ्याकडे त्यानं काम शिकायला सुरुवात केली होती, म्हणून गमतीनं तो मला करमरकरगुरुजी म्हणायचा. तोच हा गजानन गोगटे. पण या गोष्टीला आता पस्तीस वर्षे होऊन गेलीत.''

''असू द्या. या गजानन गोगटेला जाऊन भेटा. तो तुमची सगळी कामं मार्गाला लावील. शुभम् भवतु।'' असं म्हणून नानामहाराजांनी दोघांना निरोप दिला.

श्रीधर जोशींनी माधवरावांना अगदी घरापर्यंत आणून सोडलं. माधवराव 'नको-नको' म्हणत असताना काही नोटा बळे-बळेच त्यांच्या खिशात कोंबल्या. मुंबईला जाण्यासाठी उपयोगी पडतील, असे म्हणून माधवराव उच्चारीत असलेले आभाराचे शब्द न ऐकताच ते निघून गेले. माधवरावांनी घडलेली सर्व हकिगत सावित्रीबाईंना सांगितली. ''अहो, पण ते गजानन गोगटे म्हणजे कंपनीच्या मोठ्या मालकांचे चिरंजीव. ते आता इतक्या वर्षांनी तुम्हाला ओळख तरी देतील का? आणि आता तर ते स्वतःच्या कंपनीचे मालक झाले असतील. मग तर तुम्हाला ते भेटतील की नाही, ही पण मला शंकाच आहे!'' हकिगत ऐकून सावित्रीबाई म्हणाल्या.

''असू दे!'' असं म्हणून माधवरावांनी मुंबईला जायची तयारी केली. सावित्रीबाईंनी हातावर दही देऊन त्यांना निरोप दिला.

''कुणाला भेटायचंय आपल्याला?'' रिसेप्शनिस्टनं माधवरावांना विचारलं.

''गजानन गोगटेंना,'' माधवरावांनी सांगितलं.

''कुणाला म्हणालात?'' रिसेप्शनिस्टनं भुवया वर ताणून पुन्हा विचारलं.

''गजानन गोगटेंना.'' माधवराव पुन्हा म्हणाले.

''म्हणजे भाऊसाहेबांना का?'' तिनं पुन्हा विचारलं.

''कोण भाऊसाहेब?'' माधवरावांनी विचारलं.

''अहो, कोण भाऊसाहेब काय? 'गोगटे ॲन्ड सन्स'चे मालक.'' रिसेप्शनिस्टनं जरा तोऱ्यातच सांगितलं.

माधवरावांनी अंमळ विचार केला आणि म्हणाले, ''हो-हो, त्यांनाच भेटायचंय.''

''काय काम आहे?'' पुन्हा विचारणा झाली.

''जरा काम होतं-'' माधवराव म्हणाले.

''हे बघा, काही ऑफिशियल काम असलं, तर समोरच्या केबिनमध्ये देशपांडेसाहेबांना भेटा.'' रिसेप्शनिस्ट म्हणाली.

''पण मला गजानन गोगटेंनाच- आय मीन भाऊसाहेबांनाच भेटायचंय.'' माधवराव निग्रहानं म्हणाले.

''तुम्ही आधी अॅपॉइंटमेंट घेतली आहे काय?'' रिसेप्सनिस्टनं विचारलं.

''नाही, पण...''

''मग अॅपॉइंटमेंटशिवाय नाही तुम्ही त्यांना भेटू शकत. ती आधी घ्या आणि मग त्यांना भेटायला या.'' रिसेप्शनिस्ट म्हणाली.

''पण तुम्ही त्यांना विचारून आणि माझं नाव सांगून तर पाहा-'' माधवरावांनी नम्रपणे पण आग्रहाने सांगितलं.

''काय कटकट आहे!'' असं म्हणून रिसेप्शनिस्टनं इंटरकॉम उचलून एक बटण दाबलं.

''हॅलो, सर, कुणी माधवराव करमरकर नावाचे गृहस्थ आले आहेत. तुम्हालाच भेटायचं म्हणत आहेत... नाही... काम काय आहे, ते सांगतच नाहीत. तुमच्याशीच बोलीन, असं म्हणत आहेत... ठीक आहे सर,'' असं म्हणून तिनं रिसीव्हर ठेवला. ''पहिल्या माळ्यावर दोन नंबरच्या केबिनमध्ये जा,'' असं तिनं माधवरावांना सांगितलं.

माधवरावांनी तिचे आभार मानले आणि पहिल्या माळ्यावर दोन नंबर केबिनच्या दारासमोर येऊन उभे राहिले. केबिनचं दार ढकलण्यापूर्वी मनोमन महाराजांचं स्मरण केलं आणि अर्धवट दार ढकलून म्हणाले, ''मे आय कम इन सर?''

भाऊसाहेबांनी समोरच्या फाईलमधून डोकं वर न काढताच विचारलं, ''यस्! व्हॉट कॅन आय्...'' असं म्हणताना त्यांनी वर बघितलं आणि काही क्षण बघतच राहिले; आणि अचानक ''ओह... करमरकरगुरुजी!'' असं म्हणत झटक्यात आपल्या जागेवरून उठले आणि धावत केबिनच्या दारापर्यंत येऊन त्यांनी माधवरावांना आपल्या मिठीत घेतलं. काही क्षण दोघांच्या तोंडांतून शब्द फुटेना. माधवरावांच्या डोळ्यांतून मात्र घळाघळा अश्रू ओघळू लागले. भेटीचा पहिला आवेग ओसरल्यावर भाऊसाहेब खुर्चीकडे नेऊन त्यांना बसवत म्हणाले, ''किती वर्षांनी भेटतोयस माधव!'' त्यांचेही डोळे पाणावले. मग बेल मारून त्यांनी रिसेप्शनिस्टला बोलावून घेतला. ती आल्यावर म्हणाले, ''हे माधव करमरकर. या कंपनीत कामकाजाचे पहिले धडे मी त्यांच्याकडूनच घेतले. पस्तीस वर्षे झाली या गोष्टीला. यांच्या हाताखाली मी शिकलो, म्हणून मी त्यांना त्या वेळी गमतीनं करमरकरगुरुजी म्हणायचो.'' यावर रिसेप्शनिस्टनं कौतुकानं माधवरावांकडे बघून त्यांना वाकून नमस्कार केला.

''आता आम्हा दोघांना कॉफी पाठवून दे आणि आजच्या माझ्या सगळ्या अपॉइंटमेंट्स कॅन्सल कर. मी सांगेपर्यंत कोणालाही माझ्याकडे पाठवू नकोस.'' असं सांगून तिला निरोप दिला. अनवधानानं आणि अज्ञानानं माधवरावांना प्रतीक्षा करायला लावल्याबद्दल क्षमायाचना करून रिसेप्शनिस्ट निघून गेली.

''भाऊसाहेब, तुम्ही...''

''अरे काय बोलतोयस तू माधव! अरे, गजानन म्हणायचास तू मला.''

''हो, पण आता तुम्ही मालक...''

''छे, छे- भलतंच! अरे, मी मालक झालो; पण इतरांसाठी, तुझ्यासाठी मी तोच गजानन आहे- शिष्य! तू मला सरळ गजानन म्हण, पूर्वीसारखा. खूप-खूप आनंद झाला बघ तुला भेटून. आमचे अण्णा तुझी नेहमी आठवण काढायचे. असो. तुला कशी काय आठवण झाली या मित्राची?''

आणि माधवरावांनी आपण नागपूरच्या ऑफिसमधून रिटायर्ड झाल्यावर फंडाचे पैसे मुलाला कसे दिले, तो अमेरिकेतून परत आलाच नाही, कागदपत्रं

गहाळ झाल्यामुळे अजून पेन्शन मिळाली नाही, मुलीचं लग्न पैशांअभावी रखडले आहे; मुलांचे शिक्षण अर्धवट झाले आहे, अमेरिकेतला मुलगा विचारत नाही... ही सगळी हकिगत गजाननाला सांगितली.

'त' वरून ताकभात कळणाऱ्या हुषार गजाननाच्या लक्षात सगळा प्रकार आला. ''विवेक अमेरिकेत कुठल्या कंपनीत कामाला आहे?'' त्यानं विचारलं. अमेरिकेतल्या हॅरिसन कंपनीत तो मोठ्या पगारावर काम करीत असल्याचं माधवरावांनी सांगितलं.

''ओके!'' असं म्हणून गजाननानं इंटरकॉम उचलून एक बटण दाबलं आणि फोनवर म्हणाले, ''मि. देशपांडे, ताबडतोब माझ्या केबिनमध्ये या.'' थोड्याच वेळात देशपांडे आले. भाऊसाहेब म्हणाले, ''मि. देशपांडे, हे माझे परममित्र मि. माधवराव करमरकर. हे पस्तीस वर्षांपूर्वी आपल्या कंपनीत काम करीत होते. आपली नागपूर शाखा सुरू झाल्यावर अण्णासाहेबांनी एक हुशार आणि कर्तबगार कर्मचारी म्हणून त्यांची बदली नागपूरला केली.

''दोन वर्षांपूर्वी ते तिथून रिटायर्ड झालेत. पण पस्तीस वर्षांपूर्वी ते इथं काम करत असतानाचे त्यांचे सर्व्हिस पेपर्स गहाळ झाल्यामुळे त्यांची पेन्शन अजून सुरू झाली नाही. सो, डू दि नीडफुल ॲट वन्स. आणि एका आठवड्यात त्यांची पेन्शन सुरू झाल्याचा रिपोर्ट माझ्या टेबलावर हवा. सो गो ॲन्ड स्टार्ट वर्किंग ऑफ धिस.''

''यस् सर!'' असं म्हणून देशपांडे गेले.

''थँक्यू! आणि तुझा वेळ घेतल्याबद्दल सॉरी...'' असं म्हणून माधवराव जाण्यासाठी उठले.

''हे बघ, तुझ्या या थँक्यू आणि सॉरीसारख्या शिव्या मी अजिबात ऐकून घेणार नाही. आणि निघालास कुठं? तुझ्या वहिनीला भेटणार नाहीस? अरे, तुमची प्रत्यक्ष भेट झाली नसली, तरी मी तुझ्याबद्दल इतकं सांगितलंय की, तू येऊन परस्पर निघून गेलास हे जर तिला कळलं, तर मला फाडून खाईल! आणि माझ्या नातवंडांना भेटशील की नाही?'' असं म्हणून भाऊसाहेबांनी घरी मोबाईल लावला. ''हे बघ वृंदा, मी त्या माधव करमरकरबद्दल बोलताना

नेहमी सांगायचो ना, तो नागपूरहून आलाय. आम्ही दोघं जेवायला घरी येतोय– हो, हो! मुक्कामाला तो आपल्याकडेच राहणार आहे,'' असं सांगून भाऊसाहेबांनी मोबाईल ऑफ केला आणि हसत अन् कौतुकानं ते माधवरावांकडे पाहत राहिले.

आणि पुढच्याच आठवड्यात माधवरावांना त्यांची पेन्शन एक तारखेपासून सुरू झाल्याचं कंपनीचं पत्र आलं. सोबत मागील थकबाकीचा चेक पण जोडलेला होता. माधवरावांनी मनोमन श्रीधर जोशींचे, महाराजांचे आणि गजानन गोगटेंचे आभार मानले. प्रत्यक्षा ते तसं करूच शकत नव्हते, कारण ही माणसं त्यापलीकडची होती.

अमेरिकेतल्या हॅरिसन कंपनीतला फोन जोरात खणखणला. रिसेप्शनिस्टनं तो घेतला.

''हॅलो, मे आय स्पीक टू हॅरी?''

''हू इज स्पीकिंग प्लीज?''

''आय ॲम गजानन फ्रॉम इंडिया.''

''वन मिनिट प्लीज,'' असं म्हणून तिनं हॅरीच्या इंटरकॉमचं बटण दाबलं. तिला काही नाव नीट समजत नव्हतं. आतून फोन उचलल्यावर 'समबडी गॅजॅनन फ्रॉम इंडिया वॉंट्स यू' असं म्हणून तिने फोन ठेवून दिला.

''हॅलो ...'' हॅरीनं फोन घेतला.

''हू–ज इट?'' पलीकडून विचारलं गेलं.

''आय एम हॅरिसन स्पीकिंग.''

''ए... ह्या लेका, नारायण हरी म्हण की! नारायण हरी नावाची लाज वाटते म्हणून लेका कंपनीचं नाव हॅरिसन ठेवलंस, ते ठीक आहे. पण, माझ्याशी बोलताना पण हॅरिसन?''

''कोण, गजानन? अरे, तुझा फोन आहे असं वाटलं नव्हतं, म्हणून... एनी वे, बोल काय म्हणतोस?''

''अरे, तुझ्या कंपनीत विवेक करमरकर म्हणून आपला कुणी इंडियन कामाला आहे का?''

''हो, आहे ना. व्हेरी क्लेव्हर बॉय– तर त्याचं काय?'' आणि मग नारायण हरी व गजाननचं बोलणं बराच वेळ चाललं होतं.

''सर, आपण मला बोलावलंत?'' विवेकनं अदबीनं हॅरीला विचारलं.

''हं... बसा.. मि. विवेक, आपली ही कंपनी एका इंडियन आणि त्यातूनही एका मराठी माणसाची आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे ना?''

''यस सर, मला ते चांगलंच ठाऊक आहे. आणि म्हणून अमेरिकेत नोकरी करू इच्छिणाऱ्या फक्त मराठी माणसांनाच आपण नोकरी देता, हेसुद्धा आम्हाला ठाऊक आहे सर.''

''आणि अशा मुलांकडून इंडियात, महाराष्ट्रात असलेल्या त्यांच्या पालकांना–आई–वडिलांना मदत व्हावी, या उद्देशाने आपल्या कंपनीनं एक नियम केला आहे. तो पण तुम्हाला ठाऊक असला पाहिजे?''

''हो, ठाऊक आहे सर.''

''काय आहे तो नियम–''

''तो नियम असा आहे की, अशा मुलांनी आपल्याला मिळणाऱ्या पगाराच्या दहा टक्के इतकी रक्कम आपल्या आई–वडिलांना पाठवावी.'' विवेकनं सांगितलं.

''पण हे टाळण्यासाठी आपल्याला आई–वडीलच नाहीत, अशी खोटी माहिती तुम्ही कंपनीला दिलीत.''

''सॉरी सर, पण मी...''

''डोन्ट टॉक रबिश... अरे, ज्या आई–वडिलांनी तुमचं पालनपोषण करण्यासाठी, तुमची आजारपणं काढण्यासाठी, तुमची शिक्षणं पूर्ण करण्यासाठी, तुम्ही सुखी राहावं म्हणून जन्मभर खस्ता खाल्ल्या; त्या आई–वडिलांना पैसे पाठवायला लागू नयेत म्हणून चक्क तुम्ही त्यांना जिवंतपणीच मारलंत? शेम ऑन यू! तुमच्यासारखी मुलं असण्यापेक्षा नसलेली बरी!''

''सॉरी सर, पण मी थोड्या दिवसांनी...''

''काय? थोड्या दिवसांनी काय? तुम्हीच मारलेल्या आई-बापांना तुम्ही पुन्हा जिवंत करणार होता की काय? अजून तुम्ही खोटं बोलत आहात. आणि खोटं बोलणारी माणसं मला अजिबात आवडत नाहीत. आजपासून मी तुम्हाला कामावरून काढून टाकलंय आणि अमेरिकेत दुसरीकडे कुठेच नोकरी मिळणार नाही, याकडे मी जातीनं लक्ष देईन... नाऊ गेट आउट!''

हे ऐकून मात्र विवेक हादरला. त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. तो हॅरिसनच्या अक्षरशः पायांवर पडला आणि क्षमायाचना करू लागला. ''मला नोकरीवरून काढू नका. माझी बायको-मुलं उपाशी मरतील.'' असं सांगू लागला.

''जो विचार तू स्वतःच्या बायको-मुलांबद्दल करतोयस, तो विचार जन्मदात्या आई-वडिलांबद्दल का केला नाहीस? नो एक्सक्यूज, गेट आऊट!'' हॅरिसन संतापानं त्याच्या अंगावर ओरडला.

विवेकनं पुनः पुन्हा विनवणी केल्यावर हॅरी म्हणाला, ''तू आतापासून तुझ्या पगारातील दहा टक्के रक्कम आई-वडिलांना पाठवणार आहेस. अर्थात ती रक्कम नियमानं कंपनी डायरेक्ट तुझ्या आई-वडिलांना पाठवीलच. पण इथं नोकरी लागल्यापासून तुला जो पगार मिळालाय, त्याच्या दहा टक्के रक्कम तू ताबडतोब आई-वडिलांना पाठव, तर आणि तरच तुझी नोकरी टिकेल; नाही तर अमेरिकेत तुला स्थान नाही, हे लक्षात ठेव!''

पुढच्याच महिन्यात माधवरावांना अमेरिकेतून पाच लाख रुपयांचा ड्राफ्ट आला आणि त्याचबरोबर 'यापुढे मी नियमितपणे पैसे पाठवीन', असं पत्रही आलं. आतापर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं याबद्दल विवेकनं त्यांची क्षमाही मागितली होती. हे सर्व झालं कसं? या मुलाला ही उपरती झाली कशी? - हा प्रश्न माधवराव आणि सावित्रीबाईंना पडला.

ही गोष्ट गजानन गोगटेला सांगितलीच पाहिजे, म्हणून माधवराव खास मुंबईला गेले आणि विवेकमध्ये हा आश्चर्यकारक बदल झाल्याबद्दल गजाननकडे त्याचं तोंडभरून कौतुक केलं. तेव्हा गजानन त्यांना म्हणाला, ''माधव, अरे, हल्लीच्या मुलांना सहजासहजी आपल्या कर्तव्याची जाणीव होत नाही. त्यासाठी त्यांचं नाक दाबावं, तेव्हा तोंड उघडतं. मी त्याचा नाक दाबण्याचं काम केलं, इतकंच!'' आणि रहस्याचा भेद झाल्यानं माधवराव खळाळून हसले.

❐ ❐ ❐

१२

# मातृत्व

““वा! अपर्णावहिनी, भजी एकदम मस्त झालीत. आमच्याकडे अशी कधीच होत नाही, बघा!'' असं शेखरनं म्हणताच अपर्णावहिनी भलत्याच सुखावल्या. पण तिथंच उभी असलेली शेखरची पत्नी शीला मात्र फणकारून आणि डोळे वटारून शेखरवर एकदम फिस्कारली, ''कायऽऽ काय म्हणालात? पुन्हा एकदा बोला पाहू?'' आणि हे ऐकताच स्वतःच्या बायकोबद्दल इतर बायकांसमोर असं बोलण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल सावरून घेण्यासाठी पट्‌कन म्हणाला, ''नाही, म्हणजे मला असं म्हणायचं होतं की...'' आपल्या डाव्या हाताची तर्जनी त्याच्या नाकासमोर नाचवीत त्याच चढ्या आवाजात शेखरची बंद झालेली बोलती पुढे सुरू करण्यासाठी शीला म्हणाली, ''तेच... तेच विचारतेय मी– काय म्हणायचं होतं तुम्हाला?'' हे ऐकून शेखरने चाचरतच आपले म्हणणे पुढे रेटले, ''म्हणजे हेच गं की, तशी भजी तू छानच करतेस गं... म्हणजे कांद्याची, बटाट्याची, गळक्याची वगैरे... पण वांग्याची भजी आपल्याकडे कधी होतच नाहीत ना... म्हणून...''

''मग बोलायचंत कधी तरी मला की, तुम्हाला वांग्याची भजी खायचे डोहाळे लागलेत म्हणून!'' शीला पुन्हा शेखरवर फिस्कारली.

प्रकरण जास्त वाढायला नको म्हणून यजमानपदाचं कर्तव्य समजून श्रीकांतनं हस्तक्षेप केला आणि म्हणाला, ''हे बघा शेखर आणि शीला, आपण आपल्या बंगल्यात माझ्या प्रमोशनची पार्टी एंजॉय करण्यासाठी जमलोय. सो, नो भांडण... काय अय्यरसाहेब?'' तोंडात एकदम दोन गुलाबजाम कोंबलेला अय्यर श्रीकांतच्या बोलण्याची री ओढण्यासाठी लगबगीने पुढे सरकत असतानाच टेबलाखाली खेळत असलेल्या दोन लहान मुलांपैकी एक जण झट्कन अचानक बाहेर आला आणि त्याला अडखळून अय्यर पुढच्या टेबलावर झेपावला अन् त्याचा हात लोणच्याच्या बरणीवर पडून सगळे लोणचे त्याच्या पांढऱ्याशुभ्र लुंगीवर सांडले आणि ती लालेलाल झाली.

''अय्यो! वाट्टूळं केलं की वो माज्या लुंगीचं! जीवन, तुझंच की हे पोरगं... काय...''

''उत्तम!'' असं अय्यरच्या मागेच उभा असलेला जीवन म्हणाला.

''लोणचं झालं आणि तू उत्तम म्हणतं?... अं... उत्तम काय म्हणतं? माझं लुंगीचं लोणचं झालं आणि तू उत्तम म्हणतं?... आं...'' अय्यर पटकन मागे वळून जीवनवर किंचाळलाच. ''सॉरी मिस्टर अय्यर, तुमची लुंगी खराब झाली, त्याला मी उत्तम नाही म्हणालो. मी माझ्या मुलावर ओरडलो. त्याचं नाव उत्तम...''

जीवनच्या खुलाशावर अय्यर पुन्हा त्याच स्वरात किंचाळला, ''सगळं लुंगी खराब– वाईट्ट करून टाकलं बघ.''

''सॉरी... व्हेरी सॉरी, मि. अय्यर!'' जीवनने पुन्हा माफी मागितली.

''आता सॉरी म्हणून काय उपयोग? मी आधीच सांगत होते, याला बरोबर नको घेऊ या म्हणून... पण तुमचाच हट्ट त्याला बरोबर आणायचा!'' जीवनची पत्नी जानकी फणकारली. आता हे दुसरं भांडण उद्‌भवायला नको, म्हणून परत एकदा यजमान श्रीकांतने हस्तक्षेप केला.

''असू द्या हो जानकीवहिनी– आणलं बरोबर, तर काय झालं?''

''बघितलंत ना तुम्ही काय झालं ते? पार्टीचा विचका केला कार्ट्यानंऽ'' जानकी पुन्हा सणसणली.

''अगं, काय बोलतेस तू हे जानकी? मुलं नाहीत तर पार्टीत मजा कसली?'' असं म्हणून श्रीकांतची पत्नी अपर्णाने बावरलेल्या उत्तमला प्रेमानं जवळ घेतलं.

''बरोबर आहे! खोड्या मुलं नाही तर काय आपण करणार?'' श्रीकांतने अपर्णाची री ओढली.

''तुमचं काय जातं वो असं बोलायला? तुमाला तर मूलच होत नाही ना?'' आतापर्यंत शांत असलेल्या मिसेस अय्यरांनी आपली हजेरी लावली.

मिसेस अय्यरांचं हे बोलणं मात्र श्रीकांत आणि अपर्णाच्या मनाला चांगलंच टोचलं. पार्टीतली इतर मंडळी पण मिसेस अय्यरांचं हे बोलणं ऐकून एकदम स्तब्ध झाली. इतक्यात शीलाच्या मांडीवरचा प्रणव जोरजोरात रडू लागला. ''घ्या! राजश्री उठले. म्हणजे माझ्या खाण्याचे झाले तीनतेरा!'' शीला शेखरकडे पाहत म्हणाली. यजमानीणपदाला जागून अपर्णा जणू काहीच झालं नाही असं भासवत शीलाला म्हणाली, ''शीला, प्रणवला दे माझ्याकडे. मी त्याला गप्प करते. तुझं खाणं होऊ दे आरामात.''

''नको, असू दे माझ्याच जवळ–'' असं म्हणून शीला थोपटायचा बहाणा करून मांडीवरच्या प्रणवला जर घुश्श्यातच धपाटे घालू लागली. हे सगळं बघणारा शेखर थोड्या अजीजीनंच शीलाला म्हणाला, ''अगं, असं काय करतेस? दे ना प्रणवला अपर्णावहिनींकडे. तुला आरामात खाता येईल. तोपर्यंत अपर्णावहिनी सांभाळतील त्याला.''

''नको. असू देत माझ्याच जवळ.'' शीला निकरानं म्हणाली.

''अगं, हा कसला हट्ट तुझा? अपर्णावहिनी नीट सांभाळतील त्याला'' शीलावर थोडंसं कातावूनच शेखर बोलला.

''ती काय खाक सांभाळणार? लग्न होऊन तब्बल दहा वर्षे झालीत, तरी अजून कूस कोरडीच. मुलं सांभाळण्याचा अनुभव फक्त एका आईलाच असू शकतो!''

हा घाव मात्र अपर्णा सहन करू शकली नाही. तिचे डोळे भरून आले. घायाळ मनाने ती आत निघून गेली. सगळी पार्टी पुन्हा एकदा स्तब्ध झाली...

कुणीच काही बोलेना. शेवटी या शांततेचा भंग करीत शेखरच शीलाला म्हणाला, ''शीला, तू अपर्णावहिनींना असं बोलायला नको होतंस,'' असं म्हणून तो श्रीकांतजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''सॉरी... श्रीकांत, व्हेरी सॉरी-'' पण यावर काहीच न बोलता श्रीकांत गुपचूप आत निघून गेला.

श्रीकांत ऑफिसचे काम करण्यात इतका गढला होता की, शेखर कधी येऊन समोर बसला, हे त्याला कळलेच नाही. काही तरी आठवून शिपायाला बोलवायला म्हणून त्याने मान वर केली, तर समोर शेखर!

''अरे, तू केव्हा आलास?'' पण त्याच्या ह्या प्रश्नाला उत्तर न देता शेखर एकदम अजीजीनं म्हणाला, ''सॉरी ... श्रीकांत, आय ॲम व्हेरी सॉरी.. रिअली सॉरी...'' असं म्हणत श्रीकांतसमोर शेखरने खरोखरच हात जोडले.

''छोडो यार! तू एवढं सीरियस का होतोस? आणि काय खोटं बोलली शीला? आई झाल्याशिवाय मुलं सांभाळण्याचा अनुभव नसतोच कुणाला!'' श्रीकांतने शेखरला चुचकारले.

''श्रीकांत, मला एक गोष्ट सांगायचीय तुला-''

''मग बोल ना...''

''इथं नको- संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर कँटीनमध्ये भेटू नक्की,'' असं म्हणून शेखर केबिनचं दार उघडून निघून गेला. श्रीकांत त्या दिशेने बघतच राहिला.

दोघेही ऑफिसर्स मेसमध्ये गरम-गरम वाफाळलेला चहा पीत बसले होते. ''हं... बोल शेखर... काय सांगायचं होतं तुला?'' घोट घेत-घेत श्रीकांतनं विचारलं.

''श्रीकांत, म्हणजे तू वाईट वाटून घेणार नसलास, तर एक गोष्ट विचारू?'' शेखर म्हणाला.

''नो घडाभर तेल फॉर नमन. कम टू दि पॉइंट!'' श्रीकांतने हसतच त्याला बढावा दिला.

''श्रीकांत, मुलासाठी तू अपर्णावहिनींची डॉक्टरी तपासणी का करून घेत नाहीस?'' शेखरने सरळ प्रश्न केला.

‘‘का? अपर्णाचीच का, माझी का नाही? दोष माझ्यातही असू शकतो!’’ श्रीकांत म्हणाला.

‘‘तेच म्हणतोय मी. तुम्ही दोघंही तपासणी का करून घेत नाही? सॉरी... म्हणजे तू वाईट वाटून घेणार नसशील तर...’’

‘‘अरे, वाईट काय वाटायचं त्यात? आम्ही दोघांनीही आधीच तपासणी करून घेतलीय. आम्हा दोघांतही दोष नाही. पण ईश्वरचीच इच्छा नाही, त्याला आपण काय करणार? एनी वे... माझ्याबद्दल इतकी आस्था दाखवलीस त्याबद्दल...’’

‘‘नो... नो थँक्स बिझिनेस ॲट ऑल... अरे, मैत्रीत कसले आभार?’’ असं म्हणत शेखरने संपलेल्या चहाचा मग खाली ठेवला आणि काही तरी सुचून एकदम म्हणाला, ‘‘यार श्रीकांत, तुम्ही असं का नाही करीत? मला वाटतं, तुम्ही एक छोटंसं बाळ दत्तक घ्यावं. काय हरकत आहे? एखाद्या अनाथ बाळाला दत्तक घेतलंस, तर त्याचंही कल्याण होईल आणि तुम्हा दोघांचंही मन रमेल.’’ शेखरने सुचवले.

‘‘कन्सिडरेबल; पण असं बाळ मिळणार कुठे?’’

‘‘ते तू माझ्यावर सोड. गोव्यात एक अनाथ बालकाश्रम आहे. तिथं अगदी वीस दिवसांपासून चार महिन्यांपर्यंतची मुलं मिळतात; पण त्या आधी तू अपर्णावहिनींशी कन्सल्ट कर.’’

‘‘पण अपर्णा या गोष्टीला तयार होईल?’’ श्रीकांत अर्धवट प्रकट आणि अर्धवट स्वतःशीच बोलला.

‘‘नाही.. नाही... नाही... या गोष्टीला मी अजिबात तयार नाहीऽ’’ अपर्णा निग्रहाने म्हणाली.

‘‘काय हरकत आहे अपर्णा? आपल्या घरात एखाद्या छोट्याशा बाळानं खेळावं, असं नाही वाटत तुला?’’ श्रीकांतने समजावणीच्या सुरात विचारलं.

‘‘वाटतं की; पण अनाथाश्रमातलं नाही.’’ अपर्णा म्हणाली.

‘‘का? अनाथाश्रमातल्या मुलात काय वाईट आहे?’’ – श्रीकांत.

''सांगायचंच म्हटलं तर, एक का आहे? कुणास ठाऊक त्या मुलाचे आई–वडील कोण असतील, कुठल्या खानदानाचे असतील. कदाचित त्यांना खानदानच नसेल!'' अपर्णा नापसंतीनेच म्हणाली.

''हे बघ अपर्णा, लहान मूल म्हणजे परमेश्वराचं रूप असतं. त्याला ना कोणी खानदान असतं, ना धर्म, ना जात. अगं, या सगळ्या माणसानं निर्माण केलेल्या गोष्टी आहेत. ईश्वरानं निर्माण केलेला धर्म एकच– तो म्हणजे मानवता आणि जाती दोनच– त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष. एका लहान बाळाचा या गोष्टीशी काहीही संबंध नसतो. ज्या संस्कारांत ते वाढतं, ते संस्कारच त्याचा धर्म आणि जात असते. आपण जर चांगले संस्कार त्या बाळावर केले, तर ते बाळसुद्धा एक चांगला सुसंस्कृत माणूस होईल.'' श्रीकांतने तिला समजावण्याचा प्रयत्न केला.

अपर्णला श्रीकांतचे म्हणणे हळूहळू पटत होते. थोडा विचार करून ती म्हणाली, ''ठीक आहे... तू म्हणतोयस तर...''

''गलत.. साफ चूक... केवळ मी म्हणतोय म्हणून होकार देऊ नकोस. हा जबरदस्तीचा मामला अजिबात नाही. मी तुझ्यापुढं एक प्रस्ताव मांडला आहे. तू त्याच्यावर समजदारीनं नीट विचार कर आणि मगच तुझा निर्णय सांग. याबाबतीत तू माझ्याशी शंभर टक्के सहमत असलीच तर आणि तरच ही गोष्ट आपण अमलात आणणार आहोत. अदरवाइज नो! कारण मूल दत्तक घ्यायचं म्हणजे पोरखेळ नाही. ही एक मोठी जबाबदारी आहे. लाइफटाइम कमिटमेंट आहे. एका छोट्या जिवाच्या आयुष्याचा प्रश्न आहे. तेव्हा...''

''केला.. श्रीकांत, मी पूर्ण विचारान्ती होकार भरला.''

''अपर्णा, किती समजूतदार आहेस तू. मी भाग्यवान, म्हणूनच मला तुझ्यासारखी बायको मिळाली!'' श्रीकांत अभिमानाने बोलला.

''आणि मी काय कमी भाग्यवान आहे? उगीच नाही मला तुझ्यासारखा गोड आणि प्रेमळ नवरा मिळाला–'' असं म्हणून अपर्णाने आपले मस्तक श्रीकांतच्या छातीवर टेकवले.

''तुम्ही दोघंही भाग्यवान आहात, म्हणूनच तुम्ही या बाळाची निवड केलीत. फार गोड बाळ आहे.'' अपर्णाच्या हातातल्या बाळाकडे पाहत अनाथाश्रमाचे चालक दयाळजी म्हणाले.

''दयाळसाहेब, म्हणजे... तुमची हरकत नसेल तर या बाळाची पास्ट हिस्टरी तुम्ही आम्हाला सांगू शकाल?'' श्रीकांतकडे पाहत शेखरने दयाळजींना विचारले.

''अलबत! का नाही?'' दयाळजी त्वरित उद्‌गारले. एक फाईल श्रीकांतच्या पुढ्यात ठेवत ते म्हणाले, ''या फाईलमध्ये या मुलाची सगळी हकिगत नमूद आहे; पण तपशील तसा फारच कमी आहे.''

''म्हणजे?'' श्रीकांतने फाइल हातात घेत विचारले.

''म्हणजे असं की... थोडक्यात सांगतो... एक जीपगाडी पुण्याहून मुंबईला चालली होती. त्या जीपमध्ये दोन स्त्रिया, चार पुरुष, ड्रायव्हर आणि हे मूल होतं. दुर्दैवानं त्या जीपला मोठा अपघात झाला आणि ड्रायव्हरसकट सगळे जागच्या जागीच ठार झाले. जीपसुद्धा जळून खाक झाली, पण वाचलं ते फक्त हे मूल. म्हणतात ना, देव तारी त्याला कोण मारी!''

''ओह गॉड... आणि मग?'' श्रीकांतने उत्सुकतेने दयाळजींना विचारले.

''मग काय– पोलिसांनी खूपच प्रयत्न केले; पण जीपची किंवा जीपमधल्या एकाही माणसाची ओळख पटू शकली नाही. त्या अपघाताविषयी चौकशी करायला किंवा या मुलावर हक्क सांगायला पण कोणीही नातेवाईक किंवा सगेसंबंधी पुढे आले नाहीत. शेवटी पोलिसांनी त्याला या अनाथाश्रमात दाखल केले. त्यासंबंधीची कागदपत्रे या फाईलमध्ये आहेत.''

ऐकून श्रीकांत खूप अस्वस्थ झाला. अपर्णाचे तर डोळेच भरून आले. 'एक्सक्यूज मी' असं म्हणून श्रीकांत अपर्णाला घेऊन एका बाजूला गेला.

''अपर्णा, आपण दुसरं एखादं मूल बघू. मला भीती वाटू लागली आहे.'' श्रीकांत अस्वस्थपणे म्हणाला.

''का, कसली भीती?'' अपर्णाने न समजून विचारले.

''नाही... या मुलाची अपशकुनी सावली आपल्या संसारावर पडली तर?'' श्रीकांतने आपली भीती व्यक्त केली.

‘‘काय बोलतोयस तू हे श्रीकांत? अरे, तूच तर म्हणाला होतास ना... की लहान मूल परमेश्वराचं रूप असतं म्हणून... अरे, त्या ॲक्सिडेंटमध्ये या बिचाऱ्या बाळाचा काय दोष? मला तर वाटतं की, इतक्या मोठ्या अपघातातून देवानं या बाळाला वाचवलं ते केवळ माझ्याचसाठी. माझा तर या बाळावर फारच जीव जडलाय.’’ असं म्हणून हातातल्या बाळाचा तिनं पटकन मुका घेतला.

अपर्णाचं हे बोलणं ऐकून श्रीकांत मनोमन खजील झाला आणि दोन्ही कान पकडून म्हणाला, ‘‘सॉरी अपर्णा. आणि माझे विचार किती चुकीचे होते, हे दाखवून दिल्याबद्दल थँक्स!’’ असं म्हणून दोघेही परत येऊन आपल्या जागेवर बसले. दयाळजी आणि शेखर त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत होते.

‘‘मग... या मुलाला दत्तक घेण्याचा तुमचा विचार पक्का आहे ना?’’ दयाळजींनी विचारले.

‘‘होय साहेब, दत्तक म्हणून आम्हाला हेच मूल हवं आहे.’’ अपर्णा निश्चयपूर्वक म्हणाली.

‘‘ठीक आहे; पण एक गोष्ट तुम्ही जरूर लक्षात घ्या. या अनाथाश्रमातली मुलं आम्ही कुणाही आल्या-गेल्यांना मुळीच देत नाही. मूल घेणाऱ्याचं खानदान, कौटुंबिक व आर्थिक स्थिती, सामाजिक स्थान, इत्यादी सगळ्या गोष्टींची तपासणी व पडताळणी करून आम्हाला त्याची नोंद ठेवावी लागते आणि आमचे पूर्ण समाधान झाल्यावर, मगच आम्ही मुलाचा कायदेशीर ताबा देतो.’’

‘‘ऑफकोर्स... ऑफकोर्स...! पुरती तपासणी आणि स्क्रुटिनी करून तुमचं समाधान झालं तर यांना मुलाचा ताबा द्या,’’ शेखर आदरपूर्वक दयाळजींना म्हणाला.

‘‘ठीक आहे,’’ असं म्हणून दयाळजींनी एक फॉर्म श्रीकांतपुढे ठेवला. ‘‘हा फॉर्म तुम्ही भरा आणि पंधरा दिवसांनी मूल न्यायला या.’’ असे दयाळजी म्हणेपर्यंत श्रीकांतने फॉर्म भरायला सुरुवातसुद्धा केली होती.

‘‘दयाळसाहेब, या मुलाची बर्थ डेट काय हो?’’ फॉर्म भरता-भरता श्रीकांतने विचारले.

‘‘ते तर आम्हाला पण माहीत नाही. तुमच्यासाठी, तो या आश्रमात दाखल झाल्याची तारीखच त्याची बर्थडेट समजा.’’ दयाळजींनी सुचवले.

‘‘आजचीच बर्थडेट धरायला काय हरकत आहे?’’ अपर्णा म्हणाली.

‘‘जशी तुमची इच्छा!’’ दयाळजींनी सहमती दर्शविली.

‘‘गुड आयडिया! आपण आजच्याच दिवशी त्याचा वाढदिवस साजरा करू आणि त्याचे बारसे पण आजच करू. त्याचे नाव ठेवू आनंद!’’ श्रीकांतने सुचविले.

सगळे कायदेशीर सोपस्कार पार पाडून श्रीकांत-अर्पणाच्या संसारात ‘आनंद’ आला आणि खरोखरीच त्यांचा संसार, जीवन आनंदी झाले. बाळाची कामे करण्यात वर्ष कधी सरले, ते समजलेच नाही. आनंदचा पहिला वाढदिवस अपर्णाने थाटात- अगदी शानदार पद्धतीने साजरा केला. किती पाहुणे, किती लहान मुले, किती खेळणी आणि विविध भेटी! आनंदची खोली अगदी खच्चून भरून गेली.

‘‘अभिनंदन! आनंदचं वाढदिवसाबद्दल अभिनंदन! आणि श्रीकांत, अपर्णा तुम्हा दोघांचंही अभिनंदन!’’ अशी गर्जना करीतच शेखरने प्रवेश केला.

‘‘आनंदचा वाढदिवस म्हणून त्याचं अभिनंदन ठीक आहे; पण आमचं कशाबद्दल?’’ अपर्णाने विचारले.

‘‘अरे, आपका भी ये हक बनता है मॅडम! अहो, तुम्ही दोघांनी एका अनाथ मुलाला घरी आणलंत आणि त्याला इतका लळा लावला, इतकं प्रेम दिलंत की, कदाचित त्याच्या सख्ख्या आई-वडिलांनीसुद्धा...’’

‘‘शेखर, एक मिनिट...’’ श्रीकांतने शेखरचे वाक्य अर्ध्यावरच तोडले. ‘‘पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आनंद आता अनाथ नाही. आम्ही आहोत ना त्याचे आई-वडील. काय अपर्णा....’’ असं म्हणत त्याने अपर्णाकडे अपेक्षेने बघितले, तर अपर्णा भेलकांडत आपल्या रूमकडे जात होती आणि शीला अन् जानकी तिला सावरायला तिच्यामागे धावत होत्या. ‘अहो, अगं’ करेपर्यंत आणि शीलानं तिला धरेपर्यंत अपर्णा जमिनीवर कोसळलीच. अचानक तिला काय झालं, हे न समजून श्रीकांत तिच्याकडे धावला आणि शेखरने त्वरित खिशातून मोबाईल काढून डॉक्टरांना फोन लावला. पार्टीतले सर्व पाहुणे

अपर्णाकडे धावले. श्रीकांत एकदम कावरा-बावरा झाला. जानकी व शीलाने अपर्णाला धरून बेडरूममध्ये नेले आणि पलंगावर झोपवले.

''एसी चालू करा,'' कुणी तरी म्हणाले. श्रीकांतने एसीचे बटण ऑन केले. श्रीकांतचा उतरलेला चेहरा बघून अय्यर त्याच्याजवळ आले आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला धीर देत म्हणाले, ''डोन्ट बी पॅनिक श्रीकांत. अरे, हे बर्थडेच्या प्रिपरेशनचं काम करून ते थकलं असेल, म्हणून तेला चक्कर आलं असंल बग.'' तेवढ्यात ''बाजूला व्हा... बाजूला व्हा... डॉक्टर आले,'' असं म्हणत डॉक्टरांना घेऊन शेखर तिथे आला. त्याने सगळ्यांना आधी बेडरूमबाहेर जाऊन थांबण्याची विनंती केली. श्रीकांत आनंदला घेऊन बेडच्या बाजूलाच उभा राहिला. डॉक्टरांनी अपर्णाची तपासणी केली आणि बाजूलाच टेन्शनमध्ये उभ्या असलेल्या श्रीकांतला म्हणाले, ''काँग्रेट्स मिस्टर श्रीकांत, अपर्णा आई होणार आहे आणि तुम्ही बाप होणार आहात!''

''काय? काय... माझी अपर्णा आई होणार आहे? ऐकलंस आनंद, अपर्णा आई होणार आहे!'' असं म्हणून कडेवरच्या आनंदचे तो पटापट मुके घेऊ लागला.

नव्या येणाऱ्या बाळासाठी अपर्णाने स्वेटर करायला घेतला होता; पण आनंदसारखा मधे-मधे येऊन विणलेला स्वेटर ओढीत होता. ती उचलून त्याला बाजूला ठेवीत होती. तो पुनः पुन्हा तिच्या कामात डिस्टर्ब करीत होता.

''छेऽ! या मुलानं अगदी जीव नकोसा केला,'' असं म्हणत ती आनंदवर जरा ओरडूनच म्हणाली, ''आनंद, अरे, मला काम का करू देत नाहीस? जा बरं, खेळ जरा तिकडं जाऊन-'' असं म्हणून पुन्हा तिनं आनंदला उचलून बाजूला ठेवलं. ठेवलं म्हणण्यापेक्षा जरा आदळलंच अन् साहजिकच आनंदनं भोकाड पसरलं. इतक्यात डोअरबेल वाजली. आनंदला तसंच रडत ठेवून अपर्णा दरवाजा उघडायला गेली. तिनं दरवाजा उघडताच नेहमीप्रमाणे तिच्या कडेवर आनंद असणारच, या समजुतीने त्याला घेण्यासाठी श्रीकांतने झटकन आपले दोन्ही हात पसरले; पण तो तिच्या कडेवर नाही, हे पाहून तो म्हणाला, ''हे काय... दरवाजा उघडायला आज आनंदला नाही घेऊन आलीस? आहे कुठं तो?'' त्यानं असं म्हणताच अपर्णानं आतल्या बाजूला

रडत असलेल्या आनंदकडे निर्देश केला आणि म्हणाली– ''तो काय रडत बसलाय तिकडं. आज तर रडून–रडून त्याने माझा जीव खाल्लाय नुसता!'' तिनं असं म्हणताच श्रीकांत आनंदच्या दिशेने झेपावला आणि उचलून त्याला छातीशी लावत चुचकारू लागला, ''अले, आला हं बाबा, काय झ्यालं आमच्या आनंदला... मम्मीनं माललं... च्यल आपन मम्मीला मालू.... च्यल–'' असं म्हणून आनंदचा एक हात आपल्या हातात घेऊन तो अपर्णाला खोटं–खोटं मारू लागला. अपर्णानं त्याचा हात झटकला आणि जरा घुश्श्यातच म्हणाली, ''काय हा पोरकटपणा लावलायस श्रीकांत... का मारतोस मला?''

''अगं, गंमत करतोय मी; चिडायला काय झालं?'' हसत–हसत श्रीकांत म्हणाला.

''गंमत सोड. हातपाय धुऊन घे. मी तुझ्यासाठी चहा आणते,'' असं म्हणून अपर्णा जाण्यासाठी वळत असतानाच श्रीकांतनं झटक्यात तिचा हात पकडला आणि म्हणाला, ''चहा आणशील गं, पण आधी आनंदसाठी मी काय आणलंय ते तर बघ–'' असं म्हणून हातातील एक भली–मोठी पिशवी पुढे केली; पण तिकडे दुर्लक्ष करून ''तूच बघत बस आणि दाखव तुझ्या आनंदला–'' असं म्हणून अपर्णा आत गेली.

श्रीकांत ती गेल्या दिशेने दिङमूढ होऊन बघतच राहिला. आज ही अशी का वागते आहे, हे काहीच त्याला कळेना. बहुतेक आज आनंदनं तिला खूपच त्रास दिला असला पाहिजे, असं त्याला वाटलं. शांत झाली की येईल ताळ्यावर, असं वाटून त्याने तो ट्रॅक जरा साइडिंगला टाकला आणि आनंदला उचलून आपल्या छातीशी घेतले.

''अले अले.. आज काय झ्यालं मम्मीला? आज तू मम्मीला फालच त्लास दिलास वाटतं... लब्बाल आहेस नुसता,'' असं स्वतःशीच पण आनंदला उद्देशून बोलत त्याने पुन्हा एकदा अपर्णा गेल्या दिशेने नजर टाकली. तेवढ्यात आनंदने भोकाड पसरले.

''ललायच्यं नाई – ललायच्यं नाई. हे बघ... हे बघ... पप्पानं आनंदसाठी काय आणलंय...'' असं म्हणून श्रीकांतने बॉक्समधून बाजा वाजवणारं माकड काढलं आणि त्याला चावी भरून आनंदपुढे ठेवलं. नाचत–नाचत आणि 'तड्

तड् तड्--- टम् टम् टम्' असा आवाज बाजावर काढणारं ते माकड बघून आनंद खदाखदा हसू लागला. ''काय शुंदर दिसतोय आमचा आनंद हशताना'' असं म्हणत तो आनंदचे पटापट मुके घेऊ लागला. तेवढ्यात...

''श्रीकांत, ठेव त्याला बाजूला आणि चहा घे-'' असं म्हणत अपर्णानं चहाचा कप त्याच्यापुढे केला.

''घेतो गं, पण आधी आनंदचं खेळणं तर बघ!'' श्रीकांत आपल्याच नादात म्हणाला.

''श्रीकांत, सगळं घर खेळण्यांनी भरलंय. आणखी हे खेळणं आणायची काही गरज होती का?'' अपर्णा घुश्श्यात म्हणाली.

''म्हनून क्याय झ्यालं? काय ले लब्बाला,'' असं आनंदला म्हणत त्याला खाली ठेवलं आणि अपर्णाच्या हातून चहाचा कप घेता-घेता, समजुतीच्या स्वरात तिला म्हणाला, ''अगं, एक तर मुलगा आपल्याला. आपल्याकडची प्रेम, माया... सगळी त्याच्यावर उधळून टाकू...''

त्याचे बोलणे अर्धवट तोडत अपर्णा म्हणाली, ''नाही श्रीकांत, आता आपल्या घरी अजून एक आणि ते पण आपलं स्वतःचं बाळ येऊ घातलंय. आता आपला पैसा आणि प्रेम त्याच्यासाठी राखून ठेवायची सवय लावून घे.''

हे ऐकून श्रीकांतच चक्रावला, ''अपर्णा, अगं, काय बोलतेस हे?'' संभ्रमित होऊन त्याने प्रश्न केला.

''बरोबर... अगदी बरोब्बर बोलतेय मी!'' असं ठामपणे म्हणत अपर्णा झटक्यात आत गेली आणि वाचा बंद झाल्यासारखा श्रीकांत ती गेली त्या दिशेकडे नुसता बघतच राहिला.

त्या दिवशी अपर्णाचं भाजी निवडण्याचं काम सुरू होतं. ''ही गावरान गवार निवडायची म्हणजे कटकट आहे अगदी!'' असं स्वतःशीच पुटपुटत अपर्णा ती बारीक गवार निवडत बसली होती. आनंद सारखा मधे-मधे लुडबूड करून निवडलेली गवार विस्कटून टाकत होता, म्हणून कपाटातली एक भली मोठी बाहुली काढून त्याला खेळायला दिली. इतक्यात डोअरबेल वाजली. ''आता या वेळी कोण?'' असं पुटपुटत तिनं दरवाजा उघडला, तर दारात शीला.

''ये, ये शीला. आज कशी काय वाट चुकलीस?'' असं म्हणून तिनं शीलाचं स्वागत केलं.

''अगं काय सांगू अपर्णा, या दोन पोरांच्या भांडणानं मी हैराण झालेय बघ. म्हणून पिंकूला इथल्याच एका नर्सरीत दाखल केलाय. तेवढीच दोन तास रिंकूला आणि पर्यायाने मला पण सुटका!

''अगं, म्हणजे पिंकूला आता शाळेत सोडून आले. आता तो दोन तासांनी येणार. एका जाचातून माझी सुटका. जाता-जाता तुझ्याकडे डोकवावं, असा विचार मनात आला म्हणून आले,'' असं म्हणून कडेवरच्या रिंकूला अपर्णाच्या स्वाधीन करीत शीला खेळत असलेल्या आनंदकडे धावली.

अपर्णानं मायेनं रिंकूला घेतलं आणि रिंकूच्या हातावरची खरचटल्याची जखम पाहून म्हणाली, ''अय्या, हे काय... याला इतकं खरचटलं कशानं?''

''ही पिंकूची करामत...'' शीला कृतक्कोपानं म्हणाली.

''पिंकूची करामत? म्हणजे?'' अपर्णानं विचारलं.

''म्हणजे वाघाचे पाय, हत्तीचे कान अन् उंटाची मान!'' शीला हसत म्हणाली.

''अगं, हसतेस काय अशी शीला? किती खरचटलंय बघ की-'' अपर्णा काळजीनं म्हणाली.

''अगं, काय सांगू अपर्णा, या रिंकूला पिंकूकडून वाचवायचं म्हणजे माझ्यासाठी एक मोठी डोकेदुखीच झालीय. किती वेळा सांगितलं की- रिंकू अजून लहान आहे, त्याच्या अंगाशी झोंबू नकोस; पण ऐकतच नाही. बघावं तेव्हा त्याच्या अंगाशी झोंबाझोंबी खेळत असतो. आज असंच खेळताना त्याची नखं लागली बघ याला.''

आणि अपर्णाला शीला हे सगळं सांगत असताना, अचानक अपर्णा एका कल्पनेत हरवली. आनंद त्या कापडी बाहुलीशी खेळता-खेळता बाहुलीला दोन्ही हातांनी धबाधबा मारतोय, उचलून आपटतोय आणि एकाएकी अपर्णाला बाहुलीच्या जागी तिचं छोटं बाळ दिसू लागलं. बाळ छोट्या

गादीवर झोपलं आहे. आनंद रांगत-रांगत बाळाच्या जवळ जातो. बाळाच्या छातीवर, पोटावर धबाधबा मारून हातातले खेळणे बाळाच्या डोक्यात मारतोय. बाळाच्या डोक्यातून भळाभळा रक्त वाहतंय, या कल्पनाचित्रात वाहून जात अपर्णा ''आनंदऽऽ'' असं जोरानं किंचाळली. तिचं किंचाळणं ऐकून शीला तिच्याजवळ आली.

''अपर्णा... अपर्णा'' म्हणून तिला गदागदा हलवले. ''अपर्णा, अपर्णा, अगं, काय झालं? आनंदच्या नावानं किंचाळलीस का? अगं, हा बघ आनंद माझ्याजवळ आहे - बाहुलीशी खेळतोय.'' शीला तिला समजवण्याच्या सुरात म्हणाली.

शीलाच्या या बोलण्याने अपर्णा भानावर आली आणि ''तेच तर!'' एवढं बोलून आनंदकडे धावली आणि बाहुली त्याच्या हातातून खेचून घेतली. आनंद मोठ्याने रडू लागला; पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून अपर्णा आत निघून गेली. तिच्या त्या वागण्याचे आश्चर्य वाटून आणि काहीच न समजून अपर्णा गेली त्या दिशेकडे शीला बघतच राहिली. आनंदचे रडणे तिच्या कानांत शिरतच नव्हते.

''अपर्णा... ए अपर्णा'' असं लाडानं बोलत श्रीकांतनं अपर्णाच्या कमरेत हात घातला.

''सोडा, सोडा मला! कुणी तरी बघेल,'' असं म्हणत अपर्णानं त्याचा हात झटकला.

''अगं, आपण आपल्या बेडरूममध्ये आहोत. इथं कोण बघणार आपल्याला?'' असं म्हणत श्रीकांतने पुन्हा तिला जवळ ओढण्याचा प्रयत्न केला.

''श्रीकांत, आनंद बाजूला झोपलाय-'' असं म्हणत अपर्णाने पुन्हा श्रीकांतचा हात झटकला.

''म्हणून काय झालं? आपलाच मुलगा आहे तो,'' असं श्रीकांत म्हणताच अपर्णा ताड्कन म्हणाली, ''नाहीऽ तो आपला मुलगा नाही. आपलं बाळ तर अजून माझ्या पोटात आहे!''

‘‘अगं अपर्णा, हे असं काय बोलतेस तू?’’ श्रीकांत आश्चर्यानं म्हणाला.

‘‘खरं तेच बोलतेय मी,’’ असं ठामपणे म्हणत अपर्णा अचानक वळून श्रीकांतच्या कुशीत शिरली आणि त्याच्या छातीवर हात फिरवीत म्हणाली, ‘‘श्रीकांत, माझं एक ऐकशील?’’

‘‘सांग ना– तुझं म्हणणं मी कधी टाळलंय?’’ तिला जवळ घेत आश्वासक सुरात श्रीकांत म्हणाला.

‘‘आपण... आनंदला बोर्डिंगमध्ये ठेवू या?’’ अपर्णाने चाचरत प्रश्न केला.

‘‘काऽऽय?’’ अपर्णाला अचानक दूर लोटत श्रीकांत किंचाळलाच.

‘‘अपर्णा, अगं, तू काय बोलतेयस, हे तुझं तुला तरी समजतंय का?’’ त्यानं आश्चर्यानं अपर्णाला प्रश्न केला.

‘‘हो. मी काय बोलतेय ते मला चांगलं समजतंय. तुलाच समजलं नसलं तर पुन्हा बोलते हवं तर. आपण आनंदला बोर्डिंगमध्ये ठेवू या.’’ अपर्णाने त्याच वाक्याचा पुन्हा ठामपणे उच्चार केला.

‘‘अपर्णा, तुला वेड लागलंय... पागल झालीस तू. यू आर गोइंग मॅडऽऽ’’ श्रीकांत त्राग्याने म्हणाला.

‘‘बिलकुल नाही. बुद्धी ताळ्यावर ठेवून चांगली शुद्धीत बोलतेय मी. वास्तव तेच सांगतेय. शहाणपणाचं बोलतेय.’’ अपर्णा शांतपणे म्हणाली.

‘‘हे... हे... वास्तव आहे? याला शहाणपणा म्हणतेस तू? स्वतःच्या मुलाबद्दल असं बोलशील तू?’’ श्रीकांतनं तप्त आवाजात विचारलं.

‘‘नाही, कधीच नाही.’’ तितक्याच शांतपणे अपर्णा म्हणाली.

‘‘नाही ना? मग आनंदबद्दल तुला असं बोलवतं तरी कसं?’’ त्याच तप्त आवाजात श्रीकांत म्हणाला.

‘‘कारण आनंद माझा मुलगा नाही आणि कुणा परक्या मुलाची छाया माझ्या मुलावर पडलेली मला मुळीच खपायची नाही!’’ अपर्णा निश्चयी आवाजात म्हणाली.

‘‘काय... काय म्हणालीस तू? आनंद परका?’’ आश्चर्याने श्रीकांत म्हणाला.

‘‘होय, परकाच! हेच वास्तव आहे. त्याच्या धमन्यांतून वाहणारं रक्त आपलं नाही, हे सत्य आहे.’’ स्वरातला ठामपणा कायम ठेवून अपर्णा म्हणाली.

‘‘अपर्णा, अपर्णाऽऽ अगं, काय वेड्यासारखं बोलतेयस हे? अगं, याच आनंदवर तू पोटच्या पोरासारखा जीव लावलायस, हे विसरू नकोस.’’ श्रीकांत अजीजीने म्हणाला.

‘‘काही विसरले नाही मी. सगळं लक्षात आहे माझ्या. पण आता माझं स्वतःचं मूल जर माझ्या पोटी जन्माला येणार आहे, तर परक्या मुलावर मी का म्हणून जीव लावावा?’’ अपर्णानं परखडपणे प्रश्न केला.

‘‘शिट्! अपर्णा, अगं, मी आता कसं समजावू तुला? जरा विचार कर– किती विश्वासानं आपण अनाथाश्रमातून आणलं आनंदला. त्या विश्वासाला असा तडा द्यायचा?’’ श्रीकांत काकुळतीने म्हणाला.

‘‘मी कुठं म्हणते, विश्वासाला तडा द्यायचा म्हणून! त्याला सोडून देऊ, असं नाही म्हणत मी. मी इतकंच म्हणतेय की, आपण त्याला बोर्डिंगमध्ये ठेवू. तिथं तो चांगल्या प्रकारे वाढेल, मोठा होईल. शिकून शहाणा होईल आणि त्यासाठी होणारा सगळा खर्च आपण करू या की. ती जबाबदारी झटकत नाहीये मी.’’ अपर्णा समजावण्याच्या स्वरात म्हणाली.

‘‘पण अगं, बोर्डिंगमध्ये त्याला आई–वडिलांचं प्रेम मिळणार आहे का?’’ तिचं न पटून श्रीकांत म्हणाला.

‘‘ते तर त्याच्या नशिबातच नसावं! आई–वडिलांचं प्रेम त्याच्या नशिबात असतं– तर लहानपणीच आई–बापाला गिळून बसला नसता. उलट हे त्याचं नशीब समज की, आपण त्याला अनाथाश्रमातून उचलून बोर्डिंगमध्ये घालतोय.’’ अपर्णानं पुन्हा आपलं म्हणणं श्रीकांतच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला.

‘‘नाही... अपर्णा... असे होणे नाही. आनंद आपल्या मुलाबरोबरच वाढणार... शिकणार... मोठा होणार...’’ श्रीकांत ठाम स्वरात म्हणाला.

''ठीक आहे. हाच जर तुझा अंतिम निर्णय असेल, तर मी घर सोडून जाते.'' त्याच ठामपणे अपर्णा म्हणाली.

''अपर्णा... अपर्णा.. आता मात्र तू हे ठार वेड्यासारखी बोलतेयस!'' श्रीकांत उद्वेगाने म्हणाला.

''काही म्हण; पण आनंद आणि मी– आम्हा दोघांपैकी या घरात कुणी राहायचं, याचा निर्णय आता तुलाच घ्यावा लागेल.'' असं म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवून अपर्णानं डोक्यावरून पांघरूण घेतलं.

श्रीकांत पुरता हताश झाला. 'परमेश्वरा, कसलं धर्मसंकट उभं केलंस माझ्यासमोर...?' विचार करून त्याचं डोकं फुटायची वेळ आणि नाइलाजाने त्याने मनात निर्णय घेतला.'ठीक आहे. अपर्णा, तूच राहशील या घरात. आय प्रॉमिस यू. ज्या दिवशी तुझं मूल या घरात येईल, त्या दिवशी आनंद या घरात नसेल. बस्स? झालं तुझं समाधान?' असा विचार करून श्रीकांतने व्याकुळपणे शेजारी निजलेल्या आनंदकडे नजर टाकली. आनंद झोपेत खुदुखुदु हसत होता.

''श्रीकांत... श्रीकांतऽ'' अशा दोन–तीन वेळा हाका मारूनही श्रीकांतचे लक्ष जात नाही, असे पाहून शेवटी ऑफिस प्रोटोकॉलला न जुमानता ''श्रीकांतऽऽ'' अशी शेखरने मोठ्यांदा हाक मारली आणि श्रीकांतने दचकूनच फाइलीतून डोके वर काढून शेखरकडे बघितले.

''अरे, लक्ष कुठे आहे तुझं? डोकं फाईलीत खुपसलं होतंस, तरी मन नक्कीच कुठे तरी भरकटलं होतं.'' असं म्हणत शेखर श्रीकांतच्या समोरच्या खुर्चीत स्थानापन्न झाला. ''काय बच्चू, इतका कसल्या गहन विचारात गढला होतास?'' त्याने श्रीकांतला प्रश्न टाकला.

''अरे शेखर, तू कधी आलास?'' श्रीकांतने विचारले.

''मला येऊन जमाना झाला यार; पण तुझं लक्षच नाही. इतका कसल्या विचारात गढला होतास?''

''विचार? छे, कसला विचार? विचार–बिचार काही नाही. नथिंग ऑफ द सॉर्ट. तू चहा घेणार? खरं तर, आजची पार्टी तुझ्याकडे लागू आहे.

एक रेग्युलर आणि एक स्पेशल- अशी दोन इन्क्रिमेंट मिळाली आहेत ना तुला?'' असं म्हणत चहाची ऑर्डर करण्यासाठी श्रीकांतचा हात बेलच्या बटणाकडे गेला. इतक्यात ''नको... चहा नको...'' असं म्हणत शेखरने त्याला अडवले.

''चहाचं राहू दे. तू विचार कसला करत होतास, ते आधी सांग.'' जाब विचारण्याच्या स्वरात शेखरने विचारले.

''आता काय आणि कसं सांगू तुला शेखर... अपर्णानं माझ्यापुढे एक मोठा प्रॉब्लेम उभा केलाय.'' धीम्या गतीने श्रीकांत म्हणाला.

''प्रॉब्लेम? कसला प्रॉब्लेम?'' शेखरने विचारले.

''थांब-'' असा डाव्या हाताने शेखरला इशारा करून श्रीकांतने इंटरकॉम उचलला आणि ''मी सांगेपर्यंत कुणालाही माझ्याकडे पाठवायचं नाही किंवा फोन द्यायचा नाही.'' अशा सूचना मिसेस डिसोझाला देऊन, धीम्या गतीने तो आपला प्रॉब्लेम शेखरला सांगू लागला. ऐकता-ऐकता शेखरच्या चेहऱ्यावर कधी प्रश्नचिन्ह, कधी आश्चर्य, कधी खेद, तर कधी सहानुभूती व निराशा असे भाव उमटत होते.

सगळं सांगून झाल्यावर शेखर म्हणाला, ''श्रीकांत, तू जे काही सांगितलंस, त्यावर माझा विश्वासच बसत नाही!''ह्न

''विश्वास तर माझाही बसत नाही. शेखर, अजूनही वाटतंय की, हे मला पडलेलं एक घाणेरडं स्वप्न असावं. पण नाही शेखर, दुर्दैवानं हे सत्य आहे.'' असं म्हणत असताना श्रीकांतला भरून आलं. शेखर उठला. टेबलाला एक वळसा घालून श्रीकांतजवळ गेला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून, त्याला शांत करत म्हणाला, ''ठीक आहे. तू आधी शांत हो. काळजी करू नकोस. एका दृष्टीने तू घेतलेला निर्णय योग्यच आहे.'' असं म्हणत असतानाच थोडा विचार करून शेखर म्हणाला, ''डोन्ट वरी. आपण आनंदला पुन्हा आश्रमात पोहोचविण्याची व्यवस्था करू. मी बघतो काय करायचं ते. बाय द वे, अपर्णावहिनींची डिलिव्हरी डेट कधीची आहे?''

''डिलिव्हरी डेट...'' असं तो म्हणतो इतक्यात टेबलावरचा त्याचा मोबाईल वाजू लागला.

''आता कोण?'' असं म्हणत चरफडत फोन बघितला आणि घरचा फोन बघून हिरवे बटण दाबले.

''हं, बोल मंजुळा... काय? कधी? बरं-बरं, आलोच मी.'' असं म्हणून त्याने फोन बंद केला आणि एकदम उठून शेखरला म्हणाला, ''शेखर, अपर्णाच्या पोटात दुखायला लागलंय. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं.''

''चल! मी पण येतो बरोबर-'' असं म्हणून शेखरही उठला आणि दोघेही घाईनेच बाहेर पडले.

अपर्णा लेबर रूममध्ये गेलेली होती. कॉरिडॉरमध्ये श्रीकांत, शेखर, शीला चिंतातूर मुद्रेने बसली होती. नर्सेस, वॉर्डबॉईज यांची धावपळ चालली होती. डॉक्टर शर्मिला आत अपर्णाला ट्रीटमेंट देत होत्या. काही कामासाठी त्या बाहेर आल्या. श्रीकांत एकदम त्यांच्याकडे धावला.

''इज शी ऑलराईट?'' त्याने अधीरतेने विचारले.

''मिस्टर श्रीकांत, परिस्थिती थोडी गंभीर आहे. बट डोन्ट वरी, वुई विल डू इट सेफली अ‍ॅज पॉसिबल.'' डॉक्टर शर्मिलांनी त्याला धीर दिला.

''पण डॉक्टर, डिलिव्हरी डेट तर अजून महिन्याने...'' श्रीकांत उद्‌गारला.

''हो, पण जरा कॉम्प्लिकेशन्स झालीय. ऑपरेशन करून डिलिव्हरी आताच करावी लागेल.''

''पण तिची तब्येत बरी आहे ना?'' मधेच शीलानं विचारलं.

''नाही. तब्येत थोडी गंभीर आहे,'' असं शीलाला सांगून श्रीकांतकडे वळून त्या म्हणाल्या, ''मिस्टर श्रीकांत, मी तुम्हाला अंधारात ठेवू इच्छित नाही. ऑपरेशनदरम्यान आईच्या जिवाला किंवा बाळाला धोका उद्‌भवू शकतो. कदाचित...''

''नाही डॉक्टर... तुम्ही असं काही होऊ देणार नाही. बाळ आणि अपर्णा दोघेही मला हवे आहेत- प्लीज...'' श्रीकांत अजीजीने म्हणाला.

''होय मिस्टर श्रीकांत, म्हणून तर आम्ही ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतलाय. पण त्यासाठी तुमचे संमतीपत्र लागेल,'' असं म्हणून त्यांनी मागे हातात फॉर्म घेऊन उभ्या असलेल्या नर्सला इशारा केला आणि त्या लगबगीने आत गेल्या.

फॉर्मवर सही केली आणि श्रीकांत मट्कन बाजूच्या बाकावर बसला. त्याची छाती धडधडू लागली. डोळ्यासमोर अंधारी आली. परिस्थिती ओळखून शेखर त्याच्याकडे झेपावला. शीला पट्कन पाणी आणायला धावली. शेखरने आपल्या दोन्ही हातांच्या मिठीत श्रीकांतला सावरले. आता मात्र श्रीकांतच्या मनाचा बांध फुटला. एवढ्या धीराचा श्रीकांत– पण त्याला सुद्धा हुंदके आवरेनात.

''श्रीकांत प्लीज... बी ब्रेव्ह... नथिंग विल गो रॉंग... सगळं काही ठीक होईल–'' असं म्हणत शीलाने आणलेले पाणी त्याने श्रीकांतपुढे केले.

थोड्या वेळाने लेबर रूमचे दार उघडले. डॉ. शर्मिला हसतमुखाने बाहेर आल्या. ''कॉंग्रॅच्युलेशन्स.... श्रीकांत, तुम्हाला मुलगा झालाय आणि बाळ–बाळंतीण दोघेही सुखरूप आहेत.'' हे ऐकताच श्रीकांतनं आवेगानं डॉ. शर्मिलाचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन मनापासून त्यांचे आभार मानले आणि अधीरपणे विचारले, ''आम्ही आत जाऊन तिला बघू शकतो?''

''नॉट नाऊ! थोड्या वेळाने पेशंटला रूममध्ये आणतील; पण काळजी करू नका. दोघेही एकदम नॉर्मल आहेत.'' असं म्हणून डॉक्टर त्यांच्या केबिनकडे गेल्या.

''पेशंटला रूममध्ये आणलं आहे,'' हे शब्द सिस्टरने बोलताच श्रीकांत झप्कन आत धावला. मागोमाग शेखर आणि शीलासुद्धा.

आत शिरताच श्रीकांत प्रथम झेपावला तो अपर्णाकडे. ''अपर्णा, खरंच आज पुन्हा एकदा तू मला मिळालीस. मला तर भीतीनं माझा जीव जातोय की काय, असं वाटायला लागलं होतं. थँक्स गॉड... थँक्यू व्हेरी मच...'' असं म्हणत त्याने शेजारच्या पाळण्यातल्या बाळाकडे नजर टाकली.

''किती गोड आहे ना बाळ!'' तो म्हणाला.

''हो, अगदी आपल्या आनंदसारखं,'' अपर्णा म्हणाली. आणि इकडे – तिकडे बघत तिने विचारले, ''हे काय.. आनंदला नाही आणलंस बरोबर?''

''नाही... म्हणजे आम्ही... म्हणजे त्याला...''

''म्हणजे... तुम्ही आनंदला बोर्डिंगमध्ये पाठवलंत...?'' अपर्णानं घाईत विचारलं. यावर काय बोलावं, हे श्रीकांतला सुचेना. तेव्हा शेखरच पुढे होत म्हणाला,

''नाही... म्हणजे अजून नाही पाठवलं; पण तुम्ही घरी यायच्या आत आम्ही त्याला परत आश्रमात पाठवणार आहोत. डोन्ट वरी– मी करीन सगळी व्यवस्था.''

हे ऐकताच अपर्णा एकदम आवेगाने म्हणाली,

''नाही... नाही... आनंदला कुठेही पाठवायचं नाही. माझा आनंद मला हवाय!'' हे ऐकून श्रीकांत आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला,

''पण तू तर म्हणत होतीस की...''

''वेडी, वेडी झाले होते मी. त्या वेळी कोणतं भूत माझ्या डोक्यावर बसलं होतं, कुणास ठाऊक! पण जेव्हा मला बाळंतपणाच्या कळा जाणवू लागल्या, मी जगतेय की मरतेय असं वाटू लागलं; तेव्हा मनात विचार आला की, मी मेले तर माझ्या बाळाला कोण सांभाळेल? कोण बघेल त्याच्याकडे? कोण देईल त्याला आईचे प्रेम? या प्रश्नांनी मी हवालदिल झाले. मातृत्वाच्या भावनांनी माझा रोम–रोम आकांत करू लागला. परमेश्वरा, माझ्या बाळासाठी तरी मला वाचव. माझ्या बाळाला आईविना करू नकोस... दया कर... दया कर... आणि देवानं माझी ती आर्त हाक ऐकली आणि तेव्हा मला जाणवलं, ॲक्सिडेंट झाला, तेव्हा मरताना त्या माऊलीनं असाच आकांत आनंदसाठी केला असेल. अशीच कळवळून देवाला साद घातली असेल. तिच्या नशिबात कदाचित मुलाचं प्रेम नसेल, म्हणून तिची हाक देवाला ऐकूच गेली नाही. पण ईश्वरकृपेने माझ्या नशिबात... दोन–दोन मुलांचं प्रेम आहे. त्याची मी का म्हणून वाटणी करू? श्रीकांत, माझ्या आनंदला ताबडतोब घेऊन ये.''

हे सर्व ऐकून श्रीकांतचे डोळे पाणावले. 'ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे. फार मोठ्या धर्मसंकटातून तू मला वाचवलंस...' असे मनोमन देवाचे आभार मानता-मानता त्याच्या डोळ्यांत ढगांनी गर्दी केली. परिस्थिती ओळखून शेखर म्हणाला, ''श्रीकांत, तू थांब इथेच. मी आणि शीला जाऊन आनंदला घेऊन येतो,'' असं म्हणून त्याने मागे वळून शीलाकडे पाहिले, तर ती गायब! ''अरे, ही शीला कुठं नाहीशी झाली?'' तो पुटपुटला. इतक्यात आनंदला कडेवर घेऊन शीलानं दारातून एंट्री केली आणि म्हणाली, ''हे बघा, मी आनंदला घेऊन आलेय.'' असं म्हणत तिनं आनंदला अपर्णाच्या स्वाधीन केलं. अपर्णा मायेनं आनंदचे मटामटा मुके घेऊ लागली.

''पण शीला, तू कशी काय आनंदला घेऊन आलीस?'' शेखरनं आश्चर्याने विचारले.

''अहो महाराज, मघाशी अपर्णा जेव्हा- 'हे काय, आनंदला नाही आणलंत बरोबर?' असं म्हणाली, तेव्हाच मी तिच्या डोळ्यांत आनंदविषयीचं अपत्यप्रेम बघितलं आणि आनंदला आणायला धावले. आईचं अंतःकरण मला कळतं बरं! आई आहे मी दोन-दोन मुलांची!'' आनंदला अपर्णाकडे देत शीला म्हणाली. आनंदला अपर्णानं झेपावून आपल्या कुशीत घेतलं आणि पटापट त्याचे मुके घेत ती म्हणाली, ''ए शीलामावशी, तू एकटीच नाही काही, मीसुद्धा आता आई झालेय दोन-दोन मुलांची.''

हे ऐकून, नवीन बाळाला हळुवारपणे हातात घेत श्रीकांत दोघींना उद्देशून बाळाच्या वतीने बोबड्या सुरात म्हणाला, ''तुमी दोदी पन द्यास्त भाव खाऊ नका, माधा बाबा पन बाप धालाय दोन-दोन मुलांचा!'' श्रीकांतच्या या उद्‌गारांनी मात्र हॉस्पिटलची ती खोली हास्यतुषारांनी भिजून चिंब झाली.

❒ ❒ ❒

# लेखक परिचय

◆ **संपूर्ण नाव** : पांडुरंग हरी कुलकर्णी – जन्मदिनांक ६ जून १९४३.

◆ **शिक्षण** : बीए (स्पेशल)

◆ **व्यवसाय** : रंगभूमी / आकाशवाणी / दूरदर्शन / चित्रपट कलावंत आणि लेखन (५० वर्षे)

◆ **लेखन प्रपंच** : मुंबई आकाशवाणी 'सहज सुचलं म्हणून' या कार्यक्रमाचे लेखन

: मुंबई दूरदर्शनसाठी 'ज्ञानदीप' या कार्यक्रमाचे लेखन.

: कलर्स मराठी चॅनेलसाठी 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमाचे लेखन.

: महाराष्ट्र शासन (आरोग्य विभाग) साठी 'होण्या आधीच काळजी घ्या' या एड्स विरोधी नाटकाचे लेखन.

: सर्व मंगल सावधान आणि लागीरं या दोन एकांकिकांचे लेखन (पारितोषिकप्राप्त)

◆ **प्रकाशित साहित्य**

१) असंभव (कथासंग्रह)

२) मॉर्निंग वॉक (ललित संग्रह)

३) सहज सुचलं म्हणून (नभोवाणी श्रुतिका संग्रह)

४) मॅरेज पन्नाशी आणि इतर कथा

५) दिवाळी अंकांतून / मासिकांतून अनेक कथा, कविता, लेख, मुलाखती इ.

: अनेक व्हिडिओ/ऑडिओ अल्बमसाठी गीत–संवाद लेखन

- **इतर** : १९६२ मध्ये शाहीर साबळे पार्टीत सुरुवात केली आणि तेव्हापासून रंगभूमी, दूरदर्शन, चित्रपट क्षेत्रात ५०/५५ वर्षे अभिनेता, लेखक, गीतकार, निवेदक म्हणून कार्यरत.
- **पारितोषिके** : नाट्यस्पर्धा - अभिनय (नाटक-भूमिका)

  १) आमचं नाव बाबूराव - बाबूराव
  २) सौजन्याची ऐशीतैशी - नाना बेरके
  ३) नाथ हा माझा - मुनीम
  ४) काळोख देतं हुंकार - नारबा
  ५) मेजर चंद्रकांत - मेजर चंद्रकांत
  ६) सुरकुत्या (एकांकिका)- म्हातारा (अभिनय - दिग्दर्शन)
  ७) अंगाई (एकांकिका) - तो (अभिनय - दिग्दर्शन)
  ८) सर्वमंगल सावधान (एकांकिका - लेखन / दिग्दर्शन)
  ९) लागीरं (एकांकिका) दिग्दर्शन
- **कथा** : मेरे सामनेवाले खिडकीमे या कथेस (संवाद-नाशिक) डॉ. अ. वा. वर्टी विनोदी कथा पारितोषिक.
- **पुरस्कार** : युवा महाराष्ट्र (पुणे) नाट्यरत्न जीवनगौरव पुरस्कार.
- **सन्मान** १) ७८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन (नाशिक - कविता वाचन.

  २) भक्तिसेवा फाउंडेशन राज्यस्तरीय कवितावाचन
  ३) महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान - लावणी महोत्सव (निवेदन)
  ४) सांस्कृतिक केंद्र (उदयपूर) ५० वा स्वातंत्र्य महोत्सव (निवेदन)
- **आगामी** : संस्कार (कादंबरी)

  देवा, तू सुद्धा? (नाटक)

  विविधा (काव्यसंग्रह)

■



पांडुरंग कुलकर्णी

# मॅरेज पन्नाशी आणि इतर कथा

सहज सुचलं म्हणून, असंभव, मॉर्निंग वॉक ही माझी पहिली तीन अपत्ये. 'दो या तीन' हा लाल त्रिकोनी कायदा फक्त मानवी अपत्यांसाठीच आहे. साहित्यिक अपत्यांना तसे काही बंधन नाही. आणि म्हणून मी 'मॅरेजपन्नाशी आणि इतर कथा' हे माझे चौथे अपत्य आपल्या पदरात टाकत आहे. मी भाग्यवान असा की माझ्या 'सहज सुचलं म्हणून' या पुस्तकाला सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता श्री. मानसिंग पवार यांची प्रस्तावना लाभली. 'मॉर्निंग वॉक' या माझ्या दुसऱ्या पुस्तकाला प्रथितयश लेखक / गीतकार प्रा. प्रवीण दवणे यांची प्रस्तावना लाभली आणि 'असंभव' या माझ्या तिसऱ्या पुस्तकाला वाचस्पती भाषाप्रभू प्रा. मिलिंद जोशी यांची प्रस्तावना लाभली. आणि अहो भाग्यम की या माझ्या चौथ्या पुस्तकाला साहित्यशारदेच्या मंदिराच्या शिखरावर विराजमान असलेले आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, उच्चपदस्थ श्री. लक्ष्मीकांतजी देशमुख यांची प्रस्तावना लाभली आहे हा माझ्या अल्पशा साहित्य सेवेचा बहुमान आहे असे मी समजतो.

या सर्व थोर प्रभृतीच्या प्रोत्साहनाने हात अजून लिहिता आहे. वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे, असे म्हणतात. म्हणोत बापडे. पण...

'कुणी वाचावे वा न वाचावे –<br>
लिहिणाराने लिहीत जावे<br>
लिहीत जावे लिहीत जावे !!!'

मराठी नाटक आणि मराठी साहित्य अमृत आहे म्हणजे त्याला मृत्यू नाही. आज जरी त्याची दशा हीनदीन दिसत असली तरी अक्षरात इतके बळ आहे की दिशा बदलून कधी ना कधी ते, निश्चितच माध्यमांच्या शिखरावर विराजमान होईल. कवी माधव ज्युलियन यांच्या 'मराठी असे आमुची मायबोली' ह्या कवितेच्या तालावर मी असे म्हणेन की ...

जरी छंद आज वाचनाचा निमाला<br>
जरी अक्षरे जाहली पोरकी<br>
दृकश्राव्य सीमा न पुरतील तेव्हां<br>
अक्षरेच होतील ही बोलकी !!